# ''विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**इतिहास विभाग**

**तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोध प्रबंध**

**संशोधक**
**प्रविण बाळासाहेब पिसे**

**मार्गदर्शक**
**डॉ. एस.आर. शेंडे**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
एस.पी. कॉलेज, पुणे - ३०.

**मे - २०१७**

# ''विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

### इतिहास विभाग

### तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोध प्रबंध


**संशोधक**

**प्रविण बाळासाहेब पिसे**

**मार्गदर्शक**

**डॉ. एस.आर. शेंडे**

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख

एस.पी. कॉलेज, पुणे - ३०.


**मे - २०१७**

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, तात्त्विक, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी प्रविण बाळासाहेब पिसे यांनी **''विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान''**या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यू.जी.सी) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरुन सदर प्रंबधाचे काम केलेले आहे.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१७

**मार्गदर्शक**
**डॉ. एस.आर. शेंडे**

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, **''विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान''** submitted by **Shri. Pise Pravin Balasaheb** to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph.D.) is a confide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview and submission Viva.

**Place : Pune**

**Date :**

**Signature of Research Guide**

# घोषणापत्र

मी प्रविण बाळासाहेब पिसे असे घोषित करतो की, **''विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान''** हा माझा स्वतःचा शोधप्रबंध असून मी हा शोधप्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर शोधप्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती संशोधनात्मक विधाने ही मी स्वतः अभ्यासून घेतलेली आहेत.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१७

**संशोधक**
**प्रविण बाळासाहेब पिसे**

# ऋणनिर्देश

`टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयात विद्यावाचस्पती` पीएच.डी. पदवीसाठी **''विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणीसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान''** हा शोधप्रबंध लिहीण्याकरिता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने बहुमोल संधी प्राप्त करुन दिली. त्यामुळे मी विद्यापीठाचा आभारी आहे.

सदरचा शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी व आवश्यक साधनसामुग्री संकलीत करण्यासाठी अहमदनगर कॉलेज, अहमदनगर, न्यू आर्टस, कॉमर्स & सायन्स कॉलेज, अहमदनगर, एस.पी.कॉलेज, पुणे, गोखले इस्टिटयुट, पुणे. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा ग्रंथालय, पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालय, पुणे, डेक्कन कॉलेज, पुणे. यांनी विष्णू परशुराम शास्त्री पंडितांचे विविध जुने ग्रंथ व साहित्य अभ्यासण्यास उपलब्ध करुन दिले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच मुंबई मराठी ग्रंथालयाचेही आभार मानतो. त्यांनीही या प्रबंधासाठी अनेक संदर्भ साहित्य उपलब्ध करून दिले.

प्रस्तुत प्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. शेंडे एस. आर. (एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे) यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा मनःपुर्वक ऋणी आहे. तसेच सन्माननिय डॉ. बी. डी. कुलकर्णी अधिष्ठाता टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, डॉ. सौ. नलिनी वाघमारे इतिहास विभागप्रमुख, व सह. प्राध्यापिका डॉ. सौ. स्वराली कुलकर्णी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले त्यांचाही मी आभारी आहे. त्याचप्रमाणे सर्व कार्यालयीन सेवकवर्गाने केलेल्या सहकार्यामुळे मी त्यांचा ऋणी आहे.

प्राचार्य डॉ. खांदवे ए.टी. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा, प्राचार्य डॉ. शेळके आर.डी.(धन्वंतरी महाविद्यालय, ढवळपूरी, पारनेर), प्राचार्य डॉ. निंबाळकर जी. आर. , सुभाष आण्णा कुल कॉलेज, केडगाव यांनी आपला अमुल्य वेळ खर्च करून मला तासन तास मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच प्रा. सौ. जामदार एस. आर. इतिहास विभागप्रमुख,

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व दौंड ता. कला, वाणिज्य, महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सौ. अरुणा मोरे यांनी मला सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल, गवळी एन. एस. तसेच सेवक वर्ग यांनीही मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

वेळोवेळी आत्मीयतेने मदत करणारे माझे सहकारी मित्र डॉ. कुरुमकर एन.पी., डॉ. कुरुमकर आर. एम., डॉ. रणसिंग एन.बी., प्रा. डॉ. उंडे एस.बी. माझे मित्र भापकर आर.बी. यांनी मला विशेष सहकार्य केले मी त्यांचाही अत्यंत ऋणी आहे.

माझ्या संशोधनाच्या आणि अभ्यासाच्या काळात माझे वडील श्री. बाळासाहेब विष्णु पिसे, मातोश्री सौ. सिताबाई तसेच माझी पत्नी सौ. पूनम व कन्या आराध्या हिने संशोधन कार्यामध्ये वेळोवेळी सहकार्य केले.

प्रबंधाचे टंकलेखन सुबकरित्या करुन देणारे, अभिनव टाईपरायटिंग इन्स्टिटयुटचे प्राचार्य बुनगे आर.आर. यांचेही आभार, तसेच उपमुद्रित तपासून देण्याचे काम रेणूकादेवी उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव पिसा सौ. मेंगावडे मॅडम यांनी केले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

**स्थळ : पुणे**

**दिनांक :     /    /२०१७**

**संशोधक**
**प्रविण बाळासाहेब पिसे**

# संशोधन प्रस्तावना

एखादया व्यक्तिच्या चारित्र्याचा अभ्यास म्हणजे केवळ त्या व्यक्तिचा अभ्यास नसतो, तर ज्या समाज घटकात ती व्यक्ती वाढली, घडली त्या समकालीन गोष्टींचा संदर्भ असतो. व्यक्ती तिचा जीवन कालखंड आणि विशिष्ट कर्तृत्व यांचे साकल्याने आकलन करून घेण्यासाठी इतिहासकाराला संशोधनाची दृष्टी असणे आवश्यक असते. व्यक्ती आणि तिचे कर्तृत्व यांचे सत्य दर्शन घडविण्यासाठी तसेच घटना प्रसंगाचा व्यक्ती कर्तृत्वाचा आणि कालखंडाचा अन्वयार्थ लावण्यासाठी संशोधन आवश्यक असते.

एकोणिसाव्या शतकात समाज जीवनाच्या विविध अंगात मोठया प्रमाणावर बदल घडून येवू लागले. ब्रिटिशांच्या राजवटीमुळे राजकीय गुलामगिरीचा नवा कालखंड सुरू झाला याची खंत फार थोडयाच लोकांना जाणवली. आपली राजकीय घडी अत्यंत मुत्सद्दीपणाने बसवण्याचा प्रयत्न ब्रिटीश अधिकाऱ्यांनी केला. त्याचाच एक भाग म्हणून नवे शिक्षण देण्याची आणि येथील समाजात नव्या सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. अशातच विष्णू शास्त्री पंडितांनी विद्या खात्यात प्रवेश करून त्या विभागात नोकरी केली. त्यापाठीमागे त्यांचा उद्देश असा होता की, लोकांना आधुनिक विद्येने सुसंस्कृत केले तरच त्यांच्या हातून देश व स्वदेश सेवा होणार आहे. स्वदेश बांधवांचे कल्याण साधने हाच ध्यास त्यांनी घेतला होता.

खडतर परिस्थितीत आपले बालपण व शिक्षण घेतल्यानंतर सरकारी नोकरीत प्रवेश केला त्यातच त्यांनी विद्यादानाचेही कार्य केले पण विद्यादानाच्या या कार्यात मन न रमल्याने १८६४ च्या सुमारास सेवानिवृत्ती घेवून लोकसेवेच्या उच्च ध्येयाने प्रेरीत होवून त्यांनी वृत्तपत्र व्यवसाय स्विकारला.

`एखादी राजवट जावून दुसरी राजवट स्थिरस्थावर होईपर्यंत जो काळ जातो तो समाजप्रगतीला हानीकारक असतो. महाराष्ट्र अशीच परिस्थिती

अनुभवीत होता. अनेक संस्थाने खालसा झाली, जहागी-या सरकार जमा झाल्या लोक बेरोजगार झाले व अशातच १८५७ चे बंड उदयास आले. परंतू अशा परिस्थितीतही इंग्रजांनी प्रजेत दरारा कायम ठेवला. इंग्रजांनी पाश्चात्य विद्या व संस्कृतीने समाजाला जितके दिपवता येईल तितके दिपविण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम असा झाला की इंग्रजी सत्ता आवश्यक आहे असे सुशिक्षीत तरूणांना वाटू लागले. गुणांपेक्षा जातीवर पूर्वी भर दिला जात होता ही उणीव इंग्रजसत्तेने भरून काढली.

स्त्री शिक्षणास बंदी, बाल-जरठ विवाह, विधवापण, पुनर्विवाहास प्रतिबंध पुरूषप्रधानता या सारख्या अनेक सामाजिक प्रश्नांमुळे स्त्रियांवर जुलूम होत होता. समाज व्यवस्थेने स्त्री वर्गावर अनेक प्रकारचे सामाजिक निर्बंध लादले होते. स्त्रिया घराबाहेर पडणे त्याकाळी शिष्ठाचारास धरून नव्हते. त्यामुळे स्त्रियांच्या व्यक्तीमत्वाचा विकास पुर्णतः खुंटला होता. बहुपत्नीत्व व पुरूष प्रधानता यामुळे घरात स्त्रियांना उचीत स्थान व सन्मान नव्हता. विधवा स्त्रिची स्थिती अतीशय सोचनीय होती. बालविवाहाची प्रथा सर्रास रूढ होती. तसेच जरठ कुमारी विवाह होत होते. अशा प्रकारामुळे विधवा स्त्रियांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत गेली. अशा विधवा स्त्रियांना समाज व कुटुंबात गौण स्थान मिळत होते. केशवपन प्रकारामुळे तिला विद्रुप बनवले जात होते. अशा स्त्रिया व्रतवैकल्यात स्वतःला गुंतवून घेत. मानवतेच्या दृष्टीकोणातून स्त्रीकडे पाहाण्याची सामाजिक प्रवृत्ती शिल्लक राहिली नव्हती.

अशा पार्श्वभूमीवर विष्णू परशुराम शास्त्री पंडितांनी स्त्री सुधारणेचा कैवार घेतला. त्यांचे दुदैवी अश्रु पुसण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करावयाची असेल तर समाजाच्या मनावरची आज्ञानी पुठे दूर केली पाहिजेत. या भुमिकेतून पंडितांनी काम केले. विधवा स्त्रियांना भोगावी लागणारे दुःखे पाहून या अभागी जीवांना दिलासा देण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी समाजमन बदलण्यावर त्यांनी भर दिला. पिडीत स्त्रियांच्या वेदना पाहून पंडितांच्या अंतकरणाला क्लेश होत होता हे त्यांच्या कार्यावरून दिसून येते.

स्त्रियांची उपेक्षा सर्व समाजात होत होती. उच्च जातीत बंधने अधिक कडक होती. या स्त्रियांना अधिक चांगले जीवन जगता यावे यासाठी विष्णु शास्त्रींनी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाह चळवळीला याच विचारातून त्यांनी चालना दिली. वृत्तपत्र, लेखन व प्रवचनाद्वारे लोक शिक्षणाचा मार्ग त्यांनी अवलंबिला. या परिस्थितीची जाणीव झालेल्या तरूणांची नवी पिढी उदयास आली व त्यांनी रूढी परंपरांवर प्रहार करत समाज जागृतीचे कार्य सुरू केले. यामध्ये बाळ शास्त्री जांभेकर, दादोबा पांडूरंग, गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी), मा. ज्योतीबा फुले, विष्णुबुवा ब्रम्हचारी, न्या. रानडे यांचा समावेश होता. त्यांचे सोबत विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचा देखिल सामावेश होतो.

वरील समकालीन सुधारकांच्या यादीत विष्णु शास्त्रींचे वेगळेपण नेहमीच जाणवते. आपल्या कर्तृत्वावर व प्रयत्नांवर त्यांचा विश्वास होता. स्त्री विषयक प्रश्नावर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. व स्त्रियांच्या न्याय्य हक्कांसाठी शेवटपर्यंत झटत राहीले. समाजाने स्त्री पुनर्विवाहाला मान्यता दयावी या हेतूने त्यांनी आपल्या पत्नीचे निधन झाल्यानंतर एका विधवेशी १८७४ साली पुनर्विवाह केला व समाजासमोर विधवा विवाहाचा एक आदर्शच ठेवला. तत्वनिष्ठेला जपणारा समाजसुधारक म्हणून निश्चितच त्यांचे हे कार्य प्रशंसणीय ठरते.

**विष्णू परशुराम शास्त्री पंडित यांचा कार्यकाल -**

विष्णू परशुराम शास्त्री पंडितांचे मन शिक्षण खात्यात न रमल्याने सेवानिवृत्ती घेऊन १८६४ साली लोकसेवेच्या उच्च ध्येयाने प्रेरीत होवून त्यांनी वृत्तपत्र व्यवसाय सुरू केला व सामाजिक प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले. विशेषतः स्त्रियांच्या प्रश्नावर त्यांनी जास्त भर दिला. समाजाच्या जाचातून त्यांना मुक्त करण्याचा त्यांनी अखेरपर्यंत प्रयत्न केले. अनेक विरोधकांच्या वादाचा विचार न करता समाजासमोर एक-एक आदर्श ठेवून परिवर्तनाची प्रेरणा दिली. महाबळेश्वरमध्ये २९ एप्रिल १८७६ रोजी त्यांचे निधन झाले.

**संशोधन पध्दती -**

विष्णू परशुराम शास्त्री पंडितांच्या जीवनचरित्राच्या अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व वाङ्‍मयीन क्षेत्रात केलेल्या कार्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यासाठी वेगवेगळया संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला आहे. तसेच विष्णू परशुराम शास्त्री पंडीत यांच्या ग्रंथ साहित्याचाही याप्रबंधामध्ये अभ्यास केलेला आहे. त्यामधून त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ. क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रमाणपत्र** | I |
| | **सर्टिफिकेट** | II |
| | **घोषणापत्र** | III |
| | **ऋणनिर्देश** | IV |
| | **संशोधन प्रस्तावना** | VI |
| १ | प्रस्तावना | १ ते १९ |
| २ | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आरंभकाळातील परिस्थीती. | २० ते ६६ |
| ३ | विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन चरित्र. | ६७ ते १०३ |
| ४ | विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन समाजसुधारक. | १०४ ते १६३ |
| ५ | विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांची साहित्यिक कामगिरी. | १६४ ते १९० |
| ६ | विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे सामाजिक विचार व कार्य. | १९१ ते २२० |
| ७ | उपसंहार | २२१ ते २३८ |
| ८ | संदर्भग्रंथ सूची | २३९ ते २४८ |
| ९ | परिशिष्टे | २४९ ते २५६ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

एकोणिसावे शतक महत्त्वपूर्ण घटनांचे व सुधारणांचे, हालचालींचे मानले जाते. जसे १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला व महाराष्ट्रावर इंग्रजी सत्तेचा अंमल सुरु झाला. पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रात जी सामाजिक व धार्मिक परिस्थिती होती, ती इंग्रजी राजवट महाराष्ट्रात स्थिर झाल्यानंतर लगेच काही बदलली नाही. म्हणूनच पेशव्यांच्या काळात जी सामाजिक परिस्थिती होती ती सुरुवातीला इंग्रजी कालखंडातही होती. अनेक जाती-जमाती रुढी-परंपरा, चातुर्वण्य व्यवस्था त्याकाळी होत्या. न्यायनिवाड्यांसाठी पंचायत व्यवस्था होती. ब्राह्मणाची सत्ता आणि फौजदारासारख्या अधिकाऱ्यांचा मन मानेल तसा कारभार या गोष्टीवर देशातील शांतता व सुव्यवस्था अवलंबून होती.

या काळात हिंदी समाजात विस्कळीतपणा आलेला होता. शिवकाळापासून चालत आलेली सरदारकी, वतने, जहागिरदार आपल्या ऐशारामी जीवनात मग्न होती. मात्र, खुल्या व्यापार धोरणामुळे उद्योगधंद्यावर परिणाम झाला. आर्थिक परिस्थिती ढासळू लागली. जर आर्थिक व राजकीय परिस्थिती अनुकूल असेल तरच सांस्कृतिक प्रगती होणे शक्य असते. परंतु दोन्ही सत्ता इंग्रजी लोकांकडे असल्याने भारताची पर्यायाने महाराष्ट्राची प्रगती होणे अशक्य होते. इंग्रज राज्यकर्त्यांनी येथील शासन व्यवस्थेत अत्यंत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. या बदलाचा महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर मोठा परिणाम होऊ लागला.

इंग्रजांनी शिक्षण प्रसारावर भर देऊन महाराष्ट्रात शिक्षण प्रसारावर भर दिला. त्यांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील तरुणांची नवी पिढी पाश्चात्त्य संस्कृतीच्या संपर्कात आली. परिणामी, समाजातील आधुनिक विचारांचे वारे वाहू लागले व महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात प्रचंड खळबळ माजली. तरुणवर्ग आपल्या समाजव्यवस्थेकडे चिकित्सक दृष्टीने पाहू लागला. समाजातील अनिष्ट चालीरीती, रुढी-परंपरा आपल्या धर्मात

शिरलेल्या अनिष्ट प्रथा, सर्वसामान्य लोकांत रुजलेल्या अंधश्रध्दा व भोळया समजुती आणि या सर्वांमुळे संपूर्ण सामाजाचा घडून आलेला सांस्कृतिक व नैतिक अध:पात याची त्यांना जाणीव झाली. या जाणिवेतूनच काही तरुण पुढे आले त्यात जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुख, भाऊ दाजी लाड, विष्णुबुवा बुह्मचारी, विष्णु परशुराम शास्त्री पंडित इ. होत. या सर्वांचे कार्य अत्यंत मोलाचे असले तरी या सर्वांतून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचा. कारण समाज सुधारणेत यांचे योगदान नेहमीच उल्लेखनीय राहिले आहे. त्यांच्या जीवनकार्यांत ते नेहमीच समाजाच्या अनिष्ट प्रथांशी लढताना दिसले.

वृत्तपत्रातून, दैनिकातून सतत समाजाच्या वाईट प्रथांचे त्यांनी खंडण केले. 'इंदुप्रकाश'मध्ये बालविवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, पुनर्विवाह इ. प्रश्नांची सांगोपांग चर्चा करुन विरोधकांच्या आक्षेपांचे सप्रमाण खंडण करण्याचा परिपाठ त्यांनी सुरु केला व सुधारणांचा पुरस्कार केला. त्यांनी काही ग्रंथरचनाही केली. त्यामध्ये त्यात 'विधवाविवाह', 'ब्राह्मणकन्या-विवाह विचार', 'आर्य लोकांच्या प्राचीन व अर्वाचीन रीती' या ग्रंथांचा समावेश होतो. या थोर समाज सुधारकाला व त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकावा असे वाटले व त्यांच्या या विचारांचा समाजाला फायदा व्हावा, या हेतूने हा प्रस्तुत शोधप्रबंध सादर केला आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व -**

इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तींची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय, एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात अशा अनेक थोर व्यक्ती होऊन गेल्या की, ज्यांच्या कर्तृत्वाचा, विचारांचा ठसा त्यांनी त्या काळात उमटवला व त्याचा प्रभाव आजही आपणास दिसतो. अशाच कर्तृत्ववान सुधारकांमध्ये आपण नेहमी उल्लेख करतो तो म्हणजे रानडे, विष्णु शास्त्री चिपळुणकर, आगरकर, महात्मा फुले, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, डॉ. भाऊ दाजी लाड, विष्णु परशुराम शास्त्री पंडित, या व इतर समकालीन समाजसुधारकांच्या तुलनेत

विष्णु शास्त्री पंडित यांचे कार्य उपेक्षितच राहिलेले दिसते. गं.बा. सरदारांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' या ग्रंथातून त्यांचे कार्य समाजासमोर आणले. सामाजिक सुधारणांचा सडेतोड पुरस्कार करणारे विचारवंत व कृतिशील समाज सुधारक म्हणून त्यांचा गौरव अवघ्या महाराष्ट्राला त्यांनी दाखवून दिला.

एकोणीसावे शतक हे भारतीयांच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचे पर्व. या कालखंडात भारतातही प्रबोधन होऊ लागले होते. त्या काळात लोकजीवनावर पारंपरिक धर्माचा प्रभाव होता. याचा तत्कालीन लोकजीवनाशी अत्यंत महत्त्वाचा संबंध होता. त्यानंतरच्या काळामध्ये आपल्याला परंपरा व आधुनिकता असा संघर्ष दिसून येतो. या काळात महाराष्ट्रातल्या अनेक विचारवंतांनी आधुनिकतेचे विचार मांडलेले दिसून येतात. परंतु त्यांनाही धर्माची भीती असल्याचे जाणवते. कारण त्यातील काही विचारवंत स्वतः शास्त्री पंडित होते. म्हणून त्यांना कोणतीही सुधारणा करताना ती जड जात होती. तरी सुध्दा त्यांनी तो प्रयत्न सातत्याने सुरुच ठेवला व समाजपरिवर्तन घडवून आणले.

एकोणीसाव्या शतकात आलेल्या या सुधारणांमध्ये प्रत्येक सुधारकांचे प्रयत्न व कार्यपध्दती ही वेगळी होती. अशा सुधारकांमध्ये विष्णु परशुराम शास्त्री पंडितांचे कार्य हे नेहमीच वेगळे जाणवते. समाज सुधारणेच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करत लोकांचे मतपरिवर्तन होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच स्त्री जातीच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी शक्ती व सर्वस्व वेचण्याचा त्यांनी निश्चय केला व लोकनिंदेची पर्वा न करता तो शेवटपर्यंत पाळला. ज्या ज्या वेळेला त्यांच्यावर कृतीचा प्रसंग आला त्या त्या वेळी तो त्यांनी निष्ठेने निभावला व आपली तत्त्वनिष्ठा समाजाला दाखवून दिली.

अशाच कार्यनिष्ठ समाजसुधारक व्यक्तींचा परिचय समाजाला व्हावा, त्यांच्या लेखनकार्याचा, त्यांच्या विचारांचा व त्यांच्या साहित्याचा उपयोग समाजाला व्हावा, या हेतूने सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधन विषयाचा कालखंड (१८२७-१८७६) -**

"विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक कार्यातील योगदान" हा सदर संशोधनाचा विषय असून या विषयाचा अभ्यास करताना एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आरंभकालीन परिस्थितीचा व विष्णु शास्त्री पंडितांच्या जीवन काळाचा म्हणजे १८२७ ते १८७६ पर्यंतच्या कालखंडाची मांडणी प्रस्तुत शोधप्रबंधासाठी केलेली आहे.

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा -**

एकोणिसावे शतक हे प्रबोधनाचे शतक मानले जाते. या काळात पाश्चात्त्य शिक्षणामुळे आधुनिकतेचे विचार मांडले जात होते. त्यामुळे एक प्रकारचा सांस्कृतिक संघर्ष या कालावधीत दिसून येतो. त्यामुळे या काळातील विविध विचारवंत, समाजसुधारक, लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णु शास्त्रीचिपळुणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, म. जोतिबा फुले, विष्णु शास्त्री पंडित, डॉ. भाऊ दाजी लाड, या व इतर विचारवंतांच्या कार्याची माहिती, त्याचा समाजावर झालेला परिणाम इत्यादीची माहिती घ्यावी लागते. त्याच बरोबर ब्रिटिशांच्या शासन प्रणालीचा प्रभाव, परिणाम, शिक्षण व धर्मांवरील परिणाम इत्यादींची माहिती सदर संशोधनात घेण्यात आलेली आहे.

अभ्यासकाने सदर संशोधनासाठी आपले लक्ष केवळ विष्णु शास्त्री पंडित यांचे चरित्र व त्यांचे सामाजिक कार्य यावरच केंद्रित केले असून तोच या प्रस्तुत शोध प्रबंधाचा अभ्यास विषय आहे.

त्यामुळे अभ्यासकाने १८२७ ते १८७६ पर्यंतच्या कालखंडावर व त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. याचा प्रस्तुत शोध प्रबंधासाठी विचार केलेला आहे. त्यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक कार्यापुरताच हा अभ्यास विषय मर्यादित ठेवण्यात आलेला आहे. तसेच, विष्णु

शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन समाजसुधारक यांचाही तुलनात्मक अभ्यास सदर संशोधनात करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे -**

१) विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांच्या जीवनाविषयी माहिती जाणून घेणे.

२) विष्णु शास्त्री पंडितांच्या सामाजिक कार्यांची, योगदानाची, संघर्षाची माहिती करुन घेणे.

३) विष्णु शास्त्री पंडित व त्यांच्या समकालीन असणाऱ्या समाज सुधारकांच्या परस्पर संबंधाविषयी माहिती करुन घेणे.

४) १९ व्या शतकातील विष्णु परशुराम शास्त्री पंडितांचे योगदान अभ्यासणे.

५) त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यातून/ग्रंथरचनातून त्यांच्या वेगळेपणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणे.

६) त्यांच्या साहित्यातून त्यांनी समाजाला केलेला उपदेश अभ्यासणे.

**गृहितके -**

१) विष्णु परशुराम शास्त्री पंडितांची जडण घडण प्रतिकूल परिस्थितीत झालेली आहे.

२) एकोणिसाव्या शतकात झालेल्या सुधारणा चळवळीत अनेकांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यामध्ये विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे सामाजिक प्रबोधनाचे विचार व कार्य पाहता ते इतरांपेक्षा वेगळे जाणवते.

३) विष्णु परशुराम शास्त्री पंडित हे कर्ते सुधारक होते.

४) विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे सामाजिक सुधारणा चळवळीतील कार्य महत्त्वपुर्ण आहे.

५) विष्णु परशुराम शास्त्री पंडितांचे कार्य मार्गदर्शक ठरणारे आहे.

**संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन : (Review of Literature)**

स.ग.मालसे यांनी, 'विधवा विवाह चळवळ' (१८००-१९००) या पुस्तकात विष्णु परशुराम शास्त्री पंडीत यांचा उल्लेख विधवा विवाहाच्या समाजिक कार्याच्या संदर्भात केलेला आहे.

व्ही.ए.पाटील यांनी, 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर' यांच्या चरित्रात विष्णु परशुराम शास्त्री पंडीत यांचा उल्लेख सामाजिक कार्याचा आढावा घेताना केलेला आहे.

गं.बा. सरदार यांनी, 'रानडे प्रणित सामाजिक सुधारणेची तत्त्वमिमांसा' या पुस्तकात रानडेसमवेत सामाजिक कार्याची चिकित्सा करताना विष्णु शास्त्री पंडीत यांचा उल्लेख केलेला आढळतो.

अरुण जोशी यांनी, 'लोकहितवादी - गोपाळ हरि देशमुख' यांच्या चरित्रात विष्णु परशुराम शास्त्री पंडीत यांचा उल्लेख आढळतो.

अरुण टिकेकर यांनी, 'न्या. महादेव गोविंद रानडे' यांच्या चरित्रात विष्णु परशुराम शास्त्री पंडीत यांचा उल्लेख विधवा विवाहाच्या कार्यासंदर्भात केलेला आढळतो.

श्रीधर सखाराम पंडित यांनी विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे चरित्र लिहिलेले आहे. हे चरित्र आर्यभूषण छापखान्यात रा.रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापले व १९३६ साली ते विधवा विवाह मंडळ, पुणे यांनी पुणे येथे प्रसिध्द केले.

श्रीधर गोंधळेकर यांनी विधवा विवाहाच्या अशास्त्रतेविषयी निर्णय पत्र श्री जगद्‌गुरु शंकराचार्य स्वामी महढकरवीर व संकेश्वर यांनी वे.शा.संपन्न रा.रा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर व विष्णु शास्त्री पंडित यांच्या वादाअंती पुणे येथे रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी जगध्दितेच्छु छापखान्यात छापून १८७० साली प्रसिध्द केले.

तसेच गं.भा. सरदार यांनी आपल्या 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' या पुस्तकात विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांच्यावर बरचसे लिखाण केलेले आहे.

त्यावरुन पंडितांच्या जीवन चरित्राविषयी बरीच सखोल माहिती मिळते. त्यांनी केलेले समाजकार्य हे इतर समाजसुधारकांपेक्षा किती वेगळे व प्रेरणादायी आहे, याची जाणीव त्यांच्या लिखाणातून सातत्याने होते.

**पूर्वसंशोधन -**

१) पिसे प्रवीण बाळासाहेब, 'विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन व कार्य एक अभ्यास', एम.फिल. अप्रकाशित प्रबंध, सप्टेंबर २००९, टि.म.वि.पुणे.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. तसेच संशोधनासाठी उपलब्ध असणाऱ्या संकलित माहितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याकरिता व विश्लेषण करण्याकरिता सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व वाङ्.मय क्षेत्रात केलेल्या कार्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यासाठी वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला आहे. तसेच त्यांच्या स्वतःच्या ग्रंथ साहित्याचाही या प्रबंधामध्ये अभ्यास केलेला आहे. त्यामधून त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**संशोधन आवश्यक माहिती -**

**१) चरित्र ग्रंथ -**

१. विष्णू परशुराम शास्त्री पंडित यांचे चरित्र

२) **समकालीन चरित्र ग्रंथ -**

१. विष्णूबुवा ब्रह्मचारी व त्यांचे विचारधन

२. महात्मा फुले गौरव ग्रंथ

३. महात्मा जोतिराव फुले यांचे चरित्र

४. निंबंधमालाकार विष्णू शास्त्री चिपळुणकर

५. लो. टिळकांचे चरित्र खंड १

६. आचार्य बाळशास्त्री जांभेकर

७. समाजपुरुष जगन्नाथ शंकर शेट

८. डॉ. भाऊ दाजी लाड

९. लोकहितवादी - गोपाळ हरि देशमुख

१०. समाजचिंतक विष्णू बूवा ब्रह्मचारी

११. समाजसुधारक दादोबा पांडुरंग तर्खडकर

१२. न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे

१३. सार्वजनिक काका गणेश वासुदेव जोशी

**३) समकालीन साहित्य-**

१. स्त्री पुरुष तुलना

२. हिंदू धर्म आणि सुधारणा

३. यमुना पर्यटन अथवा हिंदुस्थानातील विधवांच्या स्थितीचे निरुपण

४. शेतकऱ्यांचा आसुड

५. विधवा विवाह चळवळ (१८००-१९००)

६. हिंदू धर्माची समीक्षा

७. पुरोहित वर्ग वर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास

८. शतपत्रे

९. एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राचे पुर्नघटन

१०. स्त्री पुरुष तुलना

११. लोकहितवादींचे शतपत्रे

१२. ज्ञानोदयलेखनसारसूची खंड १ व २

**४)विष्णु शास्त्री पंडित यांचे ग्रंथ, लेख व व्याख्याने -**

**शालेय साहित्य -**

१) नाना फडणवीस यांची संक्षिप्त बखर

२) हिंदुस्थानचा इतिहास भाग ३रा (मरेकृत इतिहासाचे भाषांतर)

३) इंग्रजी-मराठी कोश

४) संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश

५) संस्कृत तिसरे पुस्तक (इंग्रजी)

**सामाजिक व धार्मिक -**

१) ब्राह्मणकन्या विवाह विचार

२) पुरूषयुक्त व्याख्या

३) विवाह विचार

४) विधवोद्वाहविवेक (संस्कृत)

५) पुनर्विवाह सशास्त्र असल्याविषयी पुणे व नाशिक येथे दिलेली व्याख्याने

६) आर्य लोकांच्या प्राचीन व आर्वाचीन रीती व त्यांची परस्परांशी तुलना आणि द्विजनांनी नावेतून विलायतेस जाणे निर्दोश आहे या विषयावर व्याख्याने

७) स्मृतीशास्त्र-व्याख्यान

८) शूद्र धर्म

९) वेदातील सूर्य सावित्रीविवाह

१०) देवरूख्यांविषयी विचार

११) आयुष्य वर्तनक्रमाविषयी श्रृती स्मृतींच्या आज्ञा-व्याख्यान

१२) स्त्रियांचे अधिकार-व्याख्यान

**पद्यात्मक -**

१) तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा एक-दोन

२) पुष्पमाला

३) स्त्री गायन संग्रह अथवा बायकांची गाणी

**५) वर्तमानपत्रे/साप्ताहिके -**

१) इंदुप्रकाश

२) वर्तमानपत्रदीपिका

३) सुबोधपत्रिका

४) ज्ञानसिंधु

५) ज्ञानप्रकाश

६) ज्ञानचक्षु

**६) नियतकालिके -**

१) सगुणा

२) ग्राममंगल शिक्षणवेध

**शोधप्रबंधाचा आकृतिबंध -**

प्रस्तुत शोधप्रबंधाची विभागणी एकूण सात प्रकरणात पुढील प्रमाणे केलेली आहे व शेवटी संदर्भग्रंथ सूची व परिशिष्ट आहे.

**प्रकरण विभागणी -**

| क्रमांक | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १. | प्रस्तावना |
| २. | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आरंभकाळातील परिस्थिती. |
| ३. | विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन चरित्र. |
| ४. | विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन समाजसुधारक. |
| ५. | विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांची साहित्यिक कामगिरी. |
| ६. | विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे सामाजिक विचार व कार्य. |
| ७. | उपसंहार |

## प्रकरण १ ले

## प्रस्तावना

या प्रकरणात सुरुवातीला संशोधनासंदर्भात प्रस्तावना दिलेली आहे. त्यामध्ये संशोधनाचे नाव, संशोधन विषय निवड, आवश्यकता, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन (Review of Litarature) संशोधन विषयाच्या मर्यादा, प्रकरण नियोजन, संशोधन विषयाचे

महत्त्व, त्याचबरोबर सदर संशोधन विषयाचे योगदान दिलेले आहे. तसेच शेवटी संशोधनातील निवड निष्कर्ष दिलेले आहेत.

## प्रकरण २ रे

## एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आरंभकाळातील परिस्थिती

सदर प्रकरणात प्रस्तावना, १९ व्या शतकातील आरंभकाळातील परिस्थिती, मध्यमवर्गाचा उदय, वर्ण संकल्पना, समाजाची विभागणी, एकोणिसाव्या शतकातील समाजजीवन, जातिव्यवस्था, पोटजाती, वर्णजाती व्यवस्था, स्त्रियांचे प्रश्न, बालविवाह, वयांची उदाहरणे दुष्परिणाम, विषम विवाह (जरठ-कुमारी विवाह) बहुपत्नीत्व, सतीची चाल-पध्दती यावर चर्चा केलेली आहे. तसेच एकोणिसाव्या शतकातील धार्मिक परिस्थितीचा आढावा देखील यात घेतलेला आहे. यात मानवी सामाजिक जीवन व धार्मिक जीवन यांचा सहसंबंध यावर चर्चा केलेली आहे. मानवी जीवनात धर्माला किती महत्त्वाचे स्थान आहे किंवा समाजावर धर्माचा किती मोठा पगडा होता, यावर चर्चा केलेली आहे. तसेच पेशवेकाळात वाढलेल्या भ्रामक धर्म-उत्पन्नांना व वाढते यज्ञकांड यांना वाढलेले महत्त्व त्यातून ब्राह्मणांचे वाढलेले महत्त्व यावर भाष्य केलेले आहे.

थोडक्यात, धर्म हे संस्कृतीचे श्रेष्ठ अंग आहे. धर्म स्वरुपात ईश्वर भक्ती मानवता, प्रेम, सत्य, न्याय, दया इत्यादी वृत्तीचे आचरण अपेक्षित आहे. धर्मातून एक प्रभावी विचारप्रणाली संघटन, नेतृत्व व चळवळ जन्म घेते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ख्रिस्ती धर्मप्रसार भारतात व महाराष्ट्रात सुरु झाला. अनेक वेळा ख्रिस्ती धर्मप्रसारात हिंदू धर्मास अन्यायकारक वागणूक मिळाली. परंतु ब्रिटिशांच्या आचार, विचार, शिक्षण पध्दतीने देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडून आले. यावर या प्रकरणात सविस्तर भाष्य करण्यात आलेले आहे.

## प्रकरण - ३ रे

## विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन चरित्र

सदर प्रकरणात प्रस्तावना, व महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधनाचे स्वरुप यावर चर्चा केलेली आहे. यात महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधनाची सुरुवात व त्याची माध्यमे यावर भाष्य केलेले आहे. यामध्ये वृत्तपत्राची भूमिका त्यांनी केलेली सामाजिक व सांस्कृतिक जागृती व कार्य त्यातून झालेले मतपरिवर्तन, यावर भाष्य केलेले आहे. या प्रसारमाध्यमांत मराठी वृत्तपत्रांची भूमिका व त्यांनी केलेली वैचारिक क्रांतीची पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. यात प्रामुख्याने उदा. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'शतपत्रे', 'इंदुप्रकाश', 'निबंधमाला', 'धुमकेतु', 'नेटिव ओपीनियन', 'ज्ञानप्रभार' यांचा समावेश आहे.

एकोणिसाव्या शतकात प्रारंभकाळात धर्म व समाज सुधारणा चळवळी झाल्या. याला कारण इंग्रजी संस्कृती व भारतीय संस्कृती यांचा जेंव्हा संबंध आला तेंव्हा सांस्कृतिक संघर्ष, समन्वय अशा प्रक्रियेतून सुधारणेस प्रारंभ झाला व धार्मिक पुनरुज्जीवनाची चळवळ सुरु झाली. यातूनच पुढे नवे विचार मांडले जाऊ लागले, व या नव्या विचारातूनच नवविचारांची नवी पीढी उदयाला आली. त्यात म. जोतिराव फुले, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख), विष्णु शास्त्री पंडित इ. सारखे विचारवंत होय. नवविचारातून नवी पुढील पीढी घडवायला सुरुवात करु लागले व त्यांनी महाराष्ट्रातील सामाजिक प्रश्नांना हात घातला.

त्यात, जातिसंस्था व अस्पृश्यता, स्त्रियांची स्थिती, इ. प्रश्न त्यांनी जातीने सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्यात विष्णु शास्त्री पंडित हे अग्रेसर होते. फक्त प्रयत्न करुन थांबले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी ते दाखवून दिले होते. याचा या प्रकरणात सविस्तर वृत्तांत मांडला आहे.

तसेच या प्रकरणात विष्णु शास्त्री पंडितांच्या घराण्याचा इतिहास, त्यांचा जन्म, बालपण व शिक्षण, तसेच त्यांची समाजसेवेतील वाटचाल, यावरही चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे पंडितांच्या विधवाविवाह कार्यास झालेला विरोध व

पंडितांचा स्वतः विधवेशी विवाह, याचाही उल्लेख यात घेतलेला आहे. शेवटी याविषयी चर्चा केलेली आहे.

## प्रकरण - ४ थे

## विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन समाजसुधारक

या प्रकरणात विष्णु शास्त्री पंडित व त्यांच्या समकालीन असणाऱ्या ठराविक समाजसुधारकांचा विचार केलेला आहे. जे नवीन सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाविषयी जाणीव निर्माण झालेले सुधारक होते त्यांना समाज सुधारणेविषयी तळमळ होती, असे नवशिक्षित तरुण जे एकाच ध्येयाने वेगवेगळ्या मार्गाने का होईना पण कार्यरत होते, त्यांचा परिचय व कार्याचा आढावा थोडक्यात या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

या प्रकरणात प्रामुख्याने नाना शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, महात्मा जोतिराव फुले, दादोबा पांडुरंग तर्खडकर, गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) भाऊ महाजन, विष्णुबुवा ब्रह्मचारी, डॉ. भाऊ दाजी लाड, विष्णु शास्त्री पंडित यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास केलेला आहे. तसेच प्रत्येक समाजसुधारकांच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सदर प्रकरणात संशोधनाच्या दृष्टिकोनातून काही महत्त्वाच्या घटना तसेच समाजसुधारकांच्या कार्याचा सविस्तर वृत्तांत मांडला आहे. उदा. बाळशास्त्री जांभेकर यांच्या संदर्भात 'श्रीपाद शेषाद्री' प्रकरण व त्यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती घेतली आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या संदर्भात त्यांचे स्त्री उध्दाराचे कार्य, विधवा-पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंध, अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य, सत्यशोधक समाजाची स्थापना, त्यांचे राजकीय विचार, व शेतकऱ्यांसाठीचे कार्य इ. सामाजिक कार्याचा आढावा घेतला आहे. जगन्नाथ शंकरशेठ यांच्या संदर्भात त्यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य यांचा आढावा घेतला आहे. डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या संदर्भात त्यांचे राजकीय कार्य, ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना, त्याचे सामाजिक कार्य इत्यादींचा आढावा घेतला आहे. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या संदर्भात त्यांचे मिशनऱ्यांच्या

अपप्रचाराला प्रत्युत्तर, ख्रिस्ती मिशनऱ्यांशी जाहीर वादविवाद, त्यांचे समाजसुधारणेचे कार्य, त्यांचे राजकीय विचार, यांचा आढावा घेतला आहे. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या संदर्भात त्यांचे सामाजिक व धार्मिक विचार, मानवधर्म सभा, तत्त्वे, परमहंस सभा, यांचा आढावा घेतला आहे.

याशिवाय, या प्रकरणात विष्णु शास्त्री पंडित व त्यांच्या इतर समकालीन व कार्यात संबंध आलेल्या सुधारकांचाही उल्लेख केलेला आहे. त्याचबरोबर प्रत्येक सुधारकांच्या कार्याचा आढावा घेताना त्या सुधारकांबरोबर विष्णु शास्त्री पंडितांचे असणारे कार्य व विचार यांचा सहसंबंध स्पष्ट केला आहे व शेवटी या सर्वांचा तुलनात्मक सारांश मांडला आहे.

## प्रकरण - ५ वे

## विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे साहित्य व विचार

सदर प्रकरणात विष्णु शास्त्री पंडितांच्या व्यापक बुध्दीचा परिचय करुन दिलेला आहे. समाजजीवनाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक, इत्यादी सर्व अंगाच्या सुधारणेविषयी असवणारे पंडितांचे विचार या प्रकरणात मांडलेले आहे.

या प्रकरणात पंडितांचे साहित्य, ग्रंथ, लेख व व्याख्याने यांची यादी दिलेली आहे. पंडितांनी लिहिलेले शालेय साहित्य, त्यात नाना फडणवीस यांची संक्षिप्त बखर, हिंदुस्थानचा इतिहास, इंग्रजी-मराठी कोश, संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश इ. साहित्यांचा आढावा घेतला आहे.

सामाजिक व धार्मिक साहित्यात पंडितांचे ब्राह्मण कला विवाह-विचार, पुनर्विवाह सशास्त्र, असत्याविषयी पुणे व नाशिक येथे दिलेली व्याख्याने, आर्य लोकांच्या प्राचीन व अर्वाचिन रिती व त्यांची परस्परांशी तुलना आणि द्विजनांनी नावेतून विलायतेस जाणे निर्दोष आहे या विषयावर व्याख्याने, यांचा आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे पंडितांच्या साहित्यातील काही ठराविक पुस्तकांचाही आढावा या प्रकरणात घेतला आहे. त्यात उदा. 'हिंदुस्थानचा इतिहास', 'ब्राह्मण कन्या विवाह विचार', 'विधवा विवाह', 'स्त्री-पुनर्विवाह', आर्य लोकांच्या प्राचीन

व अर्वाचिन रिती, स्मृतिशास्त्र, पुष्पमाला, तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, पार्वती-परिणय नाटक, स्त्रीगायन संग्रह अथवा बायकांची गाणी, लघुनिबंधमाला इ. साहित्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे, व त्याबरोबर त्यातील पंडितांचे विचार हे कसे समाजाला उपयोगी आहेत, याचेही थोडक्यात विवेचन करण्यात आलेले आहे.

## प्रकरण - ६ वे

## विष्णु शास्त्री पंडितांचे सामाजिक विचार व कार्य

सदर प्रकरणात विष्णु शास्त्री पंडित यांचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक विचारांचे विवेचन करण्यात आले आहे. त्याबरोबर त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा सविस्तर घेण्यात आलेला आहे. विष्णु शास्त्री पंडितांचे कार्य हे इतरांपेक्षा कसे वेगळे व कृतिशील आहे, याचे विवेचन या प्रकरणात केलेले आहे.

एकोणिसाव्या शतकात झालेल्या समाजसुधारणा चळवळीत मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आले. आपल्या परंपरागत समाजरचनेत असलेले दोष शोधून त्यावर चर्चा व समाजजागृती करण्याचे कार्य या काळातील विचारी पुरुषांनी केले. त्यात विष्णु शास्त्री पंडितांबरोबर, बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, म. फुले या इतर समाजसुधारकांचा समोवश होतो.

या काळात ज्या निरनिराळ्या सामाजिक सुधारणांचा धडाडीने पुरस्कार केला गेला त्यामध्ये स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, जरठकुमारीविवाह निषेध, पुनर्विवाह, इ. स्त्रियांच्या प्रश्नांचे स्थान फार महत्त्वाचे होते. त्याची चर्चा 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानप्रसारक' इ. नियतकालिकांतून होऊ लागली होती. त्याचबरोबर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मुलींच्या शाळा उघडल्या, त्यानंतर म. फुलेंनीही मुलींच्या शाळा उघडून शिक्षणाचा प्रसार केला. त्यामुळे एकंदरच स्त्रिशिक्षणाचे महत्त्व वाढू लागले. परंतु असे असले तरी स्त्रियांच्या बाबतीत असणाऱ्या अनिष्ट प्रथांमुळे त्यांच्या शिक्षणात अडथळे येत असत.

अशा अडथळ्यांवर मात करण्यासाठी काही नवशिक्षित सुधारकांनी पुढाकार घेतला व त्यावर सांगोपांग चर्चा केली. बाळशास्त्री जांभेकरांनी विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह पुरस्कार याबाबत कार्य केले. लोकहितवादींनी 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी संस्था स्थापून विधवा विवाहाचा पुरस्कार केला. म. जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची सुरुवात केली. तसेच विष्णु शास्त्री पंडितांनी या परिस्थितीचा अभ्यास करुन प्रत्यक्ष कृतीतून समाजाला दिशा देण्याचे काम केले. याचाही उल्लेख सदर प्रकणात केलेला आहे.

या प्रकरणात विष्णु शास्त्री पंडितांनी केलेल्या स्त्रीवर्गाच्या उध्दाराच्या कार्याचे विश्लेषण सविस्तरपणे केलेले आहे. त्याच बरोबर त्यांचे असणारे स्त्री वर्गाविषयीचे विचार हे सुध्दा या प्रकरणात सविस्तरपणे मांडलेले आहेत.

विष्णु शास्त्री पंडितांनी स्त्रियांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या विविध प्रश्नांसंबंधी आपले विचार मांडले होते आणि त्या सर्वच प्रश्नांसंबंधी त्यांनी सुधारणावादी भूमिका घेतली होती. मात्र, त्यांनी विधवाविवाहाच्या प्रश्नाला विशेष प्राधान्य दिले होते व त्यांच्यावर ज्यावेळी प्रत्यक्ष कृतीचा प्रसंग आला त्यावेळेला त्यांनी विधवेशी विवाह करुन समाजाला एक वेगळा आदर्श घालून दिला. त्याचबरोबर लोकजागृतीसाठी त्यांनी चातुर्विध साधनांचा वपर करुन धर्मशास्त्रास धरत असलेले आपले प्रगल्भ व प्रागतिक विचार जनतेसमोर इंदुप्रकाश साप्ताहिकातून मांडले. याचाही उल्लेख या प्रकरणात केलेला आहे.

विष्णु शास्त्री पंडित यांनी आपल्या जीवनात कधीही विसंगती निर्माण होऊ दिली नाही. आपल्या कर्तव्यात ते स्वतःच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. व सातत्याने आपले कार्य सुरु ठेवले. नेहमी त्यांनी नवीन सुधारणांचा पुरस्कार केला. त्यांच्यावर व्यक्तिगत जीवनात आचरण करण्याचा प्रसंग आला, तेंव्हा त्यांनी नवीन सुधारणांचा पुरस्कार केला. त्यांच्यावर व्यक्तिगत जीवनात आचरण करण्याचा प्रसंग आला. तेंव्हा त्यांनी कोणत्याही सबबी वा कारणे सांगून माघार घेतली नाही. याचेही उदाहरण सदर प्रकरणात दिलेले आहे. अशा

या कर्तव्यनिष्ठ सुधारकाच्या कार्याबद्दल माहिती यामध्ये दिली आहे. त्यांच्या विचारांची चिकित्सा या प्रकरणात केली अहे.

## प्रकरण सातवे

## उपसंहार

या प्रकरणात अभ्यास विषयाच्या संदर्भात उपलब्ध साधनांच्या आधारे विवेचन करताना जी अनुमाने काढण्यात आली आहेत ती मांडलेली आहेत. सदर प्रकरणात १९ व्या शतकात महाराष्ट्रात असणाऱ्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठ वर्णन केलेले आहे. समाजावर असणारा धर्माचा प्रभाव व समाजात चालणारी व्रतवैकल्ये, अंधश्रध्दा व त्याचा समाजजीवनावरील परिणाम, यांवर भाष्य केलेले आहे. तसेच ब्रिटिशकालीन परिस्थितीचा समाजावर झालेला चांगला व वाईट परिणामांचा लेखाजोखा देखील या प्रकरणात घेतलेला आहे.

तसेच या कालखंडात झालेल्या समाजसुधारणा चळवळीचा आढावा व सुधारकांचे प्रयत्न, त्यांनी केलेले कार्य व त्यांची भूमिका स्पष्ट केलेली आहे. शिवाय या समकालीन सुधारकांच्या कार्यातून विष्णु शास्त्री पंडितांचे कार्य हे वेगळे राहिले आहे याचाही वृत्तांत सदर प्रकरणात दिलेला आहे.

**प्रमुख निष्कर्ष -**

१) विष्णू शास्त्री पंडीतांनी केलेला स्वतःचा पुर्नविवाह समाजसुधारकांसाठी एक आदर्श आहे.

२) विष्णु शास्त्री पंडितांच्या अंगी असणाऱ्या शुध्द आचार, शुध्द विचार, जीवन, त्याग व स्वाभिमान या गुणांच्या मिश्रणाने त्यांचे व्यक्तिमत्त्व हे इतरांपेक्षा वेगळे जाणवते.

३) विष्णु शास्त्री पंडितांची साहित्यिक क्षेत्रातील कामगीरी अविस्मरणीय व आजही समाजोपयोगी आहे.

४) त्यांची लेखणी अतिशय मार्मिक, साधी व सोपी अशा प्रकारची होती.

५) विष्णु शास्त्री पंडितांनी सुधारणेसाठी लेखन, व्याख्यान चर्चा आणि कीर्तन या साधनांचा वापर केला तो आजही विचारात घेण्याजोगा आहे.

६) पंडितांचे साहित्य इतरांपेक्षा वेगळे असून त्यात स्वजन, स्वभाषा व स्वदेश यासाठीचे वेगळेपण पहावयास मिळते.

७) विष्णु शास्त्रींनी केलेले वाद - विवाद हे त्या त्या काळात स्त्री - उन्नतीसाठी प्रेरणादायी ठरले.

८) विष्णु शास्त्री पंडितांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान समाज उपयोगी आहे.

९) पंडितांचे धैर्य, निष्ठा, त्याग व चिकाटी हे गुण समाजाने कृतीत आणण्यासारखे आहे.

१०) पंडितांनी केलेले स्त्री - उध्दाराचे कार्य हे आजच्या काळातही समाजाला प्रेरणा देणारे आहे.

११) स्त्री पुनर्विवाहाचा त्यांनी केलेला पुरस्कार हा अत्यंत नाजुक विषय असून तो स्त्रियांसाठी वरदानच ठरला आहे.

१२) विष्णू शास्त्री पंडितांचे कवी, कीर्तनकार हे गुण समाजासाठी मार्गदर्शक ठरतील.

१३) विष्णु शास्त्री पंडितांनी केलेले 'इंदुप्रकाश' साप्ताहिकासाठीचे कार्य किंवा वर्तमानपत्रासाठीचे कार्य हे आजच्या संपादकीय वर्गाला निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

## प्रकरण - २

# एकोणिसाव्या शतकातील आरंभकाळातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती

# प्रकरण - २

## एकोणिसाव्या शतकातील आरंभकाळातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती

### प्रस्तावना -

एकोणिसावे शतक हा भारताच्या इतिहासातील एक वैशिष्ट्यपूर्ण टप्पा होय. हे शतक म्हणजे भारतातील सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळीचा, राष्ट्रवादाचा, स्वातंत्र्य आंदोलनाचा व आधुनिकतेचा आरंभकाळ होय. याच कालखंडात प्रामुख्याने भारतात प्रबोधनाची सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रामधील सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना त्याची पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे, त्यामुळे १९ व्या शतकाच्या आरंभकाळातील महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा सविस्तर आढावा घेणे प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. त्यासाठी पेशवेकालीन उत्तरार्धातील महत्त्वाच्या घडामोडी, स्थित्यंतरे व राजकीय कारकीर्द (१७९६-१८१८) व इंग्रजी राजवटीची सुरुवात याचा विचार करावा लागतो. तसेच आरंभकालीन जीवनाचा विचार करताना १८ व्या शतकाचा उत्तरार्ध व १९ व्या शतकाचा पूर्वार्ध हा कालखंड सर्वसाधारणपणे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

पेशवाई नष्ट झाल्यावर भारतावर ब्रिटिशांनी चांगला जम बसविला. त्यांची सत्ता स्थिर झाल्यावर त्यांनी अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. युरोपात नवनवीन शोध लागल्यामुळे त्यांना भारतासारखी मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली. युरोपातून पक्का माल तयार करुन भारतात विकला जाऊ लागला. त्याचा परिणाम भारतातील उद्योगधंद्यांवर होऊ लागला. भारतातील अनेक उद्योगधंदे बंद पडले. येथील पारंपरिक व्यवसाय लयास गेले. याचा परिणाम कामगार व कारागीर बेकार झाले. त्याचा भार शेतीवर पडू लागला.

तथापि, भारतीयांच्या साचेबंद सामाजिक जीवनात परिवर्तन घडून येण्याच्या प्रक्रियेला याच काळात प्रारंभ झाला. इंग्रजी राजवटीमध्ये व शैक्षणिक धोरणामुळे देशात नवविचारांचे वारे वाहू लागले. परिणामी, भारतीय

समाजातील जुन्या चालीरीती, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यांच्यावर नवविचारांचा परिणाम होऊ लागला. लोकांच्या सामाजिक आचार विचारांत बदल घडून येऊ लागल्याने समाजात संक्रमणावस्था निर्माण झाली.

वरील परिवर्तनामुळे भारतीय तसेच महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन ढवळून निघाले. अशा परिस्थितीत तो जुन्या संस्कृतीला सोडूही शकत नव्हता व नव्या परिवर्तनाला रोखूही शकत नव्हता. थोडक्यात, समाजात वैचारिक कोंडी निर्माण झाली व ही कोंडी फोडण्याचे काम संपूर्ण शतकभर सुरु राहिले. भारतीय तरुणांवर नवविचाराचा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांच्यात बदल घडून येऊ लागले ते पाश्चात्त्य विचाराने भारावून गेले.

१९ व्या शतकात झालेल्या या सत्तांतराचा फायदा इंग्रजांनी आपला उद्योग व व्यापार वाढीसाठी करुन घेतला. त्यासाठी त्यांनी प्रथम भारतात व नंतर महाराष्ट्रात आपली सत्ता स्थापन करत आपली राजकीय कारकीर्द सुरु केली. खंडप्राय भारतावर एकछत्री अंमल प्रस्थापित केला. मुंबई शहर हे इंग्रजांचे भारतातील एक प्रमुख केंद्र बनल्याने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर त्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला. त्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांमुळे सामाजिक जीवन ढवळून निघाले. ख्रिस्ती धर्माच्या वाढत्या प्रचारामुळे हिंदू संस्कृतीवर त्याचा परिणाम दिसू लागला. त्यातच इंग्रजी शिक्षणाचे नवे विचार समाजात रुजू लागले. परिणामी, भारतीय विचारवंत व समाजसुधारकांना आपल्या धर्माकडे चिकित्सक दृष्टीने पहाण्याची गरज वाटू लागली. याचा प्रभाव महाराष्ट्रात जास्त होता म्हणूनच एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात व मुंबई इलाख्यात झालेल्या या परिवर्तनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**मध्यमवर्गाचा उदय -**

वरिष्ठ वर्ग व कनिष्ठ वर्ग यांच्या मधील स्तराला किंवा समुदायाला मध्यमवर्ग असे म्हणतात.'[१] समाजाच्या सर्वांगीण कार्यात या मध्यम वर्गाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. इतिहासातील अनेक स्थित्यंतरांमध्ये मध्यमवर्गाचा वाटा महत्त्वाचा मानला जातो. या वर्गात वैचारिक व बुध्दिजीवी

गटांचा समावेश होतो. त्यामुळे इतिहासातील परिवर्तनाला चालना देताना त्यांची वैचारिक भूमिका महत्त्वाची ठरते.

भारतात मध्यमवर्गाचा उदय हा ब्रिटिश कालखंडात झाला व १९ व्या शतकात याची वाढ झपाट्याने झाल्याचे पाहावयास मिळते. परंतु भारतीय मध्यमवर्ग हा पाश्चात्त्य किंवा ब्रिटिश मध्यमवर्गापेक्षा वेगळा जाणवतो. याचे कारण भारतातील समाजरचना, प्रादेशिक चौकट, वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था होय. इतिहासकारांच्या ते तत्कालीन महाराष्ट्रातील बदलत्या वास्तवाच्या संदर्भातील वर्गीय आशयाचे भान जाणवते. म्हणजेच महाराष्ट्रात ही वर्गवारी तळागळापर्यंत पोहचली होती व त्यातूनच पुढे समाजामध्ये विशिष्ट समुदायाचे व जातीपातीचे वर्ग तयार होत गेले. याच कालखंडात तत्कालीन महाराष्ट्रात समाज बदलण्याची प्रक्रिया सुरु झाल्याचे आढळते.

मानव हा या घटनेत केंद्रस्थानी नव्हता, तर धर्म हा केंद्रस्थानी होता व त्याच्या भोवती तत्कालीन विशिष्ट वर्गाचा समाज होता व याच्या भोवती समाजाचे सामाजिक जीवन, राजकीय जीवन, धार्मिक जीवन व आर्थिक जीवन फिरताना दिसून येते. मध्यमवर्ग हा दोन वर्गांच्या मधील वर्ग असल्याने आर्थिक व जीवनमूल्यात्मक पातळीवर त्याची नेहमी ओढाताण होत राहते. या वर्गाला परस्परविरोधी दबावांना व प्रभावांना तोंड द्यावे लागले. महाराष्ट्रात १९ व्या शतकात ही परिस्थिती अधिक गंभीरपणे पहावयास मिळते.

समाजाची विभागणी तीन वर्गात झाली होती. पहिला वर्ग होता सरदार जमीनदारांचा, दुसरा वर्ग होता वैश्यांचा (१९ व्या शतकातील मध्यमवर्ग) व तिसरा वर्ग होता रयतेचा. त्यांची आर्थिक स्थिती हालाखीची होती. पहिल्या वर्गाची परिस्थिती उत्तम असल्याने हा वर्ग चैनी व विलासी जीवन जगत होता.

वर्ग ही समाजशास्त्रीय संकल्पना आहे. मध्ययुगीन कालखंडात सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू ही व्यक्ती होती. व्यक्तीवर कोणत्याही विचाराचा प्रभाव पडत असतो. तो कुठल्याही गटाचा घटक असतो. या गटातटातच त्याची विभागणी झालेली दिसून येते. संस्था त्या व्यक्तीवर नियंत्रण प्रस्थापित करते.'

**एकोणिसाव्या शतकातील समाजजीवन -**

तत्कालीन समाज जाती, उपजातीत विभागलेला होता. त्यावर तत्कालीन हिंदू व इतर धर्माचा म्हणजे मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी, बौध्द, जैन धर्माचा प्रभाव होता. समाजजीवनात वर्णव्यवस्था खोलवर रुजली होती आणि त्यातूनच जातिसंस्थेचा विषारी वृक्ष फोफावला होता.

सामाजिक जीवन म्हटले की, त्यात कुटुंब, जाती, परंपरा, सामाजिक दर्जा, संस्था, स्त्री जीवन, यांचा अभ्यास येतो. तसेच समाजरचना, शिक्षण, परंपरा, नैतिक आचरणाचा धर्म, आर्थिक आधार, चालिरीती, रुढी, परंपरा, संस्कृती या सर्व बाबींचा विचार सामाजिक परिस्थितीत करण्याचा प्रयत्न केला आहे.

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाल्यावर ब्रिटिश राजवट महाराष्ट्रात स्थिर झाली. तशीच ती भारताच्या इतर ठिकाणीही स्थिर झाली होती. या काळात लगेचच काही महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक परिस्थिती बदलली नाही. अनेक जाती जमाती, रुढीप्रामाण्य, चातुर्वर्ण्यव्यवस्था या समाजात रुढ होती. समाजात ब्राह्मण वर्गाचे महत्त्व अधिक होते. गावकामगार, गावपंचायती, जातीच्या पंचायती, ब्राह्मणांची सत्ता, अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार यावर देशाची शांतता व सुव्यवस्था अवलंबून होती.'[२]

हिंदु समाजव्यवस्थेची परंपरागत चौकट आणि मध्ययुगीन स्थितिशीलता या दोन गोष्टी उर्वरित भारताप्रमाणेच एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रालाही लागू पडतात. समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात धर्माचे पालन होते. धार्मिक मूल्यांबाबतच्या सार्वत्रिक ऐक्यामुळे विविध सामाजिक गट हे परस्परांशी जवळच्या नात्याने बांधले गेले होते.'[३] थोडक्यात, समाज हा पारंपारिक चौकटीत सापडला होता.

**जातिव्यवस्था -**

समाजाचे विभाजन जातीत व पोटजातीत झालेले होते. या जातीजातीतील श्रेष्ठ-कनिष्ठ स्तर होते. प्रत्येक जातीला सामाजिक हक्क व

अधिकार, कर्तव्य होते. सर्वांना अनेक प्रकारचे अधिकार होते, तर कनिष्ठ जातींवर तितक्याच प्रमाणात लादलेली कामे व बंधने होती. त्यांना सार्वजनिक ठिकाणी मंदिरात प्रवेश नव्हता. विहिरीवर पाणी भरण्याची परवानगी नव्हती. इतकेच नव्हे तर मानवी हक्कापासून त्यांना वंचित राहावे लागे. त्यांचा स्पर्श देखील अशुभ मानला जाई. जातिसंस्थेच्या निर्बंधात व्यक्ती पूर्णपणे बंदिस्त झाला होता. त्याला त्यांचे उल्लंघन करता येत नसे. असे निर्बंध तोडणाऱ्यास समाज जाती बहिष्कृत करत असे.'[४]

समाजातील वर्ण-जातीची विषमताप्रधान उतरंड, ज्ञान व श्रम यांची फारकत, दैववादी व अंधश्रध्दा विचारांची चौकट, स्वयंपूर्ण व बंदिस्त ग्रामजीवन, अस्पृश्यता व स्त्री-दास्य ही भारतीय समाजाची वैशिष्टये तत्कालीन महाराष्ट्रतही दिसून येतात. या काळात समाजात कुटुंब, जात, व ग्रामपंचायत यांच्यापुढे व्यक्तीला दुय्यम स्थान होते.'[५]

ग्रामसंस्था व जातिसंस्था हे येथील समूहिक जीवनाचे मूलभूत घटक होते. या कालखंडात समाजात ब्राह्मणांचे वर्चस्व वाढले होते व त्यामुळे जाती व्यवस्थेत त्यांना सर्वोच्च स्थान प्राप्त झाले होते. याचा परिणाम म्हणजे धार्मिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात सवर्णांना महत्त्व प्राप्त होऊन आपल्या अधिकाराच्या जोरावर त्यांनी समाजाचे शोषण चालविले होते. समाजावर त्यांनी धार्मिक व मानसिक गुलामगिरी लादली होती. परमेश्वरानेच गुणधर्माच्या आधारे चातुर्वर्ण्यव्यवस्था निर्माण केली असून त्यात सवर्णांना श्रेष्ठ स्थान आहे. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान ब्राह्मणांनीच तयार केले होते. ब्राह्मण  म्हणेल तोच शब्द शेवटचा होता.'[६]

अशा प्रकारचे तत्त्वज्ञान धर्मग्रंथ, पुराणे व शास्त्रे यात मिसळून नव्याने समाजाला सांगण्यात ते पटाईत झाले होते. समाजावर धर्माचा पगडा एवढा होता की, शूद्रांनी ब्राह्मण  वर्गाची सेवा करणे हेच आपले कर्तव्य आहे, असा समज शूद्र समाजाने करुन घेतला होता. यात ते आपली आत्मप्रतिष्ठा व आत्मसन्मान

याचा देखील विचार करत नव्हते.'[७] थोडक्यात, सर्वांची सेवा करणे हाच आपला धर्म आहे ही समजूत कनिष्ठ वर्गात निर्माण झाली होती.

व्यक्तीची ओळख, त्याचा व्यवसाय हा देखील जातीनुरुपच होता. विवाह जाती-जातीतच होत होते. जातीबाह्य विवाह हा सामाजिक गुन्हा मानला जात असे. समाजात आज देखील वर्ण व जाति-व्यवस्था रुजलेली पहावयास मिळते. आपण आजही जात व धर्म सोडून विवाह करत नाही. प्रत्येकाची धर्म, वंश, खानदान या सारख्या पळवाटा आजही आपण दाखवून नामानिराळे होतो. थोडक्यात, समाज हा जाती जातीत, धर्माधर्मात विभागला गेला होता.

जातिसंस्था व धर्मसंस्था हा परंपरागत हिंदुसमाजव्यवस्थेचा कणा आहे. यात प्रत्येक मनुष्याची अस्मिता आणि सामाजिक दर्जा ही दोन्ही त्याच्या जातीशी निगडित आहेत. जातिसंस्थेने आहार, पोशाख, व्यवसाय, धर्मकृत्ये, कुटुंबनीती, सामाजिक संबंध इत्यादी लहान-मोठ्या सर्व गोष्टीवर कडक निर्बंध घातले होते. या जातीधर्माचे रक्षण करण्याची जबाबदारी जात-पंचायतीची होती व जातीबाह्य वर्तणूक करणाऱ्यावर शिक्षा करण्याचीही जबाबदारी व अधिकारही तिलाच होता. जातिसंस्थाही स्वायत्त होती व त्यात सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता.'[८] थोडक्यात, जी पूर्वपरंपरा सुरु होती, तीच पुढे सुरु ठेवण्याचा प्रयत्न सर्वत्र करीत होते.

समाजात ठराविक जातीचा दीनक्रम हा पिढ्यानपिढ्या ठराविक चाकोरितच गुंतलेला होता. त्यामुळे राजकीय क्षेत्रात जरी स्थित्यंतरे झाली तरी हा समाज बदललेला दिसत नाही. त्याचे कारणही तसेच होते. वेगवेगळ्या जातीच्या वेगवेगळ्या सामाजिक सांस्कृतिक जीवनात अंतर होते. सर्वांनाच उदरनिर्वाहासाठी जातीनुरुप व्यवसाय करण्याखेरीज गत्यंतर नव्हते. त्यामुळे समाजाचा व्यवहार नित्यपणे सुरु राहिला पण त्यातून समाजाचा विकास होण्याऐवजी जाती निष्ठेचे पोषणच होत गेले व समाज धर्माच्या जाळ्यात जास्तच अडकत गेला. जाती जातीत विखुरलेला समाज एकसंध होणे शक्य नव्हते.

जातिसंस्थेबद्दल वर्णन करताना, 'माडगावकर' आपल्या 'मुंबई वर्णन' या पुस्तकात लिहितात, की या शहरातील लोक जातीभिमानाखाली चूर असतात. जो तो आपल्या जातीला श्रेष्ठ मानतो. मी उंच कुळातला, माझे वडील आमलेदार, मी भलत्याशी संघटन ठेवणार नाही. असे खूळ माजवणारे ब्राह्मणापासून शूद्रांपर्यंत आहेत. हा सर्व वृध्थभिमान आहे. यातून नेहमी द्वेश, मत्सर, दुराग्रह व सतत, गृहकलह निर्माण होतात, व्याघ्रासारखे एकमेकांवर डोळे वटारीत असतात. या पासून तो काय लाभ, यामुळेच हिंदू धर्मात एकी होत नाही व तंट्याशिवाय एक दिवसही जात नाही.'[९] प्रत्येक जातीत आपल्या जातीचा अभिमान धरला जात असे. त्यामुळे जातिव्यवस्था अधिक घट्ट होत गेली. रोटी-बेटी व्यवहार होत नसे. असे झाले तर तो जाती बहिष्कृत होत असे.

लोकहितवादींनी 'शतपत्रा'तून तत्कालीन ब्राह्मण वर्गावर कठोर टीका केलेली दिसते. या काळात अज्ञान, अत्याचार, हेकटपणा, दुराग्रह, अंधता, लाचारी यामुळे या काळी नवविद्येला पारखा असलेला ब्राह्मण समाज अत्यंत अधोगामी झाला होता. तरीही वर्णांना ब्राह्मणो गुरु!' ही त्याची महंता कायम होती. काडीचेही ज्ञान नसताना आपणच भूदेव, आपणच सर्वज्ञ, हा त्यांचा मुढ गर्व पाश्चात्त्य विद्याविभूषितांना अत्यंत संतापजनक वाटे. त्याचाच प्रत्यय लोकहितवादींच्या 'शतपत्रातून' झाला आहे.'[१०] ब्राह्मण हाच सर्वश्रेष्ठ असा समज त्या काळी वाढीस लागला होता.

१९ व्या शतकातील गैरसमज असाच होता की, पूजाअर्चा, विधी, पाठ करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण समाजाकडेच आहे. भले त्याचा अर्थ त्यांना कळो अथवा न कळो, याबाबत सर्वसामान्यही त्यांना त्यांचा अर्थ विचारताना दिसत नाहीत. यावर लोकहितवादी आपल्या पत्र क्रमांक ३३ मध्ये म्हणतात, 'हे ब्राह्मण पाठांतरालाच विद्या समजतात. वैदिक, शास्त्री पंडित, दरागंथी, ब्राह्मण कोणीही असो, त्यांचे भूषण तर काय, त्यांनी अनेक ग्रंथ पाठ केलेले आहेत. लोकांना त्यांचे ज्ञान नाही मिळाले तरी चालेल. हे लोक वेदपाठ करतात पण ते

अर्थशून्य असतात. ही फक्त तोंडाची मजुरी झाली. यात मनाचा उपयोग काहीच नाही.

ते पुढे म्हणतात, 'सांप्रतचे ब्राह्मण  विद्येविषयी केवळ जनावरे आहेत. त्यांना अर्थज्ञान नाही, त्यामुळे धर्मावरील भाव अस्तिक बुध्दी भ्रष्ट झाली आणि वेद, शास्त्रे, पुराणे ही लहान मुलांच्या गाण्याप्रमाणेच झाली.'[११]

लोकहितवादी पुढे म्हणतात की, ब्राह्मणी विद्या ही केवळ पोटभरु विद्या झाली आहे. लोकांना अज्ञानात ठेवून त्यावर आपली उपजीविका करणारे हे पोटभरु झाले आहेत. लोकांना सज्ञान करावे, त्यांना शिकवावे, सुखी होण्याचा मार्ग दाखवावा, असे विचार त्यांच्या मनात देखील येत नाहीत.'[१२] सर्वांनी त्यांच्या जातीचा विचार केला व कनिष्ठांना अंधारात ठेवले. पोट भरण्यासाठी त्यांनी ही कला जोपासली. आजही त्यांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते.

त्यांना कनिष्ठ वर्गाचे हे वर्चस्व मुळीच मान्य नाही. इतर जातीत व ब्राह्मणांत ते मुळीच फरक करत नाही. उलट ते शूद्रांना जास्त श्रेष्ठ मानतात. त्यांच्या विद्या व बुध्दीबद्दल बोलताना लोकहितवादी म्हणतात, की ब्राह्मणांची विद्या ही केवळ त्यांचा गर्व आहे. म्हणून ते सुधारण्याची आशा मुळीच नाही. इतर लोक अज्ञानी असल्यामुळे ते सुधारणे तरी शक्य आहे. भटांत व अतिशूद्रांत इतकेच अंतर आहे की बोलता राघु व दुसरा न बोलता राघु' पण ज्ञान हे एकच. ते वेद पाठांतर करतात. मात्र, अर्थज्ञतेविषयी उभयतांची योग्यता समान आहे.'[१३] आपल्या उदरनिर्वाहाची सोय सवर्णांनी करुन ठेवली. परंतु इतर जातींकडून सेवा करुन घ्यावयाचे तंत्र आत्मसात केले. त्यांनी शिकवावे, सज्ञानी करावे, याचा विचार त्यांनी केला नाही. त्यामुळे बाकीच्या जनतेचा उध्दार होऊ शकला नाही. जुन्या विचारात ते गुरफटून राहिले.

लोकहितवादी ब्राह्मणांप्रमाणेच राजे सरदार यांच्यावरही टीका करताना दिसतात. ते म्हणतात, 'विद्येची आवड व जनतेची चिंता याची आवड त्यांना होती, असे मुळीच नाही'.

ते सरदार व राजे लोकांची उदाहरणे देताना म्हणतात, की आमचे राजे किती मूर्ख असतात हे येथील राजांच्या वागणुकीवरुन समजेल. सातारचा राजा एखादे चित्र सजवून न्यावे तसा रेसिडेंटाकडे जातो. काही न्याय कारभार करीत नाही. बसला असता तेथून लोकांनी धरुन उचलावे, ही त्याची शक्ती, राज्यात काय चालले, त्याला ठावूक नाही. लोकांना शिक्षण देणे त्यांना माहीत नाही. ते इंग्रज अधिकाऱ्यांनाच देवाप्रमाणे मानतात.'[१४] त्यावेळी अधिकारी हाच आपला देव होय, अशी त्यांची भ्रामक कल्पना होती. पुण्यात लायब्ररी केली, पण ग्रंथ वाचावयास सरदार लोक येत नाही. कारण त्यांना मोठेपणाचा अभिमान असावा, मुलांसारखे शिकावयास जावे, याची त्यांना लाज वाटत असावी.'[१५]

थोडक्यात, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन करताना म्हणावे लागते की, 'वर्णजातीची विषमता प्रधान चौकट व बंदिस्त ग्रामजीवन, अस्पृश्यता व स्त्रीदास्य ही उदाहरणे तत्कालीन महाराष्ट्राची अंगे होती. यावर राजा दीक्षित आपल्या पुस्तकात वर्णन करताना म्हणतात, की शिवाजी महाराजांसारखा समर्थ राज्यकर्ता यालासुध्दा जातीसत्ता, गोसत्ता, वनसंस्था व व्यापारीसत्ता यांच्याशी जुळवून घ्यावे लागले. किंवा प्रसंगी नमते घ्यावे लागले. 'जुने सोडू नये, नवे करु नये' अशी या शतकातील समाज धारणा होती.'[१६]

लोकहितवादी यावर लिहितात की, या चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे जाती व पोटजाती निर्माण झाल्या व त्या सर्व जन्मनिष्ठ बनल्या. त्यामुळे समाजाची शकले होऊन तो दुबळा झाला व त्याचे 'समाज' रुप नाहीसे झाले.

जातिसंस्थेच्या या वर्चस्वाबाबत दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रात दोन उदाहरणे दिसतात. ती पुढीलप्रमाणे -

दादोबांचे एक ब्राह्मण शिक्षक, 'बापुशास्त्री शुक्ल' (नेमणूक १८२७) यांना प्रभु, शेणबी, सोनार, वैश्य अशा जातीच्या मुलांना मराठी व्याकरण शिकविण्याचे काम फार हलके वाटत असे. विनोदाने का होईना ते त्याबाबत नाराजी व्यक्त करतात.

याच सुमारास 'बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी'च्या मराठी शाळेत धाकजी दादाजी परभु यांच्या आग्रहामुळे एकाएकी असा हुकूम निघाला की, 'शाळेतील कुळवाड्यांची मुले म्हणजे मराठा, कोळी, कुणबी, भंडारी या जातीची मुले काढून टाकावी व यापुढे अशा मुलांना प्रवेश देऊ नये. हलक्या जातीचे लोक शिकले तर उच्च जातीच्या लोकांना रोजगार मिळणार नाही. अशी भीती धाकजी दादाजी यांना वाटत होती.'[१७]

थोडक्यात, रोजगाराच्या भतीपोटी कनिष्ठ समाजाला अंधारात ठेवले पाहिजे, त्यांना शिक्षण दिल्याने आपल्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होईल, म्हणून कनिष्ठांना शिक्षित करणे हिताचे नाही, असा सर्वांचा समज होता.
यावर 'दर्पण' वृत्तपत्रात वाद सुरु राहिला व संपादकांनी तटस्थ भूमिका घेतली.

जातिभेद, चातुर्वर्ण्य, ब्राह्मणांचे वर्चस्व या सर्वांच्या बुडाशी जन्मनिष्ठ उच्च नीचता असते, ती समाजाला जशी घातक असते तशीच स्त्री-पुरुषातील विषमताही घातक असते. स्त्रियांना पुरुषाइतकी प्रतिष्ठा प्राप्त झाल्याशिवाय तिच्या जीवनाचा विकास होणे शक्य नाही व असा समाज तुलनेने मागासच राहणार हे जाणून लोकहितवादींनी स्त्री-पुरुष समतेचा सर्व व वर्णांच्या व जातीच्या समतेइतकाच आग्रह धरलेला दिसतो.'[१८]

लोकहितवादींनी स्त्री-पुरुष समानता व समतेचा विचार आपल्या 'शतपत्रा'तून केल्याचे दिसते.

महाराष्ट्रात स्त्री दास्याची समस्या तीव्र होती. पण प्राचीन कालखंडातील स्त्रियांच्या आढाव्याने असे दिसते की, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान होते. वेदअध्ययन, उपनयनाचा त्यांना पूर्ण अधिकार होता.

५ मार्च १८७५ रोजी झालेल्या 'ज्ञानप्रसारक' सभेत विष्णु शास्त्री पंडितांनी यावर व्याख्यान दिले. त्यात ते म्हणतात, मनुवादी स्मृतिकारांनी सामाजिक जीवनात स्त्री व पुरुष यांचे स्थान सारखेच मानले आहे. त्यांना उपनयनाचा अधिकार होता, वेदअध्ययनाचा अधिकार होता, विवाह मर्जीचा अधिकार होता, त्यांच्यावर शास्त्राने तसे कोणतेही बंधन घातलेले नव्हते.

विवाहाच्या बाबतीत मुख्य विचार व संमती कन्येचीच असली पाहिजे व तिच्या इच्छेनुरुपच वराची निवड झाली पाहिजे असे ते सांगतात.'[१९]

विष्णु शास्त्रीयांनी स्मृती-पुराण यांचा आधार घेऊन पूर्वी कशी समाज व्यवस्था होती, यावर प्रकाश टाकला आहे.

पुराणकाळापासूनच स्त्रियांचा दर्जा घसरण्यास सुरुवात झाली त्याचबरोबर स्त्री शिक्षणाचा दृष्टिकोन संकुचित बनत गेला. विवाहाची वयोमर्यादा कमी झाली. अध्ययनाचा अधिकार बंद झाला. बालविवाह रुढ झाले. जन्मापासून मृत्यूपर्यंत पुरुषांना जास्त स्वातंत्र्य देण्यात आले व स्त्रियांवर बंधने लादण्यात आली. तिच्या सतीत्त्वाची सतत स्तुती करत तिलाही त्यात धन्यता मानण्यास भाग पाडले. पतीसेवा व पतीभक्ती यातच स्त्रीच्या जन्माचे सार्थक आहे, असे सातत्याने लहानपणापासून जाणीवपूर्वक तिच्यावर बिंबवण्याचा प्रयत्न करण्यात आला व याच चालीरीती पुढे समाजाला घातक ठरल्या.'[२०]

स्त्रियांचे अधिकार बंद झाल्यानंतर स्त्रीची दशा किती वाईट झाली, तसेच सती प्रथेला प्राधान्य देण्यात आले. या पध्दती स्त्री जातीला घातक ठरल्या.

शिक्षणाच्या अभावामुळे 'चूल आणि मूल' याच समीकरणात त्यांचे जीवन बंदिस्त झाले व त्यांना समाजात दुय्यम स्थान प्राप्त झाले.

लोकहितवादी आपल्या 'शतपत्रा'त म्हणतात, ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानत नाही त्या देशाची स्थिती वाईट असते. पुढे ते म्हणतात, हिंदु धर्मात कोणतेही पुण्याहवाचन व पूजाअर्चा धर्मासंबंधीचे कार्य असताना ते स्त्रीबरोबर असल्यावाचून होत नाही. परंतु मुस्लिमांच्या येण्याने व त्यांच्या अनुकरणाने त्यांच्या रानटी चाली हिंदु लोकांस लागल्या व ते त्यांना दुय्यम लेखू लागले. पूर्वी रामाबरोबर सीता सभेत बसत होती. पांडव द्रौपदीसह बसत होते. पण लोकांना ही मते मान्य नाहीत, व ते देव होते, असा जबाब देतात. पण ते हे लक्षात घेत नाहीत की ती सुध्दा माणसेच होती.'[२१]

महाराष्ट्रात एकत्र कुटुंब पध्दतीमुळे स्त्रियांना घरात दुय्यम स्थान प्राप्त झाले होते. कुटुंबात कुटुंबप्रमुख म्हणून पुरुषाचीच सत्ता चालत होती. कुटुंबाचा वारसा हा पुरुषाच्या नावाने चालविला जात होता. त्यालाच मालमत्तेचा अधिकारही मिळत होता. शिवाय पुरुषांना अनेक विवाह करण्याची मुभा होती. जरी त्यांचा विवाह लहानपणीच झाला असला तरी नंतरचे विवाह करण्यास त्यांना वयाचे बंधन नसे.'[२२]

त्या काळी पुरुष अनेक स्त्रियांशी विवाह करत असे. संपत्तीमध्ये स्त्रियांना वाटा मिळत नसे. विवाह करण्यास वयाची अट नसे.

तत्त्कालीन महाराष्ट्रात स्त्रियांच्या बाबतीत अनेक सामाजिक अनिष्ट चालीरीती अस्तित्वात होत्या, त्यातील काही पुढील प्रमाणे -

**स्त्रियांचे प्रश्न -**

स्त्रियांचे जीवन हे धर्माने बंदिस्त केलेले होते. त्यांना सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनापासून व त्यांच्या लाभापासून दूर ठेवले होते. याचे कारण समाजावर असणारा धर्माचा पगडा होय. यासाठी हिंदू धर्मातील ग्रंथ पुरावा म्हणून मानले जात असत व त्याच्या सांगण्यावरुन किंवा त्यातील संदर्भावरुन रुढी परंपराचे पालन केले जात असे. समाजात धर्माचे स्थान हे अनन्यसाधारण असल्याने त्यानुसारच सर्व प्रथांचे अनुकरण होत असत. मग त्यामध्ये विवाहाची धार्मिक दृष्टिकोनातून या गोष्टीकडे पाहिल्यास अनेक अडचणींना स्त्रियांना तोंड द्यावे लागत असे. या चालत आलेल्या परंपरांना तोंड देण्याची हिंमत स्त्रियांमध्ये नव्हती. इतकी धर्मव्यवस्था प्रबळ झाली होती.

याबाबत सर्वसामान्य माणसामध्येही ताठरता आढळत नाही. म्हणजे समाज हा याच रुढी परंपरेत गुंतलेला व तसेच जगत असताना दिसतो. याची उदाहरणे खालीलप्रमाणे -

समाजात वारसा हक्काला विरोध होता.

स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नव्हते.

समाजात पुरुषांचे वर्चस्व जास्त होते.

स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित होते.

वरिष्ठ वर्गात स्त्रियांच्या आर्थिक हक्कांवर मर्यादा होत्या.

विधवा विवाहाला मान्यता नव्हती.

**बालविवाह -**

१९ व्या शतकात ही प्रथा रुढ असल्याचे पहावयास मिळते. मुलगी आठ वर्षाची झाल्यानंतर लग्नावाचून राहू देणे हा पेशवाईत अधर्म मानला जात होता. मुलीचे लग्नाचे वय ८ किंवा ९ व मुलाचे १२ ते १३ वर्षे होते. याचे उदाहरण म्हणजे दुसरा बाजीराव होय. यांच्या लग्नाच्या वेळीचे वय हे ११ व पत्नी भगीरथी बाईंचे वय ८ ते ९ वर्षाचे होते. दहा, अकरा वर्षाच्या मुली झाल्या की त्यांचे पालक त्यांच्या लग्नासाठी स्थळे शोधत. लग्ने लवकर व्हावी यासाठी ते प्रयत्न करत असत.'[२३]

खुद्द पेशव्यांच्या कुटुंबात व सरदारांच्या घरात ही बालविवाहाची प्रथा जणू परंपरागत चालत आली होती. दुसऱ्या बाजीरावाचा कालखंड पाहणे.१७९८-९९ च्या दरम्यान दुसऱ्या बाजीरावाने अशी आज्ञाच काढली होती की, ९ वर्षानंतर मुलगी बिना लग्नाची राहू नये.'[२४]

अशा परिस्थितीमुळे लहान वयातच मुलींवर संसाराची जबाबदारी लादली जात. त्यातच त्यांचे व्यक्तिमत्त्व खुरटून जात असे व कित्येकींचा यात अकाली मृत्यूही होत असे.

उत्तर पेशवाईच्या काळात स्त्रियांची स्थिती अगदीच हवालदील झाली होती. पेशव्यांना स्त्री पुरुष उपभोगाची वस्तू साधन म्हणून मात्र बनून राहिली होती. अशीच काही पेशवेकालीन बालविवाहाची उदाहरणे पहावयास मिळतात.

बाळाजी बाजीराव - वय ९ वर्षे, विश्वनाथ - वय ८ वर्षे, थोरले माधवराव - वय ९ वर्षे, नारायणराव- वय १० वर्षे, सवाई माधवराव- १० वर्षाहून थोडा मोठा

यांची लहान वयातच लग्ने झाली. त्याच प्रमाणात त्यांच्या पत्नीचेही वय होते. म्हणजे किती अल्प वयात लग्ने होत असली पाहिजेत. याचे उदाहरण म्हणजे 'परशुराम भाऊ पटवर्धन यांची कन्या ८ व्या वर्षी विधवा झाली होती. स्त्रिया अगदी विवाहानंतर मृत्यू पावल्या, तर पुरुष लगेचच दुसरे लग्न करीत

पण स्त्रियांना मात्र केसांचे वपन करुन सन्यास तरी घ्यावा लागे किंवा नवऱ्याच्या प्रेतासोबत सती तरी जावे लागे, एवढेच दोन पर्याय उरत असत.'[२५]

१९ व्या शतकात ही प्रथा उच्च वर्गात जास्त पहावयास मिळते. त्यांचेच अनुकरण करुन या प्रथा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचल्या होत्या. या प्रश्नांबाबत अनेक वादळे उठली, चर्चा झाल्या, वृत्तपत्रीय लिखाण झाले. पण ज्या सुधारकांनी याबाबत प्रयत्न केले, त्यांनीच परिस्थितीनुरुप विवाह मात्र लहान वयातच केले हा अपवादाचा भाग होय.

थोडक्यात, स्त्रियांना दुसरे लग्न करण्याचा हक्क नव्हता.

'ज्ञानोदया'च्या १८/१२/१८७३ च्या अंकात या बाबत संदर्भ आढळतो की, १८७३ मध्ये पुण्यात तीन आठवड्यात ७५० विवाह झाले, त्यात बहुतेक वधूचे वय हे आठ वर्षाच्या आत होते.'[२६]

१९ व्या शतकात बालविवाहासंदर्भात काही अपवादही पहावयास मिळतात. याचे उदाहरण म्हणजे, डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी आपल्या ३ मुलींना उच्च शिक्षण देऊन त्यांची लग्ने २२-२३ वर्ष संपल्यानंतर केली.'[२७] हा त्या काळातील एक आदर्श विचारच मानावा लागेल. असे उदाहरण अपवादानेच पाहावयास मिळते.

पण जे स्वतःला सुधारक म्हणवतात त्यांनी देखील समाजाच्या दबावाखाली किंवा परिस्थितीनुरुप आपल्या नातलगांचे विवाह लहानपणीच केलेले दिसतात. सुधारकांना देखील समाजाच्या विरोधासमोर नमते घ्यावे लागले. त्या काळाची परिस्थिती पाहता त्यांना तो निर्णय घ्यावा लागला असेल. पण त्यातही काही अपवाद पहावयास मिळतात. पुढे याच सुधारकांनी या प्रथांविरोधात विपुल लिखाण केलेले दिसते.'[२८]

बालवयातच लग्ने झाल्यामुळे १३-१४ व्या वर्षीच मुली आई होत व पुढील १३-१४ वर्षानंतर मुलास/मुलीस अपत्य झाल्यामुळे त्या आजीही बनत.

'बालविवाहाची पध्दत रुढ असल्याने मुलींच्या आवडीनिवडीचा प्रश्नच उद्‌भवत नसे. त्यामुळे लग्नानंतर पतीशी व त्यांच्या माणसांशी तिला जुळवून

घ्यावेच लागे.  पती आवडत नाही किंवा घराशी जुळत नाही असे म्हणून नांदण्यास नकार देणाऱ्या स्त्रियांमध्ये रखमाबाईचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी पती आवडत नाही म्हणून नांदण्यास नकार दिलेला दिसतो. ही घटना १८८४ मधील आहे.'[२९]

बालविवाहाच्या या अनिष्ट प्रथेमुळे समाजाला विशेषत- मुलींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असे. त्यांना मनस्तापाचे जीवन जगावे लागे.

**दुष्परिणाम -**

वयात आल्यानंतर पती-पत्नी एकमेकांना न आवडणे व त्यातून परित्यक्त्ताची संख्या वाढणे.

लहान वयात लग्न व मुले झाल्यामुळे स्त्रिया तसेच पुरुष लवकरच निस्तेज होत. त्यांना अनेक व्याधी जडत असत.

आई-वडील लहान वयाचे असताना त्यांच्या पोटी जन्मास येणारी मुले ही रोगट व अशक्त असत.

असे असले तरी धर्माच्या व संस्कृतीच्या नावाखाली अशी कृत्ये करणारी मंडळी त्याकाळी फार होती व आजही दिसतात. समाजात अशी उदाहरणे नेहमी दुसऱ्याला देताना दिलेली पहावयास मिळतात. परंतु समाज वेळप्रसंगी स्वतः मात्र नामानिराळा राहतो. याचेच एक उदाहरण म्हणजे टिळक होय. 'टिळक हे सनातन्यांचे प्रतिनिधित्व करीत होते. त्यावेळी ते म्हणत की, शिवाजी, थोरला बाजीराव, महादजी शिंदे, हे काय २५ व्या वर्षी लग्न झालेल्या मुलींच्या पोटी जन्मास आले आहेत काय? पण टिळकांनी त्यांच्या मुलीचे लग्न १४ व्या वर्षी केले व मुलगी नाशिक येथील केतकरांच्या सुधारक कुटुंबात दिली. म्हणून आगरकरांनी 'सुधारक' मध्ये टिळकांचे अभिनंदन करणारा लेख लिहिला होता.'[३०] अशी विधवांची भयावह अवस्था होती.

अशी विसंगती समाजात सर्वत्र पहावयास मिळते. एकीकडे समाज परिवर्तन करणारेच समाजाच्या भीतीपोटी किंवा आपल्या धर्म परंपरेत भरकटलेले पहावयास मिळतात.

आगरकर 'सुधारका'च्या २४ नोव्हेंबर १८९७ च्या लेखात म्हणतात, 'ब्राह्मण लोकांत इतर जातीपेक्षा विधवांचे प्रमाण अधिक आहे. ब्राह्मणांच्या स्त्रियांपैकी तिसरा हिस्सा हया विधवा स्त्रिया असत. त्यातही एक तृतीयांशहून अधिक या बालविधवाच असतात.'[३१]

बालविवाह ही मूलतः उच्चभ्रू संस्कृती मानली जाई. समाजातील सर्वच जातीत याचा प्रभाव हा एकसारखा नव्हता. याचा प्रभाव ब्राह्मण वर्गावर जास्त होता व त्यांचेच अनुकरण करुन तो इतर जातीतील लोकांनी स्वीकारला. याचीच काही उदाहरणे माडगावकरांनी 'मुंबई वर्णनामध्ये' लिहिलेली पहावयास मिळतात. ते म्हणतात की, कित्येक मुलींची लग्ने ही त्यांच्या आई-वडिलांच्या कडेवर बसून होतात. म्हणजे लग्नासाठी जो विधी त्यांनी स्वतः करावयाचा तो त्यांच्या आई-वडीलच करतात.'[३२] थोडक्यात, बालविवाह करणे म्हणजे आपली संस्कृती उच्च हे यावरुन समाजाचा उतावळेपणा समोर येतो. समाजाला मुलीच्या वयाचे कोणते भान होते की नाही, हाच मोठा प्रश्न पडतो. शिवाय कडेवरील विवाह झाल्यावर त्यांनी मुलीला कसे सांभाळायचे, कोठे ठेवायचे, असे अनेक प्रश्न समोर येतात.

समाजातील या वाईट प्रथेची जबाबदारी शेठ बेहरामजी मलबारी मुस्लीम स्वाऱ्यांवर टाकतात. ते म्हणतात, मुस्लिमांच्या या सुरुवातीच्या स्वाऱ्यांमुळे कोणते अनुचित प्रकार घडू नयेत म्हणून बालविवाह लोकांवर लादला गेला असावा.

बालविवाह पध्दत ब्राह्मणांकडून इतर जातीमध्ये पसरली असली तरी ती मुस्लिमांमध्येही काही प्रमाणात रुढ झालेली पहावयास मिळते.'[३३]

थोडक्यात, हिंदू-मुस्लिमामध्ये ही बालविवाह पध्दत त्यावेळी सुरु होती.

१९ व्या शतकात हिंदू धर्माचा प्रभाव इतर धर्मावर घडून त्या धर्मातील लोकांनीही काही चालीरीती अंगिकारल्या होत्या. ही गोष्ट खूप भयंकर होती. आजही भारतात वेगवेगळ्या धर्मातील लोक वेगवेगळ्या काही परंपरा

स्वीकारताना दिसतात पण त्या चांगल्या की वाईट, याचा ते विचारच करत नाही, हे मात्र खरे.

बालविवाह प्रतिबंध कायदा १८७२ साली संमत झाला व त्यातही सातत्याने बदल होत गेले. स्वातंत्र्यापूर्वी विवाहासाठी मुलींना १४ व मुलांसाठी १८ ही वयोमर्यादा ठेवली गेली. १९४९ मध्ये यात पुन्हा सुधारणा करत मुलींसाठी १५ व मुलांसाठी १८ हीच वयोमर्यादा ठेवण्यात आली. त्यानंतर १९७८ मध्ये त्या कलमात दुरुस्ती करत २१ वर्षे मुलांसाठी व १८ वर्षे मुलींसाठी लग्नाची वयोमर्यादा कायद्याने निश्चित करण्यात आली. हा कायदा करण्यापाठीमागे उद्देश हाच की, पालनकर्त्यांची जबाबदारी भावना निर्माण होईल व बालकाचे आरोग्य सुधारेल हा होय.'[३४] या कायद्यामुळे थोडीशी सुधारणा झाली हे दिसून येते. यामुळे विवाहाचे वय वाढल्याचे दिसून येते.

या कायद्याचा भंग केल्यास ३ महिने सक्तमजुरी व १०००/- रुपये दंड अशी शिक्षा होती. यात आई-वडील, विवाह-विधी करणारा पुरोहित यांच्याही शिक्षेची तरतूद केली होती. इ.स. २००६ मध्ये बालविवाह कायदयात पुन्हा बदल करत बालवयात करण्यात आलेला विवाह कायद्याने रद्दबातल करण्याची तरतूद करण्यात आली.

कायदा अस्तित्वात आला तरी बालविवाह होतच होते. कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा कायम करत नव्हती. इ.स. १९२१ च्या लोकसंख्या अहवालानुसार ६१२ हिंदू विधवा अशा होत्या की, त्याला विवाह एक वर्षाच्या आतच झाला होता. २०२४ विधवा अशा होत्या की त्यांचा विवाह ५ वर्षाच्या आतच झाला होता. आश्चर्याची बाब म्हणजे हिंदू विधवांना पुनर्विवाह करता येत नसे. जगातील कोणत्याही ठिकाणी विधवांची एवढी शोचनीय अवस्था झाली नसावी.'[३५] थोडक्यात, यामुळे सामाजिक हानी मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येते.

१९ व्या शतकात या प्रस्तावाबाबत अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. अनेक कायदे स्त्रियांच्या रक्षणासाठी निघाले. परंतु आजही परिस्थिती पाहिजे

तितकी सुधारलेली नाही. आधुनिकतेच्या नावाखाली स्त्रियांचे शोषण आजही सुरुच आहे. समाजाची मानसिकता बदलली खरी, पण आधुनिकतेच्या मायाजाळात किती व कोणते शोषण आपण करतो हेच कळत नाही. आजही बालहत्या होतात. विधवांना पुनर्विवाह करताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. कित्येकजणी आई-वडिलांच्या घरी राहिलेल्या दिसतात. एवढेच खरे की सतीची पध्दत बंद झाली. पण त्याच्या समकक्ष अत्याचार मात्र स्त्रियांवर वाढले हे विसरता येणार नाही. IT च्या जमान्यात आपणच आपल्या मुलींचे स्वातंत्र्य गमावून बसलो आहे हे मात्र खरे आहे.

याविषयी आपणच गांभीर्याने विचार करायला हवा. आपली मानसिकता, समाजाची मानसिकता बदलायला हवी, तरच खऱ्या अर्थाने स्त्रियांना स्वातंत्र्य मिळेल व त्यांना त्यांचा ४९% चा अधिकार त्यांना साध्य करता येईल.

**विषम विवाह - (जरठ-कुमारी विवाह)**

एकोणिसाव्या शतकात विषम विवाह किंवा बाल जरठ-विवाह सर्रास होत होते. समाजाने पुरुषांना अनेक विवाह करण्याची मुभा दिली होती. त्यामुळे पुरुष अगदी उतारवयातही विवाह करीत असत. परंतु अशा पुरुषांचा विवाह अजाण बालिकेशीच होत असे. अगदी मृत्यूच्या जवळ आलेला किंवा वयाची साठी उलटलेला पुरुषही सात-आठ वर्षाच्या कोवळ्या मुलीशी लग्न लावीत असे. पुरुषाची विषयासक्ती किंवा पुत्रप्राप्तीची इच्छा ही अशा विवाहाची कारणे असत. गरीब मुलींचे बाप अगतिकतेमुळे किंवा पैशाच्या लोभामुळे अशा विवाहास तयार होत असत. मात्र, या विवाहामुळे अनेक स्त्रियांच्या आयुष्याचे मात्र मातीमोल होत असत.'[३६] थोडक्यात, महिलांची ससेहोलपट आपणास पाहावयास मिळते, त्यांची यामुळे कुचंबना होत होती. मुलींना अनेक प्रसंगाला तोंड द्यावे लागत असे. त्यामुळे बालविधवांची संख्या वाढली.

विषम विवाहाचे एक नमुनेदार उदाहरण म्हणजे तुकाराम महाराजांची शिष्या बहिणाबाई होय. आपल्या आत्मकलेचा प्रारंभ करणाराच आपल्या पतीचा परिचय करुन देतात. त्या म्हणतात.....

द्वितीयसंबंधी पुरुषा तिसाचा ।
नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ।।

या तिच्या शब्दात कसलाही उपरोध नाही. रुढीविरुध्द तक्रारीचा सूर नाही. परंतु तिने अगदी सरळ व निर्मळ मनाने केलेल्या या निवेदनालाही एक व्यथेची धार होती. केवळ तीन वर्षाची पोर व तीस वर्षाचा बिळवर पती, केवढी ही वयाची तफावत. माता-पित्यांना कन्यादानाचे पुण्य मिळण्याची ओढ असल्यामुळे त्यांना ही विषमता जाणवणे अशक्य होते. किंबहुना त्या काळी हे कोणालाच जाणवत नव्हते. परंतु तिचे लग्न होऊन जाई, तिला हे कळेपर्यंत खूप वेळ गेलेला असे व शेवटी हे मान्यही करावे लागे.'[३७] विवाह कधी होईल हे तिला कळण्याच्या आतच ती प्रपंचात पडलेली दिसते.

अशीच काही उदाहरणे डॉ. राजा दीक्षित आपल्या पुस्तकामधून देतात. नानासाहेब पेशव्यांनी वयाच्या चाळिसाव्या वर्षी नऊ वर्षाच्या मुलीशी लग्न केले व त्यानंतर चार महिन्यातच त्यांचा मृत्यू झाला. (१७६१), नाना फडणीस वयाच्या ६७ व्या वर्षी वारले. (१८००) तेंव्हा त्यांच्या एका पत्नीचे वय ९ वर्षे होते. महादजी शिंदे यांनी १७९२ साली वयाच्या ६५ व्या वर्षी १२ वर्षाच्या मुलीशी विवाह केला ही तीन उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत.'[३८] या उदाहरणावरुन आपणास त्या वेळची विवाहाविषयीची परिस्थिती कशी होती हे दिसून येते.

१९ व्या शतकात बालविवाह व विषम विवाह यांमुळे समाजात विधवांचे प्रमाण बरेच मोठे होते. काही मुलींवर तर अजाणत्या वयातच विधवापणाची कुऱ्हाड कोसळत असे. संसाराचा अर्थ कळण्याच्या आगोदरच विधवेचे जीवन त्यांच्या वाट्याला येत असे. पुरुषाला त्याच्या पत्नीच्या निधनानंतर दुसरा विवाह करण्याची मोकळीक होती; परंतु विधवा विवाहाला मात्र तत्कालीन समाज मुळीच मान्यता देत नव्हता. यामुळे विधवा स्त्रीला व्रतवैकल्ये करीत परमार्थ साधनेत आपले आयुष्य काढावे लागत असे.

पेशवाईत पतीचे वय हे मुलीच्या वयाच्या चारपट असे. खुद्द पेशव्यांनी असे विवाह केल्याची अनेक उदाहरणे पहायला मिळतात. असेच एक उदाहरण म्हणजे 'कर्नाटकात एका ४५ वर्षाच्या गृहस्थाने ७० वर्षाच्या गृहस्थाच्या एका १५ वर्षाच्या मुलीशी लग्न केले, तर या ७० वर्षाच्या गृहस्थाने ४५ वर्षाच्या गृहस्थाच्या १०-१२ वर्षाच्या मुलीशी लग्न करुन ते एकमेकांचे जामात श्वसुर झाले.'[३९] यामध्ये स्त्रिया अशा चालीरीतीमुळे भरडल्या गेल्या. त्यांच्यावर अन्याय होत राहिला.

पेशवाईच्या काळातील या विलक्षण परिस्थितीमधील नवरा व बायको यांच्या मधील विलमन वयाची विषमता हेच मुलींच्या मृत्यूचे कारण म्हणता येईल व वाढत्या विधवांचेही म्हणता येईल.

**बहुपत्नीत्व -**

पेशवे कालखंडात राजे, सरदार, श्रीमंत लोक व खुद्द पेशवे कुटुंबात बालविवाह होत असत. एकोणिसाव्या शतकात एकूणच समाजात ही बालविवाह प्रथा रुढ होती. म्हणजे एक हयात असताना दुसरी करणे किंवा एक वारल्यानंतर दुसरी करणे, तिसरी करणे, अशी बहुपत्नीत्वाची पध्दत रुढ होती. यात अनेक बालविवाह केले जात होते.

दुसऱ्या बाजीरावाची ६ लग्ने दक्षिणेत पेशवेपदावर असताना झाली व ५ लग्ने पदभ्रष्ट झाल्यावर विठुर (मध्य प्रदेश) येथे झाली.'[४०]

बहुपत्नीत्वाच्या चालीबाबत महात्मा फुले म्हणतात, बहु स्त्रियांचा हा पती स्त्रीस का उलटी रीती.

अनेकदा लहान वयात लग्ने झाल्याने मोठेपणी ती पत्नी आवडत नाही म्हणून टाकून देण्याची वाईट प्रथा देखील समाजात होती. अशा प्रथांवरती बोलताना महात्मा फुले म्हणतात, शेतकऱ्यांचे आई-बाप त्यांच्या संमतीशिवाय त्यांची लहानपणी लग्ने लावून देत व त्यामुळे त्यास जर लग्नाच्या बायका आवडल्या नाहीत, तर त्या प्रत्येकांनी दुसरी एकेक पाटाची बायको केल्यास ते कदाचित न्यायदृष्टीने अपराधी ठरतील असे मी सांगत नाही. पण त्यांनी

एकामागे एक, दोन, तीन, चार, पाटाच्या बायका कराव्यात का? या जुलमी न्यायाला म्हणावे तरी काय?'[४१]

थोडक्यात, महात्मा फुले यांनी आपल्या ग्रंथातून या विवाहाला वाचा फोडली व अनेक लग्ने का करावीत, कशासाठी करावीत, यामुळे महिलांवर जुलूम होतो, असे म्हटले आहे. यासाठी त्या काळीसुध्दा मुलींना विवाहविषयी विचारणे गरजेचे होते. समाजातील या घोर कृतीचा म. फुले यांनी निषेध केला.

**सतीची पध्दत -**

महाराष्ट्रात बालविवाह, विषम विवाह किंवा जरठ बालविवाह या प्रथांमुळे अनेक स्त्रिया लहान वयात विधवा होत असत. एकंदरीत भारतात सतीची चाल पुरातन असावी. रामायण कथेत दशरथ निधनानंतर कौशल्या सती गेलेली नाही. महाभारतात पंडूची एक पत्नी माही सती गेली. रजपूत स्त्रियांमध्ये जोहार प्रसिध्द आहे. महाराष्ट्रात ही चाल उत्तर भारतीयांच्या अनुकरणाने आलेली दिसते.

उच्चक्षत्रीय कुले, पेशवे व इतर सरदार यांच्या स्त्रिया सती गेलेल्या दिसतात. थोरल्या शाहूमहाराजांची पत्नी, माधवराव पेशव्यांची स्त्री रमाबाई, बळवंतराव मेहेंदळे यांची पत्नी, संभाजी आंग्रे यांची पत्नी अशा काही सती इतिहासात प्रसिध्द आहेत. कुलथोरवीच्या कल्पनांतून किंवा घराण्याची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सती जाण्याची सक्तीही केली जात असावी.'[४२]

स्त्रियांचा कोणत्याही समाजात विवाह झाला तरी नवऱ्याच्या निधनानंतर तिला सती जावे लागत असे. तसेच काही वेळा त्यांच्यावर सती जाण्याची सक्ती केली जात असे.

'सतीची चाल' हे मध्ययुगाचे वैशिष्ट्य होते. सतीच्या चालीला धर्मशास्त्राची संपूर्ण मान्यता होती. सती जाणे म्हणजे धर्माचे पालन करणे ही समजूत या कालखंडातील समाजात होती. सती जाणाऱ्या स्त्रिया या आर्य स्त्रीच्या पतिप्रेमाच्या सर्वोच्च आदर्श ठरल्या.'

सतीची पध्दती ही प्रथम क्षत्रिय स्त्रियांनी प्रचारात आणली असली तरी हळूहळू ब्राह्मण विधवाही सती जाऊ लागल्या. महाराष्ट्रात अशी एक समजूत होती की फक्त ब्राह्मण विधवाच सती जात. ती मात्र पूर्णपणे चुकीची आहे.'[४३] रजपूत समाजात ही पध्दत रुढ होती.

ब्राह्मण विधवांना सुरुवातीस सती जाण्यापासून मनाई केली होती. पण स्वजातीविषयी अभिमान बाळगणाऱ्या ब्राह्मण स्त्रिया सतीच्या मौलिक त्यागापासून फार काळ दूर राहू शकल्या नाहीत. आणि दहाव्या शतकापासून ब्राह्मण विधवाही सती जाऊ लागल्या. वेदव्यास व इतर मध्ययुगीन स्मृतिकारांनी मृतमर्त्याबरोबर अग्निप्रवेश ठरण्याचा ब्राह्मण स्त्रीस उपदेश केला. याचा परिणाम समाजात हळूहळू वाढत गेला आणि तेराव्या शतकापासून सतीची संख्या वाढू लागली. सती जाणाऱ्या स्त्रीला स्मृतिकारांनी फार मोठे पारलौकिक कल्याणाचे प्रलोभन दाखवले होते. जी सती जाते ती स्वतःचे व भर्त्याचे सर्व पाप दूर करणारे असून नरकोध्दारार्थ आहे. तसेच ते मुक्ती देणारे असून जन्मांतरी सौभाग्य, धन पुत्रांदिकांची वृध्दी करणारे होते. जी स्त्री मर्त्याप्रत अनुगमन करते ती आपले मातृकुल, पितृकुल व भर्तृकुल हया तिन्ही लोकांस पावन करत साडेतीन कोटी वर्षांपर्यंत किंवा जितके केस अंगावर आहेत तितकी सहस्त्र वर्षांपर्यंत स्वर्गलोकी राहते.'[४४] सती जाण्यात तिचे भले आहे. तिच्यामुळे कुटुंबाचे भले होते हा समज रुढ होता.

थोडक्यात, स्मृतीग्रंथाच्या वचनाप्रमाणे किंवा स्मृतीचा लोकांवर इतका पगडा होता की समाज त्यातून बाहेर पडू शकला नाही.

सातव्या शतकापासून स्मृतिकार अशी प्रलोभने विधवेला दाखविली होती. खरे म्हणजे पतीवरील असीम प्रेमामुळे, त्याच्याशिवाय जीवन अशक्यच असल्याने स्त्रियांनी स्वेच्छेने सहगमन करणे, सतीच्या पध्दतीत अभिप्रेत होते. ज्याच्याशी लग्न बंधनाने जीवन निगडित झाले, एकरुप झाले, त्याच्यामागे आत्मसमर्पण करायचे आणि दोघांच्या एकजीवित्वाची साक्ष पटवायची, ही सतीच्या कल्पनेतील उदात्तता सतीच्या उदाहरणात क्वचित पाहवयास मिळते.

थोडक्यात, जिवंत असतानाही आणि मरतानाही पतीची साथ सोडायची नाही, त्याच्यासाठी जीवनाचा त्याग करायचा अशी कल्पना त्या काळात रुढ झाली होती.

पहिल्या माधवराव पेशव्यांच्या पत्नी रमाबाई याही पतीनिष्ठेने सती गेल्या. बापू गोखल्यांची १२ वर्षाची सून त्यांच्या मुलाच्या मृत्यूनंतर सती गेली. अहिल्याबाई होळकरांनी सासऱ्यांच्या विनवणीला मान देऊन सती जाण्याचे रहित केले. पण त्या त्यांच्या मुलीला मुक्ताबाईला सती जाण्यापासून परावृत्त करु शकल्या नाहीत.' याचे कारण पारलौकिक कल्पनांचा पगडा स्त्रियांच्या मनावर एवढा होता. ही स्वर्गलाभाच्या कल्पितापुढे जिता जीव आगीत झोकताना कोवळ्या वयाच्या मुलीही मागेपुढे पाहत नसत'[४५]

काही अपवाद उदाहरणे वगळता सतीच्या चालीने त्याकाळात कळस गाठला, असे म्हणावसे वाटते.

वयस्कर स्त्रिया आता आपला संसार झाला. नवऱ्यामागे जगून सुख काय या भावनेने पुष्कळदा आपखुषीने सती जात. गोविंद हरि पटवर्धन याची बायको सत्यभामाबाई याच उद्देशाने सती गेली. अल्पवयीन स्त्रिया नवऱ्याच्या मागे बिघडतील या समजुतीने त्यांच्यावर सती जाण्याची सक्ती होई व अशा जालीम उपायाने व्याभिचारास आळा घालण्यास येई. बरे ज्या स्त्रिया अगदी वयस्करही नसत व अल्पवयीन नसत पण संतानहीन असत, अशांना कोणी पुसणार नाही व त्यांचे हाल फार होतील म्हणूनही सती जाण्याचा मार्ग त्या स्वीकारीत असत. थोरल्या माधवरावाने रमाबाईस सहगमन करण्यास स्वतःच सांगितले होते. त्याचे कारण हे कदाचित संतानहीन असल्याचे असावे. मोरोबा दादा फडणिसांचे वडील बाबुराव फडणीस वारले तेंव्हा त्यांची स्त्री सती गेली ती फार नाजुक व सुंदर होती. ही बाबुरावाची दुसरी बायको होती. सती जाण्याने स्त्रियांना सद्गती मिळते अशी ही समजूत होती.'[४६]

सती गेल्यानंतर स्त्री व्याभिचारी बनू नये, तिच्यावर कोणी वाकडी नजर ठेवू नये तसेच त्यांना मोक्ष मिळतो ही खुळचट कल्पना त्यावेळी अस्तित्वात असल्याचे वरील उदाहरणावरुन दिसते.

सतीची चाल फक्त एकट्या ब्राह्मणांतच होती असे नाही, कित्येक मराठा सरदारांच्या स्त्रियाही सहगमन करीत असत. माधवराव पेशवा गोपिकाबाईस लिहितो, महाराज जानोजी निंबाळकर यास आषाढ वैद्य १२ शनिवारी देवाज्ञा झाली. त्यांची स्त्री समागाने गेली.

महाराष्ट्रात ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सर्व स्त्रिया सती जात. विसाव्या शतकातही राजस्थानातील रुपकुंवर या सती जाणाऱ्या स्त्रीचे मंदिर बांधले जाते. हजारो स्त्री-पुरुष भक्तिभावाने तेथे नतमस्तक होतात. तर एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सती जाणाऱ्या स्त्रीविषयी समाजातील सामान्य लोकांच्या भावना किती उदात्त असतील हे त्यावेळच्या लोकांच्या सतीविषयीच्या भावनांवरुन कळते. त्याकाळी सती जाणाऱ्या स्त्रीला समाजात देवते प्रमाणे मान मिळत होता. तिथे अलौकिक धैर्य, त्याग व पतिनिष्ठा वंदनीय ठरत असे. हिंदू स्त्रियांना पतिव्रता धर्माची थोरवी बिंबवून देण्यास लाखो सतींची आहुतीच पुष्कळ अंशी कारणीभूत ठरली, यात शंका नाही. सतीचे देऊळ बांधले जाई. सती जाणाऱ्याला जी सामाजिक प्रतिष्ठा व मूल्य होते ते अव्वल इंग्रजी कालखंडातही कमी झाले नव्हते. अनेकदा या सामाजिक प्रतिष्ठेमुळे सती जाण्याची सक्ती केली जाऊ लागली. कोवळ्या वयात विधवा झालेल्या मुलींना अग्नीचे भय वाटे. त्यांना जगण्याची उर्मी असे पण धर्मशास्त्रपंडित, घराण्याच्या प्रतिष्ठेपायी त्यांना सती जाण्यास भाग पाडीत. तसेच सती जाण्यास तयार नसणाऱ्या मुली मोठमोठ्याने आक्रोश करीत. पण त्यांचा आक्रोश ऐकू जाऊ नये म्हणून मोठमोठ्याने ढोलताशे, नगारे वाजवण्यात येत.'[४७]

थोडक्यात, आजही सतीचे स्मारक होण्यापर्यंत समाजाची मजल गेली होती, याचीही उदाहरणे आता आपणास दिसतात.

या प्रथेविरोधात 'राजा राममोहन रॉय' यांनी बंगाल प्रांतात आवाज उठविला. निर्घृण अशा खुनांना मान्यता देणारी ही प्रथा बंद व्हावी, या दृष्टीने त्यांनी इंग्रज सरकारकडे सती बंदीसाठी अर्ज पाठविला व लोकमत जागृती केली.

महाराष्ट्रामध्ये ब्रिटिश कालखंडात इतर जातीतील लोकांनी सतीच्या चालीचा हळूहळू त्याग केला. तरी कोकणस्थ ब्राह्मणांनी मात्र या बाबतीत फार दिवस दुराग्रह बाळगला आणि ते सतीच्या चालीला चिकटून राहिले, असा शेरा आर्यर क्रॉफर्ड यांनी मारला आहे.'[४८] राजा राममोहन रॉय यांना महिलांचे होणारे दुःख समजले व त्यांनी या प्रथेविरोधात जनमानसात जागृती केली.

१८२३ मध्ये एल्फिन्स्टनच्या कारकीर्दीत पुणे शहरात ओंकारेश्वरी' घडलेला सतीचा एक हृदयद्रावक प्रकार 'पुणे वर्णन' या पुस्तकात ना.वि. जोशी यांनी वर्णन केलेला आहे, तो असा-सुभानुनाम संवत्सरी भद्रपद वैद्य ८ स. (शके १७४५) एका कोकणस्त ब्राह्मणाची स्त्री 'राधाबाई सती निघाली तिला ओंकारेश्वराजवळ सरणावर बसविली व अग्नी दिला. पण तिला तो अग्नी सहन न होता तिने सरणातून बाहेर उडी टाकली. तेंव्हा तिचे अंग भाजले होते. प्राण होता म्हणून इंग्रज सरकारच्या कामगारांनी शहरात परत आणून बरी होण्यासाठी तिच्यावर औषध-उपचार केले. पण ती जास्त प्रमाणात भाजली असल्याने कोणताही उपाय चालला नाही व तीन दिवसांनी ती मरण पावली. गावात सती परत आणली म्हणून शास्त्राधाराने दुष्ट चिन्ह झाले असे सर्व लोक याबाबत बोलू लागले.'[४९] स्त्री सती जाताना परत आली म्हणून लोकांनी तो अपशकुन मानला. अशी त्यावेळी अंधश्रध्दा होती.

सतीच्या या प्रकारापैकी एक भीषण प्रकार या पुस्तकात वर्णिलेला आहे याचे आगोदर एक स्त्री सती जात असता तिचेही अंग पोळून ती बाहेर निघाली आणि सर्व अंगाची लाही झाली म्हणून नदीत उडी टाकावयास नदीकडे पळू लागली. पण ब्राह्मण लोकांनी तिला पकडून जुलमाने सरणात फेकली व वर मोठमोठे ओंडके टाकून तिचा प्राण घेतला. या प्रकारावरुन सरकारने धडा घेऊन

जर अशी सती बाहेर निघाली, तर तिला पुन्हा आत टाकू नये, असा बंदोबस्त ठेवला.'[५०] त्या काळी स्त्रीला पूर्ण जाळण्यापर्यंत व ती मरेपर्यंत तिला सोडत नसे. सवर्णामध्ये हा प्रकार अतिशय निंदनीय होता. स्त्रीच्या बाबतीत इतका क्रूरपणा होता.

जेंव्हा जेंव्हा सतीच्या प्रश्नाची चर्चा होत असे, तेंव्हा या चालीला धर्मशास्त्राची पूर्ण संमती आहे, असाच मुद्दा मांडण्यात येत असे. इ.स. १८१५ ते १८१८ या ४ वर्षात २२६६ स्त्रिया सती गेल्या व त्यापैकी १४८५ स्त्रिया कोलकत्ता विभागात सती गेल्या होत्या. बंगाल प्रांतात विधवेला पतीच्या इस्टेटीमध्ये हक्क मिळे. तो न देण्यासाठी म्हणून विधवेचे नातेवाईक तिला पतीच्या प्रेताबरोबर जाळून टाकत. ही प्रथा पश्चिम बंगालमध्ये रुढ झाली होती. महाराष्ट्रात ही प्रथा सार्वत्रिक नव्हती. पण शिवशाहीत व पेशवाईत काही विधवा सती गेल्याची नोंद इतिहासात आहे.'[५१] समाजावर धर्मशास्त्राचा इतका पगडा होता की ते त्यातच गुरफटून गेले. त्या काळी कोणी याविरुध्द आवाज उठविला नाही.

सती प्रथेविषयी रॉय यांनी विचार मांडले व काही इंग्रज अधिकाऱ्यांनी १७८९ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या सर्वोच्च सरकारकडे ही प्रथा बंद करण्यासाठी परवानगी मागितली होती. गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकने १८२८ मध्ये ही प्रथा नष्ट व्हावी म्हणून या सतीबंदीच्या संदर्भात कायदा करण्याचे ठरविले. तेंव्हा रॉय यांनी सतिप्रथेसंदर्भात आपली मते स्पष्टपणे मांडली होती. स्त्रीला व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तित्व आहे. म्हणूनच पतीचे अस्तित्व संपले म्हणून स्त्रीने स्वतःचेही अस्तित्व आत्मदहनासारख्या क्रूर पाशवी मार्गाने मिटवण्याची गरज नाही व तिच्यावर सती जाण्याची सक्ती करण्याचा समाजालाही काही अधिकार नाही असे त्यांचे मत होते.

अखेर लॉर्ड बेंटिंकने सतिप्रथाबंदीचा कायदा १८२८ मध्ये पास केला तेंव्हा रॉय व इतर त्यांच्या सहकाऱ्यांनी लॉर्ड बेंटिंकचे व्यक्तिगत आभार मानले होते.

सतीबंदीचा हा कायदा मंजूर होण्यापूर्वीच बंगालमधील लोकमत सतीबंदीच्या बाजूने तयार करण्यात राजा राममोहन रॉय यांनी फार कष्ट घेतले. सती पध्दतीला शास्त्राधार नाही व सती म्हणजे एक प्रकारचा खूनच होय, अशी रॉय यांची या प्रश्नाबाबत भूमिका होती. रॉय यांनी सतीप्रथा बंद व्हावी म्हणून प्रयत्न केले नसते, तर कदाचित आणखी कित्येक वर्षे ही प्रथा बंद होण्याची वाट पहावी लागली असती. थोडक्यात, अशा सतीबंदीला आळा घालण्याचे व जनमताच्या आधारे कायदा करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांचे कार्य खूप मोठे आहे.

**विधवांचे जीवन -**

या काळात विधवांची स्थिती अत्यंत शोचनीय होती. वैधव्य ही दैवी आपत्ती आहे. विधवांनी व्रतस्त संन्यस्त जीवन जगावे ही तत्कालीन समाजाची धारणा होती. काही जातीत मात्र विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता होती. ब्राह्मण , उच्चकुलीन मराठे यांच्या घरांतील स्त्रियांना पुनर्विवाहास मान्यता नव्हती. ब्राह्मणेत्तर समाज, मराठा कुणबी, इतर मागासवर्गीय दलित वगैरे जातीत मात्र विधवांच्या पुनर्विवाहास परवानगी होती. विधवा स्त्रियांसाठी एक आचारसंहिताच होती. उदा. विधवांनी सार्वजनिक समारंभात जाऊ नये, दिवसातून एकदाच भोजन घ्यावे, पलंगावर झोपू नये, उपवास करावा, स्वतःच्या हाताने स्वतःपुरते जेवन बनवावे व जेवावे, कथा-कीर्तनात वेळ घालवावा, कोणत्याही शुभकार्यास हजर न राहणे वगैरे.'[५२] विधवा महिलेने काय करावे व काय करु नये, याची नियमावली होती. तिला अशुभ समजले जात असे. कुठल्याही समारंभात तिला भाग घेता येत नसे. अशी सक्ती तिच्यावर लादली गेली होती.

बालविवाहाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे स्त्रीला येणारे अकाली वैधव्य. वंधत्व हा एक शाप ठरावा इतके निकृष्ट दर्जाचे, दुर्लक्षित, अपमानास्पद आयुष्य विधवेच्या वाट्याला येत असे. याबाबत लोकहितवादी आपल्या पत्र क्रमांक ९० मध्ये लिहितात, 'ती बिचारी जन्मापर्यंत विधवा, तिकडून सासरा,

दीर, सासू, जावा यांनी म्हणावे की, करंटी, अवदसा, नवरा मारुन तोंड कशाला दाखविते, बाप आपले घरी का ठेविना? बरे रस्त्याला फिरले तर लोक म्हणतात की, बोडकी पुढे आली. आता पाऊल पुढे कसे टाकावे? त्याचप्रमाणे त्या पोरीला आपली तिन्ही वये काढावी लागतात. बरे कोणाचा आश्रय करावा तर तेथे तरी टीका होते की, रंडकी, मुंडकीस तुप-दही कशास हवे? गादी निजावयास कशास हवी? तेंव्हा तिने वैराग्यसारखे संसारात राहून दिवस काढावे लागतात.'[५३] विधवा झाल्यावर येणारे संकट, तिला मिळणारी वागणूक, तिच्या वाट्याला येणारे दुःख, तसेच तिला येणारे वैराग्य याचे वर्णन लोकहितवादींनी शतपत्राद्वारे मांडले आहे.

या प्रमाणे खाटिकाचे घरी मेंढरांची देखील दुर्दशा होत नाही. तो त्यास एक वेळ सुरी लावतो त्यावेळेस मात्र काय दुखः होते तेवढेच परंतु तेथपर्यंत तो हाल करित नाही. आणि हे हिंदु लोक किती दृष्ट आहेत की, जे आपल्या स्त्रियांची अशी दुर्दशा करतात.

आगरकर 'सुधारक' च्या २४ नोव्हेंबर १८७७ च्या अंकात म्हणतात, 'ब्राह्मण  लोकांत इतर जातीपेक्षा विधवांचे प्रमाण अधिक आहे. ब्राह्मणाच्या स्त्रियांपैकी तिसरा हिस्सा विधवा असतात... ब्राह्मणी स्त्रियांत जितक्या विधवा असतात त्यापैकी एक तृतीयांशहून अधिक बालविधवा असतात.'[५४]

'सुधारक'च्या अंकावरुन ब्राह्मण  कुटुंबात विधवा स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

विधवा स्त्रियांचा पाय घसरला तर त्यांना अत्यंत वाईट शिक्षा देण्यात येत असत. तसेच त्यामुळे समाजात भ्रूणहत्या व बालहत्या होत असत. त्यामुळे ज्या प्रमाणात विधवांची संख्या वाढली, त्याच प्रमाणात भ्रूणहत्येचे व बालहत्येचे प्रमाणही वाढलेले दिसते. नंतर १८२५ मध्ये सतीबंदीचा कायदा आला तरी १८९१ पर्यंत अधून मधून स्त्रिया सती जातच होत्या.

**केशवपन -**

विधवा स्त्रीच्या संदर्भात आणखी एक अनिष्ट प्रथा समाजात रुढ होती ती म्हणजे केशवपनाची. वयात येण्याआगोदर मुलगी विधवा झाली तर ती वयात येईपर्यंत तिचे केशवपन करीत नसत. वयात आल्यावर मात्र विधवेला कोणा परपुरुषाचा मोह पडणे शक्य असते. किंवा या नवतरुण विधवेला कोणी पुशी पाडण्याची शक्यता असते. या गोष्टी लक्षात घेऊन ती वयात येताच तिचे केशवपन करुन तिला विद्रूप करुन तिच्या तारुण्यसुलभ विकारांना मुळातच छाटून टाकण्याचा प्रयत्न या पध्दतीत दिसतो.

कोवळ्या वयात विषम विवाह होत होते. त्यामुळे अकालीच बालपणी आलेल्या वैधव्याने तरुणपणात त्यांच्याकडून पापाचरण घडू नये म्हणून प्रतिकार करण्यासाठी वपनाची व सहगमनाची (सतीची) चाल पडली असावी.'[५५] नवरा मेल्यावर तरुण किंवा सुंदर स्त्री वाममार्गाला लागू नये तिच्या हातून पापकर्म घडू नये हा त्यामगचा हेतू असावा.

१८३७ साली पुनर्विवाह प्रकरण लिहिणारा तैलंग ब्राह्मण म्हणतो, मागे पुण्यात बहुत दुराचार झाला व विधवा केश राखुन व्याभिचार करु लागल्या. तेंव्हा श्रीमंतांनी एक दिवस नाकझरीच्या काठी नेऊन भादरविल्या.'[५६] विधवांच्या केशवपनाचा संबंध दुराचाराशी जोडला गेल्यामुळे पेशव्यांनी विधवांच्या केशवपनाची सक्ती केलेली दिसते.

केशवपनाच्या चालीमागचा हेतू पाहताना एक हिंदू 'ज्ञानोदया'त म्हणतो, 'भ्रतार मरण पावल्यावर स्त्रियांनी मस्तकी केश धारण करु नयेत, अशी शास्त्राज्ञा आहे. एवढेच नाही, पण ती कुलीन, तिच्या उभय कुळातील पूर्वज फार पुण्यवान होते. म्हणूनच अशी कुलदीपिका त्यांच्या वंशात उदयास आली. तिने आपल्या एकवीस पूर्वजांचा उध्दार केला. तिने आपल्या भ्रताराची यमदंडापासून सोडवणूक केली, तिला मेल्यावर उत्तम गती प्राप्त होईल, अशी स्तुती होती. याजकरिता व मुख्यत्वेकरुन लोकापवाद भयास्तव पुष्कळ स्त्रिया आपले केश काढत असत. आणी ज्या स्त्रियांची असे करण्याची इच्छा नसते

त्यांचे सासु-सासरे, आई-बाप, भाऊबंद आदिकरुन लोक लौकिकप्रीत्यार्थ बलात्काराने त्यांजवर क्षौराचा गजब करतात.'[५७]

केशवपनाच्या या अनिष्ट प्रथेमागे सासर-माहेरच्या लोकांचा उध्दार, नवऱ्याची यमदंडापासून सुटका आणि विधवेची मरणानंतरची उत्तम गती या गोष्टी जोडलेल्या होत्या. केशवपन करण्यामागे त्या स्त्रीचे धन आपल्याला मिळावे, अशी कुटुंबातील कुटुंबकर्त्यांची भूमिका असण्याचाही संभव आहे. तिला त्या स्त्री धनाच्या जोरावर काही अधिकार गाजविता येऊ नयेत. अशा निष्ठुरतेच्या विचारात या घाणेरड्या चालीचा उगम झाला असावा, असे 'पुणे वर्णनकार' म्हणतात.'[५८]

'ज्ञानोदय', 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रांनी केशवपणाच्या या प्रथेचा स्वीकार केला होता. काही विधवांनी या प्रथेविरुध्द ब्रिटिश सरकारकडे अर्जही केले तेंव्हा त्यांना पोलिस संरक्षणही मिळू लागले. लोकहितवादींनी या प्रथेचा धिक्कार करणारे लेख लिहिले हाते. पंडिता रमाबाईंनी २९ डिसेंबर १८८९ रोजी काँग्रेस अधिवेशनाच्या मंडपात तिसऱ्या सामाजिक परिषदेत बालविवाह व केशवपन प्रतिबंधाबाबत ठराव मांडला होता.

या प्रथेविरुध्द 'सत्यशोधक नारायण मेधाजी लोखंडे', म. फुले पती-पत्नीने जनमत तयार करुन नात्यांची बैठक बोलावून केशवपन करणार नाही, असा ठराव २३ मार्च १८९० रोजी मुंबईच्या डोंगरी भागात ५०० न्हाव्यांच्या उपस्थितीत पास केला होता.'[५९]

सरकारकडे कायदा करा, असे सांगण्यापेक्षा लोकांनीच स्वतःच प्रयत्न करुन ही प्रथा बंद करावी, असे आगरकरांनी सुचविले होते. आपल्या मृत्यूनंतर पत्नी यशोदाबाईंकडून केशवपन करणार नाही, असे आगरकरांकडून त्यांनी वदवून घेतले होते. त्या काळात आगरकरांनी उचललेले पाऊल कौतुकास्पद होते.

पार्वतीबाई आठवले यांनी आपले आत्मचरित्र 'माझी कहाणी' या नावाने प्रकाशित केले. पार्वतीबाई आठवले या धोंडो केशव कर्वे यांच्या दुसऱ्या पत्नी -

आनंदीबाई कर्वे यांची बहीण. केशवपनाबाबत त्यांचा व इतर स्त्रियांचा दाहक अनुभव 'माझी कहाणीत' त्या मांडताना लिहितात, 'विधवा झाल्यानंतर त्या दरमहा केशवपन करावयाच्या, पण ४० नंतर त्या केस वाढवू लागल्या, तेंव्हा त्याही पुनर्विवाह करणार का? असा प्रश्न कर्व्यांना विचारु लागले.'[६०] त्या काळी लोकही अंधश्रध्दाळू होते. कर्वे यांनाही अशा प्रसंगांना सामोरे जावे लागले.

लोकहितवादी या प्रथेबाबत लिहितात, 'अहो, जिचा नवरा मरतो, तिचा अध:पात होतो, ती दु:खी होते आणि तुम्ही अशा अवस्थेत तिचेच केश काढीता आणि तिचेच दागीने काढून घेता हा काय धर्म आहे? असा प्रश्न उपरोधिकपणे ते विचारतात.'[६१]

थोडक्यात, तिच्या दु:खात सहभागी होण्याऐवजी तिला दु:खाच्या खाईत लोटून देता असे लोकहितवादींना वाटते.

यानंतर ते म्हणतात, आता पुरे करा, आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल की, इंग्रज लोकांनी जशी सती बंद केली तशी ही प्रथा देखील बंद करावी, परंतु विधवांची लग्ने करावयास इंग्रज इकडे आले नाहीत. तुमची तुम्हास खबर नाही. मग त्यांस कशी असावी. ते तर दुरचे लोक तुम्ही केले तर त्यांना सुतक थोडेच पडणार आहे. ते लक्षात घ्या![६२]

अशा कडक शब्दात ते लिहितात. अशा प्रकारे या प्रथेविरुध्द त्यांनी आपली लेखणी झिजविली. एकंदरच एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधात केशवपनाची अनिष्ट रुढी विधवा स्त्रियांच्या अपमानात भर टाकणारी होती.

**स्त्रीशिक्षण -**

स्त्रीशिक्षणाबद्दल १९ व्या शतकात मोठी उदासीनता होती. पेशवाईच्या काळात तर ते जास्त उदासीन झाल्याचे दिसते. स्त्री शिकली तर ती चंचल होईल, कुमार्गाला लागेल, अशा अनेक समजुती धर्मशास्त्र वचनकारांनी समाजात पसरविल्या होत्या. धर्माचा समाजजीवनावर प्रचंड पगडा होता. श्रीमंत, सरदार व राजेशाही कुटुंबातील स्त्रिया थोडेफार शिक्षण घेत असत.

एकूण स्त्रियांपैकी ५ टक्के स्त्रियाही शिक्षण घेत नसत. मुलींना शिक्षणाची गरज नाही असा एक पक्का समज रुढ झाला होता.'[६३]

धर्माचा पगडा जबरदस्त असल्यामुळे स्त्रिला शिक्षणासाठी वंचित राहावे लागले. परिणामी स्त्रीशिक्षणापासून दूर राहिली.

पेशवे व इतर ब्राह्मण सरदार यांच्या स्त्रियांना बहुदा बऱ्याच जणींना पोथी, वाचण्याचे, पत्रे लिहिण्याचे ज्ञान होते.

यातील जनार्दनपंतांची पत्नी सगुणाबाई यांना चांगले लिहिता वाचता येत असून त्यांची ग्रंथसंग्रहही बराच होता.'[६४]

त्या काळात राजकारणी स्त्रियांना फक्त राज्यकारभाराचे व लष्कराचे शिक्षण दिले जाई. घोड्यावर बसणे, हत्यारे चालविणे या गोष्टी स्त्रियांना पुष्कळदा जरुरीसाठी कराव्या लागत.'[६५] काही वेळा वेळप्रसंग पाहून स्त्रियांना लष्करी शिक्षण दिले जात असे.

शिक्षण संपादन करणे हा मानवी मूलभूत हक्कांपैकी महत्त्वाचा हक्क आहे. परंतु ज्या काळात स्त्रियांची लग्नेच वयाच्या आठव्या वर्षी होत, त्यांना घरकाम व हलक्या दर्जाची मजुरीची कामे करावी लागत, अशा परिस्थितीत त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित कोण करणार.

मुलींच्या शिक्षणासंबंधी 'मुंबई वर्णनकार' म्हणतात, मुलीस विद्या शिकवणारी शाळा मुंबईत पूर्वी एकही सापडणे कठीण होते. मुलांसच धड वाचता येत नसे, मग मुलीस वाचायला व लिहावयास शिकवण्याचा अट्टाहास कोण करेल. आणि बायकांना लिहावयास व वाचावयास शिकवू नये, असा हिंदी लोकांचा मुळातच समज होता.'[६६] महिलांना शिकवू नये अशी सामाजिक मानसिकता असल्याचे दिसून येते. परंतु सन १८१४ मध्ये अमेरिकेकडून पाद्री (मिशनरी) आले आणि त्यांनी मुलींना शिकवण्यासाठी शाळा सुरु केल्या. पण त्यातही त्यांना समाजाने अनेक अडचणी आणल्या; पण त्यांनी त्यांचा प्रयत्न सोडला नाही. प्रसंगी मुलींना घागरे, चोळया, साड्या, पैसे अशी इनामे देऊन मुली जमा केल्या. तेंव्हा त्या शाळा नियमित सुरु झाल्या आणि हल्ली त्या शाळा

सुमारे २५ आहेत. स्टुडंट्स लिटररी आणि सायंटिफीक सोसायटीने काढलेल्या ५ आहेत. मुंबई इलाक्यात सरकारी शाळांत ४४१६६ मुले शिकतात व पांद्रीच्या व गावठी शाळांत सुमारे ९१३३० इतकी मुले शिकतात.'[६७] थोडक्यात, इंग्रजी मिशनऱ्यांनी भारतात शाळा सुरु केल्या आणि तिथूनच शिक्षणाची सुरुवात झाली.

लोकहितवादी आपल्या शतपत्रात म्हणतात की, स्त्रियांस विद्या शिकवू नये याचेही कारण हेच आहे की, त्यांनी जर शाळाभ्यास केला तर त्या विरुध्द गोष्टीस प्रतिकार करतील.'[६८] महिला जर शिकल्या तर त्या शहाण्या होतील आणि अन्याय, अत्याचार याविरुध्द त्या आवाज उठवतील अशी भीती होती.

स्त्रिया जर शिकल्या सावरल्या, शहाण्या झाल्या तर पुरुषांस विरोध करतील त्यांच्या पुढे जातील या भीतीने त्यांना अज्ञानात ठेवण्यात आले. स्त्रियांचे शिक्षण म्हणजे घरात आई किंवा सासू अशा वडीलधाऱ्या स्त्रियांच्या हाताखाली काम करताना घरकाम, रीतिरिवाज, व्रतवैकल्ये यांची प्रत्यक्ष माहिती मिळवणे आणि वरच्या वर्गातील स्त्रियांना पुराणे, कीर्तने व प्रवचन ऐकून आपल्या धर्माचे व धर्मग्रंथाचे श्रवण भक्तीने ते ज्ञान त्यासाठी लागले, तर अक्षरओळख एवढाच शिक्षणाचा अर्थ होता. खेड्यापाड्यांत स्त्रियांना तर परंपरेने माहीत असलेल्या गोष्टी, लोकगीत, व लोककथा एवढेच जाणते म्हणजे त्यांचे शिक्षण होय.'[६९] एवढाच तो शिक्षणाचा अर्थ १९ व्या शतकात असल्याचा पहावयास मिळतो.

सार्वजनिक जिवनात वावरताना स्त्रियांना अनेक बंधनात वागावे लागे. जसे की, पडदा पध्दतीचा वापर याचा उल्लेख 'भासाच्या' नाटकांतून आलेला आढळतो. मुस्लीम आगमनाबरोबर ही पध्दत भारतात रुढ झाली.'[७०] जी श्रीमंत घराणी होती, त्यापुरतीच पडदा पध्दती सुरु होती. प्राचीन नाटकातून याचा प्रत्यय आपणास येतो.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात पुरुषप्रधान समाज-व्यवस्थेपुढे स्त्रियांची सर्वत्र कुचंबणा होत होती. हिंदू धर्मीयांचा स्त्रियांविषयीचा

अनुदार व संकुचित दृष्टिकोन हे देखील स्त्रियांच्या दु:खस्थितीचे एक महत्त्वाचे कारण होते. तत्कालीन समाजजीवनावर धर्माचा जबरदस्त पगडा होता. आणि धर्माने स्त्रियांना अनेक प्रकारच्या बंधनात जखडून टाकले होते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हती' या मनुच्या वचनावर त्या काळच्या समाजाला पूर्ण विश्वास होता. 'मनुस्मृती' या ग्रंथात स्त्रीला स्वातंत्र्य नाही, त्यामुळे असा ग्रंथ हा स्त्रियांविरोधी असल्याने तसेच जातिभेद असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तो जाळला.

अस्पृश्यांप्रमाणेच स्त्रियांनाही समाजात अतिशय तुच्छ लेखले जात होते. स्त्रीचे स्थान घराच्या चार भिंतीच्या आतच आहे. अशी समाजाची धारणा होती.'[७१]

थोडक्यात, समाजजीवनाचा अर्धा भाग असलेल्या स्त्रियांची परिस्थिती अत्यंत शोचनीय होती. त्याच्यावर असणारी सामाजिक व नैतिक बंधने कडक होती. बहुपत्नीत्त्व, बालविवाह, बालपणी वंध्यत्वप्राप्ती, पुनर्विवाहास बंदी, पडदा पध्दती, सतीची चाल, शिक्षणापासून वंचित राहणे, या सर्व गोष्टींमुळे स्त्रियांचा कोंडमारा होत होता. या परिस्थितीत 'लोकहितवादी' लिहितात, 'स्त्रीयांचे हाल, विपत्ती, जनावरांप्रमाणे अवस्था, ज्ञानशून्यता व पुरुषांची क्रूरता, प्राचीन शास्त्राधारे बहुत दिवस चालली पण आता तरी हा ईश्वरी लोभ जावो आणि जसे पुरुष तशा स्त्रिया आहेत, असे आंधळ्या हिंदु लोकांस समजो, ही माझी अतिशय इच्छा आहे.'[७२] लोकहितवादींनी आपली खंत याद्वारे प्रकट केली आहे.

एकंदरच समाज हा अशा विघटक चालीरीतींनी ग्रासला होता. त्यातच समाजाचे दारिद्रय, जातिव्यवस्था, अंधश्रध्दा, गुलामगिरी, दासीप्रथा, नरबळी, शिक्षणाचा अभाव, यामुळे त्यात आणखीन भर पडत होती व अशा चालीरीती बळकट होत होत्याच. लोक नि:सत्व व दुर्बल झाले होते. त्यांची प्रतिकारक्षमता लोप पावली होती. लोक स्वाभिमानशून्य होऊ लागले होते. इंग्रज रीतिरिवाज,

चालींचे काही सुशिक्षित अंधानुकरण करीत होते. महाराष्ट्रातील काही नवशिक्षितांना मराठी भाषेचा स्वाभिमान राहिला नव्हता.

'समाजातील चतुवर्ण्य व्यवस्थेमुळे विषमताप्रधान व्यवस्थेविरुध्दच्या नैसर्गिक प्रेरणांचा उद्रेक व पूर्व संस्कारांची पकड यातील संघर्षाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात कधीच धार चढली नाही.'[७३]

त्यामुळे समन्वय दृष्टी हा आपल्या सामाजिक जीवनाचा स्थायीभाव होऊन बसला. यात बंडखोरपणाला थारा मिळाला नाही. यामुळे इंग्रजी शिक्षण घेतलेले, परंतु आपल्या समाजातील दोष ओळखून ते दूर करणारा असा एक सुशिक्षित सुधारकांचा वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला. यामध्ये भाऊ महाजन, नाना शंकरशेठ, बाबा पद्ममनजी विष्णुबुवा ब्रह्मचारी , भाऊदाजी लाड, विष्णु शास्त्री पंडित, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, म. जो. फुले यांचे विचार महाराष्ट्रात वैचारिक प्रबोधन घडून येण्यास महत्त्वाचे ठरले.

**एकोणिसाव्या शतकातील धार्मिक परिस्थिती -**

एकोणिसाव्या शतकात संपूर्ण समाजावर धर्माचा पगडा होता. खरेतर सामाजिक जीवन व धार्मिक जीवन असा भेद करणे कठीण होते. समाज जीवनातील अनेक सामाजिक गोष्टींना धार्मिकतेची झालर होती. समाजजीवनात अनेक प्रकारच्या धार्मिक अनिष्ट रुढी-परंपरा होत्या. या प्रथा परंपरांमध्ये बदल व्हावा, असा विचारही सुचणे दुरापास्त होते आणि सुचला तरी अंमलात येणे अशक्य होते. कारण समाजाला धर्माच्या विरुध्द जाण्याची ताकद सर्वसामान्य माणसाजवळ नव्हती.

अठराव्या तसेच एकोणिसाव्या शतकात केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात धर्म-कल्पनांचे जबरदस्त वर्चस्व होते. पेशवे काळात तर ह्या भ्रामक कल्पना व अंधश्रध्दा अधिकच रुजल्या होत्या. होम, यजन व यज्ञ हे पेशवे काळात म्हणजे १७०७ - १८१२ पर्यंत होते.'[७४]

यज्ञात पौरोहित्य ब्राह्मण  करत होते. देवाला संतुष्ट करुन घेण्यासाठी व आपली इच्छा देवामार्फत पूर्ण व्हावी या हेतूने अनुष्ठान करीत असत. शकुन-

अपशकुन, मंत्रतंत्र, ज्योतिषी यांचे प्रस्थ उत्तर पेशवाईत अधिकच वाढले होते. पर्यायाने याच काळात ब्राह्मणांचे वर्चस्व वाढीस लागले होते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे सामाजिक विषमता वाढली होती. हिंदू धर्माचा आधुनिक दृष्टीने व समर्थपणे पध्दतशीर प्रचार करणारी यंत्रणा त्याकाळी अस्तित्वात नव्हती. पुराण, कीर्तनातून जे विचार लोकांच्या कानी पडत होते त्यामुळे धर्माच्या शुध्द स्वरुपाचे ज्ञान न होता धर्मभोळेपणालाच प्रोत्साहन मिळत होते. उपनिषदे, गीताषडदर्शन, भाष्यग्रंथ यातील तत्त्वज्ञानाचा परिचय फारच थोड्या लोकांना घडत होता.

या काळात शांतीकर्माचे प्रकार धर्मशास्त्राप्रमाणे पार पाडत. 'शांतीकर्म म्हणजे, 'धर्मशास्त्राप्रमाणे नैसर्गिक आपत्ती व संकटे येऊ नयेत म्हणून योजलेला समारंभ होय' व असे 'शांतीकर्म' १९ व्या शतकाच्या प्रारंभकाळातही प्रचलित होते. वास्तूचे काम पूर्ण होताच 'वास्तुशांतीची' पध्दत अस्तित्वात होती.'[७५] व असे शांतीकर्माचे प्रकार आजही आपण विसरलो नाहीत. आजही आपण २१ व्या शतकात नवीन वास्तूच्या 'वास्तुशांती' सत्यनारायण, महापूजा यासारख्या पूजा अर्चा ब्राह्मणाकरवी करताना दिसतो.

त्याकाळी या धार्मिक श्रध्दा व अंधश्रध्दा यांना राजाश्रय मिळाल्यामुळे कर्मकांडांनी कळसच गाठला होता. संपूर्ण मराठा समाज हा व्रतवैकल्पे, नवस, उपास-तापास, तीर्थयात्रा यात अडकून पडला होता. स्त्री-पुरुष दोघेही व्रते करत होती. श्रावणमासात ब्राह्मणांना मोठी दक्षिणा वाटली जात असे. लक्षावधी रुपयांच्या दक्षिणेचे वाटप पेशवे दरवर्षी सरकारी पैशातून करीत असत. त्यामुळे पुणे शहर म्हणजे विशेषतः दक्षिणेतील ब्राह्मण ंना स्वर्गच वाटे.'[७६]

थोडक्यात, ब्राह्मणवर्ग हा जो सांगेल तसे लोक करत असे. आजारपणात, पुत्रप्राप्तीसाठी नवस केले जात. जीवनात एकदा तरी काशियात्रा करावी अशी हिंदू समाजाची धारणा होती. धर्माने समाजजीवन इतके ढवळून निघले होते की, धर्माची पारंपरिक चौकट मोडली तर त्यास बहिष्कृत केले जात असे. लक्षावधी शूद्रातिशूद्रांच्या धर्मजीवनात तत्त्वजिज्ञासा व तत्त्वसंपन्नता

आणण्याची गरज येथे कोणालाच भासली नाही. आपले पुरोहित व शास्त्री पुराणिक संस्कृतीत व स्वयंकेंद्रित वृत्तीचे होते. शूद्रांना तुच्छतेने वागवण्यातच त्यांना धन्यता वाटत होती. बहुजन समाजाच्या धार्मिक प्रबोधनासाठी जो भागवतसंप्रदाय उदयास आला होता त्यातही अंधश्रध्देचे कर्मकांडाचे व मठ महंतीचे प्रस्थ माजले होते.'[७७]

एखाद्या व्यक्तीने धर्माचे पालन केले नाही तर अशा व्यक्तीस धर्म बहिष्कृत केले जात असे. त्यास वाळीत टाकले जात असे. शूद्रातिशूद्राला तुच्छतेने वागविले जात असे. अंधश्रध्दा, कर्मकांड, मठ, यांचे स्तोम माजले होते.

वैदिक शास्त्री पंडितांना हिंदू समाज भूदेवताच मानत होते, यात त्यांचा काहीच दोष नव्हता. कारण हिंदू धर्मातील सर्व लोकांचे कुलाचार, कुलधर्म, आचार, देवदेवतांची प्राणप्रतिष्ठा, सोळा संस्कार, यात्रा, जत्रा इत्यादी नित्य कृत्ये हे तेच पार पाडत होते. तसेच पौराणिक कथाही तेच सांगत असत. त्यामुळे हिंदू समाज विशेषतः राजे लोक, ब्राह्मणांची दक्षिणा, भोजन या प्रकारे उत्तम बडदास्त ठेवत.

भिक्षुक ब्राह्मणांच्या अन्नाप्रमाणे त्यांच्या निवासाचीही सोय करणे हे राजे व धनिक लोक आपले कर्तव्य समजत. वाईस 'धर्मपुरी' नावाची एक आळी सरदार राजे यांनी ब्राह्मणांना धर्मार्थने बांधून दिली. असा उल्लेख आहे.'[७८]

पेशव्यांच्या काळात मुत्सद्दी राज्यकारभारी, सरदार, रयत, ब्राह्मण वर्ग या सर्वांमध्ये धर्मनिष्ठा होती. किंबहुना धर्मभोळेपणा हा येथील समाजाचा स्थायिभाव होता. पुरुषांपेक्षा स्त्रिया या जास्त कर्मठ व धर्मभोळ्या होत्या. व्रते, उदयापने, सहस्रनाम, आवर्तन, यात त्या मग्न असत. देवाची सेवा करण्याकरिता अनेकजन तीर्थक्षेत्राला जाऊन राहत असत. परमेश्वर प्राप्तीसाठी जीवावर उदार होणे, इष्ट कामना प्राप्तीसाठी अन्नत्याग करुन देवाजवळ धरणे, अनेक प्रकारच्या शारीरिक हालअपेष्टा सहन करणे, ईश्वर उपासनेत आयुष्य घालविणे इत्यादी आचार धर्माच्या नावाखाली देवासाठी केले जात.

पंढरपूर, तुळजापूर, पैठण या धार्मिक क्षेत्रांना पेशवाईत फारच महत्त्व होते. हिंदू व मुसलमान यांच्यात पक्षपात करुन मुस्लिमांना हिंदू राजांनी कधीही अन्यायाने वागविले नाही. जर मुस्लिमांनी खूपच अन्याय केला तरच 'जशास तसे' या न्यायाने वागविले जाई. मुसलमान राज्यकर्ते हिंदू देवतांची व ब्राह्मणांची उत्पन्ने चालवित. तसेच पेशवेही आपल्या हद्दीतील मुस्लीम व इतर परधर्मीयांना दिलेली उत्पन्ने दक्षतापूर्वक चालवित. ज्याने त्याने स्वधर्माप्रमाणे वर्तावे ही हिंदू धर्माची शिकवण होती. परंतु वर्षानुवर्षाच्या मुसलमानांच्या सहवासाने ते त्यांच्या पीरांना आपल्या देवांच्या खालोखाल मानत असत.'[७९]

हिंदू राजे क्षमाशील असल्याने त्यांनी मुस्लिमांना धार्मिक बाबतीत कधीही अन्याय केला नाही. त्यांना सन्मानाने वागविले.

पेशव्यांचा पुण्यातील सुप्रसिध्द 'शनिवारवाडा' बांधावयाचा मुहूर्त इ.स. १७२९ मध्ये ठरला. त्यावेळी देव व पीर यांच्यापुढे चार आणे दक्षिणा ठेवण्यात आली होती. तसेच सदाशिवराव भाऊ पेशवे यांच्या लहानपणी पुण्यात असताना देवी आल्यामुळे त्यांनी सैद सादत पीर करुन पुणे यास कंदोरीचा नवस केला होता. (पे.द. ४३)'[८०] अंधश्रध्दांचा त्यावेळी कळस झाला होता. तसेच पेशव्यांना सुध्दा त्यातून जावे लागले. सर्व सामान्यांचे काय?

परधर्मीयांची लाट देशावर कित्येक शतके टिकून ती ओसरली देखील पण तिचे दुष्परिणाम खरडून काढत स्वधर्म व स्वसंस्कृती यांची स्थापना करण्यात हिंदुसमाज यशस्वी ठरला. याबाबत परकीय राज्यकर्त्यांनाही आश्चर्य वाटले, यावर जॉन माल्कम आपल्या (१८२१) एका उताऱ्यात म्हणतात.

'हिंदी लोकांत बरेच नैतिक दोष आढळतात. अनेक स्थित्यंतरे हिंदुस्थानात घडून देखील इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही हिंदू लोकांतील बऱ्याच मोठ्या जनसमूहाने इतके सद्‌गुण व नीतिमत्ता कायम राखली. असले उदाहरण जगात इतरत्र कोठेच पहावयास मिळत नाही. या सर्व श्रेष्ठ हिंदू लोकांच्या धर्मसंस्थेला विशेषतः ज्ञातिसंस्थेला दिले पाहिजे.'[८१]

भारतावर अनेक परधर्मीयांची लाट असून कसा स्वधर्म त्यात टिकून राहिला, हे आपणास पाहावयास मिळते.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला. पण लगेचच काही धार्मिक परिस्थिती बदलली नाही. तीच परिस्थिती इंग्रज राजवट महाराष्ट्रात स्थिर झाल्यानंतरही होती. महाराष्ट्रात इंग्रजांच्या प्रवेशाबरोबरच इंग्रजी संस्कृतीचे, इंग्रजीच्या विद्येचे भान महाराष्ट्रातील नवशिक्षितांना होऊ लागले. या नव्या संकटाचा सामना करायचा कसा, याचा ते विचार करु लागले. भारतीय समाज हा मुख्यत्वे धर्मावर अधिष्ठित असल्याने प्रथम धर्म चिकित्सा व धर्म सुधारणा व्हायला हवी हे त्यांनी हेरले. याला पुष्टी देणारे वातावरणही महाराष्ट्रात तयार होत होते. त्यात मिशनऱ्यांचा जोरदार धर्म प्रचार व प्रसार, युरोपातून आलेले नवे आचार विचार नवशिक्षितांना गोंधळात टाकणारे होते. आपल्या मूळ संस्कृतीची ओळख न पुसता हे नवे ज्ञान आत्मसात कसे करायचे, हा त्यांच्यासमोर मोठा प्रश्नच होता. यातून वेगवेगळ्या विचारवंतांनी आपल्या जुन्या परंपरेला नव्या विचाराची झालर जोडून सुधारणावादी विचार मांडायला सुरुवात केली. यातूनच महाराष्ट्रात प्रबोधनाची नवी पहाट सुरु झाली.

इंग्रजी शिक्षणाने भारतीय धर्मपरंपरेचा पुनर्विचार करण्याची गरज भारतीय विचारवंतांना वाटू लागली. यात महाराष्ट्रही अपवाद नव्हता. भारतीय धर्माचा नव्याने विचार व्हावा, असे समाजसुधारकांना वाटू लागले. यात लोकहितवादी, महात्मा फुले, आगरकर, भाऊ दाजी लाड, बाळशास्त्री जांभेकर, म.गो. रानडे, विष्णु शास्त्री पंडित व इतर समाजसुधारकांचे विचार पुढे आले. 'वेदांवर भर देणारी आपली संस्कृती ही प्रगती विरोधी आहे, असे मत लोकहितवादींनी मांडले तर विषमता प्रधान असणारी चातुर्वर्ण्य पध्दत ही समाजातील पुरोहित वर्गाचे महत्त्व वाढविणारी व समाजरचनेत ब्राह्मण ाला अती महत्त्व देणारी आहे, असे मा. फुल्यांना वाटत होते.'[८२]

विचारवंतांनी समाज प्रबोधन केले. धर्माचा पुन्हा नव्याने विचार झाला. चातुर्वण्य पध्दत कशी समाजाला हानिकारक आहे याचे फुल्यांनी विवेचन केले.

१८६७ मध्ये दादोबा व आत्माराम या बंधूंनी नव्याने सुधारणा चळवळीला प्रारंभ केला. यातूनच 'प्रार्थना समाजाची' निर्मिती झाली. डॉ. भांडारकर, न्या. रानडे, वामन आबाजी मोडक, सर चंदावरकर, विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाद्वारे हिंदू धर्मातील परंपरा, अंधश्रध्दा, चुकीच्या प्रथा, भोळ्या समजुती, कर्मकांड, यांच्याविरोधात आवाज उठवला.

'न्या. चंदावरकर यांनी प्रार्थना समाजाचे कार्य करताना म्हटले होते की, आम्ही सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, धर्म सुधारणांचा प्रश्न हा चळवळीचा पायाभूत झाला पाहिजे. लोकांच्या सुधारणेसाठी त्यांच्या धर्मविषयक समजुतीत सुधारणा करताना धर्मास प्राधान्य न देता दुसऱ्या मार्गाने प्रयत्न करणे म्हणजे विहिरीतून चाळणीत पीठ काढण्याच्या प्रयत्नासारखे निष्प्रभ होणार आहे. आपणास जे योग्य वाटते ते योग्य सत्य न्याय ठरवून ते कर्तव्य बुध्दीने आचरणात आणावे.'[८३]

धार्मिक बाबतीत सुधारणा झाल्या तर समाज सुधारल्याशिवाय राहणार नाही, असे विचारवंतांना वाटत होते.

धर्माविषयी फुल्यांचे विचारही मोलाचे आहेत. त्यांची धर्माविषयीची उदात्तता त्यांच्या विचारात स्पष्ट दिसून येते. त्यांच्या मते कोणताच धर्म परिपूर्ण नाही. प्रत्येक धर्मात काहीतरी सत्याधारा आहेच. धर्माच्या नावाखाली तंटे, भांडणे हे त्यांना बिलकुल मान्य नाही. म्हणूनच ते म्हणतात, 'निर्मिकाचा धर्म सत्य आहे एका भांडणे अनेक कशासाठी?'

**सारांश -**

थोडक्यात समाज हा विघटक चालीरितींनी ग्रासला होता.

त्यातच समाजाचे दारिद्र्य, जातिव्यवस्था, अंधश्रध्दा, गुलामगिरी, दासिप्रकार, नरबळी, शिक्षणाचा अभाव यामुळे यात अधिक भर पडत होती.

समाजात चातुर्वण्य व्यवस्था अस्तित्त्वात होती. त्यामुळे विषमताप्रधान प्रेरणांचा उद्रेक व पुर्व संस्काराची पकड यात संघर्ष होत होता.

त्यातच इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरुणांनी समाजाची दोष ओळखुन ते दुर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

थोडक्यात, धर्म हे संस्कृतीचे श्रेष्ठ अंग आहे.

धर्म स्वरुपात ईश्वर भक्ती, मानवता, प्रेम, सत्य, न्याय, दया, प्रेम इत्यादी वृत्तीचे आचरण अपेक्षित आहे.

धर्मातून एक प्रभावी विचारप्रणाली संघटन, नेतृत्व व चळवळ जन्म घेते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ख्रिस्ती धर्म प्रसार भारतात व महाराष्ट्रात सुरु झाला. अनेक वेळा ख्रिस्ती धर्मप्रसारात हिंदू धर्मास अन्यायकारक वागणूक मिळाली.

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांच्या आचार, विचार, शिक्षण पध्दतीने महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडवून आले.

## संदर्भ सूची


१) डॉ. दीक्षित राजा, १९ व्या शतकातील महाराष्ट्र, पृष्ठ - ९-१०

२) वाळिंबे रा.श., महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, पृष्ठ - ४३.

३) डॉ. दीक्षित राजा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय, पृष्ठ - ३७.

४) प्रा. पाटील व्ही.बी., १९ व्या शतकातील महाराष्ट्रामधील समाज सुधारणेचा इतिहास, पृष्ठ - २४.

५) डॉ. दीक्षित राजा, पूर्वोक्त, पृष्ठ - ३८.

६) डॉ. मोरे अरुणा, १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधन कालखंडात विष्णुबुवा ब्रह्मचारींचे योगदान, पृष्ठ - ५.

७) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - २५.

८) डॉ. मोरे अरुणा - पूर्वोक्त, पृष्ठ - ५-६.

९) माडगावकर गो.ना., मुंबई वर्णन, पृष्ठ - ३५४.

१०) सहस्त्रबुध्दे पु.ग. संपादक - शतपत्रे, पृष्ठ - २०.

११) कित्ता; पृष्ठ - २१.

१२) कित्ता; पृष्ठ - २१-२२.

१३) कित्ता; पृष्ठ - २२-२३.

१४) कित्ता; पृष्ठ - २६.

१५) कित्ता; पृष्ठ - २६.

१६) डॉ. दीक्षित राजा, पूर्वोक्त, पृष्ठ - ३८.

१७) कित्ता; पृष्ठ - ३९.

१८) सहस्त्रबुध्दे पु.ग., पूर्वोक्त, पृष्ठ - २६-२७.

१९) सरदार गं.भा., महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, पृष्ठ - १७३.

२०) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ २८-२९.

२१) सहस्त्रबुध्दे पु.ग. पूर्वोक्त, पृष्ठ - २७.

२२) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - २७.

२३) डॉ. देशमुख शारदा, शिवकालीन व पेशवाईतील स्त्री-जीवन, पृष्ठ - ६६.

२४) डॉ. गाठाळ एस.एस., भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्रीजीवन, पृष्ठ - ६९.

२५) नरके हरी, फडके य.दि. संपादक, महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, पृष्ठ - २१०-२११.

२६) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ८१.

२७) कित्ता; पृष्ठ - ८६.

२८) कित्ता; पृष्ठ - ८६-८१.

(एकोणीसाव्या शतकातील सुधारकांची बालविवाहाचे उदाहरणे पती व पत्नीचे वय खालील प्रमाणे -

गोपाळ हरि देशमुख (१८३०) ७-६, महादेव गोविंद रानडे (पहिले लग्न) १२-८, महादेव गोविंद रानडे (दुसरे लग्न) (१८७३) ३१-११, गोपाळराव जोशी ३२-१०, दादोबा पांडुरंग (१८२८) १३-०८, दादाभाई नौरोजी ०५-०४, केशवराव शिवराम भवाळ (सावित्रीबाई फुलेंचे शिक्षक) ०८-०५, नाना फडणवीस ५०-०७. याचा सविस्तर उल्लेख डॉ. एस.एस गाठाळ यांनी आपल्या भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्रीजीवन या पुस्तकात केलेला आढळतो.)

२९) कित्ता; पृष्ठ - ८१.

३०) कित्ता; पृष्ठ - ८७-८८.

३१) आगरकर संपादित, सुधारक, पृष्ठ - १४-१५.

३२) माडगावकर गो.ना., पूर्वोक्त, पृष्ठ - ३५२.

३३) रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा - १९ वे शतक, पृष्ठ - ७५.

३४) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - १३९.

३५) कित्ता; पृष्ठ - १३९.

३६) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - २९.

३७) डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृष्ठ - २९.

३८) डॉ. दीक्षित राजा, पूर्वोक्त, पृष्ठ - ३९.

३९) रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृष्ठ - ८३.

४०) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ७०-७१.

(पेशवे काळातील बहुपत्नीत्वाची काही उदाहरणे -
छत्रपती शाहू - ४, बाळाजी बाजीराव - २, चिमणाजी बल्लाळ - २, रघुनाथराव - ६, सदाशिवराव - २, महादजी शिंदे - ९, नाना फडणीस - ६, दुसरा बाजीराव पेशवा - ११. याचा सविस्तर उल्लेख डॉ.एस.एस. गाठाळ यांच्या भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जिवण या पुस्तकात आढळतो.)

४१) डॉ. सौ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - १४.

४२) मालरो स.ग., विधवाविवाह चळवळ (१८००-१९००) पृष्ठ - ३.

४३) डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृष्ठ - १४४.

४४) कित्ता; पृष्ठ - १४४.

४५) डॉ. सौ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - १५.

४६) भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृष्ठ - २३४-२४०.

४७) डॉ.सौ.मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - १६.

४८) वाळिंबे रा.श., महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना (१८००-१८४५) भाग पहिला, पृष्ठ - ११७.

४९) कित्ता; पृष्ठ - ११८-११९.

५०) कित्ता; पृष्ठ - ११९.

५१) कित्ता; पृष्ठ - १३७.

५२) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ७३.

५३) रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृष्ठ - १८७.

५४) डॉ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - १८.

५५) भावे वा.कृ., पूर्वोक्त, पृष्ठ - २२५.

५६) रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृष्ठ - २११.

५७) कित्ता; पृष्ठ - २१२.

५८) कित्ता; पृष्ठ - २१२.

५९) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ९५.

६०) कित्ता; पृष्ठ - ९६.

६१) सहस्त्रबुध्दे पु.ग., पूर्वोक्त, पृष्ठ - २६८.

६२) कित्ता; पृष्ठ - २६९.

६३) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ८२.

६४) भावे वा.कृ., पूर्वोक्त, पृष्ठ - ७४.

(पेशवेकालीन काही साक्षर स्त्रीयांची उदाहरणे - राधाबाई - बाळाजी विश्वनाथाची भार्या, काशिबाई - पहिल्या बाजीरावाची पत्नी, आनंदीबाई - राघेबादादाची पत्नी, गंगाबाई - सवाई माधवरावाची आई, भवानीबाई - चिमणाजी शंकर सचिव यांची पत्नी, सगुनाबाई - बाजीरावाचा पुत्र जनार्दनपंत यांची पत्नी इ. याचा सविस्तर उल्लेख डॉ.एस.एस. गाठाळ यांच्या भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जिवण या पुस्तकात आढळतो.)

६५) डॉ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - २१.

६६) माडगावकर गो.ना. पूर्वोक्त, पृष्ठ - २१२.

६७) कित्ता; पृष्ठ - २१२.

६८) सहस्त्रबुध्दे पु.ग., पूर्वोक्त, पृष्ठ - २६२.

६९) डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृष्ठ १६-१७.

७०) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ ५३.

७१) प्रा. पाटील व्ही.बी. पूर्वोक्त, पृष्ठ - २८.

७२) सहस्त्रबुध्दे पु.ग., पूर्वोक्त, पृष्ठ - २८.

७३) डॉ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - २६३.

७४) डॉ. गाठाळ एस.एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८-१९६०), पृष्ठ - १२.

७५) कित्ता; पृष्ठ - १२-१३.

७६) कित्ता; पृष्ठ - १३.

७७) डॉ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - २७.

७८) भावे वा.कृ., पूर्वोक्त, पृष्ठ - ३०१-३०२.

७९) कित्ता; पृष्ठ - ३२४-३२५.

८०)    कित्ता; पृष्ठ - ३२५.

८१)    कित्ता; पृष्ठ - ३३१.

८२)    डॉ. मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृष्ठ - ३३.

८३)    कित्ता; पृष्ठ - ३४.

## प्रकरण - ३

# विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन चरित्र

## प्रकरण - ३

## विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन चरित्र

**प्रस्तावना -**

भारताच्या तसेच महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसावे शतक वैशिष्ट्यपूर्ण घटनांचे व हालचालींचे मानले जाते. या शतकाच्या प्रारंभी इंग्रजी सत्ता स्थिर झाली आणि पुढील दीडशे वर्षे आपल्या देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीत खितपत पडावे लागले. महाराष्ट्रातील मराठी सत्ता याच कालखंडात लयास गेली. राजकीय क्षेत्रात घडून आलेल्या या परिवर्तनाने सामाजिक जीवन ढवळून निघाले. व्यापार व उद्योगांच्या क्षेत्रात इंग्रजी राजवटीमुळे झालेल्या अनिष्ट परिणामांची झळ स्थानिक जनतेला मोठ्या प्रमाणावर सोसावी लागली. परिणामी, इंग्रजांविरोधीचा असंतोष वाढू लागला.

तथापि, भारतीयांच्या साचेबंद सामाजिक जीवनात परिवर्तन घडून येण्याची प्रक्रियाही याच काळात सुरु झाली. इंग्रजी राजवटीच्या आगमनाने नवविचारांचे वारे वाहू लागले. लोकांच्या सामाजिक आचार-विचारांत बदल घडून येऊ लागले. समाजात संक्रमणावस्था निर्माण झाली. शतकानुशतके एका चौकटीत बांधलेला समाज पाश्चिमात्त्यांच्या विचारांना सहजासहजी पेलू शकला नाही. त्यामुळे सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनात अनेक अडथळे निर्माण झाले. 'आपल्या जुन्या संस्कृतीला सोडून परिस्थितीने देऊ घातलेल्या परिवर्तनाला तो रोखूही शकत नव्हता.'[१]

थोडक्यात, भारतीय समाज जीवनात एक प्रकारची कोंडी निर्माण झाली व ती फोडण्याचे काम संपूर्ण शतकभर सुरु राहिले. त्यातूनच पुढे नवीन विचारांच्या देवाण-घेवाणीतून भारतीय समाज विचारांत प्रबोधनाची सुरुवात झाली.

ब्रिटिश राजवटीने भारतात नवे विचार आणले. त्यामुळे लोक आधुनिक विचार, प्रगत विद्या व भौतिक शास्त्रे यांच्या संपर्कात आले. त्यांनी आपली राजवट स्थिर व मजबूत करण्याच्या उद्देशाने भारतात, भौतिक व प्रशासकीय

सुधारणा घडवून आणल्या व त्यातून सामाजिक व राजकीय परिवर्तनाला चालना मिळाली. अशा अनुकूल परिस्थितीमुळे सुधारकांना आपले कार्य जोमाने चालवता आले. या समाज परिवर्तनाच्या कार्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी देखील महत्त्वाची भूमिका बजावली.'[२] नवविचारामुळे भारतीय समाजात परिवर्तन घडून आले.

विष्णु शास्त्री पंडित हे एकोणिसाव्या शतकातील एक अग्रणी समाजसुधारक होते. १८२७ ते १८७६ हा त्यांचा कालखंड होय. या कालखंडात समाजसुधारक म्हणून त्यांनी जे विचार मांडले व सुधारणा घडवून आणण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याकाळची परिस्थिती कशी होती व त्या परिस्थितीत त्यांनी कसे कार्य केले, त्यावर या प्रकरणात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधनाचे स्वरुप -**

महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधनाची सुरुवात खऱ्या अर्थाने इंग्रजी राजवटीच्या स्थिरतेपासून सुरु झाली. इंग्रजी शिक्षणाने नवतरुणांच्या सामाजिक विचारांत पुनरुज्जीवन घडून आले.

वास्तविक, जगाच्या इतिहासात ज्या नवविचारांच्या आंदोलनासाठी 'प्रबोधन' ही संज्ञा वापरली जाते. तिला इंग्रजीत Renaissance 'पुनरुज्जीवन' असे म्हटले जाते. तथापि, 'पुनरुज्जीवन' हा शब्द केवळ त्या घटनेचे प्रारंभिक स्वरुप दर्शवितो तर प्रबोधन या शब्द योजनेमुळे त्या घटनेचे स्वरुप स्पष्ट होते.'[३]

'समाजात प्रचलित असलेल्या आचार, विचार व व्यवहारात जेंव्हा दोष उत्पन्न होतात, तेंव्हा समाजाला पुन्हा बुध्दिनिष्ठ व विज्ञाननिष्ठ पध्दतीने जागृत करण्याच्या प्रक्रियेला 'प्रबोधन' असे म्हटले जाते.'

थोडक्यात, पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून सुरु झालेल्या नवविचारांच्या आंदोलनाला प्रबोधन म्हटले जाते. याची सुरुवात प्रथमतः भारतात, बंगाल प्रांतात राजा राममोहन रॉय यांनी केली.

महाराष्ट्रातील प्रबोधन हा भारताच्या प्रबोधनाचाच एक भाग आहे व मानव हा सर्वांचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे मानवाभोवती फिरणाऱ्या सर्वच गोष्टींची चिकित्सा करणे व शोध घेणे हे मानवाचे 'प्रबोधन कर्तव्य' आहे.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेला आकार देण्याचे काम संतांनी केले. त्यांनी राज्यात विचारांची क्रांती घडविली. समता, सदाचार, मानवतेची शिकवण दिली. भाषिक पातळीवर समतावादी एकात्मतेची शिकवण दिली. त्या संतचळवळीची महती, विचार महाराष्ट्र धर्मामध्ये मोठे प्रबोधन कारक ठरली.'[४] संतांचे कार्य सामाजिकदृष्ट्या हीतकारक ठरले. त्यामुळे समाज परिवर्तन घडून आले.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातल्या सुधारणावादाची बिजे अठराव्या शतकातच रोवली गेली होती व नंतर पाश्चात्त्य प्रबोधन विचारांचा वारसा महाराष्ट्रात पोहचला. त्यास महत्त्वाची तीन माध्यमे कारणीभूत ठरली
नवी शासन पध्दती
इंग्रजी शिक्षण
ख्रिस्ती धर्मप्रसार

या तीन माध्यमाचे परिणाम सामान्य माणसांच्या जीवनावर होऊन त्यांच्या विचारांना नवी चालना मिळाली. पुढे यात वृत्तपत्रांनी चांगलीच भर टाकली व सामाजिक सुधारणेला उपकारक ठरेल, अशी 'अभिनव शक्ती' निर्माण केली. यावर भाष्य करताना लोकहितवादी म्हणतात, 'आमचे मुखातील ही लघु जिव्हा व आपले पत्र हे 'बृहत्तर जिव्हा'[५] अशा शब्दात ते वृत्तपत्रांचा गौरव करताना दिसतात.

**वृत्तपत्रांची भूमिका -**

वृत्तपत्रांनी महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनात फार मोलाची कामगिरी केली. वयाच्या विसाव्या वर्षी बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ साली पहिले मराठी वृत्तपत्र 'दर्पण' सुरु केले.[६]

याच काळात जांभेकरांनी 'दिग्दर्शन' (१८३७) हे मासिक सुरु केले. त्यांनी या मासिकाचा उपयोग लोकांचे ज्ञान प्रबोधनासाठी केला. लोकांमध्ये ज्ञानप्रसार झाला की लोक विचारशील बनतील व जुन्या चालीरीतींना फाटा देतील, अशी जांभेकरांची विचारसरणी होती.

एकोणिसाव्या शतकात जी सामाजिक व सांस्कृतिक आंदोलने झाली त्यामागे मुख्य प्रेरणा ही तत्कालीन वृत्तपत्रांचीच होती. त्यात हे शतक उदारमतवादी तत्त्वज्ञानाच्या उत्कर्षाचे होते. याच काळात मराठी वृत्तपत्रांनी वैचारिक क्रांतीच्या आंदोलनाची पार्श्वभूमी तयार केली त्यामुळे सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान झाले.

एकोणीसाव्या शतकात ज्या सामाजिक व सांस्कृतिक घडामोडी झाल्या त्यापाठीमागे मुख्य प्रेरणा ही तत्कालीन वृत्तपत्रांची होती. एकंदरच या वृत्तपत्रांच्या प्रबोधनाने सामाजिक चळवळीला गती मिळाली व जागृतीचे नवे पर्व सुरु झाले.[७]

अर्थात, एकोणिसाव्या शतकातील वृत्तपत्रांच्या कार्याला स्वाभाविक मर्यादाही पडल्या होत्या. कारण त्या काळात समाजातील बहुसंख्य लोक शिक्षणापासून वंचित होते. सुशिक्षितांची संख्या फारच कमी असल्याने वृत्तपत्रांच्या वाचकांची संख्याही कमीच होती. मुंबई बाहेर त्यांना फारसा वाचक वर्गही नव्हता व महाराष्ट्राच्या इतर शहरांत त्यांचा प्रसार फारसा झाला नव्हता. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे या ठिकाणी देखील वृत्तपत्रांची सुरुवात विलंबानेच झाली.[८]

मोठ्या शहरांची जर ही अवस्था म्हटल्यावर ग्रामीण महाराष्ट्राची काय अवस्था असेल याची आपण कल्पनाच करु शकत नाही. त्यात अत्यंत तुरळक दळणवळणाची साधने व अपुऱ्या सुविधा यामुळे खेड्यापाड्यात वृत्तपत्रांचा संबंधही येत नसे.

थोडक्यात, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुद्रण आणि वृत्तपत्रे यांद्वारे समाज जागृती झाली खरी पण तिची व्याप्ती मर्यादितच राहिली. या साधनांचा

प्रभाव प्रामुख्याने एका विशिष्ट वर्गापुरताच जाणवला. महाराष्ट्रातील बहुजन समाजावर त्यांचा प्रभाव फारसा पडला नाही.

**एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभातील धर्म व सामाज सुधारणा चळवळी -**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतामध्ये सत्तांतर झाले पण या सत्तांतरामुळे केवळ राजकीय बदल झाला नाही. तर सर्व क्षेत्रात परिवर्तनास सुरूवात झाली. कारण ज्यावेळेस इंग्रजी राजवट भारतात सुरू झाली, त्यावेळेस भारतीय समाज मध्ययुगीन कालखंडातच होता. इंग्रजी संस्कृती ही भारतीय संस्कृतीपेक्षा आधुनिक प्रगत संस्कृती होती. यामुळे या दोन भिन्न संस्कृतीचा जेव्हा संबंध आला, त्यावेळेस भारतीय संस्कृतीत संघर्ष, समन्वय अशा प्रक्रियेतून सुधारणेस सुरूवात झाली. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात जी धार्मिक पुनरूज्जीवनाची चळवळ सुरू झाली, त्याला ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य कारणीभूत ठरले.'[९]

ख्रिस्ती मिशनरी आपल्या धर्म प्रसारासाठी भारतात आले आणि त्यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली. शिक्षणाचा प्रसारही त्यांनी त्यासाठी केला.

महाराष्ट्राची सामाजिक व धार्मिक परिस्थिती पाहता इंग्रजांच्या संबंधामुळे येथील सामाजिक विचारांमध्ये परिवर्तन घडून येऊ लागले होते. `इंग्रजी ग्रंथाचे वाचन वाढू लागले व इंग्रजांच्या राजकीय कल्पनांशी ओळख होऊ लागली. सामाजिक चळवळीशी परिचय होत गेला. त्यामुळे समाजिक चळवळींचा परिचय होऊन विचारांमध्ये बदल घडून येऊ लागला.'[१०]

इंग्रजी ग्रंथांचा प्रसार ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केला, त्यामुळे भारतीयांच्या विचारात बदल घडून आला, नवीन विचारांमुळे परिवर्तन घडून आले.

१९ व्या शतकामध्ये पारंपरिकता सोडून आधुनिकतेचे विचार मांडले जात होते आणि त्याला अनुसरुन लेखनाच्या माध्यमातून, व्याख्यानांच्या माध्यमातून नवमतांचा, विचारांचा प्रसार करण्याचे काम सुरु झाले होते. या नवमताच्या

पुष्टीमध्ये प्रामुख्याने नवशिक्षित ब्राह्मणवर्गाचा समावेश होता व प्रबोधनाची प्रेरणा ही मुख्यतः राजकीय पातळीवरच उद्‌भवली.[११]

सवर्णांवर या परकीय ग्रंथाच्या वाचनाचा प्रभाव पडला व ते त्या विचारांकडे ओढले गेले.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात ज्या अनेक लहान मोठ्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळी झाल्या त्यांचा उगम बहुदा ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या धर्मप्रचारांतूनच झालेला पहावयास मिळतो.

या काळात ज्या निरनिराळ्या सामाजिक सुधारणांचा धडाडीने पुरस्कार केला गेला त्यामध्ये स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, जरठकुमारीविवाह निषेध, पुनर्विवाह इत्यादी स्त्रियांच्या प्रश्नांचे स्थान फार महत्त्वाचे होते. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानप्रसारक' या नियतकालिकांतून या विषयी चर्चा होऊ लागली.'[१२]

वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक सामाजिक जाणिवा वृत्तपत्रातून होऊ लागल्यामुळे समाजात नवविचारांच्या निर्मिती होऊ लागली. पुढे मुंबई, पुणे, नाशिक, नगर, हरणई, बाणकोट, इत्यादी ठिकाणी ख्रिस्ती मिशनरींच्या मुलींच्या शाळा सुरु झाल्या. इ.स. १८४५ मध्ये मुंबईच्या सुशिक्षित तरुणांनी मुलींची शाळा स्थापन केली. इ.स. १८५१ मध्ये म. फुल्यांनीही पुण्यात मुलींसाठी शाळा काढली.'[१३]

अशा रीतीने हळूहळू महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाचा प्रसार वाढू लागला. स्त्रियांच्या शिक्षणावर वृत्तपत्रांनी भर दिला, तसेच ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीही मुलींसाठी शाळा सुरु केल्या.

धर्माच्या नावाखाली अज्ञान व शेकडो हास्यास्पद कल्पना उराशी बाळगून आपण आपल्या प्रगतीच्या मार्गात स्वतःच अडथळे निर्माण करत आहोत. समाजातील या सर्व दोषांचे निर्मूलन करायचे असेल, तर समाजाने समर्थ व संघटित व्हायला हवे. तरच आपणास आधुनिक जगात मानाचे स्थान प्राप्त होईल असे मत जांभेकर, महाजन, लोकहितवादींनी मांडले आहे.'[१४]

बुरसटलेले विचार, खुळ्या समजुती यांचे निर्मूलनाचा प्रयत्न करायचा असेल तर समाज संघटित होणे गरजेचे आहे. आणि समाज संघटित झाल्यावर विश्वात आपल्याला ताठ मानेने जगता येईल, असे जांभेकर, महाजन, लोकहितवादींना वाटते.

या काळात समाजसुधारणेचे तत्त्वज्ञान सांगणारे अनेक थोर पंडित होते. पण प्रत्यक्ष कृती करणारे काही अपवादात्मकच होते. त्यामध्ये म. फुले हे आग्रणी होते. त्यात विरोध म्हणजे त्यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन शिक्षिका बनवले व त्या साध्वीनेही घरचा विरोध, कुटाळांची टवाळी याची पर्वा न करता आपल्या पतीच्या कार्यात अखंड सहकार्य केले.'[१५]

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक परिस्थिती बदललेली आढळते. १८५० नंतर सुधारणांना सुरूवात झाली. ब्रिटिश कार्यकालात अनेक नव्या गोष्टी घडल्या त्या म्हणजे इंग्रजी शिक्षण, रेल्वे, पोस्ट, तारायंत्रे, वर्तमानपत्रे, छापील पुस्तके इत्यादीं. ह्या नव्या सुधारणांबरोबरच नव्या विचारांची नवीन पिढी उदयास आली. बाळशास्त्री जांभेकर (१८१० ते १८४६), दादोबा पांडुरंग (१८१४ ते १८८२), गोपाळ हरी देशमुख उर्फ (लोकहितवादी) (१८२३ ते १८९२), महात्मा जोतिबा फुले (१८२८ ते १८७३), विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५ ते १८७१), न्या. रानडे (१८४२ ते १९०१), विष्णु शास्त्रीचिपळूणकर, विष्णु शास्त्री पंडित (१८२७ ते १८७६) इत्यादीं समाजधुरिणांनी आपले विचार समाजासमोर मांडायला सुरूवात केली.'[१६]

अर्थात १९ व्या शतकात समाजात असणा-या या अनिष्ठ प्रथा, चालीरीती, धार्मिक संकल्पना यातून समाजावर जो पगडा होता त्याच्यासाठी समाज सुधारणेच्या हेतूने प्रयत्न केलेले आढळतात.

**सामाजिक प्रश्न -**

महाराष्ट्राची समाजव्यवस्था ही भारतीय समाजरचनेचाच एक अंगभूत भाग होती. समाजरचना ही ईश्वरप्रणीत असून ती अपरिवर्तनीय आहे, असा एक पक्का समज होता. समाजजीवनावर प्रारब्ध, दैववाद, ईश्वरी इच्छा आदी

गोष्टींचा मोठा प्रभाव होता. यावर टीका करताना आगरकर लिहितात, 'आमची गृहपध्दती, आमची शास्त्रे, आमच्या कला, आमचे वर्णसंबध, राहण्याच्या चाली, रीती-रिवाज हे इंग्रज येईपर्यंत आमचे सारे व्यक्तीजीवित्व व राष्ट्रजीवित्व ठरत तापून ओतलेल्या पोलादासारखे, दगडाप्रमाणे कठीण झालेल्या लाकडासारखे कठीण होऊन राहिले असे म्हणण्यास हरकत नाही.[१७]

आध्यात्मिक व धार्मिक आचारांचा प्रभाव तत्कालीन समाजजीवनावर पडलेला होता. धर्म भोळेपणा अज्ञान, रुढीप्रियता यामुळे समाज अध:पतित झाला होता. स्त्रियांच्या शिक्षणाचा तर पूर्ण अभाव होता. ग्रामसंस्था, जातिसंस्था, कुटुंबसंस्था यांच्या स्वरुपात फारसा फरक पडलेला नव्हता. परंपरेच्या डबक्यात या सर्व संस्था अडकून पडल्या होत्या. त्यामुळे समाजात अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झालेले होते.

**१) जातिसंस्था व अस्पृश्यता -**

जातिसंस्था हा परंपरागत हिंदू समाजव्यवस्थेचा कणा होता. प्रत्येक मनुष्याची स्थिती आणि सामजिक दर्जा दोन्हीही त्याच्या जातीशी निगडित आहेत. जाती बहिष्कृत माणसाला हिंदू समाजात कोठेच स्थान नाही. समाजात अगदी लहान सहान गोष्टींवर देखील जातिसंस्थेचे कडक नियम होते. प्रत्येक जातीचा आपल्या स्थानानुसार सामाजिक हक्क विशेषाधिकार व कर्तव्ये ठरवून दिलेली होती. १७०७-१८१८ या काळात पेशवे सत्तेवर आल्याने समाजात त्यांना अग्रक्रम होता. पेशवे सत्ताधीश असल्याने साहजिकच समाजजीवनावर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. अध्ययन, अध्यापनाचे अधिकारही त्यांच्याकडे होते. ब्राह्मणांचे वर्चस्व समाजावर असले तरी त्यांच्यातही एकसंघपणा नव्हता. त्यांच्यातही देशस्थ विरुध्द कोकणस्थ हे वाद होतेच. मराठ्यांमध्येही मराठे व कुणबी असे दोन भेद होते. त्याशिवाय समाजात कुंभार, सोनार, सुतार, शिंपी, धनगर, तेली, न्हावी, माळी, गोंधळी, गुरव या प्रमुख जाती होत्या. यातही काही जाती बलुतेदार असल्याने त्यांना विशेष हक्क होते.[१८]

जातिसंस्था ही ईश्वरप्रणीत आहे व त्यात बदल करण्याचा अधिकार कोणालाच नाही. असा व्यर्थ समज समाजात होता. जुने सोडू नये व नवे स्वीकारु नये, हा पेशवाईत नियम होता.

जातिसंस्थेपेक्षाही मोठा प्रश्न होता तो म्हणजे अस्पृश्यतेचा. अस्पृश्यांनाच अतिशूद्र म्हटले जाई. यात महार, मांग, ढोर, चांभार या प्रमुख जाती होत्या. त्यातही महार हे संख्येने मोठे होते. त्यामुळेच 'गाव तेथे महारवाडा' अशी म्हणच रुढ झाली होती. सार्वजनिक देवालये, पाणवठे या सार्वजनिक ठिकाणी त्यांना प्रवेश नव्हता. अस्पृश्यांना विकासाची कोणतीही संधी मिळत नव्हती, त्यामुळे समाजात त्यांची आर्थिक पत कायमच ढासाळलेली राहिली. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा हा तो कोणत्या जातीत जन्मला यावर ठरत असे.

ना.वि. जोशी यांनी 'पुणे शहराचे वर्णन' या ग्रंथात म्हटले आहे की, पेशवेकाळात महार, मांग, चांभार, भंगी, या जातीतील लोकांना रस्त्याने थुंकण्यासही परवानगी नव्हती. कारण त्यामुळे रस्ताच बाटतो असा सर्वांचा समज होता.'[१९]

इतक्या अनिष्ट प्रथा, परंपरा समाजात अस्तित्वात असताना सामाजिक स्थर उंचावणे कठीणच होते. या परिस्थितीत कार्य करणाऱ्या समाजसुधारकांना धर्माची भीती जाणवत असल्याने व ते स्वतः शास्त्री पंडित असल्याने त्यांना सुधारणा करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असे.

**२) स्त्रियांची स्थिती -**

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरूणांनी प्रथम अनिष्ट सामाजिक रूढींविरूध्द प्रचार सुरू केला. बंगाल इतके उग्र स्वरूप महाराष्ट्रात सती जाण्याच्या प्रथेने धारण केलेले नव्हते. तरीही अशी उदाहरणे महाराष्ट्रात शिवकालात व पेशवाईत पहावयास मिळतात. स्त्रियांना वारसा हक्क तसेच संपत्तीचा हक्क नव्हता. पुरूषाला अनेक विवाह करणे, अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणे, यासारखे प्रकार अस्तित्वात होते. स्त्रीला कुटुंबात अतिशय गौण स्थान होते. अनेक ठिकाणी दासी प्रथा होती. जरठ कुमारी विवाहामुळे बालवयातच मुली विधवा

होत. अशा विधवा झालेल्या स्त्रियांना कोणत्याही धार्मिक विधीत किंवा समारंभास सहभागी होण्याची मुभा नव्हती. विधवेचे दर्शन अशुभ मानले जाई. विधवेकडून तारूण्यसुलभ भावनेतून पुरूषसंग घडू नये म्हणून तिला विद्रूप बनवले जाई. डोक्यावरचे व भुवईवरचे केस काढून त्या स्त्रियांना पांढरी वस्त्र परिधान करावी लागत. जर चूक झाली तर अतिशय अवहेलना सहन करावी लागे. चार भिंतीच्या आत तिला रहावे लागत असे. शिक्षणापासून स्त्रियांना वंचित ठेवले जात होते.'[२०]

थोडक्यात, विधवा स्त्रीला हालअपेष्टेचे जगणे वाट्याला आले. कुठल्याही कार्यक्रमात किंवा कुठेही तिला अपशकुनी समजत असत. जर तिच्याकडून काही चूक झाली तर तिला अपमानास्पद जीवन जगावे लागे.

पतिव्रता हा तिचा सर्वात मोठा धर्म होता. अनिष्ट चालीरीती स्त्रियांच्या दुर्दशेला कारणीभूत होत्या. अत्यंत कमी वयातच विवाह करणे, त्यामुळे संसाराचा व निसर्गाचा अर्थ समजण्यापूर्वीच अनेकांना विधवापन येत होते. एकदा विधवा झाली की तिचे जीवन काळवंडून जाई. सतीची चाल तुरळक ठिकाणी चालू होती व त्यास धर्माचा आधार होता. या कृतीला पवित्रतेचा आधार देऊन जिवंतपणीच स्त्रीला अग्नीत जाळले जात होते, स्त्रीला होणाऱ्या यातनेचे दुःख वाटण्याऐवजी समाजाला पुण्याचा आनंद प्राप्त होत होता. अनेकदा विधवेस सती जाण्यासाठी जबरदस्ती केली जात होती.'[२१]

सती प्रथेच्या चालीमुळे नवरा मेल्यावर जर ती सती गेली तर ते पुण्यकर्म समजले जात असे. त्यामुळे ती पवित्र होई. याकरिता धर्माचा आधार घेतला जात असे.

विधवा स्त्रियांना आयुष्यभर स्वयंपाक करावा लागे तसेच अशा स्त्रियांनी नातेवाईक स्त्रियाची बाळंतपणे करून त्यांच्या मुलांचे संगोपन करावे लागे. एखाद्या पुरूषाच्या वासनांच्या आहारी जाऊन एखादी स्त्री गर्भवती झाली की तिला एक तर पोटचे पोर मारावे लागे किंवा दूर कुठे तरी जाऊन गुपचुप पोटचे पोरं टाकून द्यावे लागत असे.'[२२]

विधवा स्त्रियांवर घरातील सर्व कामे सोपविली जात, तिच्याकडून कुकर्म झाल्यास, तिला ते मारुन टाकत असे. अशी घृणास्पद पध्दत होती.

हिंदु समाजामध्ये विवाह हा एक धार्मिक संस्कार आहे. पती-पत्नीचे नाते जन्मजन्मांतरीचे असते, अशी समजूत दृढ आहे. बायकांनी करायची सगळी व्रतवैकल्ये, उपासतापास ही समजूत मजबूत करणारीच असतात. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार कोणालाच नाहीत. विवाहपध्दतीमध्येही कोणीच बदल करु शकत नाही. अशा विचारांचे प्रतिबिंब सनातनी लोकांच्या लिखाणातून पुन्हा पुन्हा दिसते. आणि या विरोधात नवे कायदे करणारे सरकार परधर्मी, परकीय असेल तर तो अधिकार बहुजन समाजाला मान्य नसतो.'[२३]

याच मुद्दयांवरुन बालविवाहातील वधु-वरांच्या वयाची इयत्ता वाढविण्याचा अधिकार इंग्रज सरकारला आहे की नाही, यावरुन सनातनी व सुधारक यांच्यामध्ये बरेच वाद-विवाद झालेले पहावयास मिळतात.

या बालविवाहाच्या प्रथेवर आश्चर्य व्यक्त करताना मलबारी म्हणतात, 'समाज व सरकार या गोष्टी खपवूनच कशा घेतो. म्हाताऱ्या नवऱ्याकडून पैसे घेऊन केले जाणारे जरठ-कुमारी विवाह किती भयानक आहेत. अशा विवाहामध्ये ती मुलगी 'गुलाम' म्हणूनच विकली जाते व खरेदीही केली जाते. परंतु या गोष्टी चोरुन केल्या जात असल्याने सरकारला यात काहीच करता येत नसे. यावर ते सूचनास्पद म्हणतात, 'की किमान हा दिला व घेतला जाणारा पैसा फक्त मुलीच्याच नावावर तिच्या वैयक्तिक उपभोगासाठी जमा करावा. त्यामुळे जर ती भविष्यात विधवा झाली तर हाच पैसा तिच्या उपयोगी पडेल.[२४]

जरठकुमारी विवाह पध्दतीत स्त्रियांची गुलाम म्हणूनच विक्री केली जाते. परंतु सरकारला यामध्ये काही कारवाई करता येत नसे. पण या गोष्टी गोपनीय असल्या कारणाने सरकारपर्यंत तक्रार जात नसे.

बाल विवाहासंदर्भात आणखीनही काही वाईट चाली १९ व्या शतकात पहावयास मिळतात. त्या काळात काही आक्षेपार्ह विवाहही झालेले दिसून येतात. 'बारा-पंधरा वर्षाच्या मुलीचा विवाह जेंव्हा आठ दहा वर्षाच्या मुलाशी

होतो तेंव्हा त्या मागचा उद्देशही तसाच असतो. म्हणजे लहान वयाच्या नवऱ्याचा बाप किंवा मोठा भाऊ विधुर असेल त्यावेळी असा विषम विवाह केला जातो. असा विषम विवाह म्हणजे पापाला उत्तेजन देणारा गुन्हाच असतो.'[२५]

म्हणजे मुलगी लहान असो वा मोठी तरीही तिच्या आयुष्यातले हे अन्याय व अत्याचार तिला भोगावेच लागत होते.

बालविवाह पध्दतीचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे स्त्रीला येणारे अकाली वैधव्य. हा एक शाप ठरावा इतके निकृष्ट दर्जाचे, दुर्लक्षित, अपमानास्पद आयुष्य विधवेच्या वाट्याला येत असे. बालविवाह व विषमविवाह यांच्यामुळे समाजात विधवांचे प्रमाण मोठे होते. काही मुलींवर तर अजाणत्या वयातच वैधव्याची कुऱ्हाड कोसळत असे. संसाराचा अर्थ कळण्याच्या अगोदरच विधवेचे जीवन तिच्या वाट्याला येत असे. पुरुषाला पत्नीच्या निधनानंतर दुसरा विवाह करण्याची मुभा होती. परंतु विधवा - विवाहाला मात्र तत्कालीन समाजाची मुळीच मान्यता नव्हती. त्यामुळे विधवा स्त्रीला व्रतवैकल्पे करीत परमार्थसाधनेत आपले आयुष्य काढावे लागे.

यावर ताराबाई शिंदे लिहितात, 'अहो, पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगाप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे. त्यामुळे किती लाखो व कोणत्याही स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसे भोगीत असतील व त्यातुन कसे अनर्थ होत असतील याची कल्पना सुध्दा करता येत नाही.'[२६]

ताराबाई शिंदे यांनी विधवा स्त्रियांच्या दुःखाबद्दल खंत व्यक्त केली आहे.

एकंदरच १९ व्या शतकात स्त्री म्हणजे 'फक्त 'उपभोगाची वस्तू' अशी तिची अवस्था होती. समाजात अनेक घाणेरड्या प्रथा पध्दती स्त्रियांना संकुचित करत होत्या. अनेकांनी त्यांना दासी म्हणून ठेवले तर काहींनी गुलाम म्हणून विकत घेतले. एवढेच काय तर ब्रिटिशांनी सुध्दा त्यांना नेटिव्ह म्हणून ठेवले होते. अशा स्त्रिया ज्या विधवा, सतीने गेलेल्या, बालविधवा, परित्यक्ता गिरणी व दारिद्र्यात पिचलेल्या या स्त्रियांना 'ईस्ट इंडिया कंपनी' च्या नोकरांनी

आपल्या सेवांसाठी ठेवले. त्यांना त्यांची घरकामे करावी लागत तसेच त्यांना लैंगिक सेवाही पुरवावी लागे.'[२७]

ब्रिटिश सैनिकांना ही लैंगिक सेवा पुरवण्याचे काम १९ व्या शतकातच नव्हे, तर अगदी स्वातंत्र्य मिळेपर्यंत या नेटिव्ह स्त्रियांनी केले. इ.स. १८८९ मध्ये कोलकत्ता शहरात नोंदणी केलेल्या वेश्या स्त्रिया ७००० होत्या. त्यात ५८३४ हिंदू १०४० मुस्लीम व ११७ युरोपियन व अन्य अशी नोंद आहे.'[२८] मुंबई व मद्रास शहरांत देखील हे प्रमाण कमी अधिक आहे.

थोडक्यात, वरील आकडेवारीवरुन आपल्याला त्यांची संख्या कशा प्रमाणात विभागली गेली व एक उपभोग्य वस्तू म्हणून तिचा वापर केला गेला याची आकडेवारी कळते. यावरुन स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आपल्याला दिसून येतो.

एकंदरच स्त्रीचे जीवनच दु:खमय होते. प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्रथा परंपरांनी स्त्रियांवर मात्र अन्याय व अत्याचारच केले. हे अन्याय फक्त हिंदू स्त्रियांवर नव्हते, तर मुस्लीम व इतर धर्मीयांच्या स्त्रियांवरही होत होते. अशा परिस्थितीत गरज हाती ती नव्या विचारांची व समाज सुधारणेची हे काम ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केले. त्यातच इंग्रजी शिक्षणामुळे परिवर्तनाचे वारे वाहू लागले. इंग्रजांच्या नव्या सुधारणांनी नवशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिला. परिणामी, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात नव्या विचारांना चालना मिळाली. इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेतलेल्या पाश्चात्त्य विद्याविभूषित तरुणांनी आपल्या समाजव्यवस्थेकडे आणि येथील धार्मिक व सामाजिक स्थितीकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्यास सुरुवात केली. आपल्या समाजाच्या अधोगतीची कारणे कोणती, याचा शोध घेण्याची गरज त्यांना वाटू लागली. अशा नव्या विचारांनी भारावलेल्या नवतरुणांनी म्हणजे, नाना शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, भाऊ महाजन, विष्णूशास्त्री पंडित, विष्णुबुवा ब्रह्मचारी , भाऊदाजी लाड यांनी समाज सुधारणेच्या चळवळींना चालना दिली.

**समाजसुधारकांचे कार्य -**

स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' वृत्तपत्रात केलेली दिसते. तसेच भाऊ महाजनांनीही `प्रभाकर` पत्राद्वारे लोकहितवादींची पुनर्विवाहाचा पक्ष उचलून धरणारी पत्रे प्रसिध्द केली होती.'[२९]

थोडक्यात, त्या काळच्या वृत्तपत्रांनी स्त्रियांविषयक असलेल्या प्रश्नांची चर्चा घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. स्त्रीविषयक जागृती करण्याचे कार्य उपरोक्त वृत्तपत्रांनी केले.

१८५६ साली विधवाविवाहास मुभा देणारा कायदा मंजूर झाला. तरीही वाळीत टाकण्याच्या किंवा सामाजिक बहिष्काराच्या भीतीने विधवेशी विवाह करण्याचे धाडस फारच थोड्या लोकांनी दाखवले. तशी वेळ आली असताना न्या. रानडे व रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनी वेळीच कच खाल्ली. १९ व्या शतकाअखेर पुनर्विवाहांची संख्या जवळजवळ चाळीसपर्यंत पोहचल्याचे पहावयास मिळते. थोडक्यात, विधवा विवाहाचे विचार मांडणारे, विधवा विवाहास लोक काय म्हणतील, या भीतीने त्यांनी माघार घेतली.

थोडक्यात, यावरून असे दिसते की, यात फारशी सुधारणा झालेली नव्हती. बालविवाहाला आळा घालण्याचे प्रयत्न करणाऱ्या सुधारकांना समाजाच्या प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले. त्या काळात वृध्द पुरूष कोवळ्या वयाच्या मुलींशी विवाह करण्यास अधिर असत. या जरठबालकुमारी विवाहामुळे लहान वयातच मुली विधवा होत.'[३०]

विधवा विवाहासाठी चळवळ करणा-यांनी बालविवाहाविरूध्द मोहीम काढणे गरजेचे होते. `बालविवाह व लादले गेलेले वैधव्य या एकाच प्रश्नाच्या दोन बाजू आहेत, असे लॉर्ड रिपन म्हणत.'[३१]

हिंदूच्या प्रमाणेच मुसलमान आणि पारशी लोकांमध्येही अशा बालविवाहाच्या प्रथा रूढ होत्या. समाजात घडणाऱ्या या नित्य अनैतिक घटना ज्यांना योग्य वाटत नव्हत्या त्यांना देखील शासनाने ह्याविषयी कायदा करावा,

असे वाटत नव्हते, इतकी सामाजिक परिस्थिती बिघडलेली होती. थोडक्यात, या बाबतीत शासनसुध्दा उदासीन असल्याचे दिसून येते.

पुनर्विवाहाचा प्रश्न किंवा संमती वयाचे विधेयक यावर आंदोलने होण्याच्या अगोदर महाराष्ट्रात स्त्रियांना शिक्षण देण्याच्या शाळा सुरू केलेल्या होत्या. त्याचा चांगला प्रागतिक परिणाम दिसू लागला होता. सावित्रीबाई जोतिराव फुले, डॉ. आनंदीबाई गोपाळराव जोशी, पंडित रमाबाई इत्यादी कर्तृत्ववान सुशिक्षित स्त्रियांमुळे महाराष्ट्रात इंग्रजी राजवटीतच स्त्रियांचे नवे रूप आकार घेऊ लागले. मुलींच्या शिक्षणासाठी जोतिराव फुले यांच्यापासून पंडित रमाबाईपर्यंतच्या सुधारकांनी निर्धाराने केलेल्या प्रयत्नांचा तो परिपाक होता. जोतिराव फुलेंनी सर्वात प्रथम पुण्यात १८५१ साली दोन व १८५२ मध्ये एक अशा मुलींच्या शाळा काढल्या. जगन्नाथ सदाशिव, केशव शिवराम भवाळकर उर्फ जोशी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णू मोरेश्वर भिडे, विष्णु शास्त्री पंडित, बापूरावजी मांडे, अण्णा सहस्त्रबुध्दे ही मंडळी या शाळांच्या नियामक मंडळात होती. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष सर आर्स्किन पेरी यांनी या शाळांना आर्थिक सहाय्य केले होते, तसेच जोतिरावांनी अनेक अडचणीवर मात करत चाललेल्या सत्कार्याबद्दल त्यांचा सत्कार करावा, अशी शिफारस सरकारला केली.'[३२]

पुण्यातील मंडळींनी एकत्र येऊन मुलींना शिक्षण मिळावे म्हणून शाळा सुरु केल्या. मुलींमध्ये शिक्षणाची गोडी लागावी, त्यांना नवीन विचारांचे ज्ञान व्हावे, त्यांच्यात वैचारिक जागृती व्हावी ही त्या मागची भूमिका होती. यापैकी पहिल्या शाळेत सावित्रीबाई फुले विनावेतन शिकवत होत्या. परंतु बालविवाहाच्या प्रथामुळे मुलींची लग्ने झाली की, सासरची माणसे त्यांना शाळा सोडण्याची सक्ती करीत असत. अशा अनेक अडचणींना व प्रश्नांना सामोरे जाताना हार न मानता सुधारकांनी प्रयत्न चालू ठेवले.

या कालखंडात महाराष्ट्रात बऱ्याच मंडळींनी आपआपल्या पातळीवर सामाजिक व धार्मिक कार्य केलेले दिसते. लोकांच्या मनात या पारंपरिक रूढी

इतक्या खोलवर रूजल्या होत्या की, त्यांच्या परंपरांना कोणी दुखवले तर हे धार्मिकदृष्ट्या पाप आहे व हे कृत्य धर्मविरोधी आहे, असे लोक मानत. त्यामुळे एखाद्याने सुधारणा करण्याचे धाडस केले, तर लगेच सार्वजनिक पातळीवर आंदोलने होत. धर्माचा पगडा हिंदू समाजावर इतका होता की, धर्माचे पालन करणे व त्यासाठीच जगणे हेच आपले कर्तव्य आहे, असे सर्वजण मानत. मग त्यातून कोणताही प्रकार घडला किंवा घडवला गेला तरी तो धर्मात आहे, असे सांगून शास्त्री पंडित लोक मोठ्या अभिमानाने वागत. अशा या परिस्थितीत स्त्रियांवर होणारे अन्याय व त्याबाबत केलेले कायदे हे योग्यच होते, असे समाजसुधारक मानत.

एकोणिसाव्या शतकातील परिस्थिती पाहता जवळजवळ सर्वच समाजसुधारकांना धर्माची भीती असल्याचे जाणवते. अनेक सुधारक हे स्वतः शास्त्री पंडित असल्याने त्यांना या सुधारणा करताना त्या जड जात होत्या. तरीही या लोकांनी सुधारणांचा वारसा सातत्याने पुढे चालू ठेवला व त्यांच्या प्रयत्नाने समाजात जो बदल झाला, अशा समाजसुधारकांची ओळख इतिहासात व समाजात ठेवणे गरजेचे वाटते. सुधारणेच्या या लाटेत आगरकर, जांभेकर, लोकहितवादी, रानडे, जगन्नाथ सदाशिव, केशव शिवराम भवाळकर उर्फ जोशी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णु मोरेश्वर भिडे, विष्णु शास्त्री पंडित इत्यादींनी सुधारणेचा अट्टाहास धरून समाज परिवर्तनाचा इतिहास घडवला आहे. पण या प्रत्येकाचे प्रयत्न व साहस वेगवेगळे होते हे पाहावयास मिळते. प्रत्येकाने आपापल्या पातळीवर सुधारणांचा चंग बांधलेला दिसतो.

अशा वेगळेपणाच्या सुधारकांच्या कार्यात विष्णू परशुराम शास्त्री पंडितांचे कार्य हे नेहमीच वेगळे जाणवते. समाज सुधारणेच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करून लोकांचे मतपरिवर्तन होणे शक्य नव्हते. याची विष्णु शास्त्री पंडितांना पूर्ण जाणीव झालेली होती. म्हणूनच स्त्री जातीच्या उन्नतीसाठी शक्ती व सर्वस्व वेचण्याचा त्यांनी निश्चय केला होता. लोकनिंदेच्या निष्ठुर आघातांना बिलकूल

न जुमानता त्यांनी तो आमरण पाळला. ज्या ज्या वेळेला त्यांना कसोटीची वेळ आली त्या त्या वेळी ते आपल्या शब्दाला जागले व आपली तत्त्वनिष्ठा किती अटळ आहे याची समाजाला खात्री पटवून दिली.'[३३]

**कौटुंबिक पार्श्वभूमी -**

**शास्त्री घराण्याचा इतिहास -**

विष्णु शास्त्री पंडित यांच्या घराण्याविषयी जी माहिती उपलब्ध आहे ती अशी

विष्णू शास्त्री पंडीत हे ब्राह्मण असल्यामुळे त्यांना भट्ट असे म्हणले जात असावे. असा उल्लेख त्यांच्या चरित्रात आलेल्या गोत्रा संबंधीत पदयांवरुन दिसते.[३४]

या घराण्याची प्राचीन पिटिका काशीची असून ते मूळचे शिरगावचे होते, असे त्यांच्या बनकट्टे - काशीकर किंवा शिरगांवकर या अभिधानावरून दिसते. यावरून असे दिसते की जसे पूर्वी एखाद्या व्यक्तीचे कुटुंब दुसऱ्या गावाकडून एखाद्या गावी स्थायिक झाल्यानंतर त्या गावातील लोक त्या कुटुंबास आडनांवाऐवजी गावच्या नांवाने ओळखत असत व पुढे हे गावचे नांव त्यांच्या आडनांवाची जागा घेत असे, पंडितांच्या शिरगावकर या नावावरून दिसते.'[३५]

विष्णुपंडितांचे मूळ आडनांव हे भट्ट होते. पंडित हे आडनांव त्यांना राजदरबारी सातारकरांच्या आश्रयाला आल्यानंतर मिळाले. पंडित नावाचा इतिहास श्री. स. पंडित यांनी असा सांगितला आहे की, हे नांव त्यांच्या राजदबारी केलेल्या पांडित्यामुळे प्राप्त झाले. विष्णु शास्त्री पंडित हे मूळचे सातारा जिल्ह्यातील श्री. क्षेत्र वाईजवळील बावधन या गावचे. त्यावेळी हे गाव लुगड्याच्या व्यवसायासाठी प्रसिध्द होते. विष्णु शास्त्री पंडितांचे वडील सातारकरांच्या आश्रयाला आले होते. त्याव्यतिरिक्त त्यांच्या आई वडिलांविषयी इतर माहिती मिळत नाही.'[३६]

तसेच त्यांचे बंधू पुनर्विवाहोत्तेजक मंडळाचे २ एप्रिल १८६७ मध्ये सभासद झाले असता त्यांनी त्यावेळी बाळ परशुराम शास्त्रीभट्ट, डेप्युटी

इन्स्पेक्टर, कोल्हापूर अशी स्वाक्षरी केलेली आढळते. तसेच विष्णु शास्त्री पंडितांच्या मृत्यूनंतर 'इंदुप्रकाश'चे काम त्यांचे दुसरे बंधू सखारामपंत पंडित यांनी केलेले दिसते. या व्यतिरिक्त शास्त्री घराण्याचा विशेष संदर्भ आढळत नाही.

**जन्म, बालपण व शिक्षण -**

'तुझी मूर्ती गेली परि जगि तुझे नांव वसते।
जगी कीर्ती नित्या कविजन वदे सत्य गमते'।।

ही विलापिका कै. वामन दाजी ओंकारांसारख्या कवीने विष्णुशास्त्रींच्या मृत्यूनंतर केलेली आहे. बंगाल प्रांताचे ईश्वरचंद्र विद्यासागर तसे महाराष्ट्राचे प्रती ईश्वरचंद्र विद्यासागर अशी त्यांची ख्याती होती. विद्वत्तेला देशहिताच्या कळकळीची त्यांनी जोड दिली. त्यामुळे त्यांचे कार्य लोकांसमोर आले. त्यांचा उल्लेख महादेव गोविंद रानडे अत्यंत आदरपूर्वक करत, 'इतिहासतज्ज्ञ कै. वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्रातील बुध्दिमान, प्रतिभावान व्यक्तिरेखांचे अध्ययन करताना विष्णुशांस्त्रींचा उल्लेख पत्रकार, व पुनर्विवाह उत्तेजक अशा शब्दात केलेला आहे.`[३७]

विष्णु शास्त्री पंडितांचा जन्म इ. स. १८२७ मध्ये झाला. विष्णु शास्त्री पंडितांची मूळ जन्मतारीख उपलब्ध साधनांमध्ये कोठेच आढळत नाही.

विष्णु शास्त्री पंडितांचे वडील परशुरामशास्त्री पंडित हे सातारकरांच्या आश्रयाला आल्यानंतर तेथेच विष्णुशास्त्रींचा जन्म झाला. लहानपणी त्यांनी वडिलांजवळ संस्कृत भाषेचे प्राथमिक शिक्षण घेतले व नंतर वेदशास्त्रसंपन्न राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर व त्यांचे चिरंजीव नारायणाचार्य यांच्या जवळ १२ वर्षे राहून न्याय व्याकरणादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. पण त्या काळात दिवसेंदिवस वाढत चाललेले इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता इ. स. १८४५ मध्ये पंडित पुण्यात आले.'[३८]

पुण्यातील आगमनानंतर विष्णु शास्त्री पंडितांनी संस्कृत पाठशाळेतील इंग्रजी वर्गात आपले नाव दाखल केले. मात्र, वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे

इंग्रजी शिक्षण अवघ्या दीड वर्षातच सोडावे लागले. आलेल्या संकटांना तोड देत ते शिक्षण घेत राहिले. व्याकरण शास्त्राच्या मूलभूत तत्त्वांशी त्यांचा चांगलाच परिचय झाला. अल्पावधीत त्यांनी इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास केला. विद्यालय सोडल्यानंतरही आपला व्यासंग अव्याहत चालू ठेऊन इंग्रजी भाषेत प्रावीण्य मिळवले. 'नृसिंहशास्त्री साठे` यांच्या पत्नी `दुर्गाबाई` यांनी आपले बंधू विष्णु शास्त्रीयांना इंग्रजी शिकण्याकरिता पुण्यात बोलावून घेतले होते.'[३९]

पुण्यात इंग्रजी वर्गाचे शिक्षण घेत असताना त्यांच्या बरोबर कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री तळेकर आणि महादेवशास्त्री कोल्हटकर हे शिक्षण घेत होते. या तिघांच्या बरोबरच त्यांनी न्याय, व्याकरणात नैपुण्य मिळवले होते. वडिलांच्या निधनानंतर आपला अभ्यास अपूर्ण टाकून साता-यास त्यांना जावे लागले. त्यावेळी त्यांचे कनिष्ठ बंधू बाळशास्त्री पंडित हे रत्नागिरी जिल्ह्यात व कोल्हापूर संस्थानात डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून काम करत होते. तसेच त्यांचे दुसरे बंधू सखारामपंत पंडित यांनी विष्णुशास्त्रींच्या मृत्यूनंतर 'इंदुप्रकाश' पत्राचे काम पाहिले. त्या उभयतांच्या शिक्षणाकरिता पंडितांना काही वर्ष साता-यातच काढावी लागली. कौटुंबिक प्रश्नामुळे पंडितांना काही दिवस कोणताचा निर्णय घेता आला नाही. काही दिवस सरकारी ट्रान्सलेशनची नोकरी व त्याशिवाय अध्यापनाचेही काम त्यांनी केले.

तत्कालीन परिस्थिती पाहता प्रांतो-प्रांतीचे दळणवळण सोईस्कर होऊन शिक्षण प्रसारावर विशेष भर दिला जात होता. याच संधीचा फायदा घेऊन पंडितांनी विद्या खात्यातच शिरकाव करून त्याच विभागात काम केले. लोकांना आधुनिक विद्येत सुसंस्कृत केले, तरच त्यांच्या हातून देश व स्वदेश सेवा होणार आहे, असा त्यामागील हेतू होता. स्वदेश बांधवांचे कल्याण साधणे हे ध्येय विष्णु शास्त्री पंडितांनी आयुष्यभर दृष्टिआड होऊ दिले नाही. यातच त्यांचे आधुनिक विचार व देशप्रेम प्रत्ययास येते.

अशा या खडतर परिस्थितीत पंडितांनी आपले बालपण घालवून शिक्षणाची आस धरून अथक प्रयत्नांनी शिक्षणात त्यांनी प्रावीण्य मिळवले. माणसाची इच्छा दृढ असेल तर कोणतेही संकट मानवावर मात करू शकत नाही, याचा प्रत्यय पंडितांच्या परिस्थितीवरून निश्चितच येतो. परंतु उज्ज्वल चारित्र्य, अलौकिक कार्यनिष्ठा, असामान्य नीतिधैर्य, लोकोत्तर त्याग इत्यादी गुणांत विष्णु शास्त्री पंडितांची बरोबरी करणारे महापुरूष त्या काळी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर उभ्या हिंदुस्थानातही हाताच्या बोटावर मोजण्याइतपत होते, असे म्हणावे लागते.'[४०]

**विष्णु शास्त्री पंडितांची समाजसेवेतील वाटचाल :**

वडिलांचे कृपाछत्र एकाएकी गमवल्यामुळे विष्णुशास्त्रींना कुटुंब पोषणाचा भार आपल्या शिरावर घ्यावा लागला. इ. स. १८४८ मध्ये पंडितांनी सरकारी नोकरीत प्रवेश केला व त्यांना दरमहा चाळीस रूपये पगारावर ट्रान्सलेशन एक्झिबीशनरीची जागा मिळाली.'[४१]

या सरकारी नोकरीत पंडितांनी १५-१६ वर्ष विद्यादानाच्या पवित्र कार्यात घातले तरीही त्यांना यात पुरेपूर मानसिक समाधान मिळाले नाही. त्यांची दृष्टी पूर्वग्रहाने दूषित झाली नव्हती समाजात चालणा-या घडामोडींकडे त्यांचे फार बारीक लक्ष होते. त्यांनी बदलत्या काळाचे स्वरूप अचूक ओळखले होते. आणि म्हणूनच सनातन्यांच्या रूढीप्रियतेचा व अविचारीपणाचा त्यांना मनस्वी संताप येत असे. शाळेच्या टिचभर आवारात पाचपंन्नास मुलांना तिचतिच ठराविक पाठ्यपुस्तके शिकविण्यात त्यांचे चित्त रमणे शक्य नव्हते. त्यापेक्षाही अधिक व्यापक व महत्त्वाच्या कार्याला त्यांनी आपले आयुष्य वाहिले पाहिजे, असे त्यांना मनोमन वाटत होते. समाजातील शेकडो अनाथ व असाह्य स्त्रियांच्या दु:खांना वाचा फोडली पाहिजे हेच आपले जीवित कार्य आहे, असे त्यांना वाटले. इ.स. १८६४ च्या सुमारास ते सेवानिवृत्त झाले व लोकसेवेच्या उच्च धेयाने प्रेरित होऊन त्यांनी वृत्तपत्र व्यवसायात आपले लक्ष घातले.'[४२]

थोडक्यात, नोकरीत असल्यापासून महिलांच्या दुःखास वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी करण्याचा निर्धार केला आणि तेच आपले कार्य आहे असे त्यांना वाटत असे.

लोकजागृतीचे प्रभावी साधन म्हणून नियतकालिकाचा प्रभाव नुकताच वाढू लागला होता. 'ज्ञानप्रकाश', 'शुभसुचक', 'वृत्तवैभव', 'इंदुप्रकाश', 'वृत्तप्रकाश', नेटिव ओपिनीयन इत्यादी नियतकालिके व वृत्तपत्रे दर आठवड्यास निघू लागली होती. त्याच बरोबर 'शालापत्रक', 'आनंदलहरी', 'कथाकल्पहम', 'ज्ञानदर्पण', 'ज्ञानाकार' इत्यादी लहान सहान मासिकेही मराठीत प्रसारित होत होती. श्रीकृष्णशास्त्री तळेकरांच्या नंतर विष्णु शास्त्री पंडित स्वतः शालापत्रकाचे संपादक म्हणून काम पाहत होते. त्यानंतर 'इंदुप्रकाशा'तील मराठी विभागाचे उपसंपादक म्हणून काम केले. पुण्यात असताना इंदुप्रकाशच्या 'मुनीम' या पदाचे कामही पाहिले. १८६४ पासून मात्र ते प्रत्यक्ष लिहू लागले. आणि पुढे अखेरपर्यंत ते या पत्राचेच संपादक होते.'[४३]

'इंदुप्रकाश'ची सूत्रे हाती घेतल्यानंतर पंडितांच्या कार्याला खरी सुरूवात झाली व स्त्रीजातीच्या उद्धारासाठी प्राणप्रणाने झगडण्याचा त्यांनी निर्धार करून 'इंदुप्रकाशा'त ते आपली मते निर्भीडपणे मांडू लागले. लेखन, भाषण, चर्चा, कीर्तन इत्यादी साधनांच्या व्दारा आपले विचार लोकांच्या गळी उतरविण्याच्या ते प्रयत्नाला लागले. 'इंदुप्रकाशा'त बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह इ. प्रश्नांची सांगोपांग चर्चा करून विरोधकांच्या आक्षेपांचे समप्रमाण खंडण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.'[४४]

प्राचीन काळी समाजजीवनात स्त्रियांचे स्थान फार मोठे होते हे समाजाला पटवून दिले. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार आहे किंवा नाही? लग्नांच्या वयासंबंधी काही किमान मर्यादा ठरविता येईल किंवा नाही? विधवाविवाह सशास्त्र किंवा अशास्त्र आहे? इत्यादी अनेक गोष्टींचा ऊहापोह करून आपली निर्णायक मते लोकांना पटवून देण्याची त्यांनी अविश्रांत प्रयत्न केले.

विष्णु शास्त्री पंडितांनी सर्वात प्रथम विधवाविवाहाचा प्रश्नच प्रामुख्याने हाती घेतला. महाराष्ट्रात पुनर्विवाहाच्या प्रश्नाला इ.स. १८४० पासूनच चालना मिळाली. `इ.स. १८४२ साली बेळगांव येथे दोन ब्राह्मण बालविधवांचे पुनर्विवाह झाल्याचे वृत्त 'प्रभाकर' या पत्रात प्रसिध्द झाले होते.`[४५]

यानंतर पंडितांचा प्रवास फार जोमाने चालू झालेला दिसतो. विधवाविवाहाच्या पुरस्कारानंतर विधवा विवाह घडवून आणण्यात पुढाकार, बालविवाहाच्या विरूध्द जागृती त्याच बरोबर काही वाड्.मयीन कार्यही केल्याचे दिसून येते. त्यांचे समाजकार्य इतरांपेक्षा वेगळे आहे, असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. कारण समाजसुधारणेच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करून लोकांचे मतपरिवर्तन होणे शक्य नाही. याची विष्णु शास्त्री पंडितांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच स्त्रीजातीच्या उन्नतीसाठी प्राणपणाने लढण्याचा त्यांनी प्रयत्न केला व लोकनिंदेच्या निष्ठुर आघातांना बिलकूल न जुमानता त्यांनी तो आमरण पाळला. ज्या ज्या वेळेला त्यांच्यावर कसोटीची पाळी आली त्या त्या वेळी ते आपल्या शब्दाला जागले व आपली तत्त्वनिष्ठा किती अटळ आहे, याची त्यांनी समाजाला खात्री पटवून दिली. अशा या महान सत्पुरूषाची जाणीव त्यांच्या वेगळ्या विचारातून व तत्त्वनिष्ठेतून होते.

पंडितांची आपल्या कार्यावर अढळ श्रध्दा होती. व्यवहारिकदृष्ट्या प्रतिपक्षांशी तडजोड करण्यास ते नेहमी तयार असत. मतभेदांच्या मुद्दयांवर अवास्तव जोर देऊन भांडण वाढवीत बसण्यापेक्षा उभयपक्षांची कोणत्या बाबतीत एकवाक्यता होऊ शकते, याकडे त्यांचे जास्त लक्ष होते. विरोधकांचे पुनर्विवाहाच्या प्रश्नावर जरी दुमत असते तरी बालविवाहाचे अनिष्ट परिणाम सर्वांस मान्य होण्याजोगे आहेत, असे दिसून येताच त्यांनी सनातनी व सुधारक या दोन्ही पक्षांना पटेल असे संमतिपत्र तयार केले व ते गोविंदशास्त्री लेले, गजेशशास्त्री मालवणकर, सदाशिवशास्त्री लेले, विष्णु शास्त्री पंडित, लक्ष्मणशास्त्री हळवे इत्यादी पंडितांनी ते प्रसिध्द केले. त्यात कन्येचा विवाह

बारा वर्षापासून सोळा वर्षापर्यंत करावा व पुरुषाने सतरा वर्षापुढे पंचेचाळीस वर्षापर्यंत आपले लग्न करावे असे स्पष्ट केले होते.'[४६] थोडक्यात, त्यांना सुध्दा विवाहाचे वय हे कमी नसावे असे वाटत होते.

१९ व्या शतकात पुनर्विवाहाचे प्रमाण अत्यंत नगण्य होते. या संपूर्ण शतकात मराठी भाषिकांत ३९, तर गुजराती समाजात ३७ विधवाविवाह झाले. यात मुळातच विधवेच्या नातेवाईकांची व समाजाची पुनर्विवाहाबाबतची तयारीच नव्हती. म्हणजे ९९ टक्के पेक्षा जास्त विधवा सक्तीच्या वैधव्यात जीवन जगत होत्या, असे दिसते. एक तर विधवांवर या चालींचे दडपण असावे किंवा पती हा सात जन्मांसाठी असतो, असा एक समज असावा. जे काही पुनर्विवाह झाले ते प्रामुख्याने ब्राह्मण , कायस्थ व प्रभू जातीत झाले.

इ.स. १८६५ मध्ये मुंबईत विष्णु शास्त्री पंडितांनी आंग्रवाडीत माधव विंचुकर यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विवाहितेचे मंडळ स्थापन करुन त्यांच्या प्रयत्नाने नाना भिडे, करमरकर, मोरोबा कान्होबा या सुधारक पुरुषांनी विधवांशी विवाह केले.'[४७]

भारतीय स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी, या करिता पंडितांनी गावोगावी जाऊन व्याख्याने दिली. स्त्रियांच्या प्रश्नांशी संबंधित असे अनेक ग्रंथ लिहिले. स्त्रियांच्या प्रश्नावर शेकडे लेखही लिहिले. आपल्या या लेखांमधून विष्णुशास्त्रींनी स्त्री-शिक्षण, बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, केशवपन, पुनर्विवाह, परदेशगमन, जातिभेद इत्यादी प्रश्नांचा उहापोह केला. थोडक्यात, स्त्रियांच्या जीवनाशी निगडित असलेल्या सर्वच महत्त्वाच्या प्रश्नांना त्यांनी हात घातला. तथापि, स्त्रिविषयक प्रश्नांमध्ये विधवा स्त्रियांचे होणारे हाल पाहून त्यांनी विधवाविवाहाच्या प्रश्नाला प्राधान्य दिले. सामाजिक सुधारणेसंबंधी त्यांचा दृष्टिकोन इतरांपेक्षा वेगळा होता. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे केवळ कायदा करुन कोणताच प्रश्न मार्गी लागणार नाही. अशा सुधारणा घडून येण्यासठी समाजानेच त्यांना अंत:प्रेरणेने आशीर्वाद द्यावा लागतो.'[४८]

थोडक्यात, सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजाला तो बदल स्वीकारण्यास तयार व्हावे लागते आणि त्यासंबंधीची जबाबदारी सामाजिक कार्यकर्त्यांनी पार पाडावयाची असते, ही गोष्ट विष्णु शास्त्री पंडित ओळखून होते. म्हणूनच त्यांनी विधवा विवाहाच्या प्रश्नाला समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न सुरुच ठेवले. त्याच उद्देशाने विष्णु शास्त्रींनी या प्रश्नावर अनेक शास्त्री पंडितांशी वेळोवेळी वादविवाद केले. आणि आपल्या मतांना प्राचीन धर्मग्रंथाचे प्रमाण मिळवून देण्यावर भर दिला.

विष्णुशास्त्रींनी स्त्रीसुधारणेच्या प्रश्नाप्रमाणेच अल्प सामाजिक सुधारणांचा देखील पुरस्कार केला होता. भारतीय समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी ही त्यांची तळमळ होती. त्यासंबंधीची मते ते 'इंदुप्रकाश' मध्ये सातत्याने मांडताना दिसतात. भारतीय समाजातील जातिभेद, सामाजिक व आर्थिक विषमता, कनिष्ठ वर्गावर होणारा अन्याय इत्यादी दोषांवर त्यांनी आपल्या लिखाणातून जोरदार टीका केली.

विष्णुशास्त्रींचे वाङ्.मयीन कार्यही खूपच महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या वाङःमयाचा उपयोग नेहमीच समाजाच्या सेवेसाठी केला. स्त्रियांच्या प्रश्नांशी संबंधित अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले. ब्राह्मणकला विवाह विचार, पुरुषसुक्त व्याख्या, विधवा-विवाह, आर्य लोकांच्या प्राचीन व अर्वाचीन रिती हे त्यांचे काही प्रसिध्द ग्रंथ. याशिवाय 'हिंदुस्थानचा इतिहास', 'नाना फडणवीस यांची संक्षिप्त बखर', 'तुकाराम बाबांच्या अभंगांची गाथा' इत्यादी पुस्तकेही त्यांनी लिहिली होती.'[४९]

आपल्या साहित्यातून त्यांनी समाजाचे हित व्हावे, असे विचार मांडले आहेत. त्यासाठी स्त्रीविषयक विचारांचा उहापोह केला आहे.

विष्णु शास्त्री पंडित भारतीय समाजातील एका दुर्बल घटकाचे म्हणजे स्त्रियांचे प्रश्न पोटतिडीकीने मांडणारे आघाडीचे समाजसुधारक होते. त्यांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी सनातनी लोकांशी संघर्ष करण्याची तयारीही ठेवली होती. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालण्यापर्यंत सनातनींची मजल गेली.

परंतु हाती घेतलेले कार्य त्यांनी अर्धवट सोडले नाही. त्यांची समाजसुधारणेच्या कार्याची व्याप्ती प्रचंड होती. तरीही त्यांनी स्त्री सुधारणेच्या प्रश्नांवर आपले लक्ष केंद्रित करुन ते कार्य अतिशय निष्ठेने पुढे चालविले.

**विधवाविवाह व त्यास झालेला विरोध -**

विधवाविवाहाच्या पुरस्काराला अनेकांचा विरोध होत असताना देखील त्यांनी आपला कार्यक्रम सुरूच ठेवला. विरोधकांच्या वादाला समर्थपणे तोंड देत विधवाविवाहाची नवीन प्रथा प्रत्यक्षात राबवण्यात ते यशस्वी झाले. इ.स. १८४० पासूनच या प्रश्नाला चालना मिळाली व १८४२ साली बेळगावांत दोन ब्राह्मण बालविधवांचे पुनर्विवाह झाले. याच कालखंडात मुंबईमध्ये `परमहंस मंडळी` या नावाची गुप्त संस्था स्थापन झाली व तिच्या उद्देशपत्रिकेतही विधवा पुनर्विवाहाविषयी संमती असावी, असे प्रमुख कलम होते.`[५०]

इ.स. १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा आला व त्यामुळे सुधारणेच्या मार्गातील मोठी अडचणच दूर झाली. सुसंघटित प्रयत्नांशिवाय पुनर्विवाह प्रतिबंधाच्या दीर्घकालीन रूढींचे निर्मूलन होणार नाही हे लक्षात घेऊन २८ जानेवारी १८६६ रोजी पुनर्विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना पंडितांनी केली. हळूहळू पुणे, रत्नागिरी, अहमदाबाद इत्यादी ठिकाणी पुनर्विवाहोत्तेजक सभा स्थापन झाल्या. या सर्व सभांचा उद्देश फक्त एवढाच होता की, पुनर्विवाहाच्या चळवळीच्या आड येणाऱ्या औदासीन्य, भित्रेपणा व धर्मभोळेपणा या गोष्टी नाहीशा करणे होय.

अशा या परिस्थितीत पंडितांनी पुणे येथील `नारायण जगन्नाथ भिडे` यांचा पुनर्विवाह केला. परंतु त्याचा फारसा गाजावाजा झाला नाही. त्यानंतर पंडितांनी दि. १५ जून १८६९ रोजी मुंबईस मोरोबा कान्होबा यांच्या वाड्यात `प्रभाकरभट परांजपे` यांची कन्या वेणुबाई हिचा पुनर्विवाह मोठ्या थटामाटात घडवून आणला. या विवाहात नियोजित वर पांडुरंग विनायक करमकर हे होते. समारंभाच्या कुंकुमपत्रिकेवर गोपाळ हरि देशमुख, विष्णू परशुराम पंडित, विष्णू मोरेश्वर भिडे, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, विष्णु परशुराम रानडे, महादेव गोविंद

रानडे, जनार्दन सखाराम गाडगीळ अशा सात वजनदार पुढाऱ्यांच्या सह्या होत्या.'[५१]

थोडक्यात, पुनर्विवाह होण्यास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. प्रत्यक्षात कृतीतून त्यांनी हे साध्य केले.

त्यावेळी ह्या समारंभास मुंबईतील बरेच प्रमुख लोक उपस्थित होते. वधुवरांच्या आहेराची रक्कम ही जवळजवळ तीन हजारापर्यंत होती. शिवाय पंडितांनी पुनर्विवाहोत्तेजक मंडळाच्या फंडातून दोन हजार रूपये पुनर्विवाहित स्त्रीच्या नांवे बँकेत ठेवले होते. हा समारंभ त्यावेळी यशस्वी झाला. परंतु त्यामुळे विरोधकांचे चांगलेच पित्त खवळले व त्यांनी बहिष्काराचे रामबाण अस्त्र बाहेर काढले.

त्यावेळी पुराणमताभिमानी लोकांनी मुंबई, पुणे या ठिकाणी सनातनी पंडितांच्या सभा भरविल्या होत्या. त्यात पुनर्विवाहाला पाठिंबा देणाऱ्या पुढाऱ्यांना बहिष्कृत करण्याचा निर्णय झाला होता. प्रभाकर शिवराम भावे व कृष्णशास्त्री साठे यांनी मुंबईत 'हिंदू धर्म व्यवस्थापक सभा' स्थापन केली होती. व तिच्या मार्फत दर रविवारी जाहीर बैठका बोलावून पुनर्विवाहाचे खंडण करण्याचे काम केले जात असे. त्यावर आमचे मत ज्यांना मान्य नाही त्यांच्याशी वाद करण्यास आम्ही तयार आहोत, असे विष्णु शास्त्री पंडितांनी सनातनी पंडितांना सांगितले. त्यावेळी विष्णु शास्त्री पंडित व नारायणाचार्य गजेंद्रगडकर यांच्यात पुणे येथे या विषयावर १७ एप्रिल १८७० रोजी वाद झाला. त्या वादाच्या अंती एक निर्णयपत्र श्री.जगहरु शंकराचार्य स्वामी मठकरवीर व संकेश्वर यांनी प्रसिध्द केले होते.'[५२]

कोणत्या ना कोणत्या मार्गाने सुधारकांचा नायनाट करण्याचा उद्योग त्यांनी आरंभिला. तरीही विरोधकांच्या तोंडला तोंड देत आपले कार्य अखंड सुरुच ठेवले. समाजाची सर्वांगीण सेवा करीत असतानाच त्यांच्या आयुष्यात कसोटीची वेळ आली व तिच्यातूनही ते तावून सुलाखून बाहेर पडले. कारण महाराष्ट्रातील मी मी म्हणणाऱ्या नामवंत सुधारकांनी वाटेल त्या लंगड्या सबबी

पुढे करून ऐन आणिबाणीच्या वेळी कच खाल्ल्याची उदाहरणे काही थोडी नव्हती. परंतु पंडितांची वृत्ती फार वेगळीच होती. लोकांना ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी सांगून आपण नामानिराळे राहणे त्यांना कधीच रूचले नाही.

**पंडितांचा विधवेशी विवाह -**

इ. स. १८७४ च्या सुमारास त्यांच्या पहिली पत्नीचा क्षय आजाराने मृत्यू झाला. परंतु त्यांच्या पत्नीच्या मृत्यूबाबत समाजात काही विवाद होते. पंडितांची स्त्री पुनर्विवाहाची मते पत्नीला पसंत नव्हती व तिने कुढत राहून तिचा आजार बळावला व त्यामध्येच तिचा मृत्यू झाला असे काहींचे मत होते.'[५३]

पंडितांच्या हितशत्रूंना आता चांगलीच संधी साधून आली होती. कारण पत्नीच्या मृत्यूनंतर पंडित अविवाहित राहतात की पुनर्विवाह करतात, का आपले सर्व तत्त्वज्ञान गुंडाळून ठेवत साळसुदपणे एखाद्या बालवधूशी विवाहबध्द होतात, याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले होते. भविष्यात जर आपल्या पत्नीचे देहावसान झाले व आपण विधुर झाल्यास विधवेशी पुनर्विवाह कराल काय, असा प्रश्न केला असता ते आपल्या शालीनतेस अनुसरून मुग्ध हसत.`[५४]

पंडितांना पत्नीच्या मृत्यूचे दुःख झाले, अशा या द्विधा मनःस्थितीतही विरोधकांचा त्रास सहन करून काही थोड्या दिवसांच्या अवधीनंतर त्यांनी कोर्टात ता. २१ एप्रिल १८७४ रोजी करार पध्दती विवाह करण्याचा निर्णय घेतला. मुंबई येथील पोलीस कोर्टातील मॅजिस्ट्रेट यांचे कचेरित पंडितांनी एक करारपत्र सादर केले. या कराराच्या अन्वये विष्णु शास्त्री पंडित यांचे वय ४७ असताना, वामनराव आगाशे यांची कन्या गं. भा. कुसाबाई वय २५ हिच्याशी विवाहबद्ध होण्याचे ठरविले.

हरिपंत पटवर्धन यांच्या अकाली मृत्यूनंतर कुसाबाईस बालपणीच वैधव्य प्राप्त झाले होते. अशा विधवा अवस्थेत त्यांनी जवळजवळ एक दीड तपाचा कालखंड घालविला होता. अशा या विधवा दुःख परिस्थितीत कुसाबाई मुंबईस पंडितांनी अनाथ स्त्रियांकरिता काढलेल्या संस्थेत दाखल झाल्या. या

विवाहास त्यांच्या मातोश्रीचा विरोध होता. कुसाबाईने जुजबी शिक्षणाच्या आधारावर मॅजिस्ट्रेटचे कोर्टातील रूजू करारपत्रावर स्वाक्षरी केली. या करारात पंडितांनी कुसाबाईच्या उपयोगार्थ १६०० रू. दिल्याचे समजते.`[५५]

लग्नापूर्वी करार करणे हे घटनेचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणून सांगता येईल. लग्नापूर्वी करार ही हिंदू विवाहपध्दतीत नवी रीत पंडितांनी येथे घडवून आणल्याचे दिसते.

वरील करार झाल्यानंतर आठ महिन्यांनी म्हणजे `दि. १४ डिसेंबर १८७४ रोजी मार्गशीर्ष शु. ३ शुक्रवार` रोजी शिरगाव येथील गवालिया तलाव या ठिकाणी असलेल्या गोकुळदास तेजपाल यांच्या शाळेत विष्णु शास्त्री पंडित व कुसाबाई यांचा यथाशास्त्र पध्दतीने पुनर्विवाह झाला. या प्रसंगी पुष्कळ मित्रमंडळी विवाहासाठी पंडितांबरोबर हजर होती. मात्र, या गोष्टीचा फारसा गाजावाजा पंडितांनी करून दिला नाही.`[५६]

स्त्रीजातीच्या उन्नतीपुरतेच जरी विष्णु शास्त्री पंडितांनी आपले कार्यक्षेत्र मर्यादित केले असले तरी त्यांची दृष्टी अत्यंत व्यापक होती. समाजजीवनाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक इत्यादी सर्व अंगाच्या सुधारणेविषयी त्यांना सारखीच तळमळ होती. अशा निरनिराळ्या समाजोपयोगी विषयांचा त्यांनी आपल्या 'इंदु-प्रकाशाती'ल लेखात वेळोवेळी परामर्श घेतला आहे. जन्मभर त्यांनी समाजाचीच चिन्ता केलेली दिसते.

**प्रकृती अस्वस्थ व मृत्यू -**

आयुष्यभर समाजाची चिंता करणाऱ्या या महापुरूषाचे अतिश्रेष्ठ कार्यकर्तृत्व होते. लोकोपवादाची त्यांनी कधी पर्वा केली नाही ज्यांनी शेकडो संकटे स्वतःवर ओढवून घेतली, पण स्वतःच्या सद्सद्विवेकबुध्दीशी प्रतारणा केली नाही.

अनाथ, अबला, मागासलेला वर्ग, देशातील उद्योगधंदयाची उन्नती, परदेशगमन, विद्याभिवृत्ती संस्कृत ग्रंथावलोकन, नूतन ग्रंथप्रकाशन, विधवापुनर्विवाह प्रसार इत्यादी अनेक विषयात कार्य करत असतानाच स्वदेश,

स्वभाषा आणि स्वजन यांच्या उध्दारासाठी अहर्निश झटत असताना पंडितांची प्रकृती वयाच्या ४९ व्या वर्षी एकाएकी बिघडली. ती सुधारण्यासाठी ते महाबळेश्वर येथे मित्र शेठ माधवदास रंगनाथदास आणि इतर मंडळीसह जात असताना त्यांना न्या. म. गो. रानड्यांच्या येथे मेजवानी झाली. महाबळेश्वरात त्यांच्या प्रकृतीस कोणताही आराम पडला नाही. ता. २५ एप्रिल सन १८७६ रोजी `उन्मादवायू` होऊन त्यातच पंडितांचा मृत्यू झाला.`[५७]

पंडितांच्या निधनानंतर अनेक वृत्तपत्रांनी त्यांच्या मृत्यूलेखाची मालिकाच लावलेली दिसते. त्यापैकी एक `नेटिव ओपिनियन` या मुंबई येथील सुधारणावादी वृत्तपत्र प्रथम विधवाविवाहाच्या बातम्या आपल्या पत्रात छापत. या पत्रांना पंडितांनी मदत केली होती. याच वृत्तपत्रांनी पंडितांच्या मृत्यूची बातमी छापली. विष्णु शास्त्री पंडित हे कित्येक वर्षे 'इंदुप्रकाशा'चे भागीदार होते. परंतु त्यांना इंदुप्रकाशची मालकी याच वर्षी प्राप्त झाली होती. पुनर्विवाह उत्तेजकाचे उत्कृष्ट कार्य पंडितांनी पार पाडले होते. इतकेच नाही परंतु स्वतःही पुनर्विवाह केला व त्यांनी त्यांच्या वैचारिकतेनुसार विचारांशी फारकत घेतली नाही.`[५८]

नुसत्या विधवा विवाहकार्याचीच नव्हे तर त्यांनी स्वदेशी वस्तुप्रसार, परदेशगमन, स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, इंग्रजी विद्याप्रसार, शूद्रान्नसेवन अशा अनेक कार्यात रस घेतला. उत्तरोत्तर या कार्यात प्रगती होत गेली म्हणजेच त्यांनी सुरू केलेल्या कार्याची मालिका आज वेगवेगळ्या स्वरूपात आपणास पहावयास मिळते.

पंडितांच्या मृत्यू पश्चात आलेला मृत्युलेख 'ज्ञानप्रकाश' मध्ये पहावयास मिळतो तो असा

ता. ४ मे १८७६ पुणे.

या लोकोत्तर गृहस्थाविषयी पुनर्विवाहासंबंधाने काहीही गृह असला तरीही त्यास देखील नवीन लोकांप्रमाणे दुःख होईल कारण आपल्या देशास उर्वरित दशेत आणण्यास जी सामग्री, बुध्दी कौशल्य व दृढ निश्चयाचे वर्तन जरुरी आहे ती या पुरुषाचे अंगी पूर्णपणे होती हे सांगावयास नको. त्यांनी मनात धरलेला

हेतू सिध्दीस नेण्यास्तव धर्मशास्त्राचा उत्तम अभ्यास करुन सर्व लोकांस एक उत्तम प्रकारचा कित्ता; घालून दिला. या शास्त्रांत त्यांची अलीकडे प्रवीणता आली होती की त्यातील कठीण प्रश्न सोडविण्यास्तव त्यांच्याकडे येत असत. आपल्या देशांत अलीकडे व्यापार वगैरे संबंधाने जी चळवळ सुरु आहे, तिचे महत्त्व लोकांचे मनात चांगले ठसवून देण्याकरिता कवितेच्या साह्याने व आपल्या भाषणाने कीर्तन करण्याचा परिपाठ त्यांनी सुरु केला होता. ईश्वराने त्यास अधिक आयुष्य दिले असते, तर अशाच रीतीची दुसरी उत्तम कृत्ये त्यांचे हातून झाली असती.

पुनर्विवाहपक्ष काहीसा मोडकळीस आला असताही हया पुरुषाने दुसऱ्याच्या सहाय्याची आशा न धरता स्वतःच्या हिश्याने तो चालवून स्वतः आपण पुनर्विवाह करुन जे उदाहरण घालून दिले आहे, ते लोकांस उपयोगी पडेल, असे वाटत आहे. या पुरुषास अकाली मृत्यू आला ही गोष्ट सर्व देशाचे हितास बाधक होईल, असे म्हटल्याविना आमच्याने राहवत नाही. वे.शा.सं. विष्णु शास्त्री पंडितांसारखे विधवाविवाहाचे कामात पुढारी असतानाही त्यांचे अनुयायी मंडळींनी कोणत्या प्रकारचे वर्तन केले व प्रसंगास आपला किती कमजोरपणा दाखविला हे सर्वत्रास माहीत आहे. यास्तव, अशा एकनिश्चयाच्या गृहस्थाचे सर्व लोकांस स्मरण राहण्याजोगेच काही काम त्यांच्या मित्रमंडळींनी करण्याचा प्रयत्न करावा अशी, आमची त्यास सूचना आहे.'[५९]

यावरुन पंडितांची महानता व त्यांची ध्येयवादी वृत्ती यांची प्रचिती होते. ते आपल्यात नाहीत, परंतु त्यांची शिकवण मात्र आजही समाजाला उपयोगी पडणारी आहे.

**सारांश -**

एकोणिसाव्या शतकाची सुरूवात ही राजकीय गुलामगिरीने झाली. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनात बदल झाला.

या शतकातील महत्त्वाची घटना म्हणजे १८१८ मध्ये पेशवाईचा अंत व इंग्रजी राजवटीची सुरूवात होय.

सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनात या कालखंडात कोणताही बदल न झाल्याने समाजाची परिस्थिती खालावत गेली.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मप्रसाराला सुरूवात केली.

कालांतराने त्यांचा जोर वाढत गेला. व त्यांनी हिंदू धर्मावर आक्रमणे केली. दिवसेंदिवस इंग्रजी ग्रंथांचे वाचन वाढत जाऊन इंग्रजी समानतेचा बदल समाजाने स्वीकारावयास सुरूवात केली.

जसजसा इंग्रजी संस्कृतीशी संबंध वाढत गेला तसतसा भारतीय कल्पनात नवनवीन विचारांची जाणीव वाढत गेली.

नवीन सुधारणांची सुरूवात होऊन रेल्वे, तारायंत्रे, पोस्ट, वर्तमानपत्रे, पुस्तके यांची ओळख समाजाला झाली.

त्याच बरोबर नवमतवादी विचारांची नवी पिढी उदयाला आली यामध्ये बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) जोतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्या. रानडे, विष्णु शास्त्री पंडित इत्यादींचा समावेश होतो.

इंग्रजी नवलाईची जादू ओसरल्यानंतर या सुधारकांनी वृत्तपत्राद्वारे समाज जागृतीचे कार्य केले.

समाजजागृतीसाठी इंग्रजांनीही कायद्याचा मार्ग अवलंबविला व त्याला समाजसुधारकांनीही पाठिंबा दिला.

महात्मा फुलेंनी पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू केली व त्या शाळेत आपल्या पत्नीला शिकविण्याचे काम दिले. त्यावेळी या शाळेच्या नियामक मंडळावर इतर समाजसुधारकही होते, त्यात विष्णु शास्त्री पंडितांचाही समावेश होता.

त्याकाळात समाज सुधारण्याच्या कार्यात महिलांचाही समावेश होता. समाज सुधारण्याच्या कोणत्याही कार्यात सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय लोकांचे मतपरिवर्तन होणार नाही. याची जाणीव विष्णु शास्त्री पंडितांना होती.

त्यामुळे लोकनिंदेची पर्वा न करता त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न समाज सुधारणेचे कार्य केले.

१८७४ मध्ये त्यांची पत्नी दिवंगत झाल्यानंतर त्यांनी एका विधवेशी विवाह केला. व एक आदर्श समाजासमोर ठेवला.

स्वराज्य, स्वभाषा आणि स्वदेशाची कल्पना मनात ठेवून १८७६ मध्ये त्यांचे निधन झाले.

## संदर्भसूची


१) प्रा. पाटील व्ही.बी., 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', पृष्ठ - १७-१८.

२) कित्ता; पृष्ठ - ६५.

३) गर्गे स.मा., सं.पा. 'भारतीय समाजविज्ञान कोष', पृष्ठ - २४१.

४) डॉ. दीक्षित राजा, 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय', पृष्ठ - ४१.

५) डॉ. मोरे अरुणा, 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधन कालखंडात विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे योगदान', (पीएच.डी. प्रबंध)पृष्ठ - ८०.

६) कित्ता; पृष्ठ - ८०.

७) डॉ. गाठाळ एस.एस., 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास', पृष्ठ - ३९-४०.

(एकोणीसाव्या शतकातील प्रबोधन कालखंडातील प्रमुख उत्तपत्रे मराठी व इंग्रजी - दर्पण - बाळशास्त्री जांबळेकर १८३२-१८४०, प्रभाकर - भाई महाजन १८४१-१८५३, ज्ञानोदय - वीरखेर १८४२, निबंधमाला - विष्णुशास्त्री चिपळूणकर १८७४, शतपत्रे - लोकहितवादी, इंदुप्रकाश - विष्णू शास्त्री पंडित १८७४, ज्ञानप्रकाश - कृष्णाजी रानडे १८४९, सुधारक - आगरकर १८८८,

Bombay Herold - 1789, Bombay Courier - 1790-1846, Bombay Gazette - 1791, Bombay Times - 1832, Times Of India - 1839. संदर्भ - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास)

८) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - ६३.

९) सौ. मोरे अरूणा अर्जुन, पूर्वोक्त, पृष्ठ - ०५

१०) टिकेकर श्री. रा., पाध्ये प्रभाकर, `आजकालचा महाराष्ट्र`, पृष्ठ - ४८

११) उडे श्रीपाद भालचंद्र, 'लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ - एक अभ्यास' (१८८१-१९२०), पीएच.डी. प्रबंध, पृष्ठ - २६-२७.

१२) सरदार गं.बा., 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', पृष्ठ - १५३.

१३) कित्ता; पृष्ठ - १५३.

१४) कित्ता; पृष्ठ - १५१-१५२.

१५) सहस्त्रबुध्दे पु.ग., 'महाराष्ट्र संस्कृती, पृष्ठ - ६७८.

१६) प्रा. पाटील व्ही. बी., पुर्वोक्त, पृष्ठ - ९५

१७) डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ०७.

१८) कित्ता; पृष्ठ - ८-९.

१९) कित्ता; पृष्ठ - ०९.

२०) कित्ता; पृष्ठ - २८

२१) कित्ता; पृष्ठ - ३०

२२) फडके य. दि., `विसाव्या शतकातील महाराष्ट्र`, पृष्ठ - ३६

२३) रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा - एकोणिसावे शतक' पृष्ठ - १३६.

२४) कित्ता; पृष्ठ - १३६.

२५) कित्ता; पृष्ठ - १३६-१३७.

२६) शिंदे ताराबाई, 'स्त्री-पुरुष तुलना', पृष्ठ - ०३.

२७) डॉ. गाठाळ एस.एस, 'भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री चळवळ' पृष्ठ - ९७-९८.

२८) कित्ता; पृष्ठ - ९८

२९) कित्ता; पृष्ठ - ३७.

३०) कित्ता;

३१) कित्ता;

३२) कित्ता; पृष्ठ - ४०

३३)   सरदार गं. बां., `महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी`, पृष्ठ - १५५

३४)   श्री. स. पंडित, `विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे चरित्र`, पृष्ठ - ०२

(माता, पिता, कुल, गोत्र, ग्राम या सर्वांचा उल्लेख श्री. स. पंडित यांनी विष्णू शास्त्री पंडीत यांच्या चरित्रात काही पदयात केलेला आहे.

१. 'सप्तर्षी, नगरवासी भट्ट कुलोत्पन्न काश्यप सुगोत्र ।
सुत परशराम कविचा विष्णु वदे प्रार्थुनी सुरस गोत्र ।।'

२. 'नत्वखिलजगदीश मानन्दी परशुरामपितृचरणान ।।
विधवोव्दाहविवेकं भट्टो विष्णुः करोमि धर्मयुतम् ।।')

३५)   कित्ता;

३६)   कित्ता;

३७)   कित्ता; पृष्ठ - ०१

३८)   सरदार गं. बां., पूर्वोक्त पृष्ठ - १५६

३९)   पंडित श्री. स., पूर्वोक्त, पृष्ठ - ०३

४०)   सरदार गं. बां., पूर्वोक्त, पृष्ठ - १५६

४१)   पंडित श्री. स., पूर्वोक्त, पृष्ठ - ०४

४२)   सरदार गं. बां., पूर्वोक्त, पृष्ठ - १५७

४३)   कित्ता; पृष्ठ - १५८

४४)   कित्ता; पृष्ठ - १५९

४५)   कित्ता;  पृष्ठ - १५९

४६)   कित्ता;  पृष्ठ - १६०-१६१.

४७)   डॉ. गाठाळ एस.एस., पूर्वोक्त, पृष्ठ - ९१.

४८)   प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३६.

४९)   कित्ता; पृष्ठ - १३८-१३९.

५०)   कित्ता;

५१)   कित्ता; पृष्ठ - १६१

५२)   गोंधळेकर श्रीधर, `विधवा विवाहाच्या अशास्त्रतेविषयी निर्णयपत्र, (श्री जगद्रू शंकराचार्य स्वामी मठकरवीर व संकेश्वर यांनी,

नारायणाचार्य गजेंद्रगडकर व विष्णु शास्त्री पंडित यांच्या वादाअंती केलेले.) ता. १७ एप्रिल १८७०.

५३) पंडित श्री. स., पूर्वोक्त, पृष्ठ - ९१

५४) कित्ता; पृष्ठ - ९२

५५) कित्ता; पृष्ठ - ९३

५६) कित्ता;

५७) कित्ता; पृष्ठ - ९९

५८) कित्ता; पृष्ठ - १०२

५९) कित्ता; पृष्ठ - १०२

## प्रकरण - ४

# विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन समाजसुधारक

## प्रकरण - ४

## विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन समाजसुधारक

**प्रस्तावना -**

सन १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट होऊन महाराष्ट्रावर इंग्रजी सत्तेची सुरूवात झाली होती. भारतात ब्रिटिश राजवटीची स्थापना झाल्यानंतर येथील समाजजीवनात मोठ्या प्रमाणावर बदल घडून आला. त्याचप्रमाणे लोकांच्या जीवनावरही ब्रिटिश राजवटीचा दूरगामी परिणाम झाला. या राजकीय बदलामुळे येथे राजकीय गुलामगिरीचे नवे पर्व सुरू झाले होते. पण त्याची खंत मोजक्याच लोकांना वाटत होती. ब्रिटिशांच्या राज्यात पेशवाईप्रमाणे व मोगलाईप्रमाणे लढाया, बंडे, धामधुमी व जुलूम नाहीत, एकसूत्री कारभार आहे शांततेने राज्य चालते.` असाच सार्वत्रिक समज झाला.`[१]

नव्या राज्यकर्त्यांनी शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्याच्या कार्याला अग्रक्रम देऊन प्रजेला दिलासा मिळवून दिला होता. त्यामुळे इंग्रजी सत्तेविषयी लोकांची फारशी तक्रार राहिली नव्हती. इंग्रज हे जरी परकीय असले तरी त्यांचा राज्यकारभार चांगला आहे, अशीही समजूत झाली होती.

महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर मुंबई इलाख्याच्या राज्यकारभाराची सूत्रे सुरूवातीच्या काळात एल्फिन्स्टन, माल्कम यांसारख्या अधिकाऱ्यांच्या हाती होती.`[२]

त्यांनी या इलाक्यात मोठ्या दक्षतेने आणि दूरदर्शीपणाने इंग्रजी सत्तेचा जम बसविला. आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी एतद्देशीय प्रजेचा विश्वास संपादन केला होता. या राज्यकर्त्यांनी आपल्या राज्यकारभाराची घडी नीट बसविण्याच्या कार्याबरोबरच येथील लोकांना नवे शिक्षण देण्याचे व नव्या सुधारणा घडविण्याचे कार्य सुरू केले होते. या बदलांचा परिणाम सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर होऊ लागला होता. शिक्षण प्रसारावर भर देण्यात आला होता. महाराष्ट्रात अनेक शाळा व शैक्षणिक संस्था सुरू करण्यात आल्या

होत्या. सुरूवातीच्या काळात या कामी ख्रिस्ती मिशनऱ्यांचेही सहकार्य लाभले होते. शिक्षणप्रसारामुळे महाराष्ट्रातील तरूणांची नवी पिढी पाश्चात्त्य संस्कृतीच्या आणि आधुनिक विचारांच्या संपर्कात आली होती. ब्रिटिशांच्या भौतिक सुधारणांमुळे ज्ञानाची क्षितिजे रूंदावण्यात मदत झाली होती. त्यामुळे येथील समाजात आधुनिक विचारांचे वारे जोराने वाहू लागले होते.'[३]

थोडक्यात, युरोपातील नवीन विचारामुळे भारतीय समाज ढवळून निघाला. लोकांना शिक्षणाची संधी मिळाली. ब्रिटिशांमुळे समाजपरिवर्तन झाले.

या परिवर्तनामुळे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात प्रचंड प्रमाणात खळबळ माजली. विशेषतः इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेतलेल्या तरूणांनी आपल्या समाजव्यवस्थेकडे व येथील धार्मिक, सामाजिक स्थितीकडे चिकित्सक दृष्टीने पाहावयास सुरूवात केली होती. समाजाच्या अधोगतीची कारणे कोणती, याचा शोध घेण्याची गरज त्यांना वाटू लागली होती. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा, अनिष्ट प्रथा, अंधश्रध्दा व भोळ्या समजुती आणि या सर्वांमुळे संपूर्ण समाजाचा घडून आलेला नैतिक अध:पात याची जाणीव त्यांना झाली होती. त्यातूनच आपल्या धर्मात व समाजात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली होती.

अशा प्रकारे भारतीय समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाविषयी जाणीव निर्माण झालेली आणि समाजसुधारणेविषयी तळमळ असलेली सुशिक्षित युवकांची नवी पिढी या काळात उदयास आली होती. यामध्ये नाना शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, महात्मा जोतिबा फुले, दादोबा पांडुरंग, गोपाळ हरी देशमुख, (लोकहितवादी), भाऊ महाजन, विष्णु शास्त्री पंडित, बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी , भाऊ दाजी लाड इत्यादींचा समावेश होतो.`[४]

या समाजसुधारकांच्या सुरूवातीच्या प्रयत्नामुळेच सामाजिक सुधारणांच्या चळवळीला चालना मिळाली म्हणूनच त्यांना आद्यसमाजसुधारक असे संबोधले जाते.

**१) बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६) -**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश राजवटीच्या काळात तत्कालीन मुंबई इलाख्यामध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव अग्रक्रमाणे घ्यावे लागेल. मुंबई इलाख्यात इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यावर अनेक लोकोत्तर माणसे स्वकर्तृत्वावर मोठी झाली. त्यांनी महाराष्ट्राच्या प्रबोधनामध्ये मोठी भर घातली. त्यात बाळशास्त्री हे अग्रणी होते. समाजप्रबोधनाबरोबरच बऱ्याच क्षेत्रात ज्यांनी नाव उमटवले त्या बाळशास्त्री यांना पश्चिम भारतातील 'नवयुगप्रवर्तक' आणि 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' असे संबोधले जाते.[५]

१८१२ ते १८४६ बाळशास्त्रींचा अल्पजीवी कार्यकाल पण या अल्पकाळातील बाळशास्त्रींचे कार्य थक्क करणारे आहे. मुंबई इलाख्यात प्रत्येक सुधारलेल्या चळवळीचा पहिला मान हा त्यांना मिळाला. म्हणूनच त्यांचे कार्य निश्चितपणे प्रेरणादायी व स्फूर्तिदायी ठरले. एकोणिसाव्या शतकाचा पूर्वाध हा पश्चिम भारतात अत्यंत निराशेचा आणि सांस्कृतिक खच्चीकरणाचा होता. या पार्श्वभूमीवर त्यांनी भारतीय सांस्कृतिक विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला आणि मुंबई शहर हे त्यांचे उगमस्थान ठरले.[६]

थोडक्यात, बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्राद्वारे जनमत ढवळून काढले.

**परिचय -**

बाळशास्त्री जांभेकर आधुनिक महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक, मराठी वृत्तपत्रांचे जनक, इतिहास संशोधक व विचारवंत होते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील पोंबुर्ले या गावी इ.स. १८१० मध्ये झाला. (काही ठिकाणी हे साल १८१२ असे आहे.) वयाच्या बारा-तेरा वर्षापर्यंत संस्कृत व मराठी भाषेचे अध्ययन पूर्ण केले. पुढे इंग्रजी शिक्षणासाठी मुंबईस

आले. थोड्याच दिवसात इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवले. शाळेत शिकत असतानाच ते गणित विषयाचे शिक्षक झाले.[७]

त्यांनी संस्कृत, इंग्रजी, मराठी, गणित, भूमिती, गुजराती, बंगाली आणि फारशी या विषयाचे ज्ञान संपादन केले.

त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी १८३० मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या 'डेप्युटी सेक्रेटरी' या पदावर काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर दोनच वर्षांनी त्या संस्थेचे नेटिव्ह सेक्रेटरी या पदावर त्यांची नियुक्ती झाली. इतक्या लहान वयात एवढा बहुमान मिळणारे बाळशास्त्री जांभेकर हे त्या काळातील पहिले महाराष्ट्रीय विद्‍वान होते.[८]

१८३४ मध्ये मुंबईमध्ये गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याच्या स्मरणार्थ एलफिन्स्टन कॉलेज सुरु झाले. त्या कॉलेजात 'असिस्टंट प्रोफेसर' म्हणून बाळशास्त्रींची नियुक्ती करण्यात आली. तेथे ते गणित, खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र हे विषय शिकवित होते. पुढे त्यांची गणित विषयासाठी मुख्य प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली.

मुंबई इलाख्यातील प्राथमिक शाळांची तपासणी करण्यासाठी सरकारने त्यांची 'इन्स्पेक्टर' म्हणून नियुक्ती केली होती. सन १८४५ मध्ये त्यांच्या नेतृत्वाने मुंबईत पहिले केनिंग कॉलेज सुरु करण्यात आले.[९] त्या कॉलेजचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. जबाबदारीची विविध पदे भूषवित असताना त्यांनी आपल्या विद्यांचा संग्रह सुरु ठेवला. बाळशास्त्रींना अनेक विषयात गती होती आणि त्या-त्या विषयातील नवे ज्ञान आत्मसात करण्यावर त्यांचा कटाक्ष होता. अशा या अष्टपैलू विद्वानाचे वयाच्या ३४ व्या वर्षी अकाली निधन झाले. (१७ मे १८४६)[१०]

**मराठी वृत्तपत्राचे जनक -**

बाळशास्त्रींना 'मराठी वृत्तपत्राचे जनक' म्हटले जाते. त्यांनी मराठी भाषेतील 'दर्पण' हे पहिले वृत्तपत्र इ.स. १८३२ मध्ये सुरु केले.

'दर्पण' हे साप्ताहिक होते आणि ते इंग्रजी व मराठी या दोन भाषांत ते प्रसिध्द होत असे. या पत्रातील इंग्रजी भाग बाळशास्त्री जांभेकर लिहित होते व त्याचे भाषांतर 'भाऊ महाजन' करीत होते. 'दर्पण' हे वृत्तपत्र सुमारे आठ वर्षे सुरु राहिले. ते बंद होण्याच्या सुमारास म्हणजे इ.स. १८४० मध्ये बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन यांनी 'दिग्दर्शन' या नावाचे मराठी मासिक सुरु केले.'[११]

'दर्पण' व 'दिग्दर्शन' या वृत्तपत्रांतून समाजजागृती करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांना हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा बंद व्हाव्यात, असे वाटत होते. ते विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. जांभेकर सुधारणावादी असले तरी हिंदू धर्माविषयी त्यांना अभिमान होता. म्हणून हिंदू धर्मातून दुसऱ्या धर्मात गेलेल्या लोकांना हिंदू धर्मात परत घ्यावे असा त्यांचा आग्रह होता व तसेच प्रयत्नही त्यांनी चालविले होते. 'दर्पण'चा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिध्द झाला. पहिल्याच अंकात त्यांचे प्रयोजन स्पष्ट करताना ते म्हणतात, की स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृध्दी व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रपणे व उघड रीतीने विचार करण्यास स्थळ व्हावे, या इच्छेने हे वृत्तपत्र सुरु केले. आहे.'[१२] समाजात सुधारणा घडवून आणण्याचे प्रभावी साधन या दृष्टीने त्यांना वृत्तपत्राचे महत्त्व वाटत होते. त्यांनी असे म्हटले होते की, बंगाल प्रांतासारख्या मागासलेल्या प्रांताची तेथे ब्रिटिश सत्तेच्या झालेल्या स्थापनेनंतर झपाट्याने सुधारणा झाली. यास इंग्रजी शिक्षणाची सुरुवात व वृत्तपत्रांचा प्रसार या दोन्ही गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत ठरल्या. तेंव्हा बंगालच्या मार्गाने गेल्यास महाराष्ट्रीय समाजात ही सुधारणा होण्यास विलंब लागणार नाही. थोडक्यात, वृत्तपत्र हे समाजात नवीन विचार रुजवेल आणि त्यातून लोक शहाणे होतील याचा देशाला फायदा होईल, ही त्यांची धारणा होती.

**सामाजिक कार्य -**

सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रामध्येही बाळशास्त्री जांभेकर आघाडीवर होते. त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या 'दर्पण' व 'दिग्दर्शन' या वृत्तपत्रांच्या लेखांवरुन स्पष्ट होतो. आपल्या समाजाचे मागासलेपण दूर व्हावे व त्यांची प्रगती व्हावी अशी त्यांची तळमळ होती. त्यासाठी आपण पाश्चात्य विद्या आत्मसात केली पाहिजे, ज्ञान व विज्ञान यांच्या प्रसारावर भर दिला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. याच दृष्टिकोणातून त्यांनी सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला होता.

जांभेकरांनी समाजसुधारणेचा पक्ष घेतला असला तरी 'राजा राममोहन रॉय' यांच्याप्रमाणे एखादा नवा धर्मपंथ स्थापन करुन धर्मसुधारणा करण्याचे धोरण त्यांना मान्य नव्हते. परंतु सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या बाबतीत त्यांचा दृष्टिकोन पुरोगामीच होता.'[१३] भारतीय समाजातील व हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा बंद पडाव्यात, किमान त्यांना आळा बसावा अशी त्यांची मनोभूमिका होती. त्यामुळे त्यांनी विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण यांचा पुरस्कार केला. हिंदू धर्मातील परधर्मात गेलेल्यांना शुध्द करुन पुन्हा स्वधर्मात घ्यावे, असे त्यांचे मत होते. विधवाविवाहाचा शास्त्रीय आधार शोधून काढण्याची कामगिरी त्यांनी गंगाधरशास्त्री फडके यांच्याकडून ग्रंथ लिहून पूर्ण केली.'[१४] त्या काळी विधवाविवाहाचा असा विचार करणारे व धर्माचा आधार घेणारे जांभेकरानंतरचे समकालीन कृतिशील फक्त विष्णु शास्त्री पंडितच होते. अशा प्रकारे पुनरुज्जीवनवादी सुधारणावादाचा किंवा परंपरानिष्ठ परिवर्तनाचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. त्या वेळच्या समाजाची कर्मठ वृत्ती विचारात घेता, जांभेकरांची समन्वयाची भूमिका उचित होती हे मान्य करावे लागेल.

**श्रीपती शेषाद्री प्रकरण -**

धर्मांतराचा प्रश्न हा हिंदू धर्मीयांच्या बाबतीत नेहमीच अडचणीचा बनला होता. परधर्मीयांनी हिंदूंना धर्मांतराच्या मार्गाने आपल्या धर्मात ओढण्याचा प्रयत्न नेहमीच चालविला होता व आजही ते कोणत्या ना कोणत्या मार्गाने थोड्या बहुत प्रमाणात सुरुच आहेत. परंतु अल्प धर्मीयांना हिंदू धर्मात घेण्याची कसलीच

तरतूद नव्हती. त्यामुळे हिंदू धर्माची फार मोठी हानी झाली होती. म्हणून काही धर्मसुधारकांनी अशी भूमिका घेतली की, हिंदू धर्मातून दुसऱ्या धर्मात गेलेल्यांना तरी शुध्दीकरणाच्या मार्गाने पुन्हा हिंदू धर्मात घेण्याची व्यवस्था असावी; परंतु सनातनी हिंदूंचा या गोष्टीला विरोधच होता व त्यामुळे त्या काळी हा मुद्दा वादाचा विषय बनून राहिला होता.[१५]

स्वधर्मात घेण्याच्या निर्णयाचा त्यांनी केवळ पुरस्कारच केला नाही, तर प्रत्यक्षात त्याचा पाठपुरावाही केला. त्यातूनच त्यांच्या जीवनात श्रीपती शेषाद्री प्रकरण उद्‌भवले. त्याचे सविस्तर वृत्त असे की, 'शेषाद्री' नावाच्या ब्राह्मणाची नारायण व श्रीपती ही दोन मुले मुंबईत ख्रिस्ती मिशनरी शाळेत शिकत होती. त्यातील नारायण या थोरल्या मुलाने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. नारायणाच्या पाठोपाठ श्रीपतीही धर्मांतर करण्याचा धोका होता. तसे घडू नये म्हणून बाळशास्त्रींनी पुढाकार घेण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे त्यांनी श्रीपतीच्या वडिलांस पुढे केले व सुप्रीम कोर्टाकडून श्रीपतीचा ताबा मिळविला.

खरे तर एवढ्यावरच हे प्रकरण थांबायला हवे होते. परंतु सनातनी ब्राह्मणांना ते मान्य नव्हते. त्यांनी धर्मांतर केले नव्हते, कोणतीही दीक्षा घेतलेली नव्हती तरीही समाज ते स्वीकारण्यास तयार नव्हता. यावर बाळशास्त्रींनी असे मत मांडले की, 'त्याला शास्त्रोक्त प्रायश्चित्त देऊन आणि शुध्द करुन स्वधर्मात घेता येईल.' त्याचप्रमाणे त्यांनी काही धर्मशास्त्रज्ञांची व शंकराचार्यांची या शुध्दीकरणाला अनुज्ञा मिळविली व श्रीपतीला शुध्द करुन हिंदू धर्मात परत घेण्यात आले.' [१६]

परंतु या प्रकरणाने समाजाने विशेषतः ब्राह्मणांनी बाळशास्त्री जांभेकरांना वाळीत टाकले. इतकेच नव्हे तर बाळशास्त्रींच्या अकाली मृत्यूनंतर शापाने बाळशास्त्री मेला', असे उद्‌गार सनातनी ब्राह्मणांनी काढले.'[१७] त्यावेळी धर्मांतर केले तर त्याला आपल्या धर्मात घेणे कठीण होते. बाळशास्त्रींनी ते कार्य करुन दाखविले पण त्यांना समाजाने वंचित ठेवले.

**शैक्षणिक क्षेत्रातील कार्य -**

बाळशास्त्रींचा शिक्षणक्षेत्राशी निकटचा संबंध होता. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे डेप्युटी सेक्रेटरी व नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून त्यांनी काम पाहिले होते. त्याचप्रमाणे मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून आणि मुंबई इलाख्याचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणूनही त्यांनी काम केले होते. महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर मुंबईत विद्येचा व शिक्षणाचा पाया घालण्याचे श्रेय ज्या काही मोजक्याच व्यक्तींना दिले जाते, त्यापैकी बाळशास्त्री जांभेकर हे एक होते. महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराच्या सुरुवातीच्या अवस्थेत निरनिराळ्या विषयांवरील अभ्यासासाठी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे अतिशय कठीण काम त्यांनी केले. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित इत्यादी विषयांवरील मराठी भाषेतील पहिली पाठ्यपुस्तके त्यांनी रचली.'[१८]

त्यांना अनेक विषयात गती होती. वाङ्मय व विज्ञान या दोन्ही शाखांमध्ये ते निष्णात होते. जांभेकर इतिहास संशोधक म्हणूनही प्रसिध्द होते. प्राचीन भारतीय शिलालेख व ताम्रपट यांचे संशोधन करुन त्यावर विद्वत्तापूर्ण लेख त्यांनी लिहिले होते. त्यासंबंधीचे त्यांचे शोधनिबंध रॉयल एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकात प्रसिध्द झाले होते. इत्यादी व्यासंग सुरु ठेवून मुंबई इलाख्यातील सरकारी शिक्षण खात्याचे कार्य नावारुपाला आणण्यास त्यांनी बहुमोल सहाय्य केले होते.

**मूल्यमापन -**

बाळशास्त्रींची अवघ्या चौतीस वर्षाच्या कालावधीतील विद्वत्ता ही अष्टपैलू होती. त्यांचे कर्तृत्व हे असाधारण असे होते. राष्ट्रजागृतीचे अग्रदूत, मराठी वृत्तपत्रांचे जनक, आद्यइतिहास संशोधक, आधुनिक महाराष्ट्राचा आद्य ऋषी, सुधारणावादाचे आद्यप्रवर्तक, व्यासंगी पंडित, महाराष्ट्राचे आद्यसमाज सुधारक अशा नावांनी त्यांचा यथार्थ गौरव केला जातो.

त्यांना हिंदू धर्माचा अभिमान होता. म्हणूनच त्यांनी परधर्मात गेलेल्यांसाठी स्वधर्मात येण्यासाठी शुध्दीकरणाचा आग्रह धरला. बाळशास्त्रींनी आपल्या उभ्या आयुष्यात समाजजागृतीच्या कार्याची सतत चिंता वाहिली.

महाराष्ट्रातील इंग्रजी आमदनीच्या सुरुवातीच्या कालखंडात येथील समाज अंधकारात चाचपडत होता. परकीय राजवटीने आरंभलेल्या व्यापक परिवर्तनाच्या संदर्भात आपण कोणती भूमिका घ्यावी हेच समाजाला समजेनासे झाले. अशा वेळी या समाजाला आत्मीयतेचा मार्ग दाखविण्याचे कार्य ज्या काही द्रष्ट्या समाजसुधारकांनी केले त्यात बाळशास्त्री जांभेकर अग्रभागी होते.'[१९] एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या बुध्दीला आधुनिक वळण लावण्याच्या कामी त्यांनी प्रमुख भूमिका बजावली होती. म्हणूनच महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारकांमध्ये त्यांचे स्थान श्रेष्ठ प्रतीचे समजले जाते.

**२. महात्मा जोतिबा फुले (१८२७ ते १८९०)-**

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीस ज्या थोर पुरुषांनी हातभार लावला त्यात महात्मा जोतिबा फुले यांचा मान अग्रक्रमाचा आहे. त्यांच्या कार्याची दखल घेतल्याखेरीज आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास लिहिला जाऊ शकत नाही. महाराष्ट्रातील बहुजन समाजाला, पददलित जनतेला आणि शूद्रातिशूद्रांना हजारो वर्षाच्या गाढ निद्रेतून जागे करुन त्यांना त्यांच्या न्याय हक्कांची जाणीव करुन देणारा आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत प्रस्थापितांविरुध्द अविरत झगडणारा महामानव हे महात्माच होत. समाजव्यवस्थेने ज्यांना माणुसकीचे हक्कही नाकारले, अशा पददलित समाज आणि ज्यांचे जीवन सर्व प्रकारच्या दास्याच्या शृंखलांनी पुरते जखडून टाकले होते, असा स्त्रीवर्गाच्या उध्दारासाठी महात्मा फुल्यांनी आपला देह अखेरपर्यंत चंदनासारखा झिजविला.

'परमेश्वर एक आहे, परमेश्वराची आपण सर्व लेकरे समान दर्जाची आहोत, आपणामध्ये जन्मजात उच्च नीचत्व नाही. परमेश्वराचे भक्त यांच्यामध्ये दलाल नको, सत्य हाच परमधर्म आहे. ज्ञानाशिवाय गती नाही आणि

भिक्षुकशाहीच्या धार्मिक गुलामगिरीतून हिंदू समाज मुक्त झाल्यावाचून हिंदुस्थान स्वतंत्र होणे शक्य नाही.'[२०] इत्यादी उदात्त तत्त्वांची शिकवण महात्मा जोतिरावांनी जनतेला दिली.

अस्पृश्यता निवारण, जातिभेद विध्वंसन, अनाथ-बालहत्या प्रतिबंध, स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, सत्यशोधक समाज, सक्तीचे शिक्षण, राजकीय स्वातंत्र्य या सर्वच सुधारणांचा पुरस्कार करताना त्यांनी फार मोठे हाल सहन केले. महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या या स्थितीचा विचार करता केवळ वरवरच्या सुधारणांनी त्याच्यात काही बदल घडून येणे अशक्यच होते. सुधारणांच्या मलमपट्ट्यांनी बरे होण्याइतके हे दुखणे साधेसुधे नव्हते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात समाजसुधारकांची एक मालिकाच तयार झाली असली तरी समाजातील कनिष्ठ वर्गाच्या परिस्थितीत काही फरक पडला नव्हता. येथील शूद्रातिशूद्र कित्येक शतकांपासून अव्याहत चालू राहिलेल्या शोषणाचे बळी ठरले होते. तेंव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याकरिता, त्या समस्येच्या अगदी मुळाशी जाऊन त्या मुळावरच घाव घालणे आवश्यक होते. त्या कामासाठी अर्थातच शूद्रातिशूद्रांच्या सुख-दुःखाशी समरस झालेल्या त्यांच्या समस्येच्या यथार्थ स्वरुपाची पुरेशी जाणीव असलेल्या आणि त्यांच्या उध्दाराच्या तळमळीतून प्रस्थापित व्यवस्थेशी कोणतीही किंमत देऊन टक्कर घेण्याची तयारी असलेल्या बंडखोर नेतृत्वाची गरज होती व म. फुलेंच्या रुपाने महाराष्ट्रातील बहुजन समाजाला अशा बंडखोर विचारांचा क्रांतिकारक नेता लाभला. म्हणूनच म. फुले यांच्या उदयानंतर महाराष्ट्राच्या समाजकारणाचा आणि सामाजिक सुधारणेच्या चळवळीत एक नवी दिशा प्राप्त झाली.'[२१] थोडक्यात, समाजामध्ये परिवर्तन करायचे असेल तर जातिभेद नष्ट केला पाहिजे. प्रस्थापित समाजव्यवस्थेत बदल केले पाहिजे, त्याकरिता बंड करुन उठले पाहिजे अशी धारणा जोतिराव फुलेंची होती.

**परिचय -**

महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म सन १८२७ मध्ये पुणे येथे झाला. ११ एप्रिल ही त्यांची जन्मतारीख मानली जाते.'[२२] जोतिबांच्या पूर्वजांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. जोतिबांचे पणजोबा त्या गावचे चौगुले होते. ते जातीने क्षेत्रिय माळी होते व त्यांचे मूळ आडनाव गोऱ्हे असे होते. पण गावच्या कुलकर्न्यांसी त्यांचे वाकडे आल्याने त्यांनी आपले गाव सोडले व पुढे पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील खानवडी या गावी येऊन राहिले.

शेटिबा गोऱ्हे हा स्वभावाने भोळसर व उधळा निघाल्याने तो निर्धन बनला. त्यामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्याला पुणे येथे स्थलांतर करावे लागले. व तेथे आल्यावर शेटिबा फुलांच्या व्यवसायात शिरला व त्या व्यवसायात त्याने चांगलाच जम बसविला. त्याचा लौकिक ऐकून पेशव्यांनी त्याला आपल्याकडे फुले पुरविण्याचे काम सोपविले. पुढे शेटिबाच्या सेवेवर खुश होऊन पेशव्यांनी त्याला पस्तीस एकर जमीन इनाम दिली. लोक आता त्यास त्याच्या व्यवसायावरुन फुले असे म्हणू लागले.'[२३] तेंव्हापासून त्याने आपले मूळचे गोऱ्हे हे आडनाव सोडून फुले हे नाव धारण केले.

शेटिबाच्या तीन मुलांपैकी गोविंद याचे लग्न चिमणाबाई यांच्या मते या दांपत्याला दोन पुत्र झाले, त्यापैकी एक राजाराम व दुसरा जोती. हाच जोती पुढे महात्मा जोतिबा फुले या नावाने विख्यात झाला. जोतिबाच्या तरुणपणातच त्यांची आई चिमणाबाई मरण पावली. त्यामुळे त्यांची संपूर्ण जबाबदारी वडिलांवर येऊन पडली.

जोतिबा वयाच्या सातव्या वर्षी 'मराठी' शाळेत जाऊ लागले. त्यांची अभ्यासातील प्रगती चांगली होती. अर्थात, त्या काळातील शिक्षण म्हणजे लिहिण्यावाचण्याचे जुजबी ज्ञान, हिशोबापुरते-अंकगणित त्यातही पाठांतरावर जास्त भर, अशा स्वरुपातील होते. संस्कृत, वेदान्त, ज्योतिष, धर्मशास्त्र यांसारखे विषय फक्त ब्राह्मणांच्या मुलांनाच शिकविले जात असत.'[२४] शिक्षण

व्यवस्थाही ब्राह्मण मुलांपुरतीच मर्यादित होती. इतरांना लिहिणे, वाचणे एवढेच ज्ञान दिले जात असे.

त्या काळात सभोवताली विद्याभ्यासाचे वातावरण नसल्याने व शिक्षणाचे महत्त्वही वाटत नसल्याने गोविंदरावांनी दोन-तीन वर्षातच शाळेतून काढून आपल्या शेतीच्या व्यवसायात घातले. परंतु थांबलेले शिक्षण १८४१ मध्ये पुन्हा सुरु झाले. त्यांनी 'स्कॉटिश मिशनच्या' इंग्रजी शाळेत उर्वरित शिक्षण घेऊन ते १८४७ मध्ये पूर्ण केले. दरम्यान, वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचे लग्न सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगावच्या खंडोजी नेवसे यांच्या मुलीशी झ ाले. त्यावेळी त्यांची पत्नी सावित्रीबाई यांचे वय अवघे नऊ वर्ष होते.'[२५]

शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही त्यांना नोकरी करण्याचा मोह झाला नाही व आपल्या कुटुंबाच्या परंपरागत व्यवसायातही त्यांचे मन रमले नाही. लोकांच्या सेवेला वाहून घ्यावे, सभोवतालच्या लोकांचे दैन्य व दुःख दूर करावे, असे विचार मनात घोळत असताना त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा प्रसंग घडला तो म्हणजे, त्यांना एका ब्राह्मण जातीच्या मित्राच्या लग्नाचे आमंत्रण मिळाले व ते त्यात आनंदाने सहभागी झाले. लग्नसमारंभाच्या प्रसंगी नवरा मुलगा वऱ्हाडी मंडळीसह नवरीच्या घरी मिरविला जात असताना त्या मिरवणुकीत जोतिबाही सामील झाले. परंतु एका माळ्याच्या मुलाने ब्राह्मणाच्या लग्नात त्यांच्या बरोबरीने सामील व्हावे, ही गोष्ट त्यांना रुचली नाही. त्यापैकी एकाने अपमानास्पद भाषेत जोतिबांची कानउघाडणी केली व त्यांना आपल्या पायरीने वागण्यास सांगितले.'[२६] हा प्रसंग त्यांच्या फारच जिव्हारी लागला व डोक्यात विचारांचे थैमान माजले. आपल्या समाजातील सर्वसामान्य लोकांच्या स्थितीची जाणीव त्यांना होऊ लागली. त्यातूनच सामाजिक विषमतेविषयी त्यांच्या मनात चिड उत्पंन्न झाली. अशा प्रकारच्या सामाजिक अन्यायाविरुध्द आपण संघर्ष केला पाहिजे, असे त्यांनी मनावर घेतले आणि त्या दृष्टीने वाटचाल करण्याचा त्यांनी निश्चय केला.

कार्याची दिशा निश्चित झाल्यावर जोतिबांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांनी सर्वप्रथम स्त्रीशिक्षणावर लक्ष केंद्रित केले. सन १८४८ मध्ये त्यानी पुण्यात मुलींसाठी शाळा सुरु केली. त्यावेळी त्या कामी त्यांना रा. जगन्नाथ सदाशिवजी या गृहस्थाने बरीच मदत केली.'[२७] सामाजिक अन्यायाला वाचा फोडायची असेल तर शिक्षण हे आवश्यक आहे हे त्यांना पटले होते. त्यासाठी त्यांनी पहिली मुलींची शाळा सुरु केली. ही शाळा स्थापन झाल्याने गावातील सर्व लोक खवळून उठले. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळू नये कारण त्या महाकपटी, स्वभावतः दुष्ट, अविचारी, लबाड व मूर्ख असतात. त्यांनी भलीबरी पतीची इच्छा पूर्ण करावी, हाच तिचा धर्म त्यांना शिक्षण दिल्याने अनर्थ ओढावेल अशी हजारो वर्षाच्या ब्राह्मण शिकवणुकीमुळे फुल्यांच्या शाळेने साऱ्या पुण्याचा धर्म बुडाला म्हणून एकच हाहाकार झाला.'[२८]

पुढे ३ जुलै १८५१ रोजी पुण्यात बुधवार पेठेत ही शाळा पुन्हा सुरु करण्यात आली. पुढे जाऊन १८५२ रोजी जोतिबांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा सुरु केली. हिंदू धर्मातील स्त्रियांची स्थिती पाहून त्यांच्या मनाला अतिशय क्लेश होत असत म्हणून त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देण्याच्या कामी पुढाकार घेतला. सन १८६३ मध्ये त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. स्त्री उध्दाराप्रमाणेच अस्पृश्यांच्या उध्दारासाठीही त्यांनी अविश्रांत प्रयत्न केले. उन्हाळयातील अस्पृश्यांचे पाण्यासाठीचे होणारे हाल पाहून त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करुन दिला.'[२९] तो हौद आजही पुण्यात 'फुल्यांचा हौद' म्हणून प्रसिध्द आहे. पाणी हे जीवन आहे, दलितांनाही पाणी मिळाले पाहिजे, अशा भावनेतून व दलितांचे पाण्यावाचून जे हाल होत होते ते जोतिबाला पाहवले नाही म्हणून त्यांनी स्वतःच्या घरात पाण्याचा हौद दलितांना वापरावयास दिला व त्यांची तहान भागविली.

ब्राह्मण वर्गाकडून शूद्रातिशूद्रांची किती व कशी पिळवणूक होते हे समाजाच्या निदर्शनास आणण्यासाठी जोतिबांनी 'ब्राह्मणांचे कसब' व 'गुलामगिरी' ही पुस्तके लिहिली. १८७३ मध्ये त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची

स्थापना केली. शेतकऱ्यांच्या अस्तेविषयी त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हे पुस्तक लिहून शेतकऱ्यांची दुःखे वेशीवर टांगली.

थोडक्यात, महात्मा फुलेंना समाजात ज्या-ज्या ठिकाणी अन्याय विषमता व शोषन यांचे दर्शन घडले त्या-त्या ठिकाणी ते त्या विरुध्द प्रतिकारासाठी उभे राहिले. अशा या महात्म्याचे सारे आयुष्य दुःखी दलित व पीडित घटकांच्या सेवेतच संपले. २८ नोव्हेंबर १८९० रोजी त्यांचे निधन झाले.

**स्त्री उध्दारासाठी कार्य -**

एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट होती. स्त्रीशिक्षणाविषयीचा समाजाचा दृष्टिकोन अतिशय अनुदार होता. स्त्रिया शिक्षण घेऊन शहाण्या झाल्या तर त्या बिघडतील, त्यांचे आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष होईल, असा सार्वत्रिक समज होता. त्यांना शिक्षण देणे हे धर्मबाह्य आहे, अशी त्या काळातील सनातन्यांची समजूत होती. त्यामुळे त्यांचा तर स्त्रीशिक्षणाला कडवा विरोध होता. एवढ्यावरच स्त्रियांवरील अन्याय थांबले नाहीत. तर भारतीय समाजव्यवस्थेने स्त्रीवर्गावर अनेक प्रकारचे सामाजिक निर्बंधही लादले होते. त्यांचे घराबाहेर जाणे शिष्टसंमत मानले जात नव्हते. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व घराच्या चार भिंतीतच खुरटून जात होते. बहुपत्नीविवाहाच्या प्रथेमुळे स्वतःच्या कुटुंबातदेखील त्यांना उचित स्थान मिळत नव्हते. समाजातील विधवा स्त्रियांची स्थिती तर अतिशय शोचनीय होती. त्या काळी बाल-विवाहाची प्रथा सर्रास समाजात रुढ होती. जरठकुमारी विवाहदेखील बरेच होत होते. परिणामी, समाजात विधवा स्त्रियांची संख्या मोठी होती व त्यांना त्यांच्याच कुटुंबात गौण स्थान देण्यात येई. त्यांच्यावर केशवपन करण्याची सक्ती करण्यात येई. अशा विद्रूप अवस्थेत व्रतवैकल्ये, उपासतापास करत परमार्थसाधनेतच त्यांनी आपले आयुष्य काढावे अशी समाजाची अपेक्षा असे.'[३०] समाजात अनेक वाईट चालीरीती होत्या, स्त्रियांना शिक्षण देणे, त्यांना साक्षर करणे धर्माच्या विरोधी होते. ब्राह्मणांचा याला विरोध होता. स्त्रियांना शिक्षण दिले तर धर्म बुडेल, स्त्रीने तिची कर्तव्ये करण्यास विसरु नये, तिने चार

भिंतीत राहावे, चूल आणि मूल हेच तिचे जीवन, अशी त्यावेळची परिस्थिती होती.

एकोणिसाव्या शतकात महात्मा फुलेंबरोबर रानडे व लोकहितवादी हे ही समाजसुधारक होऊन गेले, पण त्यांनी ऐनवेळी कच खाल्ल्याची उदाहरणे देखील पाहावयास मिळतात. १८७० साली रानड्यांनी जोतिरावांना सांगितले, माझी एक विधवा बहीण आहे म्हणून साहजिकच जोतिराव म्हणाले, बोलीप्रमाणे कृती करण्याची ही संधी तुम्हाला मिळाली आहे. त्या वेळी रानडे म्हणाले, ते खरे पण आपल्या वडिलांना त्यामुळे फार दुःख होईल. त्यावर जोतिराव चिडून म्हणाले, 'मग रावसाहेब आपण समाजसुधारक असल्याचे बोलू नका.'[३१] जोतिराव कृती करण्यास सांगत असत. नाहीतर समाजसुधारक असल्याचा आव आणू नका, असेही ते निकटतेने सांगत.

लोकहितवादींच्या हातूनही अशीच एक गोष्ट घडलेली पहावयास मिळते. ती अशी की, त्यांना ब्रिटिश सरकारने काही कामासाठी विलायतेला जाल काय म्हणून विचारले, असता त्यांनी उत्तर दिले की, इंग्लंडला गेल्यावर माझी जात माझ्यावर बहिष्कार टाकील! याही पेक्षा धक्का देणारी घटना म्हणजे त्यांनी आपल्या ६ व ८ वर्षांच्या नातवंडाची लग्ने बालवयातच लावलेली आहेत.'[३२]

याचा अर्थ एवढाच की त्या वेळच्या सत्शील पुरोगामी विचारांच्या ब्राह्मणांलाही समाजाच्या विरुध्द जाण्याचे धाडस होत नव्हते.

त्याला अपवाद निघालेले त्या काळी फक्त विष्णु शास्त्री पंडितांसारखे थोर समाजसुधारकच होय. त्यांनी जातीला आलेला कमीपणा तरी धुऊन काढला. त्यांनी आपली पत्नी वारल्यानंतर डिसेंबर १८७४ साली स्वःता ब्राह्मण विधवेशी विरोधाला न जुमानता विवाह केला.'[३३] विष्णुशास्त्रींनी आपल्या कृत्याद्वारे समाजाला दाखवून दिले की, ते सुध्दा विधवाविवाह करु शकतात.

महात्मा फुले यांच्या काळात समाजाने स्त्रीला सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. समाजाची मानवतेच्या दृष्टिकोनातून तिच्याकडे पाहण्याची मानसिकता नव्हती. स्त्रियांची दैन्यावस्था दूर करण्यासाठी महात्मा फुल्यांनी खूप

प्रयत्न केले. स्त्रियांचा कैवार घेताना जोतिबांनी जातीपातीचा विचार केला नाही. केवळ मानवतावादी भूमिकेतून दुर्दैवी स्त्रियांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न त्यांनी केला. फुल्यांच्या या कार्याचा लाभ ब्राह्मण जातीच्या स्त्रियांनाही मिळाला. यावरुन जोतिबा फुले कोणत्याही विशिष्ट जातीविरुध्द नव्हते हे स्पष्ट होते. स्त्रियांच्या हालअपेष्टा जोतिबांना पाहवत नव्हत्या, त्यांना पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचे महान कार्य त्यांनी केले. तिला तिचे सर्व हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्त्रीकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहावे, असेही त्यांनी सुचविले.

**विधवा - पुनर्विवाह -**

भारतातील विधवा स्त्रियांची स्थिती अतिशय केविलवाणी व दुःखदायक होती. पतीच्या निधनानंतर त्यांना डोक्यावरील केस काढावे लागत. त्यामुळे त्यांचा चेहरा अतिशय विद्रूप दिसत असे. विधवांचे जीवन क्लेशदायक व अनेक धार्मिक बंधनांनी जखडलेले होते. पतीनिधनानंतर त्यांनी पापकृत्यास प्रवृत्त होऊ नये म्हणून त्यांना वेशभूषा, केशभूषा करणे वर्ज्य केले होते. विधवा स्त्रियांनी बदकर्म केल्यास त्यांना कडक शिक्षा केली जाई. त्यासाठी त्यांच्याकडून अतिशय साधे परंतु पावित्र्याचे जीवन जगण्याची अपेक्षा करण्यात येई. मात्र, त्यांना धार्मिक विधी, सार्वजनिक उत्सव, विवाह, इत्यादींपासून दूर ठेवण्यात येई. अशा कंटाळवाण्या व निर्बंधनात्मक जीवनापेक्षा स्त्रिया पतीच्या निधनानंतर सती जाणे पसंत करीत.'[३४] थोडक्यात, जिवंतपणीच मरण यातना त्यांना भोगाव्या लागत. त्यांना चार भिंतीत राहावे लागे. देवधर्मातच त्यांना जगावे लागत असे.

खरे तर विधवा स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या यमयातना ही उच्च जातीच्या स्त्रियांची समस्या होती. केशवपनासारखी हिडीस प्रथा प्रामुख्याने ब्राह्मणातच आढळून येत होती. अर्थात, सर्वच जातींत विधवा स्त्रियांच्या वाट्याला कमी-अधिक प्रमाणात उपेक्षा येतच होती. परंतु उच्च जातींनी त्यांच्यावर घातलेली बंधने अधिक कडक होती. महात्मा फुल्यांनी मात्र एक

दु:खी कष्टी जीव याच भावनेतून विधवांच्या समस्येकडे पाहिले. जातीपातींचा विचारही त्यांच्या मनात आला नाही. विधवा स्त्रियांनाही चांगले जीवन जगण्याची संधी मिळावी म्हणून जोतिबांनी विधवा-पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रिय पाठिंबा दिला व त्यात पुढाकारही घेतला. आपल्या लेखणाच्या व भाषणांच्या द्वारे त्यांनी पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. सन १८६४ मध्ये त्यांनी पुण्यात गोखल्यांच्या बागेत एक पुनर्विवाहही घडवून आणला.'[३५] खरेतर फुल्यांसारख्यांनी समाजपरिवर्तनाचे एक धाडसी पाऊल त्या काळी टाकले. समाजातील सर्व थरातील जातीपातीचा विचार न करता त्यांनी हे कार्य पार पाडले.

**बालहत्या प्रतिबंध -**

महात्मा फुल्यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला असला तरी तत्कालीन समाजाचा अशा विवाहांना असणारा विरोध पाहता विधवा-विवाह मोठ्या प्रमाणावर होणे अशक्यच होते. एखाद्या स्त्रीचा विवाह झाला तरी समाजात मोठी खळबळ माजत होती व समाजात अशा विधवांची संख्या बरीच होती. त्यातूनही चुकून एखाद्या स्त्रीचे वाकडे पाऊल पडले तर तिच्यावर अनवस्था प्रसंग ओढवत असे. तिच्या अब्रूचे धिंडवडे निघत असे. त्यामुळे तिला भ्रूणहत्येशिवाय मार्गच उरत नसे.

अशा दुर्दैवी स्त्रियांची या अवस्थेतून सुटका व्हावी व तिची विटंबना टळावी म्हणून जोतिबांनी विधवा स्त्रियांना गुप्तपणे घेऊन बाळंत होण्यासाठी व आपली मुले ठेवण्यासाठी एक 'बालहत्या प्रतिबंधक गृह' १८६३ मध्ये स्वत:च्या घरी स्थापन केले.[३६] या प्रतिबंध गृहाची माहिती देण्यासाठी काढलेल्या पत्रकात त्यांनी विधवांना गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत होण्याचे आवाहन केले होते. या गृहात अनाथ मुलांची काळजी घेण्याचे काम त्यांच्या पत्नी सावित्रीबाई स्वत: करीत होत्या. या बालहत्या प्रतिबंधक गृहात 'काशीबाई' नावाची ब्राह्मण विधवा बाळंतपणासाठी आली होती व तिच्याच मुलाला पुढे जोतिरावांनी दत्तक म्हणून घेतले'[३७] त्यांना मुलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांकडून त्यांना दुसरा

विवाह करण्याचे सातत्याने सांगितले जाई. परंतु तत्त्वनिष्ठ जोतिबांनी त्यांना मुळीच दाद दिली नाही. उलट त्यांनी ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन आपली तत्त्वनिष्ठा प्रत्ययास आणून दिली व यातही त्यांनी जातीपातीचा विचार केला नाही हे महत्त्वाचे आहे. थोडक्यात, विधवा स्त्रीचे पाऊल वाकडे पडले तर तिच्यातून सुटका होण्यासाठी, तसेच बाळंतपण सुखरुप होण्यासाठी त्यांनी आपल्या घरी अशा स्त्रियांना ते साहाय्य करत असत. त्यांची पत्नी आणि ते स्वतः काळजी घेत. काशीबाई या स्त्रीच्या पोटी जन्म घेणाऱ्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले. त्या काळात एवढे मोठे कार्य त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

**अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य -**

महात्मा फुल्यांनी समाजातील दुर्बल, उपेक्षित, शोषित घटकांची सातत्याने बाजू लावून धरली व हेच आपले जीवितकार्य मानले. म्हणूनच त्यांनी समाजव्यवस्थेतील सर्वात उपेक्षित घटक असलेल्या अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे अपेक्षित लक्ष केंद्रित केले. भारतीय समाजात हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना माणुसकीचे हक्कही नाकारले होते. धर्मशास्त्राप्रमाणे शूद्रांना विद्येचा अधिकार नाही, असे त्यांचे मत होते. त्यामुळे शेकडो वर्षे हा समाज अंधारात खितपत पडला होता. दारिद्र्य हे त्यांच्या 'पाचवीलाच' पुजले होते. सर्व हिंदूंना अस्पृश्यांच्या स्पर्शानेही विटाळ होत होता. त्यात मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथांनी शूद्र जाती इतर तीन वर्णाच्या सेवेसाठीच निर्माण झाल्या आहेत, असे प्रतिपादन करुन अस्पृश्यांना गुलामगिरीच्या खाईत ढकलण्याचे काम केले होते.'[३८] समाजातील उपेक्षित घटकांना समाजात मानाचे स्थान प्राप्त करुन देण्याचे कार्य त्यांनी केले. मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथात सवर्ण समाज भरकटला होता. त्यांची सामाजिक स्थिती बदलण्याचे काम जोतिबा फुल्यांनी केले.

समाजातील सर्वात हिन व घाणेरडी कामे अस्पृश्यांच्या वाट्याला आलेली होती, ती कामे करीत उपेक्षितांचे आयुष्य जगणे एवढाच त्यांच्या जीवनाला अर्थ होता. त्यांचा उध्दार करावयाचा असेल, तर वर्षानुवर्षे त्यांना

नाकारण्यात आलेले हक्क मिळवून दिले पाहिजेत. त्यासाठी प्रथम त्यांना शिक्षण देऊन त्यांचे अज्ञान दूर केले पाहिजे, असे फुल्यांचे मत होते. आणि म्हणूनच त्यांनी त्यांच्या शिक्षणाचे कार्य हाती घेतले व बुधवार पेठेत सुरु केलेल्या मुलींच्याच शाळेत या अस्पृश्य मुलांनाही शिकवू लागले. पुढे १८५२ मध्ये त्यांनी वेताळ पेठेत अस्पृश्यांच्या मुलांसाठी दोन शाळा सुरु केल्या. १० सप्टेंबर १८५३ रोजी जोतिबांनी आपल्या काही मित्रांच्या सहकार्याने महार, मांग, इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता 'मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली. १८५८ मध्ये या संस्थेच्या वतीने पुण्यात तीन शाळा चालविल्या जाऊ लागल्या. जोतिबांच्या या संस्थेला रिव्हज, मॅनस्किल्ड, हॅरिसन यांसारख्या इंग्रज सरकारी अधिकाऱ्यांनी व्यक्तीशः मदत केली. दक्षिणा प्राईज फंडातूनही त्यांच्या संस्थेला मदत झाली.'[३९] थोडक्यात, अस्पृशांना शिक्षण देणे हे त्यांनी आद्य कर्तव्य समजले. त्यासाठी त्यांना मुलींच्या शिक्षणाबरोबर मुलांच्या शिक्षण व्यवस्था केली. त्यांनी या कामी ब्रिटिश अधिकाऱ्यांची मदत घेतली.

अस्पृश्यांसाठी शाळा सुरु करण्याबरोबरच जोतिबांनी अस्पृश्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी, आणि त्यांच्यात जागृती घडवून आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. दुष्काळात पाण्याचे होणारे अस्पृश्यांचे हाल पाहून त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करुन दिला. तसेच त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेमधील निरनिराळ्या दोषांवर नेमके बोट ठेवून सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला.

**सत्यशोधक समाज -**

महात्मा फुलेंनी आपल्या उद्देशप्राप्तीसाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. ब्राह्मणी वर्चस्वाविरुध्द संघर्ष करण्यासाठी बहुजन समाजाला अशा संघटनेची गरज आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाची तत्त्वे अगदी साधी व सोपी होती. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे असल्यामुळे मानवात कुणीही उच्च किंवा नीच नाही. परमेश्वराची उपासना किंवा प्रार्थना करण्याचा हक्क

सर्वांनाच आहे. त्यासाठी मध्यस्थाची गरज नाही. सर्व धर्मग्रंथ मानवानेच निर्माण केले आहेत. म्हणून धर्मग्रंथात लिहून ठेवलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या नाहीत. तेंव्हा त्यांच्यावर विश्वास ठेवण्याची गरज नाही, असे सत्यशोधक समाजाचे सांगणे होते.'[४०]

या समाजाचा मूर्तिपूजेवर विश्वास नव्हता, ईश्वर हा निर्गुण, निराकार आहे. तेंव्हा मूर्तिपूजा आणि त्याच्या जोडीने येणारे कर्मकांड या गोष्टी बहुजन समाजाचे शोषण करण्यासाठी पुरोहित वर्गाने शोधून काढलेल्या क्लृप्त्या आहे. बहुजन समाजाने त्यास बळी पडू नये, अशीही शिकवण सत्यशोधक समाजाची होती.

सत्यशोधक समाजाने येथील बहुजन समाजात जागृती निर्माण केली. त्याला त्याच्या हक्कांची जाणीव करुन दिली. सत्यशोधक समाजासारखी क्रांतिकारक विचारांची संघटना महाराष्ट्रात उभी राहिल्यामुळेच बहुजन समाजाला वरिष्ठ वर्गाच्या वर्चस्वाविरुध्द संघटित लढा देणे शक्य झाले. अशा प्रकारच्या संघटित लढ्यातूनच येथे सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली. विशेष म्हणजे या सत्यशोधक समाजाचे सभादत्व सर्व जातीतील लोकांना खुले असल्याने ब्राह्मण, महार, मांग, ज्यू, मुसलमान, मराठा, माळी असे सर्व जाती धर्माचे लोक या समाजाचे सभासद बनले. जोतिरावांनी दोन वर्षात सत्यशोधक समाजाची स्थापना करुन मोठ्या कष्टाने त्याची घडी मजबूत बसविली व तिला संघटित स्वरुप प्राप्त करुन दिले व पुढे या समाजाच्या अनेक शाखा स्थापन झाल्या व हे कार्य जागोजागी फुल्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु राहिले आजही या समाजाची मूळ शाखा पुण्यात सुरु आहे.'[४१] सवर्णाविरुध्द त्यांच्या अन्यायाविरुध्द सत्यशोधक समाजाची स्थापना फुले यांनी केली. यामध्ये सर्व जातीच्या, धर्माच्या व्यक्तींना सभासद होता येत असे. त्यामुळे सवर्णाविरुध्द संघटित लढा देणे सुकर होईल व सामाजिक परिवर्तनाला एक नवी दिशा मिळेल अशी त्यांची भावना होती. या सत्यशोधक समाजाचे कार्य आजही सुरु आहे.

**राजकीय विचार -**

महात्मा फुले मानवी मूल्यांची कदर करणारे तत्त्वचिंतक होते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या गुलामगिरीचा त्यांना मनस्वी तिटकारा होता. त्यामुळे ब्रिटिशांनी या देशाला राजकीय गुलामगिरीच्या खाईत लोटले ही गोष्ट ही त्यांना अजिबात रुचली नाही. अशा परिस्थितीत या सत्तेला शास्त्राच्या बळावर उलथून टाकण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले.

मात्र, पुढील काळात जोतिबांनी जेंव्हा सामाजिक परिस्थितीचा विचार केला, तेंव्हा येथील सामाजिक विषमतेमुळे शूद्रातिशूद्र स्त्रिया यांना भोगावे लागणारे दुःख याची जाणीव झाली व ही परिस्थिती त्यांना इंग्रजी सत्तेपेक्षा जाचक वाटली. इंग्रजांनी लादलेल्या राजकीय गुलामगिरीपेक्षाही येथील वरिष्ठ वर्गाने (उच्चवर्णीयांनी) लादलेल्या बहुजन समाजावरील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक गुलामगिरीचे स्वरुप फारच भयंकर होते.'[४२] भारतात स्थापन झालेल्या इंग्रजी सत्तेमुळे येथील कनिष्ठ वर्गांना शिक्षण घेण्याची संधी प्रथमच मिळाली व त्यामुळे अधिकारही मिळाले. इंग्रजांच्या सत्तेने केलेल्या भौतिक, सामाजिक व राजकीय सुधारणांमुळे त्यांच्या उन्नतीचा मार्ग मोकळा झाला, असे जोतिबांना वाटू लागले. शेतकऱ्यांच्या राजवटीच्या तुलनेत इंग्रजांची राजवट येथील बहुजन समाजाच्या दृष्टीने अधिक हितावह आहे, असे मत झाल्याने इंग्रजी सत्तेविषयी जोतिबांच्या मनात सहानुभूती निर्माण झाली.

महात्मा फुल्यांनी इंग्रजी सत्तेला अनुकूलता दर्शविली असली तरी ज्या ज्या वेळी बहुजन समाजाच्या हितसंबंधाचा प्रश्न उपस्थित झाला, त्या त्या वेळी त्यांनी राज्यकर्त्यांना कठोर शब्दांत त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्यास मागेपुढे पाहिले नाही. इंग्रज राज्यकर्ते बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे पुरेसे लक्ष देत नसल्याबद्दल त्यांनी राज्यकर्त्यांवर अनेकदा टीका केली होती.

सन १८८५ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय सभेत म्हणजेच काँग्रेस संघटनेत सुरुवातीच्या काळात समाजातील वरिष्ठ वर्गांच्या लोकांचाच भरणा होता व तिने वरिष्ठ वर्गाच्या हिताचा विचार करुन सरकारपुढे आपल्या

मागण्या मांडल्या होत्या, त्यावेळी म. फुल्यांनी त्यांच्या वृत्तीवरही टीका केली होती. १८८९ मध्ये राष्ट्रीय सभेच्या वार्षिक अधिवेशनात मुंबईत भरलेल्या सभेत जोतिबांनी सभेच्या नेत्यांना असे ठणकावून सांगितले की, जोपर्यंत या देशात बहुसंख्येने असलेला शेतकरीवर्ग राष्ट्रीय सभेच्या बाहेर आहे, तोपर्यंत राष्ट्रीय सभेला स्वतःचा राष्ट्रीय म्हणवून घेण्याचा अधिकार पोहचत नाही.'[४३] त्यांच्या या विचारातून स्पष्ट होते की, देशाच्या राजकीय व्यवस्थेत शेतकऱ्यांना, कामकऱ्यांना व सर्वसामान्य जनतेला प्रतिष्ठेचे, मानाचे स्थान मिळाले पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भर -**

शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे समाजाला व सरकारला विदारक दर्शन घडवून देण्याचे व त्याला वाचा फोडण्याचे कार्य प्रथम महात्मा फुलेंनी केले. त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न जितक्या पोटतिडीकीने मांडले, तसे पूर्वी कुणीही मांडले नव्हते. त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नाची व त्यांना येणाऱ्या अडचणींची जाणीव होती. त्यामुळे शेतकऱ्यांची दुःखे प्रभाविपणे मांडणे त्यांना शक्य झाले.

सन १८८३ मध्ये त्यांनी आपला सुप्रसिध्द ग्रंथ 'शेतकऱ्यांचा आसुड' हा लिहिला. यात त्यांनी एकोणिसाव्या शतकात येथील शेतकरीवर्गाची स्थिती कशी होती, याचे अतिशय मार्मिक विवेचन केले. भारतीय शेतकऱ्यांचे दुःख व दारिद्र्य यांचे मूळ त्यांच्या अज्ञानात आहे, हे स्पष्ट करुन अशा शेतकरीवर्गाला ब्राह्मण धर्माच्या नावाखाली कसे लुबाडले जाते व त्याबाबत सरकार किती बेफिकीर आहे, हे जोतिबांनी दाखवून दिले.'[४४] शेतकरी रात्रंदिवस आपल्या शेतात राबत असतो तरीही त्याला व त्याच्या कुटुंबाला अर्धपोटी राहून दारिद्र्यात खितपत पडावे लागते. त्यामुळे तो मुलांना शिक्षण देऊ शकत नाही. पर्यायाने तो आणखीनच दरिद्री बनत राहतो व त्याचा फायदा हे उच्चवर्णीय घेत राहतात. याचे वस्तुनिष्ठ चित्रण त्यांनी आपल्या ग्रंथात केले आहे.

**मूल्यमापन -**

महात्मा फुले महाराष्ट्रात होऊन गेलेले एकमेव समाजशील व अग्रणी सुधारक होते. त्यांच्या कार्याची व्याप्ती इतकी प्रचंड होती की, त्यांची बरोबरी करणारा सुधारक महाराष्ट्रात दुसरा कोणीही नव्हता. महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारा पहिला समाजसुधारक, अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा उघडून त्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करणारा पहिला दलितोध्दारक, हिंदी शेतकऱ्यांची दु:खे वेशीवर टांगणारा शेतकऱ्यांचा पहिला कैवारी, शूद्रातिशूद्र बहुजन समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारा बहुजन समाजातील पहिला नेता, अशा अनेक शब्दांलंकारांनी जोतिबा फुल्यांचा गौरव केला जातो. महात्मा फुले बोलघेवडे समाजसुधारक नव्हते. आपली उक्ती व कृती यांत त्यांनी काही विसंगती निर्माण होऊ दिली नाही. समाजसुधारणेचे व्रत खरोखर अतिशय खडतर असते, समाजसुधारक हा आपल्या काळच्या दोन पावले पुढे असतो. त्यामुळे त्याचे विचार समाजाला लवकर पटत नाहीत. अशा वेळी लोकांचा किंवा समाजाचा विरोध सहन करुनही आपले विचार त्यांच्या गळी उतरविण्यासाठी त्याला विशेष प्रयत्न करावे लागतात. समाजातून विरोधी प्रतिक्रिया उमटत असताना आपले विचार कृतीत आणताना महात्मा फुल्यांना कठीण गेले, परंतु त्यांनी जे विचार समाजापुढे मांडले ते त्यांनी स्वतः प्रथम कृतीत आणले.[४५]

महात्मा फुल्यांचे फक्त सुधारक म्हणून मूल्यमापन होऊ शकत नाही. ते केवळ सुधारक नव्हते, तर मूलग्राही समाजक्रांतिकारक होते. समाजव्यवस्थेत त्यांना मूलग्राही बदल हवा होता. त्यांना समाजातील जातिभेद पूर्णपणे मोडून काढायचा होता. म्हणूनच त्यांनी ब्राह्मणी वर्चस्वावर हल्ला चढविला होता. ते ब्राह्मणद्वेष्टे मुळीच नव्हते, परंतु ब्राह्मणांनी समाजातील आपल्या उच्च स्थानाचा वापर करुन बहुजन समाजावर जी सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरी लादली होती त्यास त्यांचा विरोध होता.[४६]

त्यांनी बहुजन समाजाला कार्यप्रवाहात आणून त्यांच्यात वैचारिक जागृती केली. त्यांना वरिष्ठांच्या गुलागिरीतून मुक्त करण्यासाठी म. फुल्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली व त्याद्वारे बहुजन समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न केला. समाजातील वरिष्ठ वर्ग हा स्वतःहून आपल्या हातची सत्ता व अधिकार यांचा त्याग करणार नाही. म्हणून बहुजन समाजाला ती संघर्ष करुनच मिळवावी लागेल ही गोष्ट त्यांनी या समाजाच्या मनावर बिंबविली व त्यांच्या या प्रयत्नातूनच पुढे महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ उभी राहिली. तिने समाजव्यवस्थेला हादरा दिला.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक परिस्थितीमुळे महात्मा फुले यांना सामाजिक परिवर्तनासाठी संघर्षाचा पवित्रा घ्यावा लागला असला तरी त्यांच्या कार्यामागील खरी प्रेरणा मानवतावादी होती.[४७] समाजसुधारणेच्या कार्याकडे त्यांनी कधीही संकुचित दृष्टिकोनातून पाहिले नाही. सामाजिक शोषण व अन्याय यांचे बळी ठरलेल्या सर्वच समाजघटकांसाठी त्यांनी आपले आयुष्य झिजविले.

महात्मा फुले यांच्या जीवन कार्याचे वर्णन करताना धनंजय कीर म्हणतात, 'जोतिरावांचे नाव जोती आणि जोती म्हणजे ज्योत, त्या जोतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद यांवर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला, त्यांचे उपनाव होते फुले, फुले म्हणजे फुलांचा धंदा करणारे फुलमाळी त्या माळ्याने राष्ट्ररुपी बागेतील सामाजिक समतेच्या वाढीला विरोध करणारी तणे नि बांडगुळे उपटून फुलझाडांची उत्तम जोपासना केली, त्यांची सुवासिक सुमने मानवाला उपयुक्त ठरावी हाच त्यांचा उद्देश होता. त्या बागेतील फुलझाडे वाढतच आहेत त्यांना अद्याप फुलांचा बहार आलेला नाही. जी काही फुले फुलली आहेत, त्यांपासून मानवतावादाचा सुगंध दरवळत आहे. त्याप्रमाणे जातिवंत गायनात स्वाभाविक माधुरी संचारत असते, त्याचप्रमाणे त्या बागेतही स्वाभाविकच सुगंध दरवळत असतो.[४८]

### ३) जगन्नाथ शंकरशेठ (१८०३-१८८५) :

'जगन्नाथ शंकरशेठ' यांना इतिहासात आदराचे स्थान आहे. सुरवातीच्या काळात मुंबई शहराच्या व महाराष्ट्राच्या समाजजीवनाला योग्य दिशा प्राप्त करून देण्यासाठी ज्यांनी आपले संपूर्ण जीवन खर्च केले होते. अशा समाजसुधारकांच्या यादीत त्यांचे नाव खूप आदराचे आहे. म्हणूनच आचार्य अत्रे त्यांना `मुंबईचा अनभिषिक्त सम्राट` असे संबोधत होते.'[४९]

**परिचय :**

जगन्नाथ शंकरशेठ यांचा जन्म १० फेब्रुवारी १८०३ मध्ये झाला. त्यांना `नाना शंकरशेठ` या नावानेही ओळखले जाते. त्यांचे घराणे दैवज्ञ ब्राह्मण (सोनार) होते. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनांव मुरकुटे हे होते.'[५०] वडील शंकरशेठ यांनी मुंबईत जवाहिऱ्यांच्या व्यवसायात मोठी संपत्ती मिळविली होती. लहान असतानाच त्यांची आई मरण पावली. आईविना त्यांना आपले लहानपण पित्याच्या छायेत काढावे लागले. अशा परिस्थितीतच त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या वयाच्या १८ व्या वर्षी त्यांच्या पित्याचे निधन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर लहान वयातच त्यांच्यावर उद्योगधंद्याची प्रचंड जबाबदारी पडली. नानांना प्रारंभीपासूनच शिक्षणाची आवड असल्याने त्यांनी मराठी, इंग्रजी, व संस्कृत भाषेत प्रावीण्य मिळविले. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप राज्यकर्त्यांवर पडत होती.'[५१] लहान वयातच मातृ-पितृ छत्र हरविल्यामुळे त्यांना उद्योगाकडे लक्ष द्यावे लागले. धंदा करता करता त्यांनी भाषांवर प्रभुत्व मिळविले.

नानांनी आपला व्यवसाय अत्यंत चिकाटीने व कसोटीने केला. अमाप संपत्ती असूनही तिचा विनियोग विलासी जीवनासाठी न करता जनतेच्या कल्याणासाठी करण्याचे त्यांनी ठरविले होते. अनेकांना सामाजिक कार्यातून प्रोत्साहन देऊन पुढे आणण्याचे काम नानांनी केले. नाना शंकरशेठ हे त्यांच्या दातृत्वाबद्दलही प्रसिध्द होते. अनेक सार्वजनिक संस्थांना त्यांनी सढळ हाताने मदत केली होती. गोरगरिबांना वेळोवेळी मदतीचा हात देऊन त्यांचे दुःख

निवारण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. नाना मुंबई प्रदेशाच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे १८४० पासून १८५६ पर्यंत १६ वर्षे सदस्य होते.'[५२] मुंबई विद्यापीठाचे फेलो म्हणून सरकारने त्यांची नियुक्ती केली होती. मुंबईच्या `म्युनिसिपल कमिशन` वरही त्यांची नियुक्ती केली होती. मुंबई प्रदेशाच्या सरकाने `जस्टिस ऑफ पीस` पदवी देऊन त्यांचा गौरव केला होता.'[५३]

नानांचे सरकार दरबारी वजन असल्याने त्याचा उपयोग सर्वसामान्यांची गाऱ्हाणी व अडचणी सोडवण्यासाठी त्यांना झाला होता. तळागाळातील जनतेला प्रश्नांसंदर्भात मदतीचा हात दिला होता. म्हणूनच त्यांना सर्वसामान्यात आदराचे स्थान प्राप्त झाले होते. नानांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दल मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये १८६५ मध्ये मुंबईच्या नागरिकांनी एक सभा आयोजित केली होती. त्यावेळी अनेक वक्त्यांनी मुक्तकंठाने त्यांची प्रशंसा केली. त्यानंतर ३१ जुलै १८६५ रोजी म्हणजे वयाच्या ६३ व्या वर्षी नानांचे निधन झाले.'[५४] थोडक्यात, आपल्या पदाचा वापर सर्वसामान्यांसाठी त्यांनी केला, त्यामुळे जनमाणसात त्यांना मानत असत. त्यांनी उपेक्षित लोकांसाठी साहाय्य केल्याचे आपणास दिसून येते.

**सामाजिक कार्य :**

एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणेस अट्टाहासाने कामे करणाऱ्यांपैकी नाना हे एक होते. त्यांनी अनेक सामाजिक संस्थांच्या उभारणीस हातभार लावला. 'बॉम्बे असोसिएशन', 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी', एलफिन्स्टन कॉलेज, ग्रँड मेडिकल कॉलेज, स्टुडंटस लिटररी ॲण्ड सांयटिफिक सोसायटी, इत्यादी संस्थांची स्थापना त्यांच्याच प्रेरणेने झाली.'[५५] सार्वजनिक जीवनात समाज सुधारणा करण्यासाठी अनेक संस्था उभारण्यात त्यांचा मोठा वाटा होता.

सामाजिक सुधारणेबाबत नानांचे विचार पुरोगामी होते. मराठी माध्यम, स्त्रीशिक्षण, सतीबंदी इ. सुधारणांना त्यांनी चालना दिली होती. स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य करणाऱ्या समाजसुधारकांना त्यांनी प्रोत्साहन दिले होते. नानांना

स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल जास्त कळकळ होती. त्यामुळे त्यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून लक्ष पुरविले होते. समाजसुधारणेसाठी फक्त कायदे पुरेसे ठरत नाहीत. सरकारने समाजहिताचे कायदे संमत केले तरी त्या कायद्यांची परिणामकारक रीतीने अंमलबजावणी होण्यासाठी लोकमत संबंधित कायद्यांना अनुकूल असावे लागते आणि ती जबाबदारी सामाजिक कार्यकर्त्यांची आहे, असे नानानां वाटत होते.'[५६] स्त्रियांना सक्षम करण्यासाठी त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिला. स्त्री शिकली तर तिला तिच्या हक्कांची जाणीव होईल. तसेच सरकारी कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता लोक जागृती करणे गरजेचे आहे. या जनमत रेट्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांद्वारे कार्य करणे उचित होईल, असे त्यांना वाटत असे. १८२९ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिंक यानी `सतीची चाल` बंद करणारा कायदा केला. या कायद्यामुळे समाजात असंतोष निर्माण झाला होता. त्यावेळी नाना शंकरशेठ यांनी महाराष्ट्रात या कायद्याच्या बाजूने लोकमत तयार केले होते व ही प्रथा अमानुष आहे व ती बंद करण्यासाठी कायदा कसा आवश्यक आहे, हे त्यांनी जनतेला पटवून दिले होते.

एकोणिसाव्या शतकात परंपरा व चालीरिती यांचा समाजावर पगडा होता व धर्माचे स्थान प्रबळ होते. अशा प्रथांना कोणी विरोध केला तर धर्म बुडेल अशी भीती वाटत होती. धर्मात अशा प्रथा बसत नाहीत, यावर समाजाचा विश्वास होता. धर्माच्या नावाखाली वाईट चालीरीती शास्त्री मंडळी पसरवित होते. शिक्षणाचा प्रसार नसल्याने चांगले काय व वाईट काय? याची कोणालाच जाणीव नव्हती. मुंबईच्या सांस्कृतिक व बौध्दिक जीवनात परिवर्तन करण्यासाठी स्थापन झालेल्या सर्व संस्थांत नानांनी सहभाग घेतला होता. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेत असणाऱ्या ग्रंथालयाला मोठी देणगी दिली होती. तसेच विज्ञानावरील मौल्यवान ग्रंथ दान दिले होते. तसेच ॲग्री हॉर्टिकल्चरल सोसायटी आणि जिओग्राफिकल सोसायटीच्या स्थापनेतही नानांनी मोठी मदत केली होती. नानाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे बोरीबंदर

ते पुणे अशी रेल्वे सुरू करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नातून रेल्वे सुरू झाली व मुंबई इतर महाराष्ट्राला जोडली गेली.[५७] नानांची दळणवळणांची दूरदृष्टी यावरून दिसून येते.

नानांनी सरकार व जनता यांचा विश्वास संपादन केला होता. जातिभेद भेदभाव उच्चनीचता यास त्यांच्या विचारात स्थान नव्हते. जनतेबरोबर नानांचे अत्यंत सलोख्याचे संबंध होते. इ.स. १८३७ मध्ये भिवंडीत जातीय दंगल होऊन विठ्ठलाची मूर्ती फोडण्यात आली होती. त्यावेळी हिंदूनी मुस्लिमांच्या विरूध्द कोर्टात फिर्याद नोंदविली. मात्र, निकाल हिंदूंच्या विरूध्द लागला. लोकांनी आपले गाऱ्हाने नानाकडे मांडले त्यावेळी नानांनी गर्व्हनरची भेटी घेऊन खटल्याची फेरतपासणी करून या गुन्ह्यातील दंगेखोरांना कडक शिक्षा देऊन हिंदूना न्याय मिळवून दिला होता.[५८] थोडक्यात, हिंदू-मुस्लिम प्रश्नाबाबत ते जागृत होते. जातीय दंगलीत कोण बरोबर, कोण चूक याची जाणीव त्यांना होती. म्हणून त्यांनी गव्हर्नरकरवी फेरतपासणी करुन दंगलीखोरांना कडक शिक्षा देऊन हिंदूंना न्याय मिळवून दिला. त्यानंतर इ. स. १८३८ मध्ये सरकारने सोलापूरची स्मशानभूमी भिवंडीला हालविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जनतेला अनेक गैरसोयीला सामोरे जावे लागणार होते. यावरून गव्हर्नर जनता प्रक्षुब्ध झाली. जनतेच्या भावना लक्षात घेऊन नानांनी प्रयत्न केले व गर्व्हनरला सर्व अडचणी समजावून सांगितल्या शेवटी हा निर्णय रद्द झाला. मुंबईतील वाढत्या जनतेसाठी पाण्याच्या सोईसाठी विहीर, तलावांची योजना नानांनी आखली. चिंचपोकळीतील गॅस कंपनी, मुंबईतील नाट्यगृह, नानांच्या प्रयत्नांचा परिपाठ आहे. प्रत्येक वेळी दवाखाने, मंदिरे, धर्मशाळा यांना सढळ हाताने मदत करून जनतेचा जिव्हाळा नानांनी प्राप्त केला होता.[५९] नानांना समाजकारणाची आवड होती. पाण्याचा प्रश्न, मनोरंजन या बाबत ते जागरुक होते, रुग्णालये, मंदिर, धर्मशाळांना त्यांनी साहाय्य करुन सामाजिक जबाबदारी निभावली.

या कार्यामुळे नानांबद्दल जनतेला विश्वास वाटत होता. त्यामुळे लहान-सहान गोष्टीही त्यांना सांगितल्या जात व त्या सोडवण्याचा आग्रह धरला जात असे.

**शैक्षणिक कार्य -**

नानांचे शिक्षण क्षेत्रातील कार्यही उल्लेखनीय होते. मुंबईसारख्या इलाक्यात नव्या शिक्षणाचा पाया घालण्याचे कार्य मुंबईचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ड एलफिन्स्टन याने केले.`[६०] त्याला जातीने मदत नाना शंकरशेठ यांनी केली होती. लोकांना आधुनिक शिक्षण मिळाल्याखेरीज त्यांच्या प्रगतीचा मार्ग खुला होणार नाही. ही गोष्ट नानांनी एलफिन्स्टनला पटवून दिली होती. त्यानुसार सरकारने शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेऊन विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्यास सुरूवात केली. परंतु सरकारवर सर्वस्वी विसंबून न राहता नानांनी स्वतः शिक्षणाच्या प्रसारासाठी शिक्षणसंस्था सुरू केल्या. शिक्षणामुळे माणूस शहाणा होतो. तसेच त्याची प्रगती होते. नवीन विचार आत्मसात करता येतात, यासाठी लोकांनी आधुनिक पध्दतीने शिक्षण घेतले पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

नानांनी इ. स. १८२३ मध्ये आपल्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने मुंबईत `बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी` या शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्याच बरोबर इतर महाराष्ट्रात शिक्षणप्रसारासाठी बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने अनेक शाळा सुरू केल्या होत्या. या कामात नानांना बाळशास्त्री जांभेकर, सदाशिव छत्रे इत्यादी सहकाऱ्यांनी मदत केली होती.`[६१]

एकोणिसाव्या शतकात स्त्रीशिक्षणासाठी समाज अनुकूल नव्हता. स्त्रियांना जर शिक्षण मिळाले तर त्या बिघडतील, त्यांचे संसाराकडे दुर्लक्ष होईल, असे लोकांना वाटत होते. सनातनी लोकांचा तर स्त्रीशिक्षणाला विरोधच होता. अशा या विलक्षण परिस्थितीत नाना शंकरशेठ यांनी १८४८ मध्ये आपल्या स्वतःच्या घरातच मुलींसाठी शाळा सुरू केली.`[६२] म. फुलेंप्रमाणेच त्यांनी आपले घर हे शाळेसाठी वापरले व मुलींना शिक्षण देऊ केले. त्यावेळी

सनातनी लोकांनी नानांना खूप विरोध केला होता. पण त्यांच्या विरोधाला न जुमानता आपले कार्य सुरुच ठेवले. त्यानंतर साधारणतः इ.स. १८४५ च्या सुमारास दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊदाजी लाड व विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी मुंबईत `स्टुडंट्स लिटररी अ‍ॅड सायंटिफिक सोसायटी` या संस्थेची स्थापना केली. या संस्थेसही नानांनी सर्वोतोपरी सढळ हाताने मदत केली. नानांनी या कालखंडात बोर्डाचे म्हणजे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सदस्य म्हणून काम पाहिले. नानांच्या या कार्याचा गौरव करताना दादाभाई नौरोजी यांनी असे म्हटले होते की, `जगन्नाथ शंकरशेठ यांनी शिक्षणाचे बीजारोपण करून आणि त्यांच्या निकोप वाढीसाठी कष्ट घेऊन आम्हा भारतीयांवर मोठे उपकार करून ठेवले आहेत.`[६३]

नानांनी समाजसुधारणा, आधुनिक शिक्षण, लोकांना मदत, सुधारणा कायदे या मार्गाने लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. विष्णु शास्त्री पंडिताप्रमाणेच नानानींही स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले होते. मराठी माध्यम, स्त्री शिक्षण, सतीबंदी, शुध्दीकरण या सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केला होता. स्त्रियांच्या उध्दारासाठी स्त्रीशिक्षणाचा मार्ग अधिक सोईस्कर असल्याने त्यांनी तो स्वीकारल्याचे दिसते.

नानांचे विचार व विष्णु शास्त्री पंडितांचे विचार हे सारखेच होते. विष्णुशास्त्रींचे विचार शास्त्रशुध्द पध्दतीचे असले तरी समाजसुधारणेसाठी त्यांनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला होता. त्याचप्रमाणे नानानींही समाजाच्या विकासासाठी प्रत्यक्ष कार्यात सहभागी होऊन कार्य केले होते. समाज सुधारण्यासाठी फक्त कायदे महत्त्वाचे ठरत नाहीत, तर अंमलबजावणी होण्यासाठी लोकमताची आवश्यकता असते व यासाठी समाजसुधारकांनी लोकसंघटनेचे कार्य करणे आवश्यक असते. त्यांनी १८४८ मध्ये आपल्याच घरात मुलींसाठी शाळा उघडून प्रत्यक्ष कृतीवर भर दिला होता. विष्णु शास्त्रीव नानांचे समाज सुधारणेचे मार्ग जरी वेगळे असले तरी त्यांचे विचार व ध्येय एकच होते. या दोघांचाही प्रत्यक्ष कृतीवर जास्त विश्वास होता.

**मूल्यमापन -**

नाना शंकरशेठ यांनी विविध क्षेत्रात केलेली कार्ये त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देण्यास पुरेशी आहेत. इंग्रजी आमदानीच्या सुरूवातीच्या काळात मुंबई शहरातील आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनाचा पाया रचण्याचे कठीण पण महत्त्वपूर्ण कार्य नानांनी केले. समाजजीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात त्यांच्या या पायाभरणीचे कार्य उल्लेखनीय आहे. अनेक संस्थांना मदत करणारे नाना हे मुंबई शहरातील जनकच होते. आचार्य अत्रे यांच्या म्हणण्याप्रमाणे ते खऱ्या अर्थाने मुंबईचे अनभिषिक्त सम्राटच होते.

नाना शंकरशेठ यांचे सरकार दरबारी वजन होते. त्याच्या जोरावर त्यांनी तळागाळातील लोकांच्या समस्यांना हात घालून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे समाजातही त्यांना मान होता. नानांना एकाचवेळी लोकांची लोकमान्यता व सरकारची राजमान्यता मिळाल्याने त्यांचे दोन्ही ठिकाणी वजन वाढले होते. या अधिकाराचा व आपल्या संपत्तीचा वापर त्यांनी जनतेच्या सेवेसाठी केला, तसेच आयुष्यभर संस्थाना मदत व सामाजिक कार्य करणाऱ्या समाजकर्त्यांना मदत केली होती. अशा अनेक कार्यकर्त्यांच्या उत्कर्षाला ते प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरत, म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत त्यांचा अतिशय मोठा वाटा आहे, असे म्हणता येते. विविध क्षेत्रातील रचनात्मक जीवनाचा विकास करण्यातच त्याचे उभे आयुष्य गेले. त्यामुळे सर्वांगीण सुधारणेचे बीजारोपण करणारे आधुनिक महाराष्ट्रातील पाहिले लोकाग्रणी या शब्दात त्यांचे वर्णन करता येईल.

**४) डॉ. भाऊदाजी लाड (१८२४-१८७४) -**

समाज सुधारणेच्या कार्यात डॉ. भाऊदाजी लाड यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या कार्यात सर्वांगीण ठसा उमटविण्याचा मान त्यांना द्यावा लागेल. इंग्रजी राजवटीत एक पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. भाऊ दाजींनी इतर समाजसुधारकांबरोबर जे समाजहिताचे काम केले ते विसरता येत नाही.

**परिचय -**

डॉ. भाऊदाजी लाड यांचे मूळ गाव गोव्यातील पेडणे तालुक्यातील पार्से हे होय. त्यांचा जन्म ७ सप्टेंबर १८२४ रोजी सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नांव `रामकृष्ण विठ्ठल लाड` हे असून भाऊ दाजी लाड या नावानेच त्यांना लोक ओळखत.

भाऊदाजींचे सर्व शिक्षण मुंबईतच झाले. विद्यार्थीदशेत अनेक परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण होऊन अनेक पारितोषिके मिळवली होती. त्यानंतर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी मुंबईच्या एलफिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये विज्ञानाचे शिक्षक म्हणून काम केले. त्या ठिकाणी त्यांनी १८४३ ते १८४५ अशी दोन वर्षे नोकरी करून नंतर नवीन स्थापन झालेल्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सन १८५१ मध्ये भाऊ दाजींनी ग्रँट मेडिकल कॉलेजातून जी.जी. एस.सी. ही वैद्यकीय पदवी घेतली. त्यानंतर काही दिवस त्यांनी त्याच कॉलेजात सब असिस्टंट सर्जन व दुय्यम अध्यापक हा जॉब केला परंतु नंतर ही नोकरी सोडून त्यांनी स्वतंत्र वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.`[६४]

वैद्यकीय व्यवसायात त्यांनी चांगलेच नाव कमवले. त्यांनी आपल्या व्यवसायाकडे केवळ व्यवसाय म्हणून न पाहता समाजसेवेचे एक माध्यम म्हणूनच पाहिले होते. समाजातील गोरगरिबांना मोफत वैद्यकीय उपचार करून समाजाची सेवा केली. त्यासाठी आपल्या काही मित्रांच्या सहकार्याने त्यांनी एक धर्मदाय दवाखानाही चालविला होता. वैद्यकीय व्यवसाय सांभाळून सार्वजनिक कार्याकडेही त्यांनी लक्ष दिले होते. अनेक सामाजिक व राजकीय संस्थांशी त्यांचा संबंध होता, ते एक संशोधक म्हणूनही ओळखले जात होते. त्यांनी नेहमीच सर्वच सार्वजनिक व सांस्कृतिक कार्यांत भाग घेऊन समाजकार्य केले होते.

डॉ. भाऊदाजींनी अखेरच्या कालखंडात प्रतिकूल आर्थिक परिस्थितीला तोंड देऊनही आपले सार्वजनिक सेवेचे व्रत अखेरपर्यंत सुरु ठेवले होते. ३१ मे १८७४ रोजी डॉ. भाऊदाजी लाड यांचे निधन झाले.

**राजकीय कार्य -**

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश राजवटीत भारतीयांना समानतेची वागणूक मिळत नव्हती. अनेक ठिकाणी अपमानीतपणे जीवन जगावे लागत असे. सर्व थरात पक्षपातीपणा, काळा-गोरा भेद केला जात होता. भारतीयांना न्याय हक्क मिळावे, यासाठी खऱ्या अर्थाने भाऊंनी प्रयत्न केले. यासाठी त्यांनी सनदशीर मार्गाचा अवलंब केला. आपल्या लोकांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी प्रभावी संपत्तीची नितांत गरज आहे हे ओळखून जनतेच्या गरजा व अडीअडचणी सोडविण्यासाठी मुंबईमध्ये जगन्नाथ शंकरशेठ यांच्या मदतीने त्यांनी २३ ऑगस्ट १८५२ मध्ये 'बॉम्बे असोसिएशन' ही संघटना उभी केली होती. या संघटनेचे भाऊदाजी पहिले चिटणीस होते.[६५] या संस्थेमार्फत ब्रिटिश पार्लमेंटला पाठविलेल्या एका अर्जात कंपनी सरकार करीत असलेल्या गैरकारभार व त्यामुळे होत असलेले हाल इत्यादींचा उल्लेख केलेला पहावयास मिळतो. मुंबई इलाख्यात त्यांनी ही संघटना स्थापन करून वेगळे भरीव कार्यही केले होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिशांच्या कारभारावर ताशेरे ओढले.

'बाँम्बे असोसिएशन' ही मुंबई इलाख्यात स्थापन झालेली राजकीय स्वरूपाची पहिलीच संस्था होती. त्यानंतर स्थापन झालेल्या काँग्रेसचे कार्यही याच पद्धतीने चालविलेले पहावयास मिळते. म्हणजे एका अर्थाने काँग्रेसच्या स्थापनेला अनुकूल पार्श्वभूमी तयार करण्याचे काम एकूणच 'बाँम्बे असोसिएशन' सारख्या स्थानिक संस्थानी केले हे लक्षात येते.

**'ईस्ट इंडिया असोसिएशन'शी संबध -**

इ. स. १८६६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी लंडनमध्ये 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेच्या स्थापनेचा उद्देश हा हिंदी लोकांच्या आर्थिक समस्यांचा विचार करणे व त्या प्रश्नावर इंग्लडमधील लोकांचे लोकमत आपणास अनुकूल करून घेणे हा होता.[६६] दादाभाई नौरोजी यांनी या संस्थेद्वारे लोकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार

केला होता. डॉ. भाऊदाजी लाड यांचा भारतीय राज्यकारभाराविषयी पुस्तके इंग्लंडमध्ये प्रकाशित करण्याचा विचार होता; परंतु या संस्थेच्या स्थापनेमुळे व तिचा उद्देशही तोच असल्याने भाऊंनी तिलाच मदत करण्याचे ठरविले. त्यानंतर जेव्हा १८६९ मध्ये दादाभाईंनी या संस्थेची शाखा मुंबईत सुरू केली, तेव्हा डॉ. भाऊदाजी लाड या संस्थेचे सदस्य बनले व त्यानंतर या संस्थेचे अध्यक्षपदही भूषविले.

इ. स. १८५९ मध्ये इंग्रजांनी व्यापार व व्यवसायावर कर बसविण्यासाठी `लायसेन्स बिल` तयार केले.`[६७] या विधेयकामुळे भारतीय व्यापार व उद्योगधंद्यावर बराच प्रतिकूल परिणाम होणार होता. त्यामुळे या कायद्याच्या विरोधात देशभर तीव्र प्रतिक्रिया उमटली. डॉ. भाऊदाजी लाड यांनी लायसेन्स बिलाला विरोध केला व या विधेयकाचा निषेध करण्यासाठी त्यावेळी मुंबईत सभा बोलावून आपला निषेध नोंदविला व यात त्यांनी पुढील मुद्दे मांडले` जर कधी असे घडून आले की, माझ्या देशात सुधारणा आणि ज्ञान यांची वृध्दी होऊन तो आपली राज्यव्यवस्था स्थापन करण्यास योग्य झाला तर इंग्लड देश ती गोष्ट कबूल करून उदारपणे आम्हास साम्राज्याच्या ओझ्यातून मुक्त करील काय?`[६८]

डॉ. भाऊचा उद्देश किती स्पष्ट होता या विधानावरून लक्षात येते. इंग्रजांच्या या धोरणाला विरोध करून जनतेचे सहकार्य मिळावे व जनतेत जाणीव निर्माण करणे हाच प्रयत्न त्यांनी आपल्या कार्यातून केला.

**सामाजिक कार्य -**

डॉ. भाऊ दार्जीनी आपल्या सामाजिक कार्याची सुरूवात आपल्या वैद्यकीय व्यवसायातूनच केली. आपला वैद्यकीय व्यवसाय चालवताना अनेक गोरगरीब रूग्णांना मदत करून त्यांच्यावर मोफत औषधोपचार केले आणि त्यांच्यासाठी धर्मदाय दवाखानाही सुरू केला होता. समाजाची खरी गरज डॉ. भाऊंनी ओळखली होती म्हणूनच त्यांनी गरजूंना मदत करून आपल्या वैद्यकीय पेशाचा खरा उद्देश व धर्म दाखवून दिला. याचेच एक उदाहरण देताना सन

१८५५ च्या अॅंग्लो-अफगाण युध्दाचे देता येईल की, या युध्दात बरेच हिंदी सैनिक मृत्युमुखी पडले. या सैनिकांच्या कुटुंबीयांकरिता मदत निधी जमविण्याचे काम मुंबईत डॉ. भाऊ दाजी यांनी केले होते.`[६९]

एकोणिसाव्या शतकात समाज रूढीपरंपरेत गुरफटला होता. सामाजिक प्रश्नांबाबतचा डॉ. लाड यांचा दृष्टिकोण अतिशय पुरोगामी होता. आपल्या समाजातल्या अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांचा लोकांनी त्याग केल्याखेरीज त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होणार नाही, असे सांगून ते स्वस्थ राहिले नाहीत, तर या रूढी, प्रथा परंपरा बंद व्हाव्यात म्हणून त्यांनी प्रयत्नही केले. लग्न, मुंज यांसारख्या धार्मिक व मंगल कार्यक्रमांतही कलावंतीणींचा नाच आयोजित करण्याची एक घाणेरडी प्रथा त्या काळात होती. डॉ. भाऊदाजींनी या प्रथेविरूध्द जोरदार आवाज उठविला व आपल्या मुलांच्या मुंजीच्या वेळी या प्रकाराला फाटा देऊन त्यांनी सर्वांना एक आदर्श घालून दिला. शिवाय मादक पदार्थांच्या सेवनाविरूध्द मोहीम उघडण्यातही त्यांनी पुढाकार घेतला होता.

डॉ. भाऊ दाजी विधवाविवाहाचे पुरस्कर्ते होते. ते एका विधवा स्त्रीच्या पुनर्विवाहास जातीने उपस्थित होते.`[७०] या घटनेचे महत्त्व असे की, त्यावेळी विधवाविवाहास हजेरी लावण्यासाठी सनातनांच्या रोषाला तोंड द्यावे लागे. वेळप्रसंगी सामाजिक बहिष्कारास सामोरे जाण्याची वेळही येत असे. परंतु याची पर्वा न करता समाजाचा रोष पत्कारून आपले कार्य नेटाने पुढे चालविण्याचे धाडस त्यांनी दाखविले होते.

डॉ. भाऊ दार्जीनी शैक्षणिक व इतर कार्यातही आपला ठसा उमटविला होता. आधुनिक ज्ञानाचे महत्त्व त्यांनी जाणले होते. एल्फिन्स्टन कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी `ज्ञान प्रसारक सभा` सुरू केली, तेव्हा डॉ. भाऊंनी अविरत परिश्रम घेऊन तिला नावारूपाला आणले. स्त्रीशिक्षणाचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी मुलींसाठी आर्थिक झळ सहन करून शाळा सुरू केली. रूढीनिष्ट समाजाला न जुमानता शिक्षणाचे कार्य नेटाने चालविले हाते. भाऊंनी 'बॉम्बे असोसिएशन'च्या वतीने मुंबई विद्यापीठाची स्थापना होण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यांनी

व्हिक्टोरीयाबाग आणि म्युझियमची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. तसेच अनेक ग्रंथालयेही स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता.`[७१] थोडक्यात, त्यांनी शिक्षणाला महत्त्व दिले. त्यामुळे समाजात सुधारणा होईल असे त्यांना वाटत होते. स्त्रीशिक्षणावर त्यांना पदरमोड करुन संस्था चालविल्या.

**इतर कार्य -**

डॉ. भाऊंनी वाङ्‌मयीन व ऐतिहासिक कार्यातही प्रशसनीय कार्य केले होते. कालिदासाचा कालनिर्णय, शकांचे हल्ले इत्यादीबाबत त्यांनी चिकित्सक दृष्टिकोणातून विवेचन केले होते. तसेच जैन धर्माची परंपरा, जैन पट्टावतीचा कालानुक्रम, हेमाद्रीचा कालखंड, इत्यादीबाबत संशोधनपर ग्रंथ लिहिले. शिवाय इतिहास संशोधनानिमित्त त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला होता व आपल्या संग्रहात शिलालेखांचे ठसे, हस्तलिखिते, चित्रे इत्यादींचा संग्रह केला होता. त्यांनी गिरनार पर्वतावरील रूद्रदामनाचा शिलालेख, गुप्त राजवंशाचे शिलालेख इत्यादींचे वाचन केले होते. इंग्रज संशोधकांनी केलेल्या सिंचनातील चुका त्यांनी दुरूस्त केल्या. त्यांनी भारताचा इतिहास लिहिण्याच्या उद्देशाने अनेक टिपणे काढली होती; परंतु काही कारणास्तव हे लेखन पुस्तक रूपाने प्रकाशित करता आले नाही. त्यांचे वाङ्‌मय `दि लिटररी रिमेन्स ऑफ भाऊदाजी` या नावाने प्रकाशित आहे.`[७२]

डॉ. भाऊ दाजी लाड व विष्णु शास्त्री पंडित यांचा प्रत्यक्ष कोणत्या कार्यात संबंध आला नसला तरी त्यांच्या कार्याचा उद्देश मात्र एकच होता. एकोणिसाव्या शतकातील परिस्थिती पाहता सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता तो म्हणजे अबला स्त्रियांचा. स्त्रियांच्या विविध प्रश्नांसाठी ज्याप्रमाणे विष्णुशास्त्रींनी स्वतःला झोकून घेतले, त्याचप्रमाणे डॉ. भाऊ दाजी लाड यांचे कार्य देखील प्रशंसनीय आहे. गोरगरिबांना मदत करून वेळप्रसंगी औषधेही मोफत पुरविली व वैद्यकीय व्यवसायाचा एक आदर्श समाजासमोर ठेवला. समाजातील कोणत्याही घटकाचा भेदभाव न करता सर्वांना सारखीच वागणूक दिली.

ते स्वतः विधवाविवाहाचे पुरस्कर्ते होते. विधवाविवाहास उपस्थित राहून विधवाविवाह न करणाऱ्यांना त्यांनी एक आदर्श घालून दिला. कारण त्यावेळी विधवाविवाहास समाजात मान्यता नव्हती. कोणी विधवाविवाहास उपस्थित राहिल्यास त्यांच्यावर समाज बहिष्कार घालत असे. त्यांना स्त्रीशिक्षणाचे महत्त्व माहीत होते म्हणून त्यांनी स्वतः एक मुलींची शाळा सुरू केली होती. रूढी परंपरांना दुजोरा देत शिक्षणाचे हे कार्य त्यांनी नेटाने चालवले होते.

विष्णु शास्त्रीव डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या कार्यात साम्यता होती. म्हणूनच त्यांना समकालीन असे म्हणता येते.

**मूल्यमापन -**

डॉ. भाऊदाजी लाड यांनी विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा विचार करता महाराष्ट्रातील इंग्रजी राजवटीच्या सुरूवातीच्या काळात येथील समाजात नवजागृती घडवून आणण्यासाठी ज्या समाजसुधारकांनी विशेष परिश्रम घेतले त्यांत भाऊ दाजी एक होते, असे म्हणावे लागेल. एकूणच एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी निष्क्रिय होऊन पडलेल्या कालबाह्य परंपरांच्या भोवऱ्यात सापडलेल्या समाजपुरूषास नवचैतन्य प्राप्त करून देण्याच्या कामात त्यांचा वाटा होता.

त्यांच्या वैद्यक क्षेत्रातील कार्यामुळे त्यांना `धन्वंतरी` या नावाने गौरविले जाई. सामाजिक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी संघटनात्मक सनदशीर मार्गाचा पुरस्कार केला. जनतेची गाऱ्हाणी व जनतेवरील ब्रिटिशांकडून होणारे अन्याय त्यांनी निदर्शनास आणून दिले. राजकीय जागृतीतून समाजजागृतीचे कार्य त्यांनी केले. यासंदर्भात ग. त्र्यं. माडखोलकर असे म्हणतात, `डॉ. भाऊदाजी` हे नुसते सनदशीर राजकीय चळवळीचे प्रवर्तक आणि प्रवक्ते नव्हते तर भारतीय स्वातंत्र्याचे आद्य द्रष्टे आणि उद्‌घोषकही होते.`[७३] त्यांच्या विचारांचा पुढील पिढ्यांवर प्रभाव पडल्याचे आपणास दिसून येते. त्यांच्या कार्याविषयी न्या. रानडे म्हणतात, त्यांच्या मनाची सार्वजनिक चळवळीकडे प्रवृत्त होण्यास डॉ. लाड, दादाभाई नौरोजी वगैरे सारख्या थोर सुधारकांची प्रत्यक्ष उदाहरणेच

कारणीभूत ठरली. डॉ. लाड यांनी इंग्रजी राजवटीच्या काळात गतिहीन समाजाला जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

**५) विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५-१८७२)**

**परिचय -**

विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा जन्म १८२५ मध्ये कुलाबा (सध्याचा रायगड) जिल्ह्यातील शिरवली या गावी झाला. त्यांचे पूर्ण नांव `विष्णु भिकाजी गोखले` असे असून लहान वयातच त्यांचे पितृछत्र हरपल्यामुळे बालपण अतिशय कष्टात गेले.

वयाच्या सातव्या वर्षी त्यांची मुंज झाली व त्यानंतर शिक्षण घ्यायला सुरूवात केली. परंतु गरिबीमुळे त्यांना फार काळ शिक्षण घेता आले नाही. अशा परिस्थितीत पोटाच्या प्रश्नासाठी त्यांना वयाच्या बाराव्या वर्षापासून भुसाऱ्याच्या दुकानापासून ते कस्टम खात्यापर्यंत निरनिराळ्या प्रकारच्या नोक ऱ्या केल्या. त्यांना लहानपणापासूनच अध्यात्माची ओढ असल्याने त्यांनी नोकरी करतानाही धार्मिक ग्रंथाचा प्ररिश्रमपूर्वक अभ्यास केला. त्याच्या जोडीने कथा-कीर्तन, पुराणे प्रवचन यांचे श्रवण तसेच साधू, बैरागी, संन्यासी यांची संगत अशा गोष्टीत समाधान शोधण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. पण त्यांना कोणत्याही गोष्टीत स्वस्थ न वाटल्याने अखेरीस वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी सर्वसंगपरित्याग केला आणि आत्मसाक्षात्काराच्या तळमळीने ते अरण्यात गेले.

वेळोवेळी आलेल्या निराशेतून त्यांनी सप्तशृंगीच्या डोंगरावर जाऊन घोर तपश्चर्येने केली. उग्र तपश्चर्याने काही विष्णुबुवांचे समाधान झाले नाही. उग्र तपश्चर्येने, आपले स्वतःचे कल्याण साधले पण या एका गोष्टीमुळे आपला कार्यभाग पूर्ण झाला असे होत नाही. याची जाणीव त्यांना झाली. म्हणून उरलेला काळ मानवजातीच्या कल्याणासाठी आपण वेचला पाहिजे, अशी धारणा त्यांची झाली व हा परमेश्वराचा आदेश मानून समाजकार्याला सुरूवात केली.

त्यानंतरच्या कालखंडात नाशिक, पंढरपूर अशा निरनिराळ्या ठिकाणी जाऊन त्यांनी धर्माचे महत्त्व विषद करणारी व्याख्याने देण्यास सुरूवात केली. विष्णुबुवांच्या अमोघ वक्तृत्वाची छाप लोकांवर पडल्याने लोक त्यांना ब्रह्मचारी बुवा या नावाने ओळखू लागले.`[७४] वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व लोकांना पटवून देण्याबरोबरच विष्णुबुवांनी समाजप्रबोधनाकडे लक्ष पुरविले व त्यासाठी त्यांनी आपले सर्व जीवन खर्च केले. अशा प्रकारे जीवनाचा प्रवास सुरु असताना १८७२ मध्ये त्यांचे निधन झाले.

**मिशनऱ्यांकडून होणाऱ्या अपप्रचारास प्रत्युत्तर -**

वैदिक धर्माच्या प्रसारासाठी गावोवाव फिरत असताना सन १८५८ मध्ये विष्णुबुवा मुंबईत आले. तेथे त्यांना ख्रिस्ती धर्मीयांनी चालविलेल्या आक्रमणाची जाणीव झाली. धर्मप्रसाराच्या कार्यासाठी ख्रिस्ती मिशनरी आटोकाट प्रयत्न करत होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांचा सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांची सेवाभावी वृत्ती. आपल्या सेवाभावी वृत्तीने मिशनऱ्यांनी समाजातील अशिक्षित, गोरगरीब तसेच कनिष्ठ जातींच्या लोकांवर छाप पाडून त्यांची मने जिंकून घेतली होती. त्यांनी हिंदू पोथ्यापुराणांच्या भाषांतरीत प्रती तयार करून त्या गावोगावी वाटल्या होत्या. त्यांच्याकडून हिंदू पुराणातील कथांची टर उडविली जात होती. लहानलहान पुस्तिका छापून, प्रसिध्द करून सामान्य लोकांमध्ये कथा सांगून हिंदू धर्माची टिंगल टवाळी करण्याचे धोरण त्यांनी अंगिकारलेले होते.`[७५] थोडक्यात, ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रचार करताना हिंदू धर्मातील प्रथा कशा आहेत याचे विवेचन केले. तसेच ख्रिस्ती धर्म कसा श्रेष्ठ आहे, हे आपल्या सेवाकार्यातून दाखवून दिले.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी वर्तमानपत्रांचाही आधार घेतला होता. एकोणिसाव्या शतकात नव्यानेच सुरू झालेल्या या प्रसारमाध्यमाविषयी लोकांमध्ये विशेष प्रकारची कुतूहल भावना होती. म्हणून मिशनऱ्यांनी आपल्या उद्दिष्टांसाठी वर्तमानपत्राचा उपयोग करून घेतला. मिशनऱ्यांनी `ज्ञानोदय` हे वर्तमानपत्र सुरू केले. ज्ञानोदयामधून हिंदू

धर्मातील चालीरीती, रूढी, परंपरा यावर टीका केली जात असे. त्याच बरोबर हिंदू धर्माविषयी अपप्रचारही केला जात असे. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या या वृत्तपत्रीय प्रचाराला उत्तर देण्यासाठी विष्णुबुवा ब्रह्मचारींनी `वर्तमानदीपिका` या नावाने वृत्तपत्र सुरू केले.`[७६] 'ज्ञानोदय' हे वर्तमानपत्र अहमदनगर येथून निघत असे. हे वृत्तपत्र ख्रिस्ती धर्म प्रसारासाठी प्रसिध्द होते. विष्णुबुवांनी वर्तमानपत्रामधून त्याला सडेतोड उत्तर दिले.

सुशिक्षित वर्ग त्यांच्या उदात्त व मानवतावादी तत्त्वांच्या प्रभावाला बळी पडत होता. त्यामुळे हिंदू धर्मावर मोठे संकटच आले होते. हिंदू धर्मातील सुशिक्षित लोकांवर पाश्चात्त्य आचार विचारांचा प्रभाव पडलेला होता. त्यांच्या मनात स्वधर्माविषयी एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला होता. राजकीय गुलामगिरीपेक्षा ही मानसिक गुलामगिरी हिंदू धर्माच्या दृष्टीने जास्त धोकादायक ठरण्याची शक्यता होती. हिंदू धर्मावर येऊ घातलेल्या संकटाला टाळण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता विष्णुबुवा ब्रह्मचारींनी जाणली. त्या दृष्टीने ख्रिस्ती धर्माच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याचा त्यांनी निश्चय केला.

विष्णुबुवांनी प्रभावी लोकांना प्रत्यक्षात भेटून त्यांच्याशी चर्चा केली. लोकांच्या प्रभावीत मतांना पुन्हा वळविण्याचा प्रयत्न केला. याच पध्दतीने परमहंस मंडळीशी चर्चा करून व लोकांशी सभांमधून वाद आणि चपखल प्रतिवाद करीत त्यांनी वेदप्रतिपाद्य धर्माची सत्यता आणि श्रेष्ठता नास्तिकांच्या मनावर यशस्वी रीतीने बिंबविली, यामधून अशा नास्तिकांची मने पुनःश्च हिंदु धर्माकडे वळविली.`[७७] थोडक्यात, जनमताद्वारे त्यांनी लोकांना आपला धर्म कसा श्रेष्ठ आहे, तसेच त्याचा खरेपणा त्यांनी लोकांना पटवून दिला आणि जे ख्रिस्ती धर्माकडे वळले होते ते परत हिंदू धर्माकडे वळले.

**ख्रिस्ती मिशनऱ्यांशी जाहीर वादविवाद -**

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचाराला उत्तर म्हणून विष्णुबुवांनी जाहीर व्याख्याने दिली. अशा जाहीर व्याख्यानातून त्यांनी आक्षेपांचे खंडण करून वैदिक धर्माची महानता पटवून दिली. विष्णुबुवांनी आपल्या बिनतोड

युक्तिवादाने नास्तिक म्हणविणाऱ्या लोकांची मनेही हिंदू धर्माकडे परत वळवली. त्यांच्या या व्याख्यानांना वर्तमानपत्रांतूनही मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी मिळाली. साहजिकच वैदिक धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी हाती घेतलेल्या कार्याचा संपूर्ण महाराष्ट्रभर बोलबाला झाला. वैदिक धर्मावर केवळ व्याख्याने देऊन विष्णुबुवा स्वस्त राहिले नाहीत. त्यांनी आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांबरोबर मुंबईच्या समुद्रकिनारी जाहीर वादविवादही केले.[७८] त्यावेळी विष्णुबुवा आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्यातील या वादविवादाला मोठीच प्रसिध्दी मिळाली. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या विचारप्रवर्तक व्याख्यानांमुळे येथील सर्वसामान्य लोकांत धार्मिक प्रश्नांबाबत मोठी जागृती झाली. तथापि, त्यांची व्याख्याने आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांबरोबरचे जाहीर वादविवाद याचा परिणाम असा झाला की, ख्रिस्ती मिशनरी हिंदू धर्माविरूध्द जो खोटा प्रचार करीत होते, त्यास बराच आळा बसला व त्यातून आणखी एक गोष्ट साध्य झाली, ती म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांचा आक्रमक प्रसारामुळे हिंदू धर्मीयांत निर्माण झालेला न्यूनगंड कमी झाला.

मुंबईतील परभु विद्यालयात आणि इतर ठिकाणच्या व्याख्यानांना अनेक मतमतांतरे असणारी मंडळी येत. परंतु तेथे अस्पृश्य वर्गातील श्रोते येत नव्हते. किंबहुना त्या मंडळींना त्या ठिकाणी येण्यास बंदी होती. हे ओळखून विष्णुबुवांनी समुद्रकिनाऱ्यावर देखील सभा घेऊन विचार मांडले. स्वतः बाबा अस्पृश्यता मानणारे नसले तरी या जागा खाजगी मालकीच्या असल्यामुळे या विषयी ते काही करू शकत नव्हते. म्हणूनच अशा परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी उघड्या मैदानावर म्हणजे समुद्रकिनाऱ्यावर सभा भरविण्यास त्यांनी प्रारंभ केला असावा.[७९] याचा फायदा असा झाला की सर्व समाजातील वर्गातील लोक या सभेला आले. म्हणजे विष्णुबुवांनी एका अर्थाने अस्पृश्यता निवारण्याचाही प्रयत्न केला असे दिसते.

विष्णुबुवांच्या व्याख्यानमालेमुळे ख्रिस्ती धर्माच्या प्रचारकांच्यात चांगलीच खळबळ माजली होती. केवळ आपल्या धर्माचा बिमोड करण्यासाठीच तुम्ही कंबर कसली की काय? पारशी, इस्लाम धर्मीयांविषयी तुमचे मत काय? असे प्रश्न त्यांना विचारले जाऊ लागले. त्याला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, `जर ते लोक हिंदू धर्माचा बिमोड करण्यासाठी प्रयत्न करू लागले तर मी ही त्यांच्या धर्माचा बिमोड करण्याचा प्रयत्न करीन. ख्रिस्ती धर्माखेरीज पारशी, मुसलमानी व इतर सर्व धर्म खरे आहेत असे मी मानतो.`[८०] यामधून ते कट्टर हिंदू धर्माविषयी अभिमान बाळणारे होते.

समाजजागृतीसाठी विष्णुबुवांनी वृत्तपत्र व्यवसायाची सुरूवात केली होती. त्यांच्या या उपक्रमापासून स्फूर्ती घेऊन हिंदू धर्माच्या आणखी काही समर्थकांनी आपली स्वतंत्र वृत्तपत्रेही सुरू केली. या वृत्तपत्राच्या प्रसारामुळे मिशनऱ्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देणे शक्य झाले होते.`[८१] यावरूनच एकोणिसाव्या शतकात झालेल्या परिवर्तनाने आधुनिकता, वैचारिक जाणिवेची चाहूल व यामुळे होणारा समाजावरील दूरगामी परिणाम नक्कीच जाणवतो. म्हणजेच हिंदू धर्माबद्दल ख्रिस्ती प्रचारकांनी केलेल्या एकांगी मांडणीवर केलेल्या हल्ल्यांचा हितकारक प्रभाव पडला. हिंदू समाजातील मागासवर्गीयांचे धर्मांतर करणे पाद्र्यांना जवळजवळ अशक्य झाले होते. विष्णुबुवांच्या प्रतिपादनाचा परिणाम पर्यायाने पारशी समाजावरही झाला व पारशी मुलांच्या धर्मांतराला पायबंद बसला. एकंदरच बाबांच्या व्याख्यानाने पारशी समाज खूप जवळ आला व त्यांना विष्णुबुवा हे आपले संरक्षक आहेत, असे वाटू लागले. विष्णुबुवांविषयी एक कृतज्ञतेची भावना निर्माण झाली होती.

**समाजसुधारणेचे कार्य -**

विष्णुबुवा ब्रम्हचारी वैदिक धर्माचे अभिमानी असले तरी त्यांनी प्रचलित समाजरचनेत असलेल्या दोषांकडे डोळेझाक केली नाही. आपल्या समाजात ज्या स्वरूपात जातिभेद आढळून येतात, तो जातिभेद वेदकालीन वर्णव्यवस्थेला सोडून आहे, असे त्यांचे म्हणणे होते. वास्तविक, ही सामाजिक विषमता व

जातिभेद यामुळे भारतीय समाजाची अधोगती झाली व त्यामुळे समाजामध्ये झालेल्या अवस्थेला पुन्हा एकजिनसी बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत, त्याकरता समाजाचा प्रत्येक घटक हा निदान सार्वजनिक जीवनात तरी सारख्या दर्जाचा मानला जावा व त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव असू नये असे विष्णुबुवांचे मत होते.`[८२] थोडक्यात, सामाजिक बाबतीत सर्वांना समान लेखले पाहिजे, उच्च नीच हा भाव असता कामा नये, असे जर झाले तर भारतीय समाजाची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही, तसेच समाज एकसंघ राहणार नाही, असे त्यांना वाटत होते.

त्यांनी नेहमी सामाजिक सुधारणांचा हिरिरीने पुरस्कार केला होता. त्यांचे व्यक्तिगत आचरणही सुधारणावादी विचारांशी सुसंगत होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात कधीही अन्न खाताना व पाणी पिताना कोणत्याही स्पर्श अस्पर्शाचे बंधन पाळले नाही. त्यांनी सामाजिक विषमतेमुळे आपल्या समाजात अतिशूद्रांवर होत असलेल्या अमानुष अन्यायाविरूध्द आवाज उठविला होता. आपल्या दलित बांधवाच्या मागासलेपणाची जबाबदारी सर्वस्वी उच्चवर्णीयांवरच आहे, म्हणून उचवर्णीयांनी दलितांची अवहेलना न करता त्यांना समानतेच्या नात्याने वागवावे. त्यांच्या सांस्कृतिक सुधारणेसाठी कसोशीने झटावे आणि मंदिर प्रवेशासारखे त्यांचे न्याय्य हक्क सुखासमाधानाने मान्य करावेत, असे प्रतिपादन त्यांनी केले होते. त्याशिवाय त्यांचे सामाजिक विचारही पुरोगामी होते. त्यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला होता. बालविवाहासारख्या प्रथेला विरोध केला होता. मुलामुलींचे विवाह प्रौढपणीच व्हावेत, असे प्रतिपादन त्यांनी केले होते. घटस्फोट, शुध्दीकरण या प्रश्नांबाबतही त्यांनी सुधारणावादी भूमिका घेतली होती.`[८३] समाजाच्या अनेक अंगांनी त्यांनी विचार केला होता.

स्त्रियांना शिकविलेच पाहिजे, ग्रहणे, पर्जन्यवृष्टी या गोष्टी निसर्ग नियमांनुसार होत असतात. आर्थिक आणि औषधी उपयोगांच्या दृष्टीतून गायी पाळाव्यात. वृक्षांची लावड व संवर्धन वातावरण शुध्दीकरिता आवश्यक आहे.

स्त्रियांचे कुंकू आणि तिलक लावण्याचा नियम ध्यानअगोचरी मुद्रा सूचक आहे. त्यात ध्यान करण्याच्या ठिकाणाची खूण आणि त्यात ध्यानबिंदूचा रंग कळावा हा मुख्य संकेत आहे. भगवतगीतेवरील `सेतुबंधनी टीका` या ग्रथांत ज्ञान विज्ञानाच्या पायावर चिकित्सकपणे त्यांनी गीतेतील तत्त्वज्ञानाचा अर्थ लावलेला आहे. त्यावरून त्यांच्या बुध्दिवादाची प्रखरता लक्षात येते.`[८४] विष्णुबुवांनी आपल्या साहित्यातून व वाङःमयी विचारातून लोकांच्या विचाराला चालना देण्याचा प्रयत्न केला होता. अर्थात, त्याकाळात असणाऱ्या सुधारकांच्या बरोबरीने जरी विष्णुबुवांचे कार्य असले तरी ते कार्य आणि विचार इतरांपेक्षा नक्कीच वेगळे असल्याचे जाणवते.

**राजकीय विचार -**

विष्णुबुवा ब्रह्मचारी अध्यात्मवादी प्रवृत्तीचे होते. आपल्या व्यक्तिगत जीवनात धर्माला इतके महत्त्व देणाऱ्या विष्णुबुवांनी सामाजिक व धार्मिक संदर्भात मांडलेले विचारही क्रांतिकारक होते. त्यांनी `वेदोक्तधर्मप्रकाश` या नावाने एक ग्रंथ लिहिला होता.`[८५] या ग्रंथात राजनीतीसंबंधी एक स्वतंत्र प्रकरण आहे. पुढे त्यांनी काही मतांचा विस्तार करून सन १८६७ मध्ये `सुखदायक राज्यप्रकरणी निबंध` हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये त्यांनी मांडलेले विचार साम्यवादाशी बरेच मिळतेजुळते आहेत. या पुस्तकातील खालील उताऱ्यावरून त्यांच्या विचारांची दिशा स्पष्ट होण्यास मदत होते.

`सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन हीच एक बाग व त्यातून जे जे निघेल ते ते सर्वांचे, याप्रमाणे राज्यव्यवस्था असली पाहिजे. म्हणजे सर्वांना लाभ व वस्तूंचा उपभोग उपलब्ध होतो. सर्वांना उत्तम खावयास मिळते, त्यामुळे कोणी वंचित रहात नाही. सर्व प्रजेकडून सर्व जमिनीची लागवड करावी आणि अनेक प्रकारची फळे, कंद, भाज्या, अन्न उत्पन्न करून गावोगांवी कोठारे करून ठेवावीत. त्यातून सर्व गावकऱ्यांनी पोटास लागेल तितके अन्न न्यावे. याप्रमाणे बाराही महिने जमिनीतून उत्पन्न घ्यावे आणि ते सर्वांचे उत्पन्न एखाद्याच्या ताब्यात ठेवून त्यातून गरजेप्रमाणे न्यावे. सर्वांची मुले जेव्हा पाच वर्षाची होतील

तेव्हा ती राजाच्या ताब्यात देऊन त्यांना शिक्षण देऊन नंतर त्यांना ज्या कामात आवड व सवड असेल ती कामे द्यावीत.`[८६]

एकोणिसाव्या शतकात अनेक सामाजिक प्रश्न होते. समाजसुधारकांच्या प्रयत्नांना यश येणे कठीण झाले होते. समाजात जातिभेद, धर्मभेद, परंपरा, अंधश्रध्दा, दलितांचा प्रश्न, आर्थिक विषमता, स्त्रियांचा प्रश्न इत्यादी प्रश्न होते. विष्णुबुवांनी मात्र आपल्या कार्यात सामाजिक विषमता, भेदभाव या प्रश्नांकडे विशेष लक्ष दिले होते. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी चालवलेल्या धर्मावरील हल्यांना त्यांनी वेळोवेळी प्रत्युत्तर दिले व धर्मातील सत्यासत्यता समाजासमोर मांडली.

त्याच बरोबर त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नावरही लक्ष दिले होते. त्यांनीही विष्णुशास्त्रींप्रमाणेच विधवाविवाहाचा पुरस्कार केला होता. बालविवाहाला विरोध करून मुलींचे विवाह प्रौढपणीच व्हावेत, असे त्यांनी सांगितले होते. मुलींना शिकविलेच पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. विष्णु शास्त्री पंडितांचे विचार व विष्णुबुवांनी मांडलेले विचार हे किती एकसारखे होते हे त्यांच्या विचारांतून समजते. समाजाचे अनेक प्रश्न सोडवत असताना सर्व सामाजिक प्रश्नांची जाणीव असणे हे देखील सुधारकांचे मोठेपणाच समजले पाहिजे.

**मूल्यमापन -**

विष्णुबुवांच्या वरील विचारातून त्यांनी सरळसरळ एका प्रकारे साम्यवादाचाच पुरस्कार केल्याचे स्पष्ट होते. यावरून ग.त्र्यं. माडखोलकर यांनी त्यांना साम्यवादाचाच पहिला प्रतिपादक असे म्हटले आहे. अर्थात, विष्णुबुवांचे हे राजकीय विचार `कार्ल मार्क्सच्या` तत्त्वज्ञानावरून बनलेले नव्हते. त्यांनी तत्कालीन परिस्थितीचे डोळसपणे जे अवलोकन केले होते त्यातून स्वाभाविकपणे सहज स्फुरलेले ते विचार होते. यावरून त्यांची बौध्दिक झेप व द्रष्टेपणा प्रत्ययास येतो.

विष्णुबुवांनी विपुल लेखनही केले होते. त्यांचे काही महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे भावार्थसिंधु, वेदोक्त धर्मप्रकाश, सुखदायक राज्यप्रकरणी निबंध, चतु:श्लोकी भागवताचा अर्थ, बोधसागराचे रहस्य, सेतबांधनी टीका इ. यावरून त्यांचे

वाङःमयीन कार्यही लक्षात येते व अशाच साहित्यांच्या मार्गाने त्यांनी लोकांपर्यंत आपले विचार पोहचवले व समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

### ६) दादोबा पांडुरंग तर्खडकर (१८१४-१८८८) -

**परिचय -**

`मराठी भाषेचे पाणिनी` म्हटल्या जाणाऱ्या व मराठी भाषेचे व्याकरण हा ग्रंथ लिहून मराठी व्याकरणाचा पाया घालणाऱ्या या महान व्यक्तीचा जन्म मुंबई शहरात ९ मे १८१४ रोजी एका वैश्य कुटुंबात झाला होता. त्यांचे घराणे मूळचे वसईजवळ असलेल्या तर्खड या गावचे म्हणूनच कदाचित त्यांना तर्खडकर या नावाने ओळखले जात असावे.`[८७] खरेतर त्यांच्या परिचयासाठी आडनावाची गरजही पडली नाही. कारण त्यांना जास्तकरून दादोबा पांडुरंग याच नावाने जास्त ओळखले जाई. त्यांचे वडील धार्मिक प्रवृत्तीचे असल्याने साहजिकच दादोबांवर लहानपणापासूनच त्या प्रकारचे संस्कार झाले. म्हणूनच त्यांना मराठी काव्याची गोडीही वडिलांमुळेच लागली. सुरूवातीचे शिक्षण घरीच घेऊन पुढील शिक्षणासाठी ते 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या शाळेत दाखल झाले.

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १८३५ मध्ये शिक्षण पूर्ण केले व शिक्षक म्हणून नोकरीस प्रारंभ केला होता. पुढे १८३६ मध्ये मध्य प्रांतातील जावरा या संस्थानच्या नवाबाचे शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. त्यानंतर प्रथम मुबईच्या एलफिन्स्टन इन्स्टिट्युटमध्ये आणि पुढे १८४० मध्ये सुरत येथे सुरू करण्यात आलेल्या इंग्रजी शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी काम केले होते.

`सन १९४६ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांचा मृत्यू झाल्याने नॉर्मल क्लासच्या म्हणजेच त्या वेळच्या ट्रेनिंग कॉलेजच्या डायरेक्टरची जागा रिकामी झाल्यानंतर त्या जागेवर दादोबा पांडुरंग तर्खडकरांची नियुक्ती करण्यात आली होती.`[८८]

सन १८५२ मध्ये त्यांची डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमणूक झाली होती. सुरूवातीला त्यांनी अहमदनगर जिल्ह्याचे डेप्युटी कलेक्टर म्हणून काम पाहिले होते. हे काम करत असताना १८५७ मध्ये उद्‌भवलेले भिल्ल जमातीच्या

लोकांचे बंड त्यांनी अतिशय कुशलतेने पण तितक्याच खंबीरपणे मोडून काढले होते. त्याबद्दल त्यांचा इंग्रज सरकारने `रावबहाद्दूर` हा किताब देऊन सम्मान केला होता.`[८९] सन १८६२ मध्ये ते सरकारी नोकरीतून निवृत्त झाले. नोकरी करीत असताना त्यांनी समविचारी लोकांना एकत्र करून निरनिराळ्या संघटना स्थापन केल्या होत्या. या संस्थेच्या स्थापनेतून सामाजिक सुधारणेला चालना दिली होती. या पाठीमागे समाजप्रबोधन हा त्यांचा उद्देश होता. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी आपल्या सामाजिक कार्यात खंड पडू दिला नाही. १८ ऑक्टोंबर १८८२ रोजी त्यांचे निधन झाले.

**सामाजिक व धार्मिक सुधारणेचे कार्य -**

दादोबा पांडुरंग यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी बरेच प्रयत्न केले होते. एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारणेचा काळ खूपच प्रतिकूल असूनही आपल्या लोकांची प्रगती व्हावी, या एकमेव हेतूने या समाजसुधारकांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपले कार्य सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला होता. महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर आधुनिक शिक्षणाचा प्रसार होऊ लागला आणि त्यातून नव्या विचारांना चालना मिळाली. इंग्रजी शिक्षणाचा लाभ मिळाल्यामुळे डोळस बनलेल्या तरूणांना आपल्या समाजातील व धर्मातील वैगुण्ये लक्षात येऊ लागली होती. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावामुळे त्यांना नवी दृष्टी प्राप्त झाली होती. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा-परंपरा अंधश्रध्दा, देवभोळेपणा इत्यादी गोष्टी या धर्माच्या अध:पतनास कारणीभूत ठरल्या आहेत अशी या नवशिक्षित तरूणांची खात्री झाली होती.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराचे कार्य जोरात चालविले होते. ख्रिस्ती धर्मातील मानवतावादी तत्त्वांचे या तरूणांना आकर्षण वाटत होते. हिंदू धर्मातील वैगुण्यांच्या पार्श्वभूमीवर ख्रिस्ती धर्मातील उदात्त तत्त्वे या तरूणांना आदर्शवादी वाटत होती. तसेच ख्रिस्ती धर्माच्या सेवाभावीवृत्तीनेही अनेक युवक जास्त प्रभावित झालेले होते. परंतु हिंदु धर्माची शिकवण जीवनात खोलवर

रूजली होती, त्यामुळे आपल्या धर्माचा त्याग करण्याचा विचार अनेकांना पटण्यासारखा नव्हता. अशा स्थितीत धर्मात सुधारणा घडवून आणण्याचा आणि काही चांगल्या तत्त्वांचा स्वीकार करण्याचा प्रयत्न करण्याचे दादोबांनी ठरविले होते. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणजे दादोबा पांडुरंग यांनी स्थापन केलेल्या मानवधर्म सभा व परमहंस सभा या संस्था होत.`[१०] दादोबांनी हिंदू धर्मातील वैग्युण्ये दाखवून दिली तसेच मानवधर्म सभा व परमहंस सभा या संस्थांच्या माध्यमातून हिंदू धर्मातील सुधारणा घडवून आणल्या.

**मानवधर्म सभा -**

दादोबा पांडुरंग यांचे नोकरीनिमित्त काही काळ सुरत येथे वास्तव्य होते. त्यावेळी त्यांचा सबंध दुर्गाराम मंछाराम मेहता, दिनमणी शंकर दलपतराय, मोतीराम दलपतराय यांसारख्या तरूण मित्रांशी आला होता. त्या त्यांनी २२ जून १८४४ रोजी `मानवधर्म सभा` या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेने काही तत्त्वे निश्‍चित करून आपले कार्य केले होते.

**तत्त्वे -**

१) ईश्वर एकच असून तो पूज्य व निराकार आहे.

२) नीतिपूर्वक सप्रेम ईश्वभक्ती हाच खरा धर्म होय.

३) मनुष्यमात्राचा पारमार्थिक धर्म एकच आहे.

४)प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

५) नित्यनैमित्तिक कर्मे विवेकास अनुसरून असावीत.

६) मनुष्यमात्राची एकच ज्ञाती आहे.

७) सर्वांस ज्ञानशिक्षा असावी.

`मानवधर्म सभेचे` अध्यक्ष म्हणून दादोबा पांडुरंग यांची तर कार्यवाह म्हणून दुर्गाराम मंछाराम यांची निवड झाली होती. या सभेच्या सभासदांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. म्हणूनच हिंदूच्या मंदिरात जाण्याऐवजी त्यांनी चर्चमध्ये जाऊन निराकार प्रभूची प्रार्थना करण्याच्या पध्दतीचे अनुकरण केले होते. मूर्तिपूजेप्रमाणे त्यांचा हिंदू धर्मातील जातिसंस्थेलाही विरोध केला होता. म्हणूनच

जातिभेद न पाळणे हे या संस्थेचे ब्रीद होते. या सभेची तत्त्वे उदात्त व मानवतावादी असली तरी तिला निष्ठावान कार्यकर्त्यांचे पाठबळ लाभले नाही. तसेच संघटनेच्या विकासासाठी निरपेक्ष बुध्दीने व समर्पित वृत्तीने झटणारे नेतृत्व न लाभल्याने पुढे फार काळ या सभेचे अस्तित्व टिकले नाही.`[९१] या संस्थेला जातिभेद मान्य नव्हता. मानव हीच जात व मानवता हाच धर्म अशी या संस्थेची शिकवण होती. पण पुढल काळात नेतृत्व न लाभल्याने ही सभा लयास गेली.

**परमहंस सभा -**

मानवधर्म सभेच्या अस्तानंतर नाउमेद न होता दादोबा यांनी काही सहकारी तसेच समविचारी मित्र यांच्या मदतीने १८४९ मध्ये मुंबई येथे `परमहंस सभा` नावाची दुसरी संस्था स्थापन केली होती. या संस्थेच्या कार्यात दादोबांचा पुढाकार होता व या सभेची तत्त्वेही मानवधर्म सभेप्रमाणेच होती. एका बाजूला हिंदूधर्माच्या अनिष्ट प्रथांना विरोध करायचा व चांगली तत्त्वे आचरणात आणून त्यांनी समाज जागृतीचे कार्य करायाचे, ही पद्धत वापरली होती. `प्रार्थनेसाठी एकत्र जमल्यानंतर सर्वजण एकत्र सहभोजन घेत. विशेष म्हणजे यामध्ये सर्व जाती धर्मांचा समावेश केला होता. एवढेच नव्हे तर हे अन्न अस्पृश्य आच्याऱ्याने बनविलेले असे. तसेच ख्रिस्ती मानसाणे बनविलेला पाव खाल्ल्याशिवाय आणि मुसलमान माणसाने आणलेले पाणी पिल्याशिवाय कोणालाही सभेचे सभासद होता येत नव्हते.`[९२] हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन या तिन्ही समाजातील लोकांना यात प्रवेश असे. जुन्या चालीरीतींना विरोध करणे व नव विचार अमलात आणणे, सहभोजन घेणे हे कार्य ही सभा घेत असे.

सामाजिक समरसतेचा विचार करता तत्कालीन परिस्थिती फारच बिघडलेली होती. कारण मिशनऱ्यांच्या घरी चहा घेतला किंवा पाव खाल्ला म्हणून प्रायश्चित्त घ्यावे लागत असे. एखाद्याचा हातचा पाव खाणे, पाणी पिणे हा विचार क्रांतिकारी होता. शिवाय हे कार्य सुरू होण्यापूर्वी मराठीत प्रार्थना होत या शिवाय या प्रार्थना स्वतः दादोबा पांडुरंग यांनी रचलेल्या होत्या.`[९३]

परमहंस सभेच्या सभासदांना सामाजिक व धार्मिक सुधारणेविषयी अंतःकरणापासून तळमळ होती, त्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याची त्यांची तयारी होती. परंतु त्यातून ओढविणाऱ्या सनातनांच्या रोषाला तोंड देण्याइतके धैर्य त्यांच्याजवळ नव्हते म्हणून आपले संघटनात्मक कार्य ते गुप्तपणे करत होते.

परमहंस सभेची तत्त्वे विषद करण्यासाठी आणि या सभेच्या मार्गदर्शनासाठी दादोबा पांडुरंग यांनी `पारमहंसिक ब्रह्मधर्म' या नावाचा एक कविताबध्द ग्रंथ लिहिला होता. त्यात त्यांनी निराकार ईश्वराची पूजा करावी, सर्वांशी बंधुभावाने वागावे, जातिभेद सोडावा, अशा प्रकारचा उपदेश केला आहे. या ग्रंथातील खालील ओवीवरून त्यांचे व्यापक व मूलगामी विचार स्पष्ट होतात.

`ऐका सांगतो मी । विसा अभंगात । सर्व शास्त्रमत। ब्रह्मधर्म ।
जातिभेद सर्व । सोडा अभिमान । द्यावे अलिंगन । एकमेका ।
असो कृष्णगीता । किंवा ख्रिस्तगीता । महंमदाची वार्ता । असेना का।
तत्त्वज्ञान एक । असे त्याचे जरी । न कां ते पदरी । घ्यावे आम्ही ।`

परमहंस सभेचे कामकाज १८६० पर्यंत सुरु होते. या सभेच्या सभासदांची गुप्त ठेवण्यात आलेली यादी प्रसिध्द केल्याने सभासदात आणि लोकांच्यात खळबळ माजली. अशा प्रक्षोभक वातावरणात सभेचे कामकाज चालवणे अडचणीचे ठरेल, यामुळे चालकांनी ही सभाच रद्द करून टाकली होती.`[१४]

दादोबा पांडुरंग यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्यही मोलाचे आहे. सन १८४८ मध्ये मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजातील काही विद्यार्थ्यांनी ज्ञानप्रसारक सभा नावाची संस्था स्थापन केली, त्यावेळी ते या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. समाजात ज्ञानाचा प्रसार करणे आणि सामाजिक जागृती घडवून आणणे ही या संस्थेची उद्दिष्टे होती.

महाराष्ट्रात धर्म सुधारण्याच्या कार्याला प्राधान्य देणारे `बाळशास्त्री जांभेकर` यांच्या नंतरचे `दादोबा पांडुरंग` हेच मोठे विचारवंत होते. त्यांनी धर्म सुधारणा व सामाजिक सुधारणेच्या कार्याला चालन दिली होती. त्यांनी

स्त्रियांच्या बाबतीत परखड विचार मांडले नसले तरी त्याकाळच्या समाजव्यवस्थेवर त्यांनी जास्त भर दिला होता. विष्णुशास्त्रींप्रमाणेच त्यांनीही आपले मत मांडलेले दिसते. आपल्या लोकांनी आधुनिक शिक्षण घेतल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही, असे त्यांनाही वाटत होते. असे असले तरी सर्वसामान्यांपर्यंत त्यांना आपला प्रभाव पाडता आला नव्हता. समाजाच्या विविध प्रश्नांची जाणीव या दोनही समाजसुधारकांना होती. परंतु समकालीन असूनही प्रवाह मात्र वेगवेगळे होते असे दिसते.

**मूल्यमापन -**

एकंदरच दादोबांच्या कार्याचा आढावा घेताना महाराष्ट्रात धर्म सुधारण्याच्या कार्यात प्राधान्य देणारे `बाळशास्त्री जांभेकर` यांच्या नंतरचे मोठे विचारवंत दादोबा पांडुरंग हेच होते. त्यांच्या `मानवधर्म सभा` व `परमहंस सभा` या दोनही संस्थाचे कार्य जरी मर्यादित असले तरी, धर्मसुधारणेच्या आणि सामाजिक सुधारण्याच्या कार्याला प्रेरणा दिली, हे निर्विवाद सत्य आहे. शिवाय प्रार्थना सभेच्या स्थापनेतही त्यांचा सहभाग होता. लोकांनी आधुनिक शिक्षण घेतल्याशिवाय आपल्या समाजाची प्रगती होणार नाही, असे त्यांचे मत होते. त्यामुळे आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी ते प्रयत्नशील राहिले. परंतु धर्मसुधारक व समाजसुधारक यांच्या अंगी जे धैर्य व निर्भिडपणा असावा लागतो तो त्यांना दाखविता आला नाही. त्यामुळे त्यांचा सामाजात प्रभाव पडला नाही व त्यांच्या विचाराचा प्रसार झाला नाही.

**७. विष्णु शास्त्री पंडितांचे इतर समकालीन समाजसुधारक -**

एकोणिसाव्या शतकात झालेल्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तनामुळे समाजात जी खळबळ माजली त्याचा परिणाम म्हणजे इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेतलेल्या पाश्चात्त्य विद्याविभूषित तरूणांनी आपल्या समाजव्यवस्थेकडे व येथील धार्मिक व सामाजिक स्थितीकडे चिकित्सक दृष्टीने पहावयास सुरूवात केली होती. आपल्या समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा व आपल्या धर्मात शिरलेल्या अनिष्ट प्रथा, सर्वसामान्य लोकांत

रूजलेल्या अंधश्रध्दा भोळया समजुती आणि या सर्वांमुळे संपूर्ण समाजाचा घडून आलेला नैतिक अध:पात याची जाणीव त्यांना झाली. त्यातूनच आपल्या धर्मात व समाजात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली होती.

अशा विचारप्रवाहामधून विष्णु शास्त्री पंडितांबरोबरच बाबा पद्मनजी, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, भाऊ महाजन, महात्मा फुले यांसारखे तरूण समाजसुधारक पुढे आले व त्यांच्या प्रयत्नांमुळेच सामाजिक चळवळींना चालना मिळाली.

एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी जाहीर विचार मांडणे विशेषतः विधवाविवाहाचा पुरस्कार, स्त्रीशिक्षणाला उत्तेजन, बालविवाहासारख्या प्रथांना विरोध यांसारख्या प्रश्नांना उचलून धरणे कोणत्याही समाजसुधारकाच्या दृष्टीने अतिशय त्रासदायक होते. समाजाच्या विरोधाला तोंड देऊन, प्रसंगी अवहेलना सहन करून स्त्रियांच्या उध्दारासाठी ज्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले, अशा समाजसुधारकांमध्ये विष्णु शास्त्री पंडित यांचे नांव आग्रक्रमाणे घेतले जाते.

त्याकाळात जसे विष्णु शास्त्री पंडित विधवाविवाहाचे पुरस्कर्ते होते, त्याचप्रमाणे `पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर` हे ही एक कट्टर पुरस्कर्ते होते. मात्र, या प्रश्नाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन काहीसा भिन्न होता. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या प्रश्नाच्या सोडविणुकीसाठी कायद्याच्या मार्गावर जास्त भर दिलेला होता. याबाबत सरकारनेच कायदा करावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रश्नांना यश येऊन इंग्रज सरकारणे विधवाविवाहाला मान्यता देणारा कायदा १८५६ मध्ये संमत केला. परंतु विष्णु शास्त्री पंडित यांचे या प्रश्नासंबंधीचे विचार वेगळे होते. विधवाविवाहाला उत्तेजन मिळण्याच्या दृष्टीने सरकारचा कायदा पुरेसा ठरणार नाही. तसेच कायद्याच्या मार्गावर विसंबून राहिल्यास हा प्रश्न मार्गी लागणार नाही. केवळ विधवाविवाहालाच नव्हे तर सर्वच प्रकारच्या सामाजिक सुधारणांना कायद्याचा व सरकारचा आधार पुरेसा

पडत नाही. अशा सुधारणा घडून येण्यासाठी समाजानेच अंतप्रेरणेने आशीर्वाद दिला पाहिजे.`[९५] त्यांचा हा दृष्टिकोन काळसापेक्ष होता असे ठामपणे म्हणता येईल. समाजसुधारणेचा ध्यास घेतलेले विचारवंत म्हणून लोकहितवादींचा उल्लेख करता येतो. समाजाची सुधारणा व्हावी, असे त्यांना अंतःकरणापासून वाटत होते. म्हणून येथील समाजव्यवस्थेत जे जे वाईट व टाकाऊ वाटेल त्याविरूध्द त्यांनी परखडपणे आपली लेखणी चालविली होती. त्यांच्या संपूर्ण लिखाणात समाजहिताची तळमळ होती. त्या दृष्टीने विविध विषयांवर मांडलेले विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत.

लोकहितवादींनी समाजातील बालविवाह, हुंडा, बहुपत्नीत्व यांसारख्या अनिष्ट प्रथांवर लेखन केले होते. बालविवाहामुळे स्त्रीचे व्यक्तिमत्त्व कुंठित होते. अनेकांना वैधव्याचे दुःख भोगावे लागते असे त्यांनी म्हटले होते. स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच अधिकार द्यावेत, शिक्षण व विवाह या बाबतीत त्यांना स्वातंत्र्य असावे, पुनर्विवाह करण्याचा अधिकार असावा, ईश्वराने स्त्री व पुरूष सारखेच केले आहेत व स्त्री पुरूषाचे अधिकार समसमान असावेत, अशी मते त्यांनी आपल्या लिखाणातून मांडलेली पहावयास मिळतात. प्रत्यक्ष कार्य करणाऱ्यांपैकी पंडितांबरोबरच लोकहितवादीही अग्रेसर होते, असे म्हणावे लागेल.

**सारांश -**

शिक्षण प्रसारामुळे नवशिक्षित तरूणांची पिढी उदयाला आली.या पिढीचा पाश्चिमात्य संस्कृतीशी, विचारांशी संबंध आल्यामुळे त्यांना आपल्या संस्कृतीमधील उणिवांची जाणीव झाली.

या जाणिवेतून धार्मिक व सांस्कृतिक चळवळींना चालना मिळाली.

धार्मिक जीवनात बुध्दिप्रामाण्यापेक्षा शब्दप्रामाण्याला व ग्रंथप्रामाण्याला जास्त महत्त्व होते. त्यामुळे समाजाची अधोगती झाली.

या परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी नवशिक्षित तरूणांनी प्रयत्न केले व सुधारणावादी धोरणातून समाजपरिवर्तन घडवून आणले जाऊ लागले.

या परिवर्तनात वृत्तपत्रे व ग्रंथसाहित्याचा वापर केला जाऊ लागला. वृत्तपत्राद्वारे आपल्या रूढी परंपरेवर टीका करण्याबरोबरच समाजाला नव विचारांचे ज्ञान करून देण्याचा प्रयत्नही समाजसुधारकांनी केला.

स्त्रियांच्या दयनीय स्थितीचे वर्णन करून त्यात सुधारणा व्हाव्यात या हेतूने समाजजागृतीचे कार्यही या सुधारकांनी केले.

या कार्यात इतर समाजसुधारकांबरोबरच विष्णु शास्त्री पंडितांनीही समाजसुधारणेचे कार्य केले.

एकंदरच विष्णु शास्त्री पंडितांचे कार्य इतर समाजसुधारकांपेक्षा वेगळे व आदर्शवादी जाणवते.

अनेकांनी लेखन, व्याख्याने, वृत्तपत्रे व संस्थांच्या माध्यमातून कार्य केले. विष्णुशास्त्रींनी लेखन, व्याख्यान व चर्चा याचबरोबर वेळप्रसंगी वादविवादाच्या मार्गाने समाजजागृतीचे कार्य केले.

त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात स्त्रीजातीच्या उन्नतीसाठीच जास्त प्रयत्न केले.

ज्या वेळी त्यांच्या कसोटीची वेळ आली त्यावेळी ते आपल्या शब्दाला जागले व आपली तत्त्वनिष्ठा किती अटळ आहे, याची खात्री पटवून दिली. स्वतःच्या जीवनात आपल्या विचाराप्रमाणे कृती करुन त्यांनी आदर्श घालून दिला.

## संदर्भसूची


१) प्रा. पाटील व्ही. बी., `१९व्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधणेचा इतिहास`, पृष्ठ - ९४.

२) ओक प्रमोद 'एलफिन्स्टन', पृष्ठ - ५.

३) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - ९५.

४) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, `महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास`, पृष्ठ - ५३.

५) पाटील व्ही.ए., 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर' पृष्ठ - २२.

६) कित्ता; पृष्ठ - २२-२३.

७) भिडे जी.एस., पाटील एन.डी., 'महाराष्ट्रातील सुधारणेचा इतिहास', पृष्ठ - ४९.

८) प्रा. पाटील व्ही.बी.'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाज-सुधारणेचा इतिहास', पृष्ठ - १०३.

९) कित्ता; पृष्ठ - १०३.

१०) पाटील व्ही.ए., पूर्वोक्त, पृष्ठ - ३३.

११) स्वामी व्ही.एन., 'महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, ऐतिहासिक आणि थोर विचारवंत', पृष्ठ - ८५.

१२) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १०५.

१३) कित्ता; पृष्ठ - १०५.

१४) प्रा. डॉ. गाठाळ एस.एस., 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास', पृष्ठ - ५६.

१५) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १०७.

१६) पाटील व्ही.ए., पूर्वोक्त, पृष्ठ - १०६-१०७.

(**श्रीपती शेषाद्री प्रकरण** - १८४३ च्या सप्टेंबर महिन्यात नारायण शेषाद्री या ब्राह्मण तरुणाचे हे प्रकरण - याचे सविस्तर वर्णन डॉ. रा.श. वाळिंबे यांनी 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुर्नघटना भाग - १' या पुस्तकात सविस्तररित्या प्रकरण ८ मध्ये वर्णन केलेली आहे.)

१७) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १०६.

१८) कित्ता; पृष्ठ - १०६.

१९) पाटील व्ही.ए., पूर्वोक्त, पृष्ठ - १५८-१५९.

२०) पाटील पंढरीनाथ सीताराम, 'महात्मा जोतिराव फुले यांचे चरित्र', पृष्ठ - ११.

२१) प्रा. पाटील व्ही.बी. पूर्वोक्त, पृष्ठ - १४४.

२२) बगाडे उमेश, 'महात्मा जोतिबा फुले' पृष्ठ २६.

२३) पाटील पंढरीनाथ सीताराम, पूर्वोक्त, पृष्ठ - १७-१८.

२४) नरके हरि, फडके य.दी., 'महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड पहिला', पृष्ठ - ०५.

२५) कित्ता; पृष्ठ - ०६.

२६) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १४७.

२७) पाटील पंढरीनाथ सीताराम, पूर्वोक्त, पृष्ठ - २८-२९.

२९) कित्ता; पृष्ठ - २९.

३०) नरके हरि, फडके य.दी. पूर्वोक्त, पृष्ठ - ४३-४४.

३१) कित्ता; पृष्ठ - ४३.

३२) कित्ता; पृष्ठ - ४३.

३३) कित्ता; पृष्ठ - ४४.

३४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 'मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन', पृष्ठ - २७.

३५) सरदार गं.बा., 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', पृष्ठ - १३१.

३६) कित्ता; पृष्ठ - १३१.

३७) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १५२.

३८) कित्ता; पृष्ठ - १५२-१५३.

३९) नरके हरि, फडके य.दी., पूर्वोक्त, पृष्ठ - ३२-३३.

४०) प्रा. डॉ. गाठाळ एस.एस., 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास', पृष्ठ - १४२-१४३.

४१) पाटील पंढरीनाथ सीताराम, पूर्वोक्त, पृष्ठ - ७०-७१.

४२) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १५८.

४३) कित्ता; पृष्ठ - १५९-१६०.

४४) खापर्डे डी.के., 'राष्ट्रपिता जोतिराव फुले', पृष्ठ - १४९.

४५) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १६५.

४६) खापर्डे डी.के., पूर्वोक्त, पृष्ठ - ११०-१११.

४७) बगाडे उमेश, पूर्वोक्त, पृष्ठ - ७०-७१.

४८) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १६५.

४९) प्रा. व्ही. बी. पाटील, `महाराष्ट्रातील समाजसुधारक व थोर भारतीय विचारवंत`, पृष्ठ - ८.

५०) कित्ता;.

५१) फडके य.दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र ', पृष्ठ - ४३.

५२) प्रा. व्ही. बी. पाटील, पूर्वोक्त, पृष्ठ -९६.

५३) कित्ता; पृष्ठ -९६.

५४) कित्ता; पृष्ठ - ९७.

५५) फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ - ७३

५६) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त, पृष्ठ - ५६.

५७) कित्ता; पृष्ठ - ५७.

५८) प्रा. व्ही. बी. पाटील, पुर्वोक्त, पृष्ठ - १०१.

५९) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त, पृष्ठ - ५७.

६०) ओक प्रमोद, पूर्वोक्त, पृष्ठ - १९२

६१) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त, पृष्ठ - ५५.

६२) कित्ता; पृष्ठ - ५५

६३) कित्ता; पृष्ठ - ५६.

६४) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त पृष्ठ - १२३-२४

६५) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त.पृष्ठ - ६९

६६) फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ - ७५

६७) कित्ता; पृष्ठ - ७४

६८) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त, पृष्ठ - ६९-७०.

६९) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त पृष्ठ - १२६.

७०) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त, पृष्ठ - ७०.

७१) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १२७.

७२) प्रा. भिडे, प्रा. पाटील, प्रा. थोरात, पूर्वोक्त, पृष्ठ - ७१.

७३) कित्ता; पृष्ठ - ७१.

७४) श्री. पु. गोखले.,'विष्णुबुवा ब्रह्मचारी' आणि त्यांचे विचारधन`, पृष्ठ - ३/४

७५) कित्ता; पृष्ठ - ७-८.

७६) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त,पृष्ठ - १३१.

७७) श्री. पु. गोखले., पूर्वोक्त, पृष्ठ - १०-११

७८) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३०.

७९) श्री. पु. गोखले., पूर्वोक्त, पृष्ठ - १२.

८०) कित्ता; पृष्ठ - १४.

८१) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३१.

८२) कित्ता; पृष्ठ - १३१.

८३) कित्ता; पृष्ठ - १३२.

८४) श्री. पु. गोखले., पूर्वोक्त, पृष्ठ - ५०-५१.

८५) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३२.

८६) श्री. पु. गोखले., पूर्वोक्त, पृष्ठ - ६७

८७) सहस्त्रबुद्धे पु. ग.,' महाराष्ट्र संस्कृती ', पृष्ठ - ६६१

८८) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १०८.

८९) कित्ता; पृष्ठ - १०९.

९०) श्री. सहस्त्रबुद्धे पु. ग., पूर्वोक्त, पृष्ठ - ६६१.

९१) कित्ता; पृष्ठ -६६१-६६२

९२) कित्ता; पृष्ठ - ६६१.

९३) कित्ता; पृष्ठ - ६६२.

९४) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - ११२.

९५) सरदार गं. बा.,' महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', पृष्ठ - १६१.

## प्रकरण-५

# विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांची साहित्यिक कामगिरी

## प्रकरण-५

## विष्णु परशुराम शास्त्री पंडित व त्यांची साहित्यिक कामगिरी

**प्रस्तावना -**

स्त्रीवर्गाच्या उन्नतीपुरतेच जरी विष्णुशास्त्रींनी आपले कार्यक्षेत्र मर्यादित केले असले तरी त्यांची दृष्टी अत्यंत व्यापक होती. समाजजीवनाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक इत्यादी सर्व अंगाच्या सुधारणेविषयी त्यांना सारखीच तळमळ वाटत होती. अशा निरनिराळ्या समाजोपयोगी विषयांचा त्यांनी आपल्या 'इंदुप्रकाश' मधील लेखनात वेळोवेळी परामर्श घेतला आहे. जन्मभर त्यांनी समाजाचीच चिंता वाहिली. स्वदेश, स्वभाषा आणि स्वजन याकरिता आणि विशेषतः स्त्रीवर्गाकरिता अक्षरशः तनमनधनाने झटताना लोकोपवादाची कधीही पर्वा केली नाही. शेकडो संकटे ओढून घेतली; परंतु स्वतःच्या सद्-सद्विवेक बुध्दीशी प्रतारणा करण्याचे मनातही आणले नाही.

सरकारी नोकरी सोडल्यानंतर पंडितांनी आपले सर्व लक्ष स्त्रियांच्या सुधारणेकडे दिले होते. त्यासाठी त्यांनी गावोगावी जाऊन व्याख्याने दिली, अनेक ग्रंथ लिहिले त्याचबरोबर अनेक लेखही प्रसिध्द केले. समाजातील अबालवृध्दाशी खुल्या दिलाने वारंवार चर्चा केली. मतप्रचाराचे एकही साधन त्यांनी सोडले नाही. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, बालविवाह, जरठकुमारी विवाह, परदेशगमन, जातिभेद इ. अनेक प्रश्नांचा त्यांनी आपल्या लिखाणांमधून ऊहापोह केला. विष्णु शास्त्री पंडितांचे सर्व विवेचन प्राच्य जुन्या धर्मग्रंथावर आधारलेले होते. प्राचीन धर्मग्रंथाचे चिकित्सक दृष्टीने अध्ययन करून त्यांनी आपली मते नेहमीच समाजासमोर मांडली. त्यामुळे त्यांच्याशी वाद करताना मोठमोठ्या शास्त्रीमंडळींचीही तारांबळ उडत होती. त्यांची भाषा काही प्रमाणात खडबडीत असली तरी सरळ व सोपी होती. त्यांच्या प्रत्येक लेखात अंतःकरणाची तळमळ, आत्मविश्वास, शोधकता व व्यासंग स्पष्टपणे दिसून येतो. विष्णु शास्त्री पंडितांची प्रागतिक मतांची शिकवण श्रृती, स्मृती, पुराणे यावर आधारलेली होती. तो कालखंड पाहता त्यांचे विचार समाजाला

रूचण्यास व पचणी पडण्यास अनुकूल नव्हता. स्त्रीशिक्षण, स्त्री पुनर्विवाह, परदेशगमन, ब्राह्मणेत्तर वर्गाशी सामाजिक समानता, स्वदेशी वस्तूंचा प्रचार इ. संबंधीचे त्यांचे विचार समाजाला आज ठीक वाटू शकतात. परंतु त्याकाळी त्याला समाजाने विरोधच केला. लोकजागृतीसाठी त्यांच्या विचाराची त्याकाळात मदतच झाली असती, परंतु त्या वेळी त्यांचे विचार समाजाला पटले नाहीत.`[१] थोडक्यात, धर्मग्रंथात गुरुटून न जाता स्त्रियांमध्ये सुधारणा झाली तर समाज परिवर्तन होईल ही आशा त्यांना होती.

इंग्रजी शिक्षणाचा बोलबाला वाढल्यानंतर लोकांच्या मनावर आणि आर्यसंस्कृतीवर विपरीत परिणाम झाला. ख्रिस्ती शाळात शिकलेल्या लोकांमध्ये गर्विष्ठ, स्वार्थी, नास्तिक, अर्ध्या हळकुंडाने पिवळी झालेली मंडळी फार होती. इंग्रजी भाषा, विद्या व विचार यांच्या परिचयाने या मंडळीची श्रध्दा स्वधर्मावरून उडून चालली होती. इंग्रजी विद्येच्या शिक्षणाने डामडौल आणि व्यसने वाढली होती. विष्णु शास्त्री पंडितांना हे अनिष्ट परिणाम पसंत नव्हते. त्यांचा ओढा पहिल्यापासूनच सद्ग्रंथ प्रकाशनाकडे होता. त्यांचे ग्रंथ कर्तृत्व १८५४ पासूनच चमकू लागले.`[२] थोडक्यात, इंग्रजी विद्येचा परिणाम भारतीयांवर अनिष्ट झाले. म्हणून त्यांनी ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केल्याचे दिसून येते.

'दक्षिणा प्राइम' कमिटीने त्यांच्या एका ग्रंथाला १५० रुपयांचे बक्षीस देऊन त्यांचा सन्मान केल्याची बातमी 'ज्ञानोदयात' ता. १५ ऑगट १८५४ च्या अंकात पहायला मिळाली, परंतु तो ग्रंथ कोणता, ते मात्र कोठेही नमूद नाही. पंडितांचे बरोबर बाळशात्री हळवे यांना व बाबा पद्मनजींनाही पारितोषिक मिळाल्याचे वृत्त त्यात आहे.'[३]

विष्णु शास्त्री पंडित हे 'दक्षिणा प्राईम' कमिटीचे सभासद असता 'Public Ocean' या ग्रंथाचे कोणी भाषांतर करत ते सभेकडे पाठविले होते. त्या हस्तलिखितावर कृष्णशास्त्री चिपळुणकरांची व अन्य परीक्षकांची स्वाक्षरी व अभिप्राय होते. त्यात पंडितांचाही अभिप्राय पहावयास मिळतो. त्यातील देशहिताची जाणीव लक्षात घेता तो अभिप्राय असा की,

"An adaptation would perhaps do but I think that our friends desirous of favourving us with translation could find subjects upon whichto spend their labours, formore interesting and useful then an account of a barbar-ous race confined to the Arctic regions. I think at present we should devote our attention to things and persons much neaver home then the 'Esquimaux' a race whose history can in my opinion be advantageously and with property put off till we have furnished the natives with the history of thein own covntry and of that of their rulers."

१५th Oct. १८५५.

याचा भावार्थ असा की, 'एस्किमो' सारख्या रानटी आणि अतिशीत प्रदेशात राहणाऱ्या लोकांची माहिती देत बसण्यापेक्षा आमच्या मित्रांनी स्वदेशाच्या मनोरंजक गोष्टी आणि आपल्या राज्यकर्त्यांच्या इतिहासाकडे लक्ष पुरविणे अधिक अगत्याचे व लाभप्रद होईल.'[४] यावरुन पंडितांच्या नजरेपुढे महाराष्ट्र स्वदेश कल्याण साधन हा एकच विषय कसा घोळत होता हे स्पष्ट होते.

विद्याखात्यात नोकरी करीत असताना सन १८६१ ते १८६३ पर्यंत विष्णु शास्त्री पंडित पुणे पाठशाळा पत्रक चालवित होते. त्यांची नेमणूक दुसरीकडे होणार म्हणून ते पत्रक मेहेरबान कोळसाहेबर एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग यांनी नार्मल क्लासचे सुपरिटेंडेंट, केरो लक्ष्मण लुगे यांच्या ताब्यात दिले. असा उल्लेख 'इंदुप्रकाश' ता. २० जुलै १८६३ च्या अंकात आहे.'[५] पंडितांची बदली पुण्याहून धारवाडला इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापकपदी झाली. पुढे खानदेशात १८६३ मध्ये बदलून गेले. व मालेगांवी आल्यावर वर्षभरातच पंडितांच्या 'इंदुप्रकाश' च्या साप्ताहिकाचे संपादकत्व स्वीकारले व त्यानंतर त्यांनी संस्कृत व 'महाराष्ट्र धातुकोश' प्रसिध्द केला. त्याच बरोबर 'पुष्पमाला' हा एक

काव्यग्रंथही त्यांनी प्रसिध्द केला.'[६] नोकरी करता करता त्यांचे लेखनकार्य सुरु होते.

स्वभाषेच्या व परभाषेच्या अध्ययन व अध्यापनांत आयुष्याची ३८ वर्षे घालविल्यावर शिक्षण देण्याचे काम बंद करुन अखिल जनतेस स्वतःच्या विद्वत्तेचा लाभ व्हावा, या हेतूने त्यांनी 'इंदुप्रकाशच्या' धुरा हाती घेतल्या. लोकशिक्षणाचे एक प्रमुख साधन म्हणून वर्तमानपत्राच्या संपादकीय व्यवसायापुढे शिक्षकाचा व्यवसाय त्यांनी स्वखुशीने सोडला.

विष्णु शास्त्री पंडितांनी आपल्या वाङ्‌मयीन गुणांचा वापर समाजसेवेसाठी केला. पंडितांचे साहित्य, वाङ;मय लेखन हे केवळ समाजासाठीच होते. विष्णुशास्त्रींच्या एकंदरच कार्याचा आढावा घेताना त्यांचे हे ग्रंथकर्तृत्व शालेय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात पहावयास मिळते. त्याचबरोबर त्यांनी आपल्या लेखनातून काही पद्यात्मक ग्रंथही प्रकाशित केलेले पहावयास मिळतात. त्यांचे ग्रंथकर्तृत्व खालीलप्रमाणे सांगता येते.

**विष्णु शास्त्री पंडित यांनी लिहिलेले वाङ्‌मय-**

**शालेय साहित्य -**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नाना फडणवीस यांची संक्षिप्त बखर | - | मुंबई १८५९ |
| २) | हिंदुस्थानचा इतिहास भाग ३रा (मरेकृत इतिहासाचे भाषांतर) | - | मुंबई १८६१ |
| ३) | इंग्रजी-मराठी कोश | - | मुंबई १८६४ |
| ४) | संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश | - | मुंबई १८६५ |
| ५) | संस्कृत तिसरे पुस्तक (इंग्रजी) | - | मुंबई १८५९ |

**सामाजिक व धार्मिक -**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ब्राह्मणकन्या विवाह विचार | - | मुंबई १८६४ |
| २) | पुरूषयुक्त व्याख्या | - | मुंबई १८६४ |
| ३) | विवाह विचार | - | मुंबई १८६५ |

४) विधवोद्वाहविवेक (संस्कृत) - मुंबई १८६८

५) पुनर्विवाह सशास्त्र असल्याविषयी पुणे व नाशिक येथे दिलेली व्याख्याने - मुंबई १८५९

६) आर्य लोकांच्या प्राचीन व आर्वाचीन रीती व त्यांची परस्परांशी तुलना आणि द्विजनांनी नावेतून विलायतेस जाणे निर्दोश आहे या विषयावर व्याख्याने - मुंबई १८७२

७) स्मृतीशास्त्र-व्याख्यान - मुंबई १८७३

८) शूद्र धर्म - मुंबई १८७३

९) वेदातील सूर्य सावित्रीविवाह - मुंबई १८७४

१०) देवरूख्यांविषयी विचार - मुंबई १८७४

११) आयुष्य वर्तनक्रमाविषयी श्रृती स्मृतींच्या आज्ञा-व्याख्यान - मुंबई १८७५

१२) स्त्रियांचे अधिकार-व्याख्यान - मुंबई १८७५

**पद्यात्मक -**

१) तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा एक-दोन - मुंबई १८६९-७३

२) पुष्पमाला - मुंबई १८७४

३) स्त्री गायन संग्रह अथवा बायकांची गाणी - मुंबई १८८२

वरील ग्रंथ कर्तृत्व पंडितांनी निर्माण केले.`[७]

सद्यःपरिस्थितीमध्ये विष्णु शास्त्री पंडितांच्या ग्रंथसाहित्यामधील बरेचशे साहित्य उपलब्ध नाही; परंतु काही उपलब्ध व त्यांच्या साहित्याचा आलेला वेगवेगळ्या ठिकाणचा संदर्भ या प्रकरणामध्ये घेतलेला आहे.

**विष्णु शास्त्री पंडितांची साहित्यिक कामगिरी -**

**१) हिंदुस्थानचा इतिहास -**

विष्णु शास्त्री पंडित हे जवळ जवळ सोळा वर्षे विद्या खात्यात नोकरी करत होते. त्यावेळी ते `ट्रान्सलेशन एक्झीबिशनर` म्हणूनही काम पहात.

पाठ्यपुस्तकाचे भाषांतर करत असताना त्यांच्या हातून काही ग्रंथ प्रकाशित झाले. त्यापैकी दोन कोशग्रंथ आहेत व इतर दोन भाषांतरात्मक ग्रंथ आहेत.

हिंदुस्थानात इतिहासाचे ज्ञान देण्याकरिता हंटर व मरेकृत पुस्तके होती. त्यापैकी हिंदुस्थानच्या इतिहासाच्या तिसऱ्या भागाचे भाषांतर केलेले पुस्तक १८६१ मध्ये विष्णुशास्त्रींनी प्रसिध्द केले. त्याआगोदर त्यांनी म्हणजे १८५९ मध्ये नाना फडणीस यांची संक्षिप्त बखर प्रसिध्द केली होती.`[८] इंग्रजीचे भाषांतर करीत असताना मुळातील मर्म न दवडता भाषा आगदी साधीसोपी व सफाईदार ठेवण्यात पंडितांचा बाणा दिसून येतो. त्यांनी भाषांतरित केलेल्या हिंदुस्थानचा इतिहास या पुस्तकात इंग्रज आल्यापासून ते संपूर्ण भारतात राज्य स्थापन करेपर्यंतचे वर्णन केले आहे. या पुस्तकाची लेखणी अत्यंत साधी व सोपी ठेवून अतिशय मार्मिक पद्धतीचे वर्णन विष्णुशास्त्रींनी केले आहे. या पुस्तकात पहिल्या भागाची जी प्रस्तावना आहे, तीच तिसऱ्या भागात मांडलेली आहे. या पुस्तकात प्रकरण १० ते १४ यांचा समावेश केलेला असून, कर्नाटकात ब्रिटिश लोकांचा जय, म्हैसूर प्रांतात, बंगालप्रांतामध्ये जय, तसेच मराठ्यांशी युध्द कसे झाले विषयीची प्रकरणे अतिशय मूद्देसुदपणे मांडलेली आहेत.

या पुस्तकाचा मूळ उद्देश होता तो म्हणजे हिंदुस्थानातील जनतेला त्यांचा इतिहास कळावा व हिंदुस्थानात ब्रिटिशांनी आपले साम्राज्य कसे तयार केले, याचा संक्षिप्त आढावा जनतेला मिळावा. ब्रिटिशांचा साम्राज्य विस्ताराचा पहिला टप्पा यात सविस्तर वर्णन केला आहे, त्यानुसार त्यांची वाटचाल व उद्देश यांची कल्पना येते. ब्रिटिशांच्या जलपर्यटनाविषयीचा वृत्तांत यातील पाचव्या प्रकरणात आलेला आहे. तो असा की, 'समूहावर लूट करावी व्यापार करावा व नवीन देश अथवा बेटे शोधून काढावी, या उद्देशाने हे लोक जलपर्यटने करीत असत. राज्य मिळावे अथवा अधिकार मिळवावा असा त्यांचा मूळचा उद्देश नव्हता.'[९] म्हणून त्यांनी जे किल्ले बांधले ते फक्त माल ठेवण्याकरिता, जेणेकरुन त्यांना व्यापार करावयास सोपे जावे.

इ.स. १८८९ पर्यंत आपण राज्य करावे किंवा ते मिळवावे, असा कोणताही उद्देश त्यांच्या मनात नव्हता. परंतु त्यावर्णी अधिकाऱ्यांना जे हुकूम झाले त्यात असे लिहून कळविले होते की, 'आजपर्यंत व्यापाराकडे जसे आम्ही लक्ष दिले तसेच इतपर वसूल पाठविण्याकडेही देणार. हिंदुस्थानात आपले राज्य असावे, अशी आमची इच्छा आहे.'[१०] नंतरच्या कालखंडात त्यांनी काही प्रदेश भाडेतत्त्वावर अथवा विकतही घेतले व आपली सत्ता स्थापनेचा पाया घातला.

या पुस्तकात प्रकरण दहामध्ये इंग्लंड व फ्रान्स यांची लढाई, फ्रेंच लोकांनी घेतलेली ठाणी, लाबडॉने केलेल्या लढाया, तंजावरावर इंग्लंडची स्वारी, कोलरी लोक - इ.स. १७५६ तील लढाई लाली सेनेचे काम - फ्रेंचाचा पराभव याची माहिती दिली आहे.'[११]

प्रकरण बारामध्ये म्हैसूरच्या राजाबरोबर लढाया, राजाची स्थापना, देवराज व नंदराज यांचा अंमल, हैदर अली याचे धनी होणे, मराठ्यांची म्हैसूरवरील स्वारी, हैदर अलीचा मृत्यू त्याचा पुत्र टिपू गादीवर येतो, मंगळूरचा वेढा व टीपूशी तह याविषयी चर्चा केली आहे.'[१२]

प्रकरण चौदामध्ये मराठ्यांशी युध्द आणि मध्यहिंदुस्थानात इंग्लिशांचा विजय याविषयी सविस्तर चर्चा केलेली आहे. यामध्ये 'मराठ्यांचा अंमल, शाहू गादीवर बसले, बाळाजी विश्वनाथ यांची कारकीर्द, होळकर व शिंदे घराणे, पेशव्यांचा अंमल, थोरले माधवराव पेशवाईवर येतात पासून ते संपूर्ण पेशवाईच्या अस्तापर्यंत म्हणजे १८१८ पर्यंतचा इतिहास सविस्तरपणे नोंदविला आहे.'[१३] या संपूर्ण साहित्यात पंडितांच्या मार्मिक लिखाणाचा प्रत्यय येतो. अगदी लहान लहान गोष्टी जनसामान्यांना समजाव्या या हेतूने त्यांनी हे भाषांतर अगदी सविस्तर केलेले पहावयास मिळते.

**२) ब्राह्मणकन्या विवाहविचार -**

पंडिताचे सामाजिक विषयावरील प्रकाशित झालेले पहिले पुस्तक म्हणजे `ब्राह्मणकन्या विवाहविचार` हे होय. त्यामध्ये त्यांनी श्रृती, स्मृती व पुराणे यांच्या आधारें प्रौढ विवाहाचे समर्थन केले आहे. समाजामध्ये रूढी परंपरेचे महत्त्व कसे

वाढत चालले होते किंवा शास्त्राचा आधार नसलेल्या रूढींना समाज किती महत्त्व देत होता, हे त्यामध्ये पंडितानी सांगितले आहे. याचे उदाहरण देतांना पंडितांनी ब्राह्मण कन्येच्या ऋतुप्राप्तीचे दिले आहे. लग्नापूर्वी ऋतुप्राप्ती झाली असता ब्राह्मण कन्येला विवाह योग्यता येत नाही. ही समजूत कशी फोल व निराधार आहे, हे पंडितांनी या निबंधात मनुस्मृती, यमस्मृती, संस्कार कौस्तुभ, प्रयोगरत्न इत्यादी ग्रंथातील प्रमाणे देऊन स्पष्ट केले आहे.`[१४]

लेखकाची भूमिका लक्षात येण्यासाठी त्यातील एक छोटासा उतारा दिला आहे, 'कन्येस विवाहाच्या पूर्वी व विवाह होम काळी ऋतुप्राप्ती झाली असता प्रायश्चित्त सांगितले. यावरुन त्या ऋषीच्या मनी ऋतुप्रात्यत्तर विवाह काहीसा सदोष आहे, आणि ऋतुप्राप्तीच्या पूर्वीचा त्यापेक्षा विशेष प्रशस्त आहे हे अगदी उघड सिध्द होते. तथापि तो ऋतुप्राप्तीपूर्वीच झाला पाहिजे, नाही तर कन्या ब्राह्मणांतून भ्रष्ट होते'[१५] असा जो ग्रह आहे तो निर्मूल आहे हे आणि ऋतुप्राप्तीच्या पूर्वी केंव्हाही विवाह करणे सारखेच प्रशस्त आहे, हे या दोन गोष्टी वरील ग्रंथावरुन सिध्द होतात हे येथे दाखविण्यात आले आहे.

विष्णु शास्त्री पंडितांनी या गुण दोषांची चर्चा फार अभ्यासपूर्वक केलेली पहावयस मिळते. यासाठी ते कोणाचे गुरुत्त्व व लघुत्व या विषयी सांगताना दिसतात. त्यांच्या मते ज्या अर्थी विवाहापूर्वी रजोदर्शन झाले असता निष्कृती मोठीशी नाही त्या अर्थी तो दोष मोठासा नाही हे अगदी उघडपणे सिध्द होते. याचा सज्ञानांनी विचार करावा.'[१६] असे ते सांगतात. यावरुन पंडितांची अभ्यासु वृत्ती व त्यांचा परखडपणा लक्षात येतो व त्यांची समाजाबद्दलची भूमिकाही स्पष्ट होते.

**३) विधवाविवाह -**

विधवाविवाहाच्या चळवळीत विष्णु शास्त्री पंडितांनी आपले सर्व सामर्थ्य खर्च केले होते. अशातच त्यांच्या हातून या विषयावर आधारित बरेचशे लेखनही झालेले दिसते. सर्वात प्रथम त्यांनी पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या `विधवा विवाह` या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी

बंगालमध्ये पुनर्विवाहाच्या प्रश्नाला जोरदार चालना दिली, तर महाराष्ट्रात त्याचप्रमाणे पंडित विष्णुशास्त्रींनी या प्रश्नाला चालना दिली. पाराशरस्मृतीतील ज्या दोन श्लोकांवर पुनर्विवाह पक्षाची सर्व इमारत उभी आहे ते श्लोक पंडित ईश्वरचंद्रांनी प्रथम शोधून काढले व या ग्रंथाच्या वाचनानेच विष्णु शास्त्री पंडितांनाही जुन्या धर्मग्रंथाचे चिकित्सक दृष्टीने अध्ययन करण्याची स्फूर्ती मिळाली. पंडित ईश्वरचंद्रांचा ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर काशिनाथ शास्त्री अष्टपुत्रे यांनी त्याचे प्रत्रव्यवहाराद्वारे खंडण केले. त्याचप्रमाणे काशीतील चौदा पंडितांनीही विधवाविवाहाच्या खंडणासाठी `पुनर्विवाह निषेध` या नावाचा ग्रंथ लिहिला व कृष्णशास्त्री साठे यांनी त्याचे मराठीत भाषांतर केले. त्याचप्रमाणे बाळकृष्ण लक्ष्मणशास्त्री बापट यांनीही `विधवा विवाहखंडण` या नावाने ग्रंथ प्रकाशित केला. विधवाविवाहावर प्रश्नांचा दोन्ही बाजूने ऊहापोह सुरु असताना काशीच्या चौदा पंडितांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या खंडणार्थ विष्णु शास्त्री पंडितांनी `विधवोद्वाहविवेक` हा संस्कृत ग्रंथ प्रकाशित केला.`[१७] यानंतर त्यांनी या विषयावर ठिकठिकाणी व्याख्याने दिली. समाजाच्या तळागळापर्यंत आपले विचार पोहचवून लोकांच्या मनात विधवा विवाहाविषयी असणारे गैरसमज दूर करण्याचे काम केले.

**४) स्त्री पुनर्विवाह -**

पंडितांनी दिलेल्या व्याख्यानामध्ये पुणे व नाशिक येथील व्याख्यानांचा संग्रह पुस्तकरूपाने प्रसिध्द झाला. यातील संदर्भ असा की, विवाहासाठी पुरूषाच्या अंगात काही गुण असावे लागतात, सांसारिक पुरूषावर जास्त जबाबदारी असतात, त्यामुळे स्त्रीपेक्षा पुरूषात जास्त गुण आसतात व स्त्रियांच्या तुलनेत पुरूषांमध्ये कमी गुण असतात, हा समज करून घेण्यापेक्षा या गुणांचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे, असे पंडितांचे म्हणणे होते.

जरी आपण बारकाईने हे गुण पडताळून पाहिले तरी त्यामध्ये त्रृटी राहातात. मात्र, पुनर्विवाह पद्धतीमध्ये या त्रृटी भरून काढता येऊ शकतात. परंतु पुरूष ज्या पद्धतीने व सहजतेने पुनर्विवाह करू शकतो, तेव्हढी मोकळीकता

स्त्रियांना नव्हती. त्यामुळे हजारो स्त्रिया बळी पडत आहेत. कारण पुरूष वधूमुलीच्या संमंतीशिवाय विवाह करू शकतो. तसेच पुरूष पाहिजे तितक्या कमी वयाच्या मुलीशी विवाह करण्यास तयार होत असे. हेच पुरूषप्रधान संस्कृतीतील लोक विसरून गेले आहेत, असे विष्णु शास्त्री पंडितांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले आहे.

स्त्रीला पुनर्विवाहासाठी शास्त्रवचनांचा आधार असला तरी आपल्या संस्कृतीतील लोक परंपरेला किती महत्त्व देतात हे पंडितांना सांगायचे होते. याचाच अर्थ त्याकाळातील शास्त्री मंडळी त्यांना सोईस्कर असे नियम लावून स्त्रियांवर बंधने घालत होते व त्याच प्रकारचे ग्रंथ साहित्यही निर्माण करत होते. म्हणूनच अशा प्रकारच्या साहित्यास व शास्त्री मंडळीस विष्णु शास्त्री पंडितांचे साहित्य हे प्रत्युत्तर होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

असे जरी असले तरी एकंदरच त्या कालखंडात पुनर्विवाहास बराच विरोध झाला. अर्थात, विरोध करणाऱ्या शास्त्रीमंडळींनीही आपल्या पद्धतीने काही ग्रंथ प्रकाशित केले व त्यात पुनर्विवाह कसा अशास्त्रीय आहे, असे दाखवून दिले. याचीच काही उदाहरणे आपल्या पुस्तकात नमूद करून पंडितांनी त्यावर चर्चा केली आहे. तसेच व्याख्यानाद्वारे पंडितांनी स्त्री पुनर्विवाह कसा सशास्त्र आहे हे पटवून दिले आहे. विरोधकाच्या तोंडाला तोंड देऊन विष्णु शास्त्री पंडित त्यांच्याशी वाद घालत व पुनर्विवाहाची बाजू स्पष्टपणे मांडत. पुनर्विवाहाविषयी विरोधकाचा विरोधी त्यांच्या पुनर्विवाह निषेदपर वाक्यांवरून लक्षात येतो.

**वाक्य -**

१) कलौ पुनर्विवाहातून कुर्यादिती गालव?

भावार्थ : कलयुगात पुनर्विवाह करू नये असे गालव म्हणतो.

२) क्रांत सप्तपंदा कन्या नोद्वेहेच्य कलौ युगे। वायवी

भावार्थ : सप्तपदी झालेल्या कन्येशी पुनर्विवाह कलयुगात करू नये.

३) कृते सप्तपदे भर्तुवियोगी यदि जयते नदेया पुनरन्यस्मै कलौ कन्या मनीषिमी।। बाभ्रव्य

भावार्थ : सप्तपदी विधी झाल्यावर भर्त्याचा वियोग झाल्यास दुसऱ्यास देऊ नये.`[१८]

विरोधकांनी कितीही निषेधपर विधाने लिहिली तरी वेळोवेळी पंडितांनी शास्त्राचा आधार घेऊन खंडण केले. खंडण करत असताना पंडितांनी घेतलेला शास्त्राचा आधार याची काही उदाहरणे पहावयास मिळतात.``पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही पुनर्विवाहास स्पष्टपणे मोकळीक दिली आहे. ही मोकळीक देणारा साक्षात वेदपुरूष आहे. व मनु, कात्यायन, वशिष्ठ, प्रजापती, शातातप, नारद, हारीत व पराशर हे आठ महर्षी आहेत.`[१९] पंडितांचे विचार अतिशय चिकित्सक होते याचा प्रत्यय येतो.

**५) आर्य लोकांच्या प्राचीन व आर्वाचीन रीती -**

पुणे येथे झालेल्या फ्रेंडली मिटींगपुढे पंडितांनी जी व्याख्याने दिली त्यांचा समावेश या पुस्तकात केलेला पहावयास मिळतो. यातील पहिल्या व्याख्यानात प्राचीन व अर्वाचीन चालीरीतींची तुलना करून पूर्वकालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांचे हक्क अबाधित राखण्याची किती दक्षता घेण्यात आली होती ते साधार स्पष्ट केले आहे. पूर्वी स्त्रियांना देखील वेद अध्ययनाचा अधिकार होता. मुलींच्या समंतीशीवाय वराची निवड करण्यास मनाई होती. कन्या विक्रयाच्या चालींचा ठिकठिकाणी तीव्र निषेध केला जात होता. या काळात प्रौढविवाहाची प्रथा सर्रास रूढ होती. अशा व इतर अनेक गोष्टींचा त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे श्रृती, स्मृतीप्रणीत राजधर्माचे स्वरूप विषद करून राजरजवाडयांची सौम्य शब्दात हजेरी विष्णुशास्त्रींनी घेतली आहे.

ज्ञानार्जनासाठी परदेशगमन शास्त्रदृष्ट्या निषिद्ध नाही, या मुद्दयांचे थोडक्यात विवेचन केले आहे. त्याचप्रमाणे रोटी व्यवहार व बेटी व्यवहार या दोन्ही बाबतीत जातिभेदाचे निर्बंध पूर्वी आजच्या इतके कडक पाळले जात नव्हते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

प्राचीनकाळी विवाहसंबंधात जातिभेद व वर्णभेद मानत नव्हते, असे धर्मशास्त्रावरून व त्याकाळच्या व्यवहारावरून निर्विवादपणे सिध्द होते. ब्राह्मणास - ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र या चार वर्णांच्या, क्षत्रियास - क्षत्रिय, वैश्य व शूद्र या तीन वर्णाच्या, वैश्याय - वैश्य व शूद्र या दोन वर्णाच्या व शुद्रास -शूद्र वर्णाच्या बायका करण्याची आज्ञा दिली आहे. व ती प्राचीनकाळी सुरु होती, असे मन्वादि सर्व स्मृतींच्या आचाराध्यायांतील व व्यवहाराध्यायातील वचनांवरून स्पष्ट होते. या शिवाय क्षत्रिय वंशातील पुरूषही ब्राह्मण वर्णाच्या बायका करत असे, असे इतिहासात आढळते. ही चाल फार चांगली व सुखावह होती. ती अर्वाचीन काळी बंद झाली. ती पुन्हाः चालू करण्यासाठी संर्वांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असे पंडितांचे म्हणणे होते.`[२०]

**६) स्मृतिशास्त्र -**

विष्णु शास्त्री पंडितांनी ११ एप्रिल १८७३ रोजी मराठी ज्ञानप्रसारक सभेमध्ये 'स्मृतिशास्त्र' या विषयावर विचारप्रवर्तक व्याख्यान दिले. ते विविधज्ञात विस्तारांत प्रसिध्द झाले आहे. या भाषणात त्यांनी युरोपीयन पंडितांच्या भाषांतरावर अवलंबून न राहता स्वतंत्र रीतीने स्मृतिग्रंथांचा अभ्यास करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. पंडितांच्या व्याख्यानात सूक्ष्म व शोधक बुध्दीचे पुरावे आढळतात. त्यांनी श्रुती व स्मृती यांच्या प्रामाण्याची मीमांसा करुन स्मृतिग्रंथाचे स्वरुप सविस्तर स्पष्ट केले आहे. त्यात त्यांनी वर्णव्यवस्था व स्त्रियांसंबंधीचा प्राचीन शास्त्राकारांचा दृष्टिकोन स्पष्ट केलेला आहे.

त्यावरील अभ्यासावर बोलताना ते म्हणतात, 'धर्मशास्त्राचे खरे मर्म समजण्यासाठी साक्षात श्रृती व स्मृती यांचा अभ्यास केला पाहिजे. फक्त व्याख्यानावर भरवसा ठेवणे उपयोगाचे नाही, तसेच युरोपियन लोकांची भाषांतरे किती चांगली असली तरी त्यांच्याद्वारे मूळ ग्रंथाचे यथार्थज्ञान कधीही होणार नाही.'[२१] त्यांची कित्येक भाषंतरे चुकीची आहेत व त्यांना त्याचा फारसा

अभ्यास नसल्याने त्यावर विश्वास ठेवणेही चुकीचे आहे, असे पंडितांचे म्हणणे होते.

पंडितांनी १२ मार्च १८७४ रोजी पुन्हा एक व्याख्यान 'आयुष्यवर्तन क्रमाविषयी श्रुती स्मृतीच्या आज्ञा' या विषयावर दिले. या व्याख्यानात प्रथम पंडितांनी सृष्टीच्या उत्पत्तीविषयी श्रुतीचा अभिप्राय सांगितला व त्यात त्यांनी विराटस्वरुपाच्या चार भवयवांच्या ठिकाणी चतुर्वर्णात्मक सृष्टीची योजना या विषयी माहिती सांगितली आहे. नंतर त्यांनी चारही आश्रमांचा निर्देश करुन ब्रह्माचर्य व गृहस्थाश्रम या दोघांचे प्रामुख्याने विवेचन केले आहे. अध्ययनाविषयी सांगताना ते म्हणतात की, फक्त पाठांतर व्यर्थ आहे व अर्थज्ञान झाल्यावाचून अध्ययनाची समाप्तीच होत नाही, असे श्रुत स्मृतीचे खरे मत आहे. यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.'[२२] लोकांना धर्मशिक्षणाची आवश्यकता आहे हे उघडच आहे. परंतु विद्याभ्यासाचे काम केवळ राजाच्याच हातात राहील आणि तो राजा व प्रजा ही उभयता एक धर्माची नसतील तेंव्हा धर्मसंबंधी शिक्षणाची न्यूनता अथवा हयगय होऊन लोकांत धर्माविषयी अज्ञान पसरुन ते धर्मरहित अथवा परधर्माश्रित होतील. हे हल्लीच्या स्थितीवरुन सहज लक्षात येते, असे पंडितांचे म्हणणे होते.

त्याचप्रमाणे पंडितांनी स्त्रियांचे अधिकार या विषयावर ज्ञानप्रसारक सभेपुढे ५ मार्च १८७५ रोजी आणखी एक व्याख्यान दिले. त्यात त्यांनी स्त्री जीवनाविषयक अनेक प्रश्न उपस्थित करून त्यांची शास्त्रशुध्द चर्चा केली. या व्याख्यानावरून असे दिसते की, पंडितांनी हा प्रश्न किती जोमाने समाजासमोर मांडला हे दिसून येते. लोकनिंदेची कोणतीही पर्वा न करता समाजाच्या तळागळापर्यंत त्यांनी या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली. सामान्यजनांचा बुध्दिभेद करण्यापेक्षा धर्मवचनांच्या आधारानेच न्याय्य सुधारणांचे समर्थन केल्यास ते अधिक परिणामकारक होईल असे त्यांनी सुरूवातीलाच म्हटले आहे. समाज जीवनात स्त्री आणि पुरूष या दोघांचेही अधिकार, सारखेच आहेत पूर्वीच्या काळी स्त्रियांना उपनयन संस्काराचाही अधिकार होता. त्याचप्रमाणे वेद

अध्ययनाचाही पुरूषाच्या बरोबरीने अधिकार होता. विवाह करणे अथवा न करणे हे स्त्रियांच्या मर्जीवर अवलंबून होते. तसेच त्याला कोणत्याही शास्त्राचे बंधन नव्हते. म्हणजेच कन्येच्या संमतीशिवाय विवाहास मान्यता नव्हती. तिच्या इच्छेनुसार वराची पसंती झाली, तरच तिचा विवाह होत असे, अन्यथा तिला आयुष्यभर अविवाहित राहण्याचा अधिकारही होता.

त्यांना शास्त्रांचे कोणतेही बंधन नव्हते. विवाहाच्या बाबतीत मुख्य विचार व संमती कन्येचीच असली पाहिजे आणि तिच्या इच्छेनुसारच वराची योजना झाली पाहिजे, अशा प्रकारे अनेक मुद्द्यांवर पंडितांनी या व्याख्यानात चर्चा केली आहे.

आपणास पसंत आहे म्हणून कन्येस पसंद असेल, हे गृहीत धरुन पित्याने मुला-मुलींचे विवाह करु नये, असे पंडित सांगतात. त्यांना जे पसंद असेल त्याच वधू-वराने आपल्या पसंतीने विवाह करावा व तशी मोकळीक पित्याने द्यावी. उगीच त्यांच्यावर बळजबरी करुन दोनाचे चार हात करु नयेत. याला नियमांचीही आज्ञा आहे व तसा स्त्रियांचा अधिकार आहे. तसे न झाल्यास पित्याने त्या कन्येला जन्मभर अविवाहित ठेवावी, परंतु अयोग्य वरास तिला देऊ नये, असे 'मनूने' स्पष्ट सांगितले आहे.'[२३] मनुस्मृतीत स्त्रियांविषयी चांगले विचार मनूने मांडले आहेत, तिच्या हिताचा विचार व्हावा, असे मनू म्हणतो.

स्त्रियांच्या अगदी लहान-लहान गोष्टींकडे पंडितांनी लक्ष देऊन, त्याला शास्त्राचा आधार घेऊन ते समाजाच्या पचनी उतरविण्याचा प्रयत्न पंडितांनी अहोरात्र केला. त्यासाठी त्यांनी लेखन, चर्चा व कीर्तने या सारख्या गोष्टींचा वापर करुन समाजाला खऱ्या ज्ञानाची ओळख पटवून दिली व समाजातील दुबळ्या घटकाला स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

**७) पुष्पमाला -**

लेखन, भाषणे, चर्चा या मार्गाने पंडितांनी अवलंब तर केलाच शिवाय देशात सुधारणेसाठी कीर्तने करण्याचाही उपक्रम केला. अशा कीर्तनाच्या माध्यमातून ते अनेक समाजोपयोगी विषयांचे निरूपण करत असत. त्यासाठी

त्यांनी निरनिराळ्या वृत्तांची बरीच पद्येही तयार केली होती व त्यातील काही पद्यांचा त्यांनी पुस्तकरूपाने संग्रह केला होता. त्यांच्या पद्यात्मक पुस्तकाचे उदाहरण म्हणजेच पुष्पमाला होय. पंडितांच्या पुष्पमालेतील काही पद्यांवर नजर टाकली तर त्यावर पंडितांची दृष्टी किती शुध्द व व्यापक होती हे लक्षात येते. सामान्य हरदासी पद्यांप्रमाणेच या पद्यांची रचना आहे.[२४]

विष्णु शास्त्री पंडितांनी महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सुधारणेचा प्रश्न प्रामुख्याने हाती घेतला असला तरी त्यांनी सामाजिक जीवनाच्या इतर अंगाची कधी उपेक्षा केली नाही. लोकांच्या रोमारोमात भिनलेल्या दास्यवृत्तीची त्यांना मनापासून चिड होती. समाजातील दैन्य आणि दुर्बलता, अन्याय आणि विषमता याकडे पाहून त्यांचे अंतःकरण तिळतिळ तुटत होते. म्हणूनच बदलत्या परिस्थितीकडे पाहून आपल्या देशाच्या कल्याणासाठी आपणच कसे प्रयत्न केले पाहिजे याची जाणीव ते आपल्या कीर्तनातून वेळोवेळी समाजाला करून देत असत आणि म्हणूनच त्यांनी आपल्या पुष्पमाला या पद्यग्रंथात विविध विषयांचा समावेश केलेला दिसतो. उदा. ज्ञानाची श्रेष्ठता, एकीची आवश्यकता, व्यापारधंद्याचे महत्त्व, मद्‌यपानाचे दुष्परिणाम इ. अनेक विविध विषयांचा त्यांनी आपल्या पुष्पमालेतील पद्यांत समावेश केलेला आहे.[२५]

समाजाने ऐक्याचे रोप लावून अपापसातील भेद विसरून आपापसात प्रेम वाढवावे व बंधुभावाने वागावे, असा संदेश पंडित आपल्या या पद्यात देतात. आतापर्यंत आपण जे वागलो, त्यामुळे त्याचा फायदा इतरांना झाला. आता एकत्र येऊन स्वहित साधू व देशसेवा करू, असाही संदेश ते आपल्या काव्यात देतात.

**८) तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा -**

सन १८६९ हे वर्ष विष्णु शास्त्री पंडितांच्या चरित्रात मुंबई सरकारच्या मदतीने जी तुकारामची अभंगाची गाथा प्रसिध्द केली, त्याबद्दल प्रसिध्द आहे. पंडितांच्या जीवनातील हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. ही गाथा त्यांनी दोन भागात प्रसिध्द केली. या कामात त्यांना शंकर पांडुरंग पंडित यांचे सहकार्य

लाभले होते. त्यांनी तळेगाव, देहू, पंढरपूर, कडूस या चार ठिकाणच्या प्रती गोळा करून त्यांच्या सहाय्याने ग्रंथाचे पाठ निश्चित केले. अशा चिकित्सक दृष्टीने ग्रंथ संपादित करण्याचा हा मराठी भाषेतील पहिलाच प्रयत्न होय. या ग्रंथाला तुकाराम महाराजांचे इंग्रजी व मराठी चरित्र जोडलेले आहे. मराठी चरित्र हे ७६ पानांचे असून ते विष्णु शास्त्री पंडितांनी लिहिले आहे.

त्याकाळी बऱ्याच विद्वानांनी आपापल्या परीने तुकारामाचे अभंग छापण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये शुद्धतेचा अभाव होता. त्यामुळेच त्याचा फायदा घेऊन ख्रिस्ती मिशनऱ्यांनी लोकांची मने वारकरी संप्रदायाकडून ख्रिस्ती धर्माकडे वळविण्याचा प्रयत्न केला. याकाळात इंग्रजी मिशनऱ्यांनी व सुसंस्कृत इंग्रजी अधिकाऱ्यांनी आपले लक्ष तुकारामाकडे वेधले होते. त्यांनी तुकारामांचा चांगला अभ्यास करून त्यांच्या अभंगाची व त्यांच्या चरित्राची काही भाषांतरे छापण्यास सुरूवात केली होती. याचेच उदाहरण म्हणजे मरे मिचेल या महाराष्ट्रात मुरलेल्या मिशनऱ्यानी महिपतीच्या तुकाराम चरित्राचा इंग्रजी गोषवारा आपल्या प्रस्तावनेसह १८४९ मध्ये मुंबईच्या `रॉयल एसियाटिक` सोसायटीच्या जर्नलमध्ये छापला होता. या मिशनऱ्यांचा तुकारामाबद्दलचा व्यासंग इतका गाढा होता की त्याला स्वतः मराठीत अभंग रचता येऊ लागले होते.`[२६] थोडक्यात, तुकारामांच्या अभंगाची गोडी लागावी तसेच हिंदूंचा ख्रिस्ती धर्माकडे असलेला ओढा त्यांना कमी करावयाचा होता.

त्यानंतर त्यावेळचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इंन्स्ट्रक्शन सर अलेक्झांडर ग्रँट या साहेबाने जानेवारी १८६७ च्या फॉर्टनाइटली रिव्ह्यु मध्ये तुकारामावर एक निबंध प्रसिध्द केला होता. इंग्रजांना तुकारामाची यथायोग्य ओळख करून द्यावी हा निबंधाच्या मागचा हेतू होता. निबंधात ग्रँट साहेबांनी तुकारामाच्या काही निवडक अभंगाची पद्यात्मक भाषांतरे दिली होती. या ग्रँट साहेबांची तुकारामांवर किती भक्ती होती हे त्या निबंधातील खाली दिलेल्या एका भाषांतरित वाक्यावरून स्पष्ट होते. `तुकारामच्या अभंगाची डेव्हिडच्या गीतांशी (Psalms) तुलना केली जाते. हे अभंग म्हणजे देवाच्या सतत सानिध्यात

असलेल्या निरनिराळ्या प्रसंगी आणि वगेवेगळ्या भावनांच्या आवेशात पक्ष्यांच्या कुंजनाप्रमाणे सहज गाईलेले उद्‌गार होत. ज्यांच्या मुखी तुकारामची वाणी आहे अशांना नैतिकदृष्ट्या ख्रिस्ती धर्म श्रेष्ठ आहे हे पटवून सांगणे दुरापास्त आहे.`[२७]

इंग्रजी लोकांना देखील तुकारामांचे अभंग वेड लावीत होते, याचा प्रत्यय येतो. आणि विशेष म्हणजे हा पद्यग्रंथ विष्णुशास्त्रींनी छापला हे महत्त्वाचे आहे.

सर बार्टल फ्रिअर हे मुंबईचे गव्हर्नर असताना याच ग्रँट साहेबाच्या प्रेरणेने त्यावेळच्या मुंबई सरकारने तुकारामाची संशोधित आवृत्ती तयार करून प्रसिध्द करण्याचे ठरविले. त्याचे संपादनाचे काम संस्कृत व मराठी भाषेत पारंगत असलेले विष्णु परशुराम पंडित यांच्यावर सोपविण्यात आले व संस्कृत, प्राकृत भाषांचे तज्ज्ञ वैदिक विद्वान, सुप्रसिध्द पंडित, शंकर पांडुरंग पंडित त्यावेळचे दक्षिणा प्राइझ कमेटीचे चिटणीस यांनी हे लेखन तपासून पाहिले. नंतर ही गाथा 'इंदुप्रकाश' छापखान्यात मुंबई सरकारच्या मदतीने छापून दोन भागात १८६९ व १८७३ साली प्रसिध्द केली. त्यावेळी मुंबई सरकारने यावर चोवीस हजार रूपये खर्च केले होते. असे असले तरी या कामात पंडितांचे योगदान अतिशय मोलाचे होते हे मान्य करावे लागते.

**९) पार्वतीपरिणय नाटक -**

विष्णुशास्त्रींना साहित्याबरोबरच कलेविषयीही आदर होता. त्यांना कलेविषयी असणारा आदर त्यांच्या लिखानांतून व साहित्यातून नेहमीच स्पष्ट होतो. म्हणूनच त्यांनी आपल्या या कला गुणांचा वापर जनहितासाठी केलेला पहावयास मिळतो. त्याचाच एक भाग म्हणून आपण त्यांनी भाषांतरित केलेल्या 'पार्वतीपरिणय' नाटकाकडे पाहू शकतो.

या पुस्तकांत त्यांनी संस्कृत मूळ ग्रंथ आणि त्यांचे प्राकृत भाषांतर अशी दोन्ही छापली आहेत. डाव्या पृष्ठावर संस्कृत आणि त्याच्या समोर उजव्या पृष्ठावर प्राकृत असा क्रमाने ते लिहिले आहे.'[२८]

हे मूळ नाटक परशुराम बल्लाळ गोडबोले यांनी १८६९ मध्ये लिहिले व पुढे याचेच भाषांतर विष्णुशास्त्रींनी प्राकृतमध्ये करुन दिले व १८७२ मध्ये ते 'इंदुप्रकाश' छापखान्यात छापून प्रसिध्द करण्यात आले.

**१०) स्त्रीगायनसंग्रह अथवा बायकांची गाणी -**

इंग्रज राजवटीत ज्या स्त्रिया लेखन वाचनात निपुण झाल्या, त्यांनी आपल्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव दिला व परिस्थिती समजून कित्येकांनी स्वतः काही गाणी रचली व काही पुरुषांकडून ती रचवून घेतली. अशी सर्व गाणी जी समाजरचनेचा पाया होती व परिस्थितीची ओळख पटवून देतात ही सर्व गाणी मोठ्या  कष्टाने विष्णुशास्त्रींनी गोळा करुन ठेवली. यावरुन विष्णुशास्त्रींच्या चिकित्सक बुध्दीचा प्रत्यय येतो. त्यांनी ती गोळा करुन आपल्या मायबोलीचा आपल्या भाषेचा, संस्कृतीचा जो अभ्यास केला तो समाजोपयोगी पडेल. समाजाला त्याचा फायदा होईल यासाठीच केला.

विष्णुशास्त्रींच्या मृत्यूनंतर म्हणजे १८७६ नंतर त्यांच्या बंधूने म्हणजे रा.रा. सखाराम परशुराम पंडित यांनी 'इंदुप्रकाश' छापखान्यात छापून मुंबई येथे १८८२ मध्ये प्रसिध्द केला.'[२९]

या बायकांच्या गाण्यांचा विषय हा अगदीच प्राकृत होता. यातील प्रमुख विषय 'जिवा गाणी ही, मुरली, फुल, विनोद, राधिका, कृष्णरुक्मिणीसंवाद, गवळणी, पद, रात्रक्रीडा, नारदी, चंद्रावळी, अष्टनायका' या संबंधीच्या श्रृंगारावर विषयावरील आहेत.'[३०]

**लाडकी -**

विष्णू शास्त्री पंडीतयांनी बायकांची गाणी लिहिताना काही श्रृंगारपर लिखाण केलेले आढळते त्यातील लाडकी पद्य हे एक उदाहरण.[३१]

**११) लघुनिबंधमाला -**

याशिवाय विष्णु शास्त्री पंडितांनी 'लघुनिबंधमाला' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाचा विषय व आशय हा केवळ मनोरंजनपर आहे. याविषयी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत पंडित लिहितात, 'मनोरंजन आणि बहुश्रुतपणा या दोन्ही

गोष्टी मनुष्याच्या सुखास आवश्यक आहेत आणि त्यांचा थोडासा तरी पुरवठा आपणाकडून जनांस व्हावा या हेतूने हे पुस्तक लिहिले आहे.'[३२]

अशाच मनोरंजक वृत्तांतून लिहिलेला उतारा खालील प्रमाणे

डायोजिनिसाला एकाने विचारले, 'महाराज श्रीमान लोकांकडे पंडित लोक जाताना हमेशा आढळतात, परंतु पंडितांकडे श्रीमंत लोक कधी जात नाहीत. याचे कारण काय? त्याने उत्तर दिले, 'बाबा, आपणास काय काय पाहिजे हे विद्वानास समजते आणि श्रीमंतास समजत नाही हेच त्याचे कारण.'[३३]

या व अनेक युक्त्या या पुस्तकात पहावयास मिळतात. त्यांचा व्यवस्थित अभ्यास करुन पंडितांनी त्यांची मांडणी केलेली दिसते.

**१२) संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोष - (पुणे मराठी ग्रंथालय, पुणे या ठिकाणी जीर्ण स्वरुपात उपलब्ध आहे)**

विष्णु शास्त्री पंडितांनी हा धातुकोष केवळ धातूची माहिती जनसामान्यांना मिळावी व त्याचा अर्थ महाराष्ट्रातील जनतेला समजावा, यासाठी लिहिलेला दिसतो.

कौमुदीमध्ये अथवा धातुपाठामध्ये अमुकच धातू पाहू म्हटल्यावर लवकर सापडत नाही, याकरिता या कोशात वर्णक्रमाने धातूंची नावे लिहिली आहेत. त्याशिवाय या कोशापासून प्रत्येक धातूचे अनुबंध गण, अर्थ, आणि त्या धातूपासून झालेले काही शब्द हे वाचनाऱ्यांस व्यवस्थित समजतील, अशा शब्दात भाषेत हा कोश पंडितांनी लिहिला आहे.

या कोशात पंडितांनी प्रथमतः अनुबंधरहित धातू मोठ्या अक्षरात लिहिला आहे. त्यापुढे कंसामध्ये अनुबंध दाखविले आहेत. याजपैकी स्वरुप अनुबंध, अनुदात्त व स्वरीत असल्यास ते यथाक्रम खाली अथवा अडवा व वर उभा असे स्वर देऊन दाखविले आहे.'[३४]

पंडितांचा साहित्यापाठीमागचा उद्देश हा केवळ 'लोकशिक्षण' हाच होता. त्याच अनुषंगाने त्यांनी आपले साहित्य हे वेगवेगळ्या अंगाने लिहून त्यांनी एका

प्रकारे जनसेवाच केली आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व वाङ्:मयीन कार्य हे स्थूलमानाने अत्यंत असाधारणच आहे, असे म्हणावे लागेल.

**पंडितांचे साहित्यातील समाजसुधारणे विषयीचे विचार -**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात ज्या अनेक लहान मोठ्या धार्मिक व सामाजिक चळवळी झाल्या, त्यांचा उगम बहुदा ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या धर्मप्रचारांतूचन झालेला आढळतो. तत्कालीन परिस्थितीत याचा परिणाम समाजव्यवस्थेवर झालेला पहावयास मिळतो. त्यात इंग्रजी शिक्षणाने आणखीन भर घातली व धार्मिक चिकित्सा करण्यास समाजसुधारकांना भाग पाडले.

आपल्या परंपरागत समाजरचनेत काही दोष असतील ही कल्पना त्याकाळी सहन न होणारी होती, परंतु काही नवशिक्षित तरुणांच्या सुधारणावादी विचारांमुळे त्यांची गरज जास्त वाढू लागली. त्यात बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, म. फुले, विष्णु शास्त्री पंडित या सारखे पंडितांची विचारसरणी व चिकित्सक बुध्दिमत्ता यामुळे त्यांचे वेगळेपण नेहमीच जाणवले.

त्यांच्या मते, 'समाजसुधारणेच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करुन लोकांचे मतपरिवर्तन होणे शक्य नाही. याची त्यांना पूर्ण खात्री होती. म्हणूनच स्त्रीजातीच्या उन्नतीसाठी आपले शक्तीसर्वस्व वेचण्याचा त्यांनी निश्चय केला. व लोक निंद्रेच्या निष्ठुर आघातांना न जुमानता त्यांनी तो आमरण पाळला.'[३५]

ज्या ज्या वेळेला त्यांच्यावर कसोटीची वेळ आली तेंव्हा त्यांनी इतर समाजसुधारकांसारखी कच न खात आपली तत्त्वनिष्ठा पाळली व समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण करुन दिला. त्याचबरोबर समाजसुधारणेच्या कार्यात त्यांनी आपल्या लेखन, व्याख्यान चर्चा व कीर्तन या गुणांना वावर करुन समाज परिवर्तन साधण्याचा प्रयत्न केला.

स्त्रीउन्नतीसाठी आपले आयुष्य वेचले असले तरी सर्वात दीनदुबळ्या स्त्रियांच्या प्रश्नांवर त्यांनी जास्त भर दिला.'[३६] त्यांनी शास्त्रांचा चिकित्सकपणे अभ्यास करुन हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा परंपरा यांच्या विरोधात जास्तच चर्चा केली व महिलांना त्यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला.

त्यांची दृष्टी अत्यंत व्यापक होती. समाजजीवनाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक क्षेत्रात सुधारणेविषयी त्यांना सारखीच तळमळ होती हे नेहमीच जाणवते.

सरकारी नोकरी सोडल्यापासून पंडितांनी आपले सर्व लक्ष स्त्रियांच्या सुधारणेकडे वळविले. त्यासाठी त्यांनी गावोगावी व्याख्याने दिली. अनेक ग्रंथ संपदा तयार केली. शेकडो लेख प्रसिध्द केले. अबालवृध्दांशी खुल्या दिलाने वारंवार चर्चा केली. मतप्रचाराचे एकही साधन त्यांनी सोडले नाही. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, बालविवाह, जरठकुमारी विवाह, परदेशगमन, जातिभेद, इत्यादी अनेक प्रश्नांची त्यांनी आपल्या लेखांतून सातत्याने चर्चा केली. त्यांचे सर्व विवेचन जुन्या धर्मग्रंथावर आधारित आहे व त्याच आधारे त्यांनी आपली मते बनविली होती.'[३७] त्यांच्याशी वाद करतानाही मोठमोठ्या शास्त्रज्ञांचीही तारांबळ उडत असे. त्यांची भाषा खडबडीत होती पण सरळ व सोपी होती. त्यांच्या प्रत्येक लेखांत त्यांच्या अंतःकरणाची तळमळ, आत्मविश्वास, शोधकता स्पष्ट दिसून येते.

त्यांनी आपल्या लिखानातून वा व्याख्यानांतून बरेच आदर्शवादी विचार मांडले उदा.

१) ब्राह्मणकन्येचा विवाह विचार.

२) मुलींच्या प्रौढविवाहाचे समर्थन केले.

३) ऋतुप्राप्तीनंतर लग्नाचा विचार व याला शास्त्राचा आधार.

४) विधवेचा पुनर्विवाह करण्याचा विचार व त्या बाबत प्रत्यक्षात सुधारणा.

५) विवाह होण्याविषयी पुरुषांच्या व स्त्रियांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा विचार.

६) चुकीच्या गुणदोषांवरुन स्त्रियांना पुनः विवाह करण्याची मोकळीक.

७) मुला-मुलींच्या संमतीशिवाय विवाहाचा विचार करणे चुकीची आहे हा आदर्शवादी विचार.

८) विवाहसंबंधात जातिभेद, वर्णभेद न मानता विवाहाच्या मान्यता.

९) समाजजीवनात स्त्री व पुरुषाचे महत्त्व सारखेच असावे.

१०) पंडितांनी साहित्यातून समाजसेवेचा विचार मांडला.

११) स्त्रीशिक्षणाचा विचार मांडून त्यांनी त्या बाबत धर्माशी सांगड घातली.

१२) समाजातील सर्वच अनिष्ट प्रथा परंपरांचा त्यांनी जाहीर सभेत तिरस्कार करुन त्या शास्त्राधारे कशा चुकीच्या आहेत हे सांगितले.

१३) समाजात सुधारणावादी बोलण्यात वेळ घालविण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून क्रांतीचा विचार मांडावा, हा मोलाचा सल्ला त्यांनी समाजाला दिला.

१४) त्यांनी स्वतः एक आदर्श समाजाला दाखवून समाजाच्या अनिष्ट प्रथांवर घाव घतला व आपल्या तत्त्वांचे पालन कसे करावे, याचे उदाहरण जगाला दाखवून दिले. आणि म्हणूनच अर्वाचित महाराष्ट्रातील तत्त्वनिष्ठ सुधारकांच्या मालिकेत त्यांना अग्रस्थान दिले गेले.'[३८]

**सारांश –**

विष्णु शास्त्री पंडितांची कीर्ती इतरांपेक्षा वेगळी होती. लोकजागृतीचे प्रभावी माध्यम म्हणून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाची धुरा हाती घेतली.

लेखन, व्याख्यान, चर्चा आणि कीर्तन या चार माध्यमातून त्यांनी लोक जागृतीचे कार्य केले.

शिक्षणानंतर तरूण पिढीने चाकरी करत बसण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठीच काम करावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी स्वतः शैक्षणिक, सामाजिक व वाङ्‌मयीन क्षेत्रात मोलाचे योगदान दिले होते.

स्त्री जातीच्या न्याय हक्कासाठी सतत बारा वर्ष ते जीर्णमतवादी पक्षाशी झटत होते व हे कार्य करत असताना त्यांनी कधी लोकनिंदेची पर्वा केली नाही.

विष्णु शास्त्री पंडितांच्या विचार, उच्चार व आचारामध्ये एकवाक्यता होती ही गोष्ट त्यांच्या शत्रूलाही मान्य करावी लागली.

त्यांची वेदक शक्ती व संघटना चातुर्य अलौकिक होते.

त्यांचे शालेय साहित्य, सामाजिक व धार्मिक साहित्य व काही पद्यात्मक साहित्य पहावयास मिळते.

समाजकार्यात सहकाऱ्यांचा अंगचुकारपणा त्यांनी कधी माफ केला नाही. त्यावर ते कडक शब्दात त्यांची संभावना करत असत.

समाजकार्य करत असताना त्यांनी समाजासमोर आदर्श ठेवलेला दिसून येतो.

## संदर्भ सूची


१) श्री पंडित स., `विष्णु परशुराम पंडित यांचे चरित्र,` पृष्ठ - ०५

२) कित्ता; पृष्ठ - ०९

३) कित्ता; पृष्ठ - ०९.

४) कित्ता; पृष्ठ - १०.

५) कित्ता; पृष्ठ - १०-११.

६) प्रा. पाटील व्ही.बी., 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास', पृष्ठ - १३८.

७) सरदार गं. बा., `महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी`, पृष्ठ - १३५, ३६,

८) कित्ता; पृष्ठ - १३७

९) पंडित विष्णु शास्त्री (यांनी भाषांतरित केलेला, मूळ पुस्तक इंग्लिश भाषेत मरेसाहेब यांनी केले) हिंदुस्थानचा इतिहास भाग तिसरा, पृष्ठ- २-३.

१०) कित्ता; पृष्ठ - २-३.

११) कित्ता; पृष्ठ - १.

१२) कित्ता; पृष्ठ - ८८-८९.

१३) कित्ता; पृष्ठ - २३६-२३७.

१४) सरदार गं.भा., पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३७.

१५) कित्ता; पृष्ठ - १६८.

१६) कित्ता; पृष्ठ - १६८-१६९.

१७) कित्ता; पृष्ठ - १६९

१८) पंडित वि. शा, `स्त्री पुनर्विवाह`, (सशास्त्र असल्याविषयी पुणे व नाशिक येथील व्याख्याने), पृष्ठ - २६

१९) सरदार गं.बा., पूर्वोक्त, पृष्ठ - १७०-१७१.

२०) कित्ता; पृष्ठ - १७१.

२१)	सरदार गं.बा. 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', पृष्ठ - १७२.

२२)	कित्ता;  पृष्ठ - १७३.

२३)	श्री. पंडित विद्याधर, ' हिंदुधर्म आणि सुधारणा', पृष्ठ - १७०-१७१.

२४)	पंडित वि.शा., 'पुष्पमाला', (काव्य), पृष्ठ - ०३.

(विष्णू परशुराम शास्त्री पंडीत यांच्या पुष्पमाला काव्यातील काही पंक्ति उदा -

``नाही कंठामाजी गोडी। नाही वकृत्वाची प्रौढी।।
येथे उद्देश प्रधान। त्याशी द्यावा सकळी मान।।
नाही ताल स्वर ज्ञान। नाही गायण साधन ।।
नाही कवना माझी छंद। नाही प्रतिमेचाही गंध।।
नाही काव्याचा अभ्यास । तरी न व्हावे उदास।।
मित्र विनवी जवी भृंगा। व्हावे मकरंदी दंग।।``
``कोणी लोटा किंवा वारा। परी येवू तुमच्या दारा।।
आम्ही होऊनी गोसावी। फेरी करू गावोगावी।।
ठाई ठाई हाका मारू। निजलीया जागे करू।।
देश जननीचे बंधे । होवूनी करू हेची धंदे।।
मित्र म्हणे हा निर्धार । सिध्दीदाता जगदीश्वर।।)

२५)	कित्ता;  पृष्ठ - ४४-४५.

(विष्णू शास्त्री पंडीत यांनी ज्ञानाची श्रेष्ठता एकीची आवश्यकता व्यापार धंद्याचे महत्व सांगताना पुष्पमालेत काही पंक्ति लिहिल्या आहेत.

``भरतखंडा माजि हा भेद झाला,
नाराकारी अनुभाव पुर्ण आला।
बोलताना हे दु:ख अतिच वाटे,
आश्रू लोटूनी सददित कंठ दाटे।।
न वदवे काही जे मनात घाटे,
परीवेगाने हृदय फार फाटे।
आता तरी याशी देऊ या निरोप,
लावू ऐक्याचे सर्व मिळूनी रोप।।
सर्व भेदांचे विसरूनी आता मूळ,
माजले हे ज्यापासून खुळ।
एकमेका भेटू कडकुण,
प्रेमसागर भरी जाऊया बुडून।।
ज्ञाती कर्मीचा भेद असो काही,
देश कार्यामध्ये तया स्थान नाही।
अशी वृत्ती असो सर्वदा मनाचि,
जिने होईल पुर्ती कामनांची)

२६)	पंडित विष्णु शास्त्री, `तुकाराम बुवाच्या अभंगाची गाथा` पृष्ठ - ०३

२७) कित्ता; पृष्ठ - ०४

२८) पंडित विष्णु शास्त्रीपरशुराम शास्त्री, 'पार्वतीपरीणय नाटक' (मूळ प्रत - परशुराम बल्लाळ गोडबोले), पृष्ठ - I

२९) कै. पंडित वा. वे.शा.स.विष्णु शास्त्री, स्त्री गायन समूह अथवा बायकांची गाणी', पृष्ठ - २.

३०) कित्ता; पृष्ठ - ३-४-५.

३१) कित्ता; पृष्ठ - ०५.

(विष्णू शास्त्री पंडीत यांनी आपल्या बायकांची गाणी या विषयासंदर्भात लिखाण करताना काही श्रुंगारपर काव्य हि लिहिलेली आढळतात
मर्जीचा कल पाहुन बोलतो, आम्ही अबुले परि भिऊन
लाडके नेइन तुज पुढे घेऊन ।।ध्रु।।
पारीजातकानिमीत्त भामा रुसली श्रीहरीवरी ।।
तिला ग समजावी नानापरी ।।
गुंफुनियां निजहरते वेणी, काजळ कुंकू करी ।।
लेपवी अलंकार परोपरी ।।
नेसुनियां चिर कंचुकी)

३२) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, 'लघुनिबंधमाला', पृष्ठ - I

३३) कित्ता; पृष्ठ - २६-२७.

३४) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, 'संस्कृत आणि महाराष्ट्र, पृष्ठ - I.

३५) सरदार गं.भा., पूर्वोक्त, पृष्ठ - १५५.

३६) पाटील एन.डी., भिडे जी.एस., 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', पृष्ठ - ६५-६६.

३७) प्रा. पाटील व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३८.

३८) सरदार गं.भा., पूर्वोक्त, पृष्ठ - १७७.

## प्रकरण - ६

# विष्णु परशुराम शास्त्री पंडितांचे सामाजिक विचार व कार्य

## प्रकरण - ६

## विष्णु परशुराम शास्त्री पंडितांचे सामाजिक विचार व कार्य

**प्रस्तावना -**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात देशात ज्या अनेक लहान-मोठ्या धार्मिक व सामाजिक चळवळी झाल्या, त्यांचा उगम बहुधा ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या धर्मप्रसारातूनच झालेला आढळतो. ख्रिस्ती धर्म व पाश्चात्त्य संस्कृती यांचे श्रेष्ठत्व महाराष्ट्रातील अबालवृध्दांच्या मनामध्ये पूर्णपणे बिंबविण्याचा त्यांचा आतोनात प्रयत्न सुरु होता. हिंदू धर्मग्रंथ व समाजरचना ह्यांवर निकराचा हल्ला चढविण्याची एकही संधी ते वाया जाऊ देत नसत. शिवाय सरकारचे शिक्षणविषयक धोरणही त्यांना अनुकूलच होते. ह्या सर्व गोष्टी महाराष्ट्रातील तत्कालीन अर्धशिक्षित तरूणांवर अनिष्ट परिणाम करण्यास कारणीभूत ठरल्या. याचा परिणाम आपला धर्म, भाषा, इतिहास, संस्कृती यामध्ये काहीच तथ्य नाही, असा त्यांचा ग्रह झाला. म्हणून आपण इंग्रजांचे अनुकरण केले पाहिजे व त्याशिवाय आपणास गत्यंतर नाही. अशा न्यूनगंडाने ते पछाडले गेले.[१] थोडक्यात, इंग्रजांच्या चालीरीती, शिक्षण, विचार यांचा भारतीयांनी अंगिकार केला तर प्रगती करु शकतील असे त्यांना वाटत हाते.

अशा परिस्थितीत `मोरभट् दांडेकर, कृष्णशास्त्री साठे, गंगाधरशास्त्री फडके, इत्यादिकांनी ह्या ख्रिस्ती आक्रमणाचा यथाशक्ती प्रतिकार केला. पण तो अपुरा व एकांगी असल्यामुळे व्हावा तसा परिणाम झाला नाही. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या टीकेतील ग्राह्यांश लक्षात घेऊन आपल्या समाजव्यवस्थेत जरूर त्या सुधारणा घडवून आणण्याच्या खटपटीला ते लागले असते, तर कदाचित आपल्या समाजाचे बळ नक्कीच वाढले असते. पण आपल्या परंपरागत समाजरचनेत काही दोष असतील ही कल्पनाही या जीर्णमतवादी पंडितांच्या मनात येणे शक्य नव्हते. मात्र, बाळशास्त्री जांभेकर, भाऊमहाजन, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, यासारख्या विचारी व दूरदृष्टीच्या पुरूषांनी हे

ओळखून लोकांच्या स्तुतिनिंदेची पर्वा न करता महाराष्ट्राच्या सर्वांगीण सुधारणेचे कंकण हाती बांधले.`[२] भारतीय विचारवंतांनी सामाजिक सुधारणासाठी इंग्रजी साहित्य, विचार यांचा सुधारणा घडवून आणण्यासाठी उपयोग केला असल्याचे दिसून येते.

या काळात ज्या निरनिराळ्या सामाजिक सुधारणांचा धडाडीने पुरस्कार केला गेला, त्यामध्ये स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, जरठकुमारी विवाह निषेध, पुनर्विवाह इ. स्त्रियांच्या प्रश्नांचे स्थान फार महत्त्वाचे होते. त्याची चर्चा 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानप्रसारक' इ. नियतकालिकांतून होऊ लागली होती. त्यातच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मुलींच्या शाळा उघडल्या, त्यानंतर फुलेंनीही मुलींच्या शाळा उघडून शिक्षणाचा प्रसार केला. त्यामुळे हळूहळू स्त्रिशिक्षणाचे महत्त्व वाढू लागले. परंतु बालविवाहाच्या प्रथामुळे मुलींच्या शिक्षणात व्यत्यय येत असे व त्यांना आपले हिताहित समजू लागण्यापूर्वीच त्यांचे जीवन परस्वाधीन होऊन जात असे. शिवाय एखाद्या स्त्रीचा पती अकाली दिवंगत झाल्यास तिला पुनर्विवाहाची मोकळीक नसल्याने तिचे जीवन अत्यंत दुःखद जात असे.[३] अशा सर्व प्रश्नांना लोकहितवादींनी आपल्या 'शतपत्रा'त या सुधारणांचा निर्भिडपणे पाठपुरावा केलेला पहावयास मिळतो. त्यांनी या विधवा पुनर्विवाहाच्या दृष्टीने शतपत्रातून मते व्यक्त केलेली दिसतात.

शास्त्रवचनाचा आधार असो वा नसो, स्त्रीजातीची विटंबना ही यापुढे बंद झालीच पाहिजे, अशी लोकहितवादींची भूमिका होती. अंतःकरणाच्या तळमळीने बाहेर पडलेल्या त्यांच्या विचारांमुळे सनातन्यांनाही कदाचित सहानुभूती वाटत असेल, पण परंपरागत रुढींमुळे व धर्माच्या बागुलबुवामुळे कदाचित ते मान वळवीत असतील.'[४] पीढ्यानपीढ्या झालेले संस्कार तडकाफडकी झुगारुन देण्याचे धैर्य फारच थोड्या लोकांत असते. त्यामुळे लोकहितवादींच्या आदेशांची लोकांनी बिलकुल कदर केली नाही.

नुसत्या बुध्दिवादाने लोकांची मने वळवीत बसण्यापेक्षा शास्त्रवचनांच्या आधाराने कोणत्याही सुधारणेचे समर्थन करता आल्यास ती समाजाच्या त्वरित पचनी पडेल अशा भावनेने काही पंडितांनी प्राचीन धर्मग्रंथांचे परिशीलन केले व त्या अनुषंगाने नवीन सुधारणांचा पुरस्कार करु लागले.

पद्मनजी यांनी 'यमुनापर्यटन' या नावाची कादंबरी लिहिली. त्यात त्यांनी हिंदुस्थानातील विधवांच्या करुणास्पद स्थितीचे वर्णन केले. 'दादोबा पांडुरंग' यांनीही पुनर्विवाहाविषयी शास्त्रदृष्ट्या गोठक विवेचन केले आहे. हे दोनही प्रयत्न अगदीच किरकोळ स्वरुपाचे आहेत. परंतु विष्णु शास्त्री पंडितांनी मात्र या दिशेने आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली पहावयास मिळते. आपली संस्कृती जितकी उच्च तितकीच उदार आहे. मंत्रदृष्ट्या ऋषींच्या पवित्र वचनांवर आपल्या धर्माची उभारणी झालेली आहे. तेंव्हा त्यात अशा अन्याय व अमानुष रुढींना थारा मिळण्याचा मुळीच संभव नाही, अशी त्यांची श्रध्दा होती. वेदे, स्मृती व पुराणे यांच्या सतत व्यासंगाने ती तिळमात्र कमी न होता उलट दुणावली आहे. म्हणूनच जुन्या धर्मग्रंथांच्या सहाय्याने आमच्या भ्रामक वेड्या समजुतीचे समूळ उच्चाटन करण्याचे कार्य पंडितांनी हाती घेतले होते.'[५] वेद स्मृती, पुराणात जे निरुपयोगी विचार आहेत त्यांचे निर्मूलन करण्याचे काम विष्णु शास्त्री पंडितांनी केले.

समाजसुधारणेच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करत लोकांचे मतपरिवर्तन होणे शक्य नाही. याची जाणीव पंडितांना होती. म्हणूनच स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले सर्वस्व वेचण्याचा निश्चय केला. लोकनिंदेची पर्वा न करता त्यांनी तो आमरण पाळला. ज्या ज्या वेळी त्यांच्यावर कसोटीची वेळ आली त्या त्या वेळी त्यांनी आपल्या शब्दाची जाणीव ठेवून समाजासमोर एक आदर्श ठेवला'[६] थोडक्यात, जननिंदेची पर्वा न करता त्यांनी आपले सामर्थ्य पणाला लावले व आपले आयुष्य समाजकार्यासाठी वेचले.

महाराष्ट्रातील विविध समाजसुधारकांनी स्त्रीप्रश्नांच्या संदर्भात कार्य केले. आधुनिक महाराष्ट्राचे आद्य शिल्पकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, शिक्षण प्रसार, पुनर्विवाह पुरस्कार करणे, अशी तत्कालीन समाजातील बंडखोरी वाटावी, असे प्रयत्न केले. लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुख यांनी `पुनर्विवाहोत्तेजेक मंडळी` संस्था स्थापून विधवाविवाहाचा पुरस्कार केला. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देणाऱ्या दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी सामाजिक जागृती आणि ज्ञान प्रसारासाठी `ज्ञान प्रसारक सभा स्थापली` महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे कर्ते सुधारक असल्यामुळे ते विचार मांडून न थांबता त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू करून प्रत्यक्ष कार्याला सुरूवात केली. विधवा पुनर्विवाह पुरस्कार करणे, अनाथ बालकाश्रम सुरू करणे या गोष्टी त्यांच्यातील मोठेपणाच्या निदर्शक होत.

**एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थिती व समाजसुधारकांचे प्रयत्न -**

१८१८ मध्ये झालेला पेशवाईचा अंत व सुरु झालेला ब्रिटिशांचा अंमल व त्यामुळे झालेल्या समाजातील घडामोडी यांचा सामाजिक जीवनावर चांगलाच परिणाम झालेला दिसतो. या काळात महाराष्ट्रातील समाजात जातिसंस्था व कडक जाती निर्बंधांना विशेष महत्त्व होते. भौतिक विद्या, बुध्दी प्रामाण्यवाद यांपेक्षा सामाजिक जीवनातही परंपरेला ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. आध्यात्मिक व धार्मिक आचारांचा प्रभाव तत्कालीन समाजजीवनावरही झालेला पहावयास मिळतो.

या काळात कनिष्ठ-वरिष्ठ भेदा-भेद, जातिसंस्थातील वर्चस्व, प्रशासनातील त्यांचा सहभाग, शिक्षणाचे अधिकार, यामुळे बहुजनांवर असंख्य निर्बंध लादले गेले होते व समाजात या दोन गटात मोठी फळी तयार झाली होती. त्याचबरोबर स्त्रियांवरही या प्रथा, परंपरांचा चांगलाच परिणाम झाला होता. त्यांची या काळातील स्थिती तर अत्यंत करुणाजनक होती. राधाबाई, गोपिकाबाई, अहिल्याबाई यांसारख्या स्त्रियांची नावे इतिहासात गाजली असली

तरी त्यातून स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा होती, असे म्हणता येणार नाही.'[७] त्यांना कोणत्याही प्रकारचा शैक्षणिक अधिकार नव्हता. उच्चवर्णीयांमध्ये तर या गोष्टी अत्यंत कडक पाळल्या जात होत्या. बालविवाहाची पध्दत रुढ होती. पुरुषप्रधान पध्दतीमुळे स्त्रियांना सामाजिक किंवा धार्मिक जीवनात कोणतेही स्वतंत्र अस्तित्व नव्हते. या प्रथांमुळे स्त्रियांवर लवकरच वैधव्यांचे संकट येई. शिवाय विधवा स्त्रीला केशवपन करावे लागे. व्रतवैकल्पे धर्माचे पालन, देवधर्म करत आयुष्य काढावे लागे.

विधवा स्त्रियांकडून जर कोणता गुन्हा अथवा बदकर्म घडल्यास तिला कठोर शिक्षा केली जाई. बहुपत्नीत्वाची पध्दत असल्याने पुरुष कोणत्याही वयात व कितीही लग्ने करीत असे. उदा. नाना फडणीस साठाव्या वर्षी वारले. त्यावेळी त्यांच्या नऊ बायकांपैकी सर्वात लहान बायकोचे वय नऊ वर्षाचे होते.'[८] थोडक्यात, त्याकाळी अनेक बायका करण्याची प्रथा होती. विधवांकडून काही चुकीचे पाऊल पडले तर तिला कठोर शासन होत असे. पुरुषांच्या विवाहाच्या वयाला मर्यादा नसे. तो कितव्या वर्षी कधीही विवाह करु शकत असे. अशी स्त्रियांना सवलत नव्हती.

लग्न ही या काळातील पुरुषांची करमणूकच होती. त्यामुळे स्त्रियांची नेहमी परवड होत असे. त्यातच सतीची चाल प्रचलित होती. त्यामुळे कित्येक स्त्रियांना इच्छेविरुध्द सती जाणे भाग पडत असे. त्याशिवाय समाजात सक्तीचे वैधव्य, पडदापध्दती, जरठकुमारी विवाह, स्त्रियांना शिक्षणाचा नसणारा अधिकार, विधवांना पुनर्विवाहाचा नसणारा अधिकार, यासारख्या असंख्य अडचणी महिला वर्गासमोर होत्या. त्यामुळे त्यांचे सर्व जीवन हे कोमेजून जाई. समाजातील सर्वच वर्गामध्ये कमी अधिक प्रमाणात व सर्व धर्मीयांत या सर्व गोष्टींचा पगडा पहावयास मिळतो. बालसंभोगाची समस्या ही एकोणिसाव्या शतकातही तीव्र स्वरुपात होती. त्याच बरोबर बहुभार्या पध्दत जणू अधिकारच असल्यासारखी समाजात रुढ होती. शिवाजीमहाराज आठ, छत्रपती शाहू यांनी चार, नाना फडणिसांनी नऊ, महादजी शिंदे यांनी नऊ तर दुसऱ्या बाजीरावांनी

अकरा लग्ने केल्याचा पुरावा आढळतो.'[९] थोडक्यात, पेशवाईच्या काळामध्ये अनेक विवाह करत असत, कारण स्त्रियांना कुठलाही अधिकार नव्हता, त्यांना बंधनात राहावे लागे.

एकोणिसाव्या शतकाची पार्श्वभूमी पाहता सुरूवातीच्या काळात `स्त्रिधन` वगळता स्वतंत्र मालमत्तेचा वारसा हक्क स्त्रिला नव्हता. तिच्या स्वकष्टार्जित मालमत्तेवरही तिचा संपूर्ण अधिकार नव्हता. तिला दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता. ती पुरूषांची राखीव मक्तेदारी होती. पत्नी हयात असताना पती दुसरे लग्न करू शकत असे. मात्र, स्त्रिला तो अधिकार नव्हता. एवढेच नव्हे, तर पतीच्या मृत्यूनंतरही तो अधिकार तिला नव्हता. पुरूषांची या संदर्भातील भूमिका दुटप्पीपणाची होती.

१८२९ मध्ये सतीबंदी, बालविवाह कायदा आला. तर १८५६ चा विधवा पुनर्विवाह कायदा, १८७२ चा नोंदणी विवाह कायदा (स्पेशल मॅरेज ॲक्ट) १९३७ मध्ये हिंदू स्त्री मालमत्ता हक्क कायदा संमत झाला. १९४६ नंतर द्विभार्या प्रतिबंधक कायदे झाले. १९५५ नंतर केंद्रीय हिंदू कायद्यात द्विभार्या घटस्फोट या कायद्यांचा समावेश झाला. स्त्री सुधारणांच्या कार्यात अनेक कायदे आले असले तरी प्रत्यक्षात मात्र स्त्रियांची परिस्थिती पारतंत्र्याच्या काळात व पारतंत्र्यानंतरही फारशी सुधारलेली पहावयास मिळत नाही. विधवांच्या संदर्भात अनेकांनी कार्य केले. महात्मा फुलेंच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन पंढरपूर येथे प्रार्थना समाजाचे धुरीण लालशंकर, उमिया शंकर यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. त्याची उपशाखा लवकरच नाशिकला निघाली. त्याला लोकहितवादी, वि. मो. भिडे, थत्ते यांची मदत झाली. गर्भवती विधवेला गर्भपाताची औषध न देता प्रसूतीसाठी गृहात आणून सोडणारास दहा रूपये बक्षीस देण्यात येई. या कार्यासंबंधीचे गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न 'सुबोधपत्रिके'ने केले.`[१०]

एवढेच नव्हे तर विधवांना अर्थसाह्य करण्यासाठी `एल्फिन्स्टन नेटिव्ह पेन्शन फंड` सुरू केला. या काळात विधवांची परिस्थिती इतकी दयनीय होती

की, त्यांचे वय पाहता विश्वासच बसत नसे. प्रा. डॉ. सौ. सरला धारणकर यांच्या 'आधुनिक भारतीय स्त्री-जीवन' या पुस्तकातील आलेल्या १८९१ मध्ये महाराष्ट्रात विधवांची संख्या व वयोगटावरून आपल्याला ती परिस्थिती डोळयांसमोर येते.`[११]

| | वयोगट | विधवा |
|---|---|---|
| १) | ० ते ४ वर्षे | १३,८७८ |
| २) | ५ ते ९ वर्षे | ६४,०४० |
| ३) | १० ते १८ वर्षे | ८७,२६६ |

स्त्रियांचा हा गहण प्रश्न अनेकांच्या चिंतनाचा विषय बनला. जो तो आपआपल्या पातळीवर या संदर्भात प्रयत्न करत होता. हळूहळू याची जाणीव समाजाला होऊ लागली व स्त्रियांच्या जीवनात थोडीफार का होईना पण सुधारणा झाली. याची सुरूवात १९व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या धर्मप्रचारांतून नवीन विचार वाहू लागले नवीन जाणीव नव्या संकल्पना उदयास आल्या. यातूनच पुढे स्त्री उन्नतीची जाणीव समाजाला झाली व अशाच जाणिवा झालेल्या सुधारकांच्या प्रयत्नातून स्त्री उन्नतीच्या प्रयत्नांला चालना मिळाली.

**विष्णु शास्त्री पंडित यांचे स्त्रिवर्गाविषयीचे विचार व कार्य -**

**१) स्त्री उध्दाराचे कार्य -**

कौटुंबिक आपत्तीमुळे जरी विष्णु शास्त्री पंडितांनी आपणास सरकारी नोकरीस गुंतवून घेतले असले तरी त्यांना त्यापासून फारच समाधान होते, असे नाही. जुन्या शास्त्री घराण्यात जरी त्यांचा जन्म झाला असला तरी त्यांनी दृष्टी ही इतर पंडितांप्रमाणे पूर्वग्रहाने दूषित झालेली नव्हती. समाजात चाललेल्या प्रत्येक घडामोडींकडे त्यांचे बारीक लक्ष होते. बदलत्या काळाचे स्वरुप त्यांनी ओळखले होते व म्हणूनच सनातन्यांच्या रुढी प्रियतेचा व अविचारीपणाचा त्यांना मनस्वी संताप येत असे. शाळेच्या टिचभर आवारात त्यांचे मन रमलेच नाही. त्यापेक्षा अधिक व्यापक व महत्त्वाच्या कार्याला त्यांनी आपले आयुष्य

वाहावे, अशी ईश्वरी योजना होती. समाजातील शेकडो अनाथ व असाह्य स्त्रियांच्या दुःखांना वाचा फोडण्यासाठीच त्यांचा जन्म होता. या आपल्या जीवित कार्याची चाहूल लागताच त्यांनी सेवानिवृत्त होऊन वृत्तपत्र व्यवसायात लक्ष घातले.'[१२]

थोडक्यात, त्यांचे नोकरीत मन रमत नसे, त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घ्यावे असे त्यांना वाटत असे. त्याकाळी त्यांना वृत्तपत्राकडे आपले लक्ष वळविले.

लोकजागृतीचे प्रभावी साधन या दृष्टीने नियतकालिकांचा प्रभाव वाढीस लागला होता. 'इंदुप्रकाश'ची सूत्रे हाती घेतल्यानंतर पंडितांच्या कार्याला खरी सुरुवात झाली. सेवानिवृत्त झाल्यानंतर स्त्रीजातीच्या उध्दारासाठी झगडण्याचा त्यांनी निर्धार केला व त्या धोरणानेच ते आपली ते 'इंदुप्रकाश' या नियतकालिकात निर्भिडपणे मांडू लागले.'[१३] 'इंदुप्रकाशच्या' माध्यमातून अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी केले.

प्राचीन धर्मग्रंथाचे त्यांनी स्वतंत्र अवलोकन करुन स्वबळावर नवीन सुधारणांचा पुरस्कार करण्यास ते पुढे सरसावले. लेखन, भाषण, चर्चा व कीर्तन इ. साधनांच्या द्वारे ते आपले विचार लोकांपर्यंत पोहचवू लागले. 'इंदुप्रकाश'मध्ये त्यांनी स्त्रियांच्या अनेक प्रश्नांची चर्चा केली. त्यात प्रामुख्याने बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह इत्यादी प्रश्नांची सांगोपांग चर्चा करुन विरोधकांच्या आक्षेपांचे सप्रमाण खंडण करण्याचा त्यांनी परिपाठ पाडला. प्राचीन काळी समाजजीवनात स्त्रियांचे स्थान फार मोठे होते. हे त्यांनी लोकांच्या निदर्शनास आणून दिले. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार होता व आहे, आजन्म अविवाहित राहण्यास त्यांना शास्त्रांची काही हरकत आहे काय? लग्नाच्या वयासंबंधी काही किमान मर्यादा ठरविता येईल किंवा नाही? विधवाविवाह सशास्त्र किंवा अशास्त्र आहे? इत्यादी अनेक प्रश्नांची चर्चा करुन आपली निर्णायक मते लोकांना पटवून देण्याचा त्यांनी अविश्रांत प्रयत्न केला.'[१४]

थोडक्यात, प्राचीन काळी स्त्रियांना असलेल्या अधिकाराची व इतर असणाऱ्या सवलतींची त्यांनी वृत्तपत्रातून दखल घेतली.

विष्णु शास्त्री पंडितांनी स्त्रियांच्या मूलभूत हक्कांचा जरी सातत्याने विचार केला असला तरी सर्वात प्रयत्न त्यांनी विधवाविवाहाच्या प्रश्नांकडे प्रथम लक्ष दिले. महाराष्ट्रात पुनर्विवाहाच्या प्रश्नाला इ.स. १८४० पासून चालना मिळाली. इ.स. १८४२ मध्ये बेळगाव येथे दोन ब्राह्मण बालविधवांचे पुनर्विवाह झाल्याचे वृत्त 'प्रभाकर' पत्रात प्रसिध्द झाले होते.' याच सुमारास मुंबईत 'परमहंस मंडळी' या नावाची गुप्त संस्था स्थापन झाली होती. तिच्या उद्देशपत्रिकेतही 'विधवांच्या पुनर्विवाहाविषयी संमती असावी' असे प्रमुख कलम होते. इ.स. १८५६ मध्ये विधवाविवाहाचा कायदा झाला व त्यामुळे या सुधारणेच्या मार्गातील मोठा अडथळा दूर झाला.'[१५] थोडक्यात, १९ व्या शतकात विधवा पुनर्विवाह व बालविवाह या विषयी काही संस्था कार्यरत होत्या, त्यांच्या माध्यमातून हे कार्य चालत असे.

सुसंघटित प्रयत्नांशिवाय पुनर्विवाह प्रतिबंधाच्या दीर्घकालीन रुढींचे निर्मूलन होणार नाही, हे लक्षात घेऊन पंडितांनी ता. २८ जानेवारी १८६६ रोजी 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची' स्थापना केली. या सभेचे अध्यक्ष जमखिडीकर होते व उपाध्यक्षपदी माधवराव विंचुकर यांची निवड केली होती.'[१६] पुढे या सभेच्या शाखा पुणे, रत्नागरी, अहमदाबाद या ठिकाणी सुरु झाल्या या सभेमार्फत या सभेच्या सभासदांनी लोकांचे औदासीन्य, भित्रेपणा व धर्मभोळेपणा या पुनर्विवाहाच्या चळवळीत आड येणाऱ्या अडचणींना दूर करण्याचा प्रयत्न केला व हेच मुख्य कार्य त्यांनी केले. सभेच्या ठिकाणी सनातनी लोकांना वाद-विवाद करण्याची पूर्ण मोकळीस देण्यात आली होती.

आपल्या अंगिकृत कार्यावर पंडितांची अढळ श्रध्दा होती. व्यावहारिकदृष्ट्या प्रतिपक्षांशी तडजोड करण्याची त्यांची नेहमी तयारी होती. मतभेदांच्या मुद्द्यांवर अवास्तव जोर देऊन भांडत बसण्यापेक्षा उभयपक्षांनी

कोणत्या बाबतीत एकवाक्यता होण्यासारखी आहे, याकडे लक्ष देऊन त्यातुन मार्ग काढण्यावर पंडितांचा जास्त विश्वास होता.

पुनर्विवाहाच्या प्रश्नावर जरी दुमत असले तरी बालविवाहाचे अनिष्ट परिणाम सर्वांना मान्य होण्याजोगे आहेत, हे लक्षात घेऊन त्यांनी सनातनी व सुधारक या दोन्ही पक्षांना पसंत पडेल असे संमतीपत्र तयार केले. यात गोविंदशास्त्री लेले, गणेशशास्त्री मालवणकर, सदाशिवशास्त्री लेले, विष्णु शास्त्री पंडित, लक्ष्मणशास्त्री हळबे इत्यादींनी ते प्रसिध्द केले त्यात कन्येचा विवाह बारा वर्षापासून सोळा वर्षापर्यंत करावा व पुरुषाने सतरा वर्षापासून पंचेचाळीस वर्षापर्यंतच आपले लग्न करावे, असे स्पष्ट करण्यात आले.'[१७] थोडक्यात, पुरुषांची व महिलांची वयोमर्यादा वाढविण्यावर भर दिला व त्याचा प्रसार केला.

कन्येचा विवाह ती उपवर झाल्यावर म्हणजे बारा वर्षापासून ते सोळा वर्षापर्यंत रजोदर्शनाच्या पूर्वी करावा, अशा कन्या विवाहापूर्वी रजोदर्शन झाल्यास त्याबद्दल गोप्रदानात्मक वगैरे प्रायश्चित मन्वदिकांनी सांगितले आहे (हे ब्राह्मण  कन्या विवाह विचार या पुस्तकात लिहिले आहे.) ते करत त्या कन्येचा विवाह करावा, पण त्या आगोदर तिचा उपवर होण्यापूर्वी तिचा विवाह करु नये. याच प्रमाणे १७ वर्षांपुढे ४५ वर्षांपर्यंतच पुरुषांनीही आपले लग्न करावे, या दोन उपायांनी दुःखात पडणाऱ्या अनेक स्त्रियांची विपत्ती बऱ्याच अंशी कमी होईल असे पंडितांचे म्हणणे होते.'[१८] थोडक्यात, महिलांवर ज्या आपत्ती कोसळतील त्या वयोमान वाढल्यामुळे कमी होतील, असे त्यांना वाटत होते.

पंडितांच्या या विचारांचा परिणाम त्याकाळी बऱ्याच स्त्रियांना झाला. समाजात थोड्याफार प्रमाणात का होईना पण लोक विवाहाच्या बाबतीत वयाचा विचार करु लागले व बालविवाहाला आळा बसला कारण पंडितांनी सांगितलेले सर्व विचार हे शास्त्रशुध्द व शास्त्राधार असणारे होते. त्यामुळे विरोधकांनाही

पंडितांच्या या निर्णयाविरोधास फारसा विरोध करता आला नाही. व त्याचाच परिणाम म्हणजे 'संमती वयाचे पत्र' होय.

विष्णु शास्त्री पंडितांचा काळ हा पारतंत्र्याचा काळ होता. त्या काळात समाजामध्ये अनेक अनिष्ट सामाजिक रूढी परंपरा सुरु होत्या. सतीची चाल हा एक अनिष्ट प्रकार महाराष्ट्रात काही ठिकाणी पाहावयास मिळतो. पुण्यामध्ये राधाबाई नावाची स्त्री सती गेल्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी रॉबर्टसन यांनी विष्णु शास्त्री पंडितांना या विषयी आपले मत विचारले असता, शास्त्रानुसार सती जाणे बंधनकारक नाही असे सांगून सरकारने सती जाण्यास विरोध करावा, असे सांगितले. एखाद्या स्त्रीचा पती अकाली दिवंगत झाल्यास तिला पुनर्विवाहाची मोकळीक नसल्याने तिचे जीवन अत्यंत दुःखद होत असे. तत्कालीन वृत्तपत्रांनी या सर्व प्रश्नांना तोंड फोडले होते. 'लोकहितवादीं'नी तर आपल्या शतपत्रात या सुधारणांचा निर्भिडपणे पाठपुरावा केला आहे. शास्त्र वचनांचा आधार असो वा नसो स्त्री जातीची विटंबना ही या पुढे बंद झालीच पाहिजे, अशी त्यांची आग्रही भूमिका होती.`[१९]

समाजसुधारणेच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करून लोकांचे मतपरिवर्तन होणे शक्य नाही, याची विष्णु शास्त्री पंडितांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच स्त्री जातीच्या उन्नतीसाठी आपले सर्वस्व वेचण्याचा त्यांनी निश्चय केला व लोकनिंदेच्या निष्ठुर आघातांना बिलकुल न जुमानता त्यांनी तो आमरण जोपासला. ज्या ज्या वेळेला त्यांची कसोटीची पाळी आली, त्या त्या वेळी ते आपल्या शब्दाला जागले व आपली तत्त्वनिष्ठा किती अटळ आहे, याची त्यांनी जगाला खात्री पटवून दिली. नुसत्या बुध्दिवादाने लोकांची मने वळवित बसण्यापेक्षा शास्त्र वचनांच्या आधाराने कोणत्याही सुधारणेचे समर्थन करता आल्यास ती समाजाच्या त्वरित पचनी पडेल, यावर विष्णु शास्त्री पंडितांचा विश्वास होता. या विचाराने ते प्राचीन धर्मग्रंथाचे वाचन करू लागले व या अनुरोधाने ते नवीन सुधारणांचा पुरस्कार करू लागले.

विष्णु शास्त्री पंडित यांनी त्या काळातील आपल्या समाजात स्त्रियांना प्राप्त झालेल्या दुय्यम स्थानाचे आणि त्यांच्या वाट्याला आलेल्या अवहेलनेचे बारकाईने अवलोकन केले होते. भारतीय स्त्रियांची ही स्थिती पाहिल्यावर त्यांनी स्त्री जातीच्या उध्दारासाठी प्राणपणाने झगडण्याचा निर्धार केला. या कामी त्यांना `इंदुप्रकाश` या वृत्तपत्राच्या संपादकपदाचा खूपच लाभ झाला. ते 'इंदुप्रकाश' मधून आपली सुधारणावादी मते निर्भिडपणे मांडू लागले. इतकेच नव्हे तर इतर मार्गांनीही आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले.

भारतीय स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी, याकरिता विष्णु शास्त्री पंडितांनी गावोगावी जाऊन व्याख्याने दिली. स्त्रियांच्या प्रश्नांशी संबंधित असे अनेक ग्रंथ लिहिले. या प्रश्नावर शेकडो लेखही त्यांनी प्रसिध्द केले. आपल्या या लेखामधून विष्णुशास्त्रींनी स्त्री-शिक्षण, बालविवाह, जरठकुमारी विवाह, केशवपन, पुनर्विवाह, परदेशगमन, जातिभेद, इत्यादी प्रश्नांचा उहापोह केला होता. थोडक्यात, स्त्रियांच्या जीवनाशी निगडित असलेल्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या प्रश्नांना त्यांनी हात घातला होता.

विष्णु शास्त्री पंडित यांनी पुरातन धर्मग्रंथांचे सखोल अध्ययन केले होते. त्यामुळे अनेक धार्मिक व सामाजिक प्रश्नांवर ते अधिकारवाणीने बोलू शकत होते. त्यांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी, या हेतूने मांडलेले विचार येथील समाजातील सनातनी व परंपराप्रिय मंडळींना पटणे शक्यच नव्हते. त्यांनी विष्णुशास्त्रींना जोरदार विरोध केला. विष्णुशास्त्रींचे विचार धर्मविरोधी आहेत, असे या सनातनी मंडळींनी सांगण्यास सुरूवात केली. पण विष्णुशास्त्रींनी सनातन्यांच्या सर्व आक्षेपांचे सप्रमाण खंडन केले. त्यांनी आपल्या जुन्या धर्मग्रंथांच्या अध्ययनाच्या आधारे असे दाखवून दिले की, प्राचीन काळी भारतीय समाजात स्त्रियांना अतिशय महत्त्वाचे व मानाचे स्थान देण्यासंबंधी मांडलेले विचार मुळीच आक्षेपार्ह ठरत नाहीत. उलट ते प्राचीन भारतीय संस्कृतीच्या परंपरेशी नाते जोडणारे असेच विचार आहेत.

## २) विधवाविवाहाचा पुरस्कार -

विष्णु शास्त्री पंडितांनी स्त्रियांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या विविध प्रश्नांसंबंधी आपले विचार मांडले होते आणि त्या सर्वच प्रश्नांसंबंधी त्यांनी सुधारणावादी भूमिका घेतली होती. तथापि, स्त्रीविषयक प्रश्नांमध्येही त्यांनी विधवाविवाहाच्या प्रश्नाला विशेष प्राधान्य दिले होते.

भारतीय समाजात विधवा स्त्रिच्या वाट्याला आलेले दुर्दैवाचे भोग पाहून विष्णुशास्त्रींच्या मनाला अतिशय वेदना झाल्या होत्या. तत्कालीन समाजाने विधवा स्त्रियांवर अनेक प्रकारचे निर्बंध लादले होते. विधवा स्त्रियांचे दर्शनदेखील अशुभ मानले जात असे. तिच्या कुटुंबातील लोकही तिला फुटक्या नशिबाची समजून हिडीसफिडीस करीत असत. केशवपनासारख्या अत्यंत हिडीस प्रकारास सामोरे जाण्याचा प्रसंग विधवा स्त्रीवर येत असे. विधवा स्त्रियांची अशी स्थिती पाहिल्यावर त्या स्थितीत सुधारणा व्हावी, असे त्यांना वाटत होते. त्याकरिता अर्थातच विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी असणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटले. त्यामुळे विष्णुशास्त्रींनी १८६६ मध्ये `पुनर्विवाहोत्तेजक मंडळी` ची स्थापना केली. विष्णु शास्त्रीस्वतः या संस्थेचे चिटणीस होते. `पुनर्विवाहोत्तेजक मंडळी` च्या वतीने दर आठवड्याला विधवा विवाहाच्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली जात असे.[२०] या बैठकीस उपस्थित राहून या प्रश्नावर वादविवाद करण्यास सनातनी पंडितांनाही मुभा देण्यात आली होती.

त्या काळात पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर हे विधवा-विवाहाचे आणखी एक कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या मतांच्या समर्थनासाठी आणि प्रसारासाठी `विधवा-विवाह` या नावाचा एक ग्रंथही लिहिला होता. विष्णुशास्त्रींनी विद्यासागर यांच्या या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर आणि विष्णु शास्त्री पंडित हे दोघेही विधवा-विवाहाचे पुरस्कर्ते असले तरी या समस्येकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन मात्र काहीसा भिन्न होता. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी

कायद्याच्या मार्गावर जास्त भर दिला होता. या बाबत सरकारने कायदा करावा यासाठी त्यांनी प्रयत्न चालवले होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन इंग्रज सरकारने विधवा-विवाहाला मान्यता देणारा कायदा १८५६ मध्ये संमत केला. परंतु विष्णु शास्त्री पंडितांचे म्हणणे याबाबत असे होते की, `विधवा-विवाहाला उत्तेजन मिळण्याच्या दृष्टीने सरकारचा कायदा पुरेसा ठरणार नाही. केवळ कायद्याच्या मार्गावर विसंबून राहिल्यास हा प्रश्न व्यवस्थितपणे मार्गी लावता येणार नाही. केवळ विधवा-विवाहालाच नव्हे, तर सर्वच प्रकारच्या सामाजिक सुधारणांना कायद्याचा व सरकारचा आधार पुरेसा पडत नाही, तर अशा सुधारणा घडून येण्यासाठी समाजानेच त्याला अंतःप्रेरणेतून आशीर्वाद दिला पाहिजे.`[२१]

सामाजिक सुधारणासंबंधीचा विष्णुशास्त्रींचा दृष्टिकोन कसा बरोबर होता हे काळाच्या कसोटीवर सिध्द झाले आहे. जोपर्यंत एखाद्या समाज सुधारणेबाबतची समाजाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत केवळ कायदा केल्याने सुधारणा होत नाहीत किंवा अपेक्षित परिवर्तन घडून येत नाही, असाच आजवरचा अनुभव आहे. कायद्याने होणारा हा बदल स्वीकारण्यास समाजाची तयारी नसल्याने कायदा झाल्यानंतरही परिस्थितीत फारसा फरक पडला नव्हता. पुढील काळात अनेक समाजसुधारकांनी याप्रश्नी लोकांत जागृती घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्यानंतरच समाज विधवा-विवाहाला हळूहळू अनुकूल होत गेला. थोडक्यात, सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजही तो बदल स्वीकारण्यास तयार व्हावा लागतो आणि त्यासंबंधीची जबाबदारी सामाजिक कार्यकर्त्यांनी पार पाडावयाची असते. ही गोष्ट विष्णु शास्त्री पंडित ओळखून होते म्हणून विधवा-विवाहाच्या प्रश्नाला समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न चालवले होते. त्याच उद्देशाने विष्णुशास्त्रींनी या प्रश्नावर अनेक शास्त्री पंडितांशी वेळोवेळी वादविवाद केले आणि आपल्या मतांना प्राचीन धर्मग्रंथांचे प्रमाण मिळवून देण्यावर जास्त भर दिला.

विष्णु शास्त्री पंडित विधवा-विवाहाचा केवळ पुरस्कार करूनच थांबले नाहीत तर असे विवाह घडवून आणण्यात त्यांनी प्रत्यक्ष पुढाकारही घेतला होता. त्यांच्या प्रोत्साहनाने पुणे येथील नारायण जगन्नाथ भिडे यांनी एका विधवा स्त्रीशी पुनर्विवाह केला. त्यानंतर १८६९ मध्ये त्यांनी मुंबईत प्रभाकर भट परांजपे यांची कन्या वेणुबाई यांचा पुनर्विवाह घडवून आणला.'[२२] यावर सनातनी मंडळीनी त्यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेऊन सामाजिक बहिष्कार टाकला. परंतु अशा संकटामुळे त्यांनी माघार घेतली नाही किंवा आपल्या अंगिकृत कार्यात खंडही पडू दिला नाही. विष्णु शास्त्रींच्या कार्याने काहीजन प्रभावित झाले होते. पंडिताप्रमाणेच विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी देखील सामाजिक प्रयत्नांबरोबरच स्त्रियांच्या प्रश्नांवरती बरेच लक्ष केंद्रित केलेले दिसते.

**विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे स्त्रिवर्गाविषयक विचार -**

बालविधवेचा पुनर्विवाह हा प्रथम विवाह मानावा, जरठ विवाह हा सामाजिक गुन्हा मानावा, विवाहासाठी मुलींची संमती अवश्य मानली जावी, विवाहापूर्वी ती वयात आलेली असावी, व्याभिचारांपेक्षा पुनर्विवाहाचा मार्ग श्रेयस्कर मानावा, पती पत्नीचे जन्मोजन्मीचे नाते अतूट असते ही परंपरागत भाबडी कल्पना दूर सारून वृध्द पतीच्या तावडीतून अल्पवयीन मुलीला सोडवून घेऊन तिचा पुनर्विवाह घडवून आणावा, असे प्रगत विचार त्यांनी मांडलेले होते.`[२३]

स्त्रियांना साक्षर केले पाहिजे, तसेच सभोवतालच्या भौगोलिक घडामोडीचे ज्ञान त्यांना असले पाहिजे. ग्रहणे, पर्जन्यवृष्टी या गोष्टी निसर्ग नियमानुसार होत असतात हे शिकवले पाहिजे. गाय पालनाचे आर्थिक आणि औषधी महत्त्व सांगितले पाहिजे. वृक्षलागवड ही पर्यावरण शुध्दतेसाठी आवश्यक आहे व पर्जन्यासाठी वृक्षाची कशी आवश्यकता आहे, सांगितले पाहिजे. यज्ञातून पर्जन्याचा संबंध नेमका आहे किंवा नाही हे पटविले पाहिजे.

स्त्रियांचे कुंकू शोभेसाठी नाही, त्यामागे योगिक मुद्रा आहे. कुंकू आणि तिलक लावण्याचा नियम ध्यान अगोचरी मुद्रा सूचक आहे. त्यात ध्यान करण्याच्या ठिकाणाची खूण आणि ध्यान बिंदूचा रंग कळावा हा मुख्य संकेत आहे. भगवतगीतेवरील `सेतुबंधनी टीका` या ग्रंथात ज्ञान विज्ञानाच्या पायावर चिकित्सकपणे त्यांनी गीतेतील तत्त्वज्ञानाचा अर्थ लावलेला आहे. त्यावरून त्यांच्या बुध्दिवादाची प्रखरता लक्षात येते.

विष्णुबुवा आपले पुनर्विवाहासंबंधी विचार सांगतांना म्हणतात की, `स्त्रीने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर विचार करूनच पुनर्विवाह करावा, असे शास्त्र सांगते. तसेच विवाहास पतीची संमंती असेल तरच पुनर्विवाह करावा व त्याला कोणाचा अटकाव नसावा, असे सशास्त्र शैलीने त्यांनी सांगितले.`

आमची मते खोटी आहेत, असे विरोधकांना जरी वाटले तरी पण पुनर्विवाह इष्ट आहे, असे वाटणाऱ्या स्त्री-पुरूषाचीही अशीच स्थिती आहे.

कमी वयाच्या मुलास वयोवृध्द स्त्री पत्नी म्हणून किंवा कमी वयाच्या मुलीला वृध्द पती नवरा म्हणून आवडत नाही, यासाठी तरूणीस तरूण पती असला पाहिजे. याचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा झाली पाहिजे. विवाहापूर्वी स्त्रीसंग करणाऱ्या पुरूषास पुरूषसंग झालेली स्त्री पत्नी म्हणून असावी. कुमारीस कुमारच पती असावा. सदैव कामुक विचार व आचार करणारे जीवनात पस्तावतील तसेच ज्या स्त्रिया अनेक पुरूषाच्या बरोबर संबंध ठेवतात, अशा स्त्रियादेखील आपले तारूण्य हारपून जाईल, याची चिंता त्यांच्या मनाला लागल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच कामवासनेत राहणाऱ्या स्त्री-पुरूषांनी ईश्वराचे स्मरण चिंतन करावे व मूलबाळ होण्यापुरताच स्वस्त्रीबरोबर संग करावा. स्त्री-पुरूषांनी प्रपंचात परमार्थाचे कार्य करावे, असे विचार त्यांनी मांडले होते.

एकोणिसाव्या शतकात हे दोन विचार एक जरी असले तरी त्यांच्या कार्याचा मार्ग व पद्धती वेगवेगळी होती. विष्णुबुवा हे आपल्या धर्मसंकल्पनेतून

समाजजागृतीचे काम करत होते, तर विष्णु शास्त्री पंडित प्रत्यक्षात ते काम करून नंतर तो आदर्श जनतेसमोर ठेवत होते.

### ३) विष्णु शास्त्री पंडितांचे बाल-विवाहविषयक कार्य -

विष्णु शास्त्री पंडितांनी विधवा विवाहाचा पुरस्कार करण्याबरोबरच बाल-विवाहाच्या प्रथेला प्रतिबंध असावा, यावरही भर दिला. वडिलाने आपल्या मुलांना शिकवून सवरून शहाणे केल्यास मुलं जबाबदाऱ्या पेलवण्यायोग्य होतील. नंतर त्यांच्या लग्नाचा विचार करावा म्हणजे ती मुलं प्रपंचाचा बोजा पेलवू शकतात. मुलांना कसलाही कामधंदा नसताना, शहाणपण आलं नसताना त्यांची लग्न करून दिल्याने त्यांचे आयुष्याचे नुकसान होणार आहे.[२४]

बाल-विवाहाचे अनिष्ट परिणाम प्रामुख्याने सर्वाधिक मुलीच्या जीवनावरच होतात. या प्रथेमुळे अनेक कोवळ्या मुलींवर बालपणीच विधवा होण्याचे प्रसंग येतात. विधवाविवाहाला समाजाची मान्यता नसल्याने अशा प्रकारचे वैधव्य प्राप्त झालेल्या मुलींचे उभे आयुष्यच मातिमोल होते म्हणूनच आपल्या समाजातील बाल-विवाहाची अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी विष्णुशास्त्रींनी प्रयत्न केले.

विष्णु शास्त्री पंडितांनी बाल-विवाहाच्या प्रथेविरूध्द लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यावर विशेष भर दिला होता. या बाबतीत त्यांनी तडजोडवादी भूमिका स्वीकारून सनातनी मंडळींचेही सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला. समाजातील सर्व घटकांच्या सहकार्यातूनच या प्रश्नाची तड लावणे शक्य होईल, अशी त्यांची भूमिका होती म्हणून त्यांनी सनातनी व सुधारक या दोन्ही पक्षांना मान्य होईल, असे एक संमतीपत्र तयार करून ते प्रसिध्दीला दिले. कन्येचा विवाह बारा वर्षापासून सोळा वर्षापर्यंत करावा आणि पुरूषाने सतरा ते पंचेचाळीस वर्षापर्यंतच लग्न करावे हे संमती पत्रासाठी विचार प्रसिध्द केले.`[२५]

विष्णु शास्त्रीनी स्त्री सुधारणेचा प्रयत्नाप्रमाणे अन्य सामाजिक सुधारणांचा देखील पुरस्कार केला होता. भारतीय समाजाची सर्वांगिण प्रगती व्हावी ही त्यांची तळमळ होती. त्यासंबंधीची आपली मते त्यांनी `इंदुप्रकाश`

मध्ये लिहिलेल्या लेखातून वेळोवेळी अतिशय परखडपणे मांडली होती. भारतीय समाजातील जातिभेद, सामाजिक व आर्थिक विषमता, कनिष्ठ वर्गावर होणारा अन्याय इत्यादी दोषांवर त्यांनी आपल्या लिखाणातून जोरदार टीका केली होती.

**४) कर्ते सुधारक -**

विष्णु शास्त्री पंडित यांनी केवळ विधवाविवाहाचा पुरस्कारच केला नाही, तर असे विवाह घडवून आणण्यात त्यांनी प्रत्यक्ष पुढाकारही घेतला होता. एखादा कायदा पास होणे याचा अर्थ तत्संबंधित बाबतीतला तांत्रिक अडथळा दूर होणे, परंतु प्रत्यक्ष मात्र त्या कार्याला त्यामुळे गती प्राप्त होतेच असे नाही. त्यासाठी लोकमत जागृत करावे लागते. समाजसुधारकांनी त्यासाठी पुढाकार घेऊन लोकमताला धडे दिल्याशिवाय लोकांत जागृती होत नाही. प्रवाहाविरुध्द पोहण्याची हिंमत असणाऱ्या नेत्यांचीच त्यासाठी आवश्यकता असते. महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात नवीन विचारांचे वारे प्रथम मुंबईत वाहू लागले. त्यामुळे लोकजागृतीचे पहिले प्रयत्न मुंबईतच सुरु व्हावेत, हे साहजिकच होते. नुसत्या पुनर्विवाहाच्या चळवळीचा विचार केला, तर गुजराती आणि मराठी समाजसुधारकांनी एकत्र येऊन ती चालविली असे दिसून येते. विशेषतः विष्णु शास्त्री पंडित आणि माधवदास रघुनाथदास यांनी जे सहकार्याने कार्य केले ते सुधारणेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे.'[२६] मराठी आणि गुजराती समाजसुधारकांनी याविषयी एकत्र येऊन ही चळवळ पुढे नेली. विष्णुशास्त्रींच्या सहकार्यासाठी माधवराव रघुनाथदास हे धावून आले आणि या दोघांनी मुंबईत या चळवळीला व्यापक स्वरुप दिले.

पंडितांनी उपयुक्त ज्ञानप्रसारक सभेपुढील निबंध अथवा व्याख्याने, कीर्तने, वादविवाद, प्रचार पुस्तिका यांद्वारे अवलोन्नतीसंबंधी व विशेषतः विधवाविवाहाच्या संबंधी लोकजागृतीचे कार्य धडाक्याने चालविले होते. 'ब्राह्मणकन्याविवाह विचार' या पुस्तकात त्यांनी प्रौढविवाहाची आवश्यकता शास्त्राधारे प्रतिपादन केली होती. विधवाविवाहाचे मंडण करणारा

विधवोद्वाहविवेक (१८६८) हा संस्कृत ग्रंथही त्यांनी रचला. पण बंगाली सुधारक प. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या 'Marriage of Widows' या ग्रंथाचे त्यांनी केलेले मराठी भाषांतर विशेष गाजले. या भाषांतरात त्यांनी विवेचनार्थ बंगाली ऐवजी आपल्याकडील उदाहरणे घेतली. पण मूळ ग्रंथातील प्रतिपाद्यास धक्का लावला नाही. पुनर्विवाह शास्त्रशुध्द मानावा की नाही, याचा विचारविनिमय करताना श्रृतिस्मृतीमधील पारिभाषिक संज्ञांचा भलताच अर्थ लावून जे गोंधळ माजतात, ते थांबावे या हेतूने या ग्रंथाच्या भाषांतराचा उपक्रम पंडितांनी हाती घेतला होता. परंतु पंडितांच्या या ग्रंथामुळे जे गोंधळ बंद होण्याऐवजी त्यांचे खंडण करण्यासाठी लेखण्या मात्र सरसावल्या आणि महाराष्ट्रात या प्रश्नाला जोरदार चालना मिळाली.'[२७]

विधवाविवाहाला बंदी असल्यामुळे तत्कालीन समाजात विधवांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर होती. लोकहितवादी आपल्या शतपत्रांत लिहितात, 'पानसे हे तोफखान्यावरील सरदार होते, त्यांचे घरी सत्तावन्न बोडख्या (विधवा) होत्या.'[२८] पेशव्यांच्या काळात सतत युध्दे होत असल्याकारणाने विधवांचे प्रमाण जास्त असावे, हे सत्य आहे. परंतु १८८७ च्या आकडेवारीवरुन तत्कालीन समाजातील विधवांची संख्या ही मनाला भोवळ आणणारी दिसते.

२४ मार्च १८८७ च्या 'ज्ञानोदय' या अंकात पुनर्विवाह निषेधकांस चष्मा अथवा हिंदुस्थानातील विधवांचे दर्शन आणि बालकांचे नाशन या पंडिता नारायण केशव वैद्य यांच्या पुस्तकावर विस्तृत अभिप्राय देताना त्यातील विधवांची आकडेवारी दिलेली आहे. या देशात एकंदर ९,६०,०९२,२७ पुरुष व ९,१९,२९,१२३ स्त्रिया आहेत. या स्त्रियांत २,०९,३८,६२९ विधवा आहेत. या विधवांपैकी १,६१,१९,१३५ हिंदू व मुस्लीम, ख्रिस्ती, एस्त्रायल व इतर धर्मीयांतील मिळून ४,८२,१७,९४ विधवा आहेत. यापैकी २५ वर्षाच्या वर १,४७,१४,८३० २५ ते १५ पर्यंत ११६१२२४ आणि १५ पासुन ५ पर्यंत २३८०८१ विधवा आहेत.'[२९] या आकडेवारीवरुन विधवांची संख्या जास्त असलेली दिसते.

सन १८८८ साली बालविवाह आणि असंमत वैधव्य या विषयावरील टिपणे लिहिणारे मलबारी म्हणतात, या क्षणी हिंदुस्थानामध्ये तीस वर्षांवरील २१ लाख स्त्रियांना विधवा रहावे लागते.'[३०] मलबारींनी दिलेली आकडेवारी अशी आहे.

| वय | हिंदू विधुर | हिंदू विधवा |
|---|---|---|
| १ ते ९ | २१००० | ६३००० |
| १० ते १४ | ६५००० | १७४००० |
| १५ ते १९ | १०८००० | ३१२००० |
| २० ते २४ | २०६००० | ६१०००० |
| २५ ते २९ | ३३३००० | ९६१००० |
| ३० ते ३९ | ७८६००० | २७९७००० |
| ४० ते ४४ | ८७७००० | ३६०१००० |
| ५० ते ५९ | ८६७००० | ३४०६००० |
| ६० वर्षानंतर | ११३३००० | ४१७७००० |

या सर्व आकडेवारीवरुन एकंदर लोकसंख्येच्या प्रमाणात विधवांची संख्या किती मोठी होती व त्यापैकी जास्तीत जास्त विधवा या ब्राह्मण जातीत व बालविधवा होत्या, असे दिसते. त्यातही भारतात या प्रथा परंपराचे अनुकरण होत असल्याने त्याचा परिणाम हा सर्वसामान्य कुटुंबातही होत होता. एकोणिसाव्या शतकात भारतात सर्व समाज हा या सर्व प्रथा परंपरांनी ग्रासला होता. त्यामुळे त्यात जागृती व सुधारणा घडवून आणणे किती कठीण होते, याची कल्पना समाजसुधारकांच्या प्रयत्नांतून दिसून येते. त्यामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांला हात घालणे किती कठीण झाले असेल, याची कल्पनाच आपण करु शकत नाही. तरीही विष्णु शास्त्री पंडितांनी याची जाहीर वाच्यता आपल्या 'इंदुप्रकाश' या नियतकालिकातून केलेली पहावयास मिळते. समाजाच्या

विरोधाला तोंड देऊन, प्रसंगी अवहेलना सहन करुन स्त्रियांच्या उध्दारासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केलेले पहावयास मिळतात.

एकोणिसाव्या शतकात पंडितांनी सुधारणेचा मार्ग अवलंबला, तो इतर समाजसुधारकांपेक्षा वेगळा होता. त्यांचा प्रत्यक्ष कृतीवर जास्त विश्वास होता.

विष्णु शास्त्री पंडित हे बोलघेवडे सुधारक नव्हते, तर ते कर्ते सुधारक होते. महाराष्ट्रातील काही समाजसुधारकांबाबत असे पाहवयास मिळते की त्यांनी त्या समाजसुधारणांचा पाठपुरवठा केला. किंवा त्यांना पाठिंबा दिला. त्या सुधारणा व्यक्तिगत जीवनात आचरणत आणण्याचा प्रसंग केव्हा त्यांच्यावर आला तेंव्हा त्यांनी सपशेल माघार घेतली. काहींनी एखाद्या कृतीबाबत समाजाच्या दडपणापुढे झुकून प्रायश्चित्त घेतले.'[३१] अर्थात, या बद्दल त्या समाजसुधारकांनाही फारसा दोष देणे योग्य नाही. ते सर्वजण आपल्या मतांशी किंवा विचारांशी प्रामाणिकच होते. आपल्या लोकांनी आधुनिक विचारांचा स्वीकार करावा, समाजात चांगला बदल घडून यावा, अशी त्यांची इच्छा होती. परंतु सनातनी विचारांच्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर दडपण आणल्यामुळे त्यांचा नाइलाज होत होता.

त्यांच्या माघारीचे कारण काहीही असले तरी त्यांची उक्ती आणि कृती यांत एकवाक्यता राखणे त्यांना जमले नाही हे मात्र निश्चित.

विष्णु शास्त्री पंडित यांनी मात्र आपल्या जीवनात अशी विसंगती कधी निर्माण होऊ दिली नाही. त्यांनी ज्या सुधारणांचा हिरिरीने पुरस्कार केला. त्यांचे व्यक्तिगत जीवनात आचरण करण्याचा प्रसंग जेंव्हा त्यांच्यावर आला, तेंव्हा त्यांनी कोणतेही कारण देऊन माघार घेतली नाही. अशा प्रसंगी ते आपली तत्त्वे व विचार यांच्याशी प्रामाणिकच राहिले.

१८७४ साली त्यांची प्रथम पत्नी मृत्यू पावली, त्या वेळी त्यांनी वामनराव आगाशे यांची विधवा कन्या कुसाबाई हिच्याशी पुनर्विवाह केला. अशा प्रकारे त्यांनी आपल्या विचारांवरील निष्ठा प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केली.'[३२]

**५) चातुर्विध साधनातून लोकसुधारणेचा प्रयत्न -**

लोकसुधारणेचा अट्टाहास धरणाऱ्या या महान पुरूषाने आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा किंचितही विचार न करता आपल्या नोकरीचा त्याग करून मुंबईस आल्यानंतर, लेखन, व्याख्यान, चर्चा आणि कीर्तन या `चतुर्विध` साधनांनी समाजसुधारणेचा मार्ग अवलंबिला. धर्मशास्त्रास धरून असलेले आपले प्रगल्भ व प्रागतिक विचार ते जनता जनार्दनापुढे 'इंदुप्रकाश' साप्ताहिकामधून मांडू लागले.

'इंदुप्रकाश' वर्तमानपत्रात बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह इत्यादी प्रश्नांची सांगोपांग चर्चा करून विरोधकांच्या आक्षेपांचे सप्रमाण खंडण करत. प्राचीन काळी समाजजीवनात स्त्रियांचे स्थान फारच सन्मान्य होते. हे लोकांच्या निदर्शनास त्यांनी आणून दिले. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार आहे किंवा नाही? आजन्म अविवाहित राहण्यास त्यांना शास्त्रांची काही हरकत आहे काय? लग्नाच्या वयासंबंधी काही किमान मर्यादा ठरविता येतील किंवा नाही? विधवाविवाह सशास्त्र किंवा अशास्त्र आहे? यासारख्या अनेक गोष्टीचा ऊहापोह त्यांनी केला व आपली निर्णायक मते लोकांना पटवून देण्याची त्यांनी अविश्रांत खटपट केली.

विष्णु शास्त्री पंडितांनी स्त्रियांच्या मूलभूत हक्कांचा सातत्याने विचार केला तरी पण स्त्रियांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणून विधवाविवाहाचा प्रश्नच प्रामुख्याने हाती घेतला. महाराष्ट्रात पुनर्विवाहाच्या प्रश्नाला इ.स. १८४० पासूनच चालना मिळाली होती. इ.स. १८४२ साली बेळगांव येथे दोन ब्राह्मण बालविधवांचे पुनर्विवाह झाल्याचे वृत्त 'प्रभाकर' पत्रात प्रसिध्द झाले होते. याच सुमारास मुंबईस `परमहंस मंडळी` या नावाची गुप्त संस्था स्थापन झाली होती. तिच्या उद्देशपत्रिकेतही `विधवांच्या पुनर्विवाहाविषयी संमती असावी` असे प्रमुख कलम होते. इ.स. १८५६ मध्ये विधवाविवाहाचा कायदा झाला. त्यामुळे ह्या सुधारणेच्या मार्गातील मोठी अडचण दूर झाली. सुसंघटित प्रयत्नांशिवाय पुनर्विवाह प्रतिबंधाच्या दीर्घकालीन रूढींचे निर्मूलन होणार नाही हे लक्षात घेऊन

पंडितांनी ता. २८ जानेवारी १८६६ रोजी पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची स्थापना केली. यासभेचे अध्यक्ष जमखिंडीकर होते व उपाध्यक्ष पदाच्या जागी माधवराव विंचुरकर होते. सभेच्या चिटणीसपदी स्वतः विष्णु शास्त्री पंडित होते. पहिल्या चार महिन्यात सभासदांची संख्या अनुक्रमे ११२, १३४, १६४, १९८ अशी होती.`[३३]

पंडितांनी आपल्या या मार्गात चर्चा, वादविवाद, या दोन गोष्टीवर जास्त भर दिलेला दिसतो. कारण सभेच्या माध्यमातून होणाऱ्या चर्चा, व त्यातून होणारा वादविवाद यातून सनातनी लोकांच्या जीवनावर जो परिणाम होत होता तो जास्त परिणामकारक होता असे म्हणता येते. आपण अंगिकृत केलेल्या कार्यावर विष्णुशास्त्रींची अढळ श्रध्दा होती. व्यावहारिकदृष्ट्या प्रतिपक्षांशी तडजोड करण्यास ते नेहमी तत्पर असत. पुनर्विवाहाच्या प्रश्नावर जरी दुमत असले तरी बालविवाहाचे अनिष्ट परिणाम सर्वांस मान्य होण्याजोगे आहेत, असे दिसताच त्यांनी सनातनी व सुधारक या दोन्ही गटांना पसंत पडेल असे संमतिपत्र तयार केले. कन्येचा विवाह बारा वर्षापासून सोळा वर्षापर्यंत करावा व पुरूषाने सतरा वर्षापुढे पंचेचाळीस वर्षापर्यंतच आपले लग्न करावे, या विचाराला प्रसिध्दी देण्यावर भर दिला.`[३४]

पंडितांच्या या प्रयत्नांत त्यांनी जास्त करून विधवाविवाह व बालविवाहाच्या प्रश्नांकडे लक्ष दिलेले पहावयास मिळते. कारण एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केलेले होते. म्हणूनच पंडितांनी कोणत्याना कोणत्या मार्गांने हे प्रश्न सनातन्यांच्या गळी उतरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

**पुनर्विवाहविषयक विचार व पंडितांचा पुनर्विवाह -**

एकोणिसाव्या शतकात महत्त्वाचा प्रश्न स्त्रियांचा होता. त्यातील विषय ते म्हणजे पुनर्विवाह, विधवाविवाह, बालविवाह अशा या प्रश्नांना विरोध व या प्रश्नांना उचलून धरणे कोणत्याही समाजसुधारकाच्या दृष्टीने किती त्रासदायक ठरले असेल याची कल्पना केली जाऊ शकते. परंतु समाजाच्या विरोधाला तोंड

देऊन प्रसंगी अवहेलना सहन करून स्त्रियांच्या उद्धारासाठी ज्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले, अशा समाजसुधारकांमध्ये विष्णु शास्त्री पंडित यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतीय स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी, याकरिता विष्णु शास्त्री पंडितांनी गावोगावी जाऊन व्याख्याने दिली. स्त्रियांच्या प्रश्नांशी संबंधित असे अनेक ग्रंथ लिहिले, याच प्रश्नावर शेकडो लेखही त्यांनी प्रसिध्द केले. विष्णु शास्त्री पंडित यांनी जुन्या धर्मग्रंथाचे सखोल अध्ययन केले होते. त्यामुळे अनेक धार्मिक व सामाजिक प्रश्नांवर ते अधिकारवाणीने बोलत होते. त्यांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी, या हेतूने मांडलेले विचार समाजातील सनातनी व परंपराप्रिय मंडळींना पटणे शक्यच नव्हते. म्हणूनच त्यांनी विष्णुशास्त्रींना जोरदार विरोध केला. विष्णुशास्त्रींचे विचार धर्मविरोधी आहेत, असे सनातनी मंडळींनी सांगण्यास सुरूवात केली. तरीही या सर्व आक्षेपांचे सप्रमाण खंडण करून त्यांनी आपल्या विचाराला जुन्या धर्मग्रंथांचा आधार दाखवून दिला.`[३५] जुन्या धर्मग्रंथाचा अभ्यास करुन त्यामध्ये विधवाविषयक चांगले विचार जनतेला दाखवून दिले.

भारतीय समाजात विधवा स्त्रिच्या वाट्याला आलेले दुर्दैवाचे भोग पाहून विष्णु शास्त्री पंडितांच्या मनाला अतिशय वेदना झाल्या होत्या. तत्कालीन समाजाने विधवा स्त्रियांवर अनेक प्रकारचे निर्बंध लादले होते. विधवा स्त्रीचे दर्शन देखील अशुभ मानले जात होते. तिच्या कुटुंबातील लोकही तिला फुटक्या नशिबाची समजून हिडीसफिडीस करीत असत. केशवपनासारख्या अत्यंत नीच प्रकाराला सामोरे जाण्याचा प्रसंग विधवा स्त्रीवर येत असे. विधवा स्त्रियांची ही स्थिती पाहिल्यावर त्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, असे विष्णुशास्त्रींनी ठरविले. त्या करिता विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी असणे आवश्यक आहे, त्यामुळेच त्यांनी १८६६ मध्ये `पुनर्विवाहोत्तेजक मंडळीं` ची स्थापना केली व या मंडळाच्या वतीने स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा केली जाऊ लागली. त्याच काळात पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर

हे विधवाविवाहाचे आणखी एक कट्टर पुरस्कर्ते होते. विष्णु शास्त्री पंडितांचे म्हणणे याबाबत वेगळेच होते. `विधवा-विवाहाला उत्तेजन मिळण्याच्या दृष्टीने सरकारचा कायदा पुरेसा ठरणार नाही. केवळ कायद्याच्या मार्गावर विसंबून राहिल्यास हा प्रश्न व्यवस्थितपणे मार्गी लावता येणार नाही. केवळ विधवा-विवाहालाच नव्हेतर सर्वच प्रकारच्या सामाजिक सुधारणांना कायद्याचा व सरकारचा आधार पुरेसा पडत नाही. अशा सुधारना घडून येण्यासाठी समाजानेच अंतःप्रेरणेतून पुढाकार घेतला पाहिजे, असे त्यांना वाटत होते.`[३६]

सामाजिक सुधारणांसबंधीचा विष्णुशास्त्रींचा दृष्टिकोन कसा बरोबर होता, हे काळाच्या कसोटीवर सिध्द झाल्याचे लक्षात येते. जोपर्यंत एखाद्या समाज सुधारणेबाबतची समाजाची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत केवळ कायदा केल्याने सुधारणा होत नाही. किंवा अपेक्षित परिवर्तन घडून येत नाही, असाच आजवरचा अनुभव आहे.

**पंडितांचा पुनर्विवाह -**

`क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे` स्वतःच्या क्रियेशिवाय निव्वळ बोलणे व्यर्थ ही उक्ती पंडितांनी स्वतःच्या जीवनात पाळली. पंडितांच्या कर्तव्याबद्दल बोलायचे झाले तर पंडित बोलघेवडे करणारे सुधारक नव्हते, तर बोलेल तेच जीवनात अनुसरणारे विचारवंत सुधारक होते. महाराष्ट्रातील काही समाजसुधारकांबाबत असे पहावयास मिळते की त्यांनी ज्या समाजसुधारणांचा पाठपुरावा केला किंवा त्यांना पाठिंबा दिला त्या सुधारणा व्यक्तिगत जीवनात आचरण्यात आणण्याचा प्रसंग जेव्हा त्यांच्यावर आला, तेव्हा त्यांनी सपशेल माघार घेतली. काहींनी एखाद्या कृतीबाबत समाजाच्या दडपणापुढे झुकून प्रायश्चित्त केले. अर्थातच, याबाबत समाजसुधारकांना फारसा दोष देणे योग्य ठरणार नाही. ते सर्वजण आपल्या मतांशी किंवा विचारांशी प्रामाणिकच होते. आपल्या लोकांनी आधुनिक विचारांचा स्वीकार करावा. समाजात चांगला बदल घडून यावा, अशी त्यांची इच्छा होती. परंतु सनातनी विचारी लोकांच्या मोठ्या दडपणामुळे त्यांचा नाईलाज होत होता. अर्थात, त्यांच्या माघारीचे कारण

काहीही असले तरी त्यांची उक्ती आणि कृती यांत एकवाक्यता राखणे त्यांना जमले नाही. एवढे मात्र निश्चित. परंतु विष्णु शास्त्रीयांच्यातील नव्हते.`[३७] ते स्वतः कृती करत व नंतर लोकांना कृतीद्वारे दाखवून देत, ते कृतिशील समाज उध्दारक होते.

विष्णु शास्त्री पंडित यांनी मात्र आपल्या जीवनात अशी विसंगती कधी निर्माण होऊ दिली नाही. आपल्या कर्तव्यात स्वतःच्या विचारांशी एकनिष्ठता ठेवली व सातत्याने आपले कार्य सुरु ठेवले. त्यांनी नेहमी ज्या सुधारणांचा हिरिरीने पुरस्कार केला. त्यांचा व्यक्तिगत जीवनात आचरण करण्याचा प्रसंग जेव्हा त्यांच्यावर आला, तेव्हा त्यांनी कोणत्याही कारणास्तव किंवा कोणत्याही सबबी सांगून माघार घेतली नाही. याचे उदाहरणच द्यायचे झाले, तर १८७४ मध्ये त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला त्यावेळी विष्णुशास्त्रींनी `वामनराव आगासे` यांची विधवा कन्या `कुसाबाई` हिच्याशी पुनर्विवाह केला.`[३८] अशा प्रकारे त्यांनी आपल्या विचारांवरील निष्ठा प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिली.

**सारांश -**

विष्णु शास्त्री पंडित भारतीय समाजातील एका दुर्बल घटकाचे म्हणजे स्त्रियांचे प्रश्न पोटतिडीकीने मांडणारे आघाडीचे समाजसुधारक होते. त्यांनी तत्कालीन समाजातील स्त्रियांची दैन्यावस्था पाहिली. त्यांच्यावर चारही बाजूने होत असलेला अन्याय पाहिले. त्यावरुन स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, या उद्देशातून त्यांनी स्त्रियांच्या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या प्रश्नाला प्राधान्य दिले व त्यासाठीच संपूर्ण आयुष्य त्यांनी वाहून घेतले. स्त्रियांच्या न्याय हक्कांसाठी समाजातील सनातनी लोकांशी संघर्ष करण्याची तयारीही त्यांनी ठेवली होती. त्या वेळच्या समाजव्यवस्थेवर सनातन्यांचा जबरदस्त पगडा होता. त्यामुळे सनातन्यांच्या विरोधाला तोंड देणे हे एक सुधारकांसमोर दिव्यच होते. बऱ्याच समाजसुधारकांना या सनातन्यांसमोर झुकावे लागल्याची उदाहरणे अनेक सापडतात. विष्णुशास्त्रींनी तर विधवाविवाहासारख्या स्फोटक प्रश्नांना हात घातल्यामुळे त्यांनाही या विरोधाला व त्यांच्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार

घालण्यापर्यंत सनातनी मंडळींची मजल गेली होती. परंतु हाती घेतलेले कार्य अर्ध्यावर न सोडता किंवा आपल्या उद्दिष्टापासून कधीही माघार घेतली नाही. खरे तर विष्णु शास्त्री पंडित सर्वांगीण, सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते होते. तथापि, समाजसुधारणेच्या कार्याची व्याप्ती खूप प्रचंड होती. हे लक्षात घेऊन त्यांनी स्त्री सुधारणेच्या प्रश्नांवर आपले लक्ष केंद्रित केले होते व ते कार्य अतिशय निष्ठेने त्यांनी पुढे सुरु ठेवले होते.

अशाच त्यांच्या कार्यातून व समाजसेवेतून त्यांच्या सर्वांगीण कृत्याचा परिपाक हा काही ठराविक निष्कर्षातून पहावयास मिळतो.

स्त्री जातींच्या न्याय हक्कांसाठी विष्णु शास्त्री पंडित सतत बारा वर्ष जीर्ण मतवादी विचारांच्या लोकांशी झगडले.

स्त्रियांच्या दयनीय अवस्थेकडे पाहून त्यासाठी काहीतरी केले पाहिजे, या हेतूने त्यांनी या प्रश्नाला प्राधान्य देऊन आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले.

या काळात समाजावर धर्माचा जास्त पगडा होता. त्यामुळे समाजसुधारकांच्या दृष्टीने सुधारणा करणे एक दिव्यच होते.

अशा परिस्थितीत अनेक समाजसुधारकांनी या परस्थितीपुढे हात टेकलेले पहावयास मिळतात.

विष्णुशास्त्रींनी स्त्रियांच्या प्रश्नाला हात घातल्याने त्यांना या परिस्थितीचा जास्तच त्रास सहन करावा लागला. त्यांच्यावर बहिष्कार घालण्यापर्यंत समाजाची मजल गेली होती.

विष्णुशास्त्रींच्या कार्याची व्याप्ती प्रचंड होती म्हणूनच त्यांनी स्त्री सुधारणेचा प्रश्न हाती घेतला व नेटाने पुढे चालविला.

याकाळात झालेल्या सुधारणा चळवळीने व सुधारकांच्या प्रयत्नाने स्त्रियांच्या परिस्थितीत हळूहळू सुधारणा झाल्याचे दिसून येते.

सरकारच्या कायद्यामुळेही बरीचशी परिस्थिती सुधारलेली दिसते तरीही रूढी परंपरेला बदलण्यास लोक तयार नव्हते.

अशा परिस्थितीत स्वतःपासूनच बदल करून नंतर तो आदर्श समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न विष्णुशास्त्रींनी केलेला दिसतो.

याचे उदाहरण म्हणजे विष्णुशास्त्रींनी केलेला विधवेशी विवाह होय.

## संदर्भसूची


१) सरदार गं. बां., `महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी`, पृष्ठ - १५३.

२) कित्ता; पृष्ठ १५३.

३) डॉ. सहस्त्रबुध्दे पु.ग., 'लोकहितवादींची शतपत्रे', पृष्ठ - २७-२८.

४) कित्ता; पृष्ठ - १३३-१३४.

५) सरदार गं.भा., पूर्वोक्त, पृष्ठ - १५४-१५५.

६) पंडित श्री.स., 'विष्णु शास्त्री पंडित यांचे चरित्र', पृष्ठ - ९-१०-११.

७) पाटील एन.डी., भिडे जी.एल., 'महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास', पृष्ठ - १०-११.

८) कित्ता; पृष्ठ - ११.

९) डॉ. दीक्षित राजा, 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', पृष्ठ - १३५.

१०) प्रा. गणेश राऊत, प्रा. ज्योति राऊत, `महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास`, पृष्ठ - १७८.

११) प्रा. डॉ. सौ. धारनकर सरला, `आधुनिक भारतातील स्त्री जीवन`, पृष्ठ - १४

१२) सरदार गं.भा., पूर्वोक्त, पृष्ठ - १५६-१५७.

१३) कित्ता; पृष्ठ - १५८.

१४) पंडित श्री.स., पूर्वोक्त, पृष्ठ - १३-१४.

१५) कित्ता; पृष्ठ - १५-१६.

१६) प्रा. पाटील व्ही.बी., 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', पृष्ठ - १३५.

१७) मालशे स.ग., 'विधवा विवाह चळवळ', पृष्ठ - २८-२९.

१८) सरदार ग.भा., पूर्वोक्त, पृष्ठ - १५८-१५९.

१९) सरदार गं. बा., `पूर्वोक्त` पृष्ठ - १५४, १५५.

२०) पाध्ये प्रभाकर, श्री.रा.टिकेकर, 'आजकालचा महाराष्ट्र - वैचारिक प्रगती' पृष्ठ - १२०-१२१.

२१) पंडित श्री.स., पूर्वोक्त, पृष्ठ - १५-१६.

२२) मालशे स.ग., पूर्वोक्त, पृष्ठ - ३०-३१.

२३) श्री. पु. गोखले., `विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि त्यांचे विचारधन`, पृष्ठ - ७४.

२४) श्री. पंडित विद्याधर, 'हिंदुधर्म आणि सुधारणा', पृष्ठ - ९६-९७.

२५) प्रा. पाटील व्ही. बी., `१९व्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास`, पृष्ठ - १३८.

२६) मालशे स.ग., पूर्वोक्त, पृष्ठ - २८.

२७) कित्ता; पृष्ठ - ३५.

२८) रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा - एकोणीसावे शतक', पृष्ठ - १९०.

२९) कित्ता; पृष्ठ - १९०.

३०) कित्ता; पृष्ठ - १९१.

३१) प्रा. पंडित व्ही.बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३७.

३२) श्री. पंडित स., पूर्वोक्त, पृष्ठ - ९२.

३३) सरदार गं. बा., `पूर्वोक्त` पृष्ठ - १५

३४) कित्ता; पृष्ठ - १६०

३५) प्रा. पाटील व्ही. बी., पूर्वोक्त, पृष्ठ - १३४.

३६) कित्ता; पृष्ठ - १३५

३७) कित्ता; पृष्ठ - १३७

३८) कित्ता; पृष्ठ - १३७

# प्रकरण - ७

# उपसंहार

## प्रकरण-७

## उपसंहार

**प्रस्तावना -**

इतिहासाची मांडणी करताना व्यक्ती समाज, स्थळ आणि काळ हे चार घटक महत्त्वाचे मानले जातात. `मानव` हाच इतिहासाचा अभ्यास विषय असतो. `मानवाने केलेली प्रगती किंवा अधोगती यांचा लेखाजोखा सांगणारी कहाणी म्हणजेच इतिहास होय`.

`इतिहास म्हणजे त्या त्या कालखंडातील त्या त्या लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक विचारांचे, आशा- आकांक्षाचे, घडामोडींचे व स्थितीचे प्रतिबिंब असते.`[१] वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळे महापुरूष निर्माण होत असतात व आपल्या कर्तृत्वाचा ठसा त्या त्या कालखंडावर ठेऊन जात असतात. म्हणूनच तर `कार्लाइल महापुरूषाच्या चरित्राला इतिहास असे म्हणतो.` महापुरूष हे त्या त्या काळात सामाजिक, राजकीय तथा आर्थिक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न करत असतात. संपूर्ण समाजाची उन्नती साधण्याचा त्यांचा हेतू असतो. अशाच एका महापुरूषाचे जीवनचरित्र संशोधनाच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा छोटासा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधाद्वारे करण्यात आलेला आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक परिस्थिती पाहता असे दिसते की, या काळात संपूर्ण सामाजिक जीवनाला धार्मिकतेची झालर होती. सामाजिक व धार्मिक असा भेद करणे कठीण होते. वर्णभेद, धर्म, जातिसंस्था, गावगाडा, कुटुंबसंस्था अशा सामाजिक संस्थांना दैवी अधिष्ठान होते.

समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात धर्माचे प्राबल्य होते आणि धार्मिक जीवन हे विशिष्ट चौकटीत बंदिस्त होते. स्नानसंध्या, उपास तापास, तीर्थयात्रा, अशा बाह्य आचरणांवर व विधी निषेधादी कर्मकांडावर धर्माचा भर असे.

शास्त्राप्रामाण्य हे उच्चवर्णीयांमध्ये तर रुढीप्रामाण्य हे बहुजन समाजात धर्माचे लक्षण बनले होते. दैववादी मनोवृत्ती आणि औदासिन्यातून उद्‌भवलेली असहिष्णुता या गोष्टींमुळे सामाजिक स्थितिशीलता कमी होऊ लागली होती. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता, इंग्रजी शिक्षण यामुळे सुशिक्षित तरुणांच्या विचारांमध्ये एकूणच प्रस्थापित धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेबद्दल योग्य - अयोग्यतेबाबत शंकाकुलवृत्ती निर्माण झाली. त्यातूनच आत्मचरित्राची प्रक्रिया सुरु झाली. पुढे ख्रिस्ती धर्मप्रसार, मिशनऱ्यांचे कार्य तसेच हिंदुधर्मावरील टीका यामुळे विचारपरिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली. व महाराष्ट्रात प्रबोधनाला सुरुवात झाली. भारतात एकोणिसाव्या शतकात झालेल्या प्रबोधनावर युरोपीय प्रबोधनाचा फार मोठा परिणाम दिसून येतो. मानवता हा प्रबोधनाचा आत्मा आहे व मानव हा त्या सर्व गोष्टींचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे प्रबोधनात प्रत्येक गोष्टीची चिकित्सा ही त्या काळी गरजेची वाटू लागली. व त्यातूनच धर्माकडे व शाखांकडे चिकित्सक वृत्तीने पहिले जाऊ लागले. भारतात सर्वप्रथम 'राजा राममोहन रॉय' यांनी खऱ्या  अर्थाने 'बंगाल प्रांतात' प्रबोधन सुरु केले. परंतु महाराष्ट्रात प्रबोधनास उशीर झाला, कारण महाराष्ट्रातील 'माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन' यांचे शासन व त्याचे विचार त्यांनी महाराष्ट्रात टप्या-टप्प्याने सुधारणा व नवे उपक्रम सुरु करण्याचे धोरण राबविले. "जुने पूर्णपणे टाकू नये व नवीन पूर्णपणे आणू नये" असे त्यांचे धोरण होते. त्यांचे विचार हे मराठी माणसांच्या कलाचेच होते. त्यामुळे जोपर्यंत ते लोकांशी समरस होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या विरोधी जाऊन कोणतेही बदल घडविता येणार नाही, असा त्यांचा विचार होता.

महाराष्ट्रात प्रबोधन सुरु झाले ते नवी शासन पध्दती, इंग्रजी शिक्षण व त्यातून निर्माण झालेला नवा मध्यमवर्ग, तसेच ख्रिस्ती धर्म प्रसारकांमुळे झालेले कार्य व त्यातून तयार झालेला सुधारकांचा वर्ग व त्यांच्या वैचारिक चळवळीतून होय.

या तीन माध्यमांचे परिणाम सामान्य माणसांच्या जीवनावर होऊन त्यांच्या विचारांना नवी चालना मिळाली व त्यात पुढे वृत्तपत्रांनी चांगलीच भर घातली.

महाराष्ट्रात या वृत्तपत्रांनी सामाजिक, राजकीय, व आर्थिक परिवर्तनात फार मोलाची कामगिरी बजावली एकोणिसाव्या शतकात जी सामाजिक व सांस्कृतिक आंदोलने झाली, त्यास मुख्य प्रेरणा ही तत्कालीन वृत्तपत्रांचीच होती. तरीही अत्यल्प वाचक वर्गामुळे या वृत्तपत्रांच्या कार्यावर मर्यादा पडल्या होत्या. कारण त्या काळात बहुसंख्य लोक हे शिक्षणापासून वंचित होते. तसेच अत्यंत तुरळक दळणवळणाच्या सुविधेमुळे या वृत्तपत्रांचा संबंधही येत नसे.

थोडक्यात १९ व्या शतकात या वृत्तपत्र व मुद्रण कलेमुळे समाजामध्ये जागृती आली पण तिची व्याप्ती ही मर्यादितच राहिलेली दिसते. या साधनांचा प्रभाव हा प्रामुख्याने एका विशिष्ट वर्गापुरताच जाणवतो. तसेच बहुजन समाजावर याचा प्रभाव फारसा पडलेला दिसत नाही.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात सत्तांतर झाले व सर्वच क्षेत्रात बदल घडून यायला सुरुवात झाली दोन भिन्न संस्कृतीच्या संघर्षातून समन्वयात्मक सुधारणेस सुरुवात झाली व नवे विचार वाहू लागले. नवविचारांबरोबरच नवीन सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला जाऊ लागला. त्यात स्त्रीशिक्षण, प्रौढ विवाह, जरठ कुमारी विवाह निषेध, पुनर्विवाह इ. स्त्रियांचे प्रश्न जास्त गांभीर्याने विचाराधीन होऊन त्यावर चर्चा केली जाऊ लागली. महात्मा फुलेंनी याच नवीन विचारांतून इ.स. १८५१ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा काढली व पुढे स्त्री शिक्षणाचा प्रसार वाढू लागला. त्याचप्रमाणे या कालखंडात ख्रिस्ती मिशनऱ्यांनीही मुलींच्या शाळा स्थापन करुन या स्त्रीशिक्षण चळवळीला चांगलाच हातभार लावला.

परंतु समाजात स्त्रीशिक्षणाबरोबरच इतरही गंभीर समस्या होत्या त्याकडेही लक्ष देणे गरजेचे होते. धर्माच्या नावाखाली अज्ञान व शेकडो हास्य स्पद कल्पना उराशी बाळगून आपणच आपल्या प्रगतीच्या मार्गात अडथळे

निर्माण करत आहोत. समाज दोषमुक्त करायचा असेल तर आपण संघटित व्हायला हवे असे मत जांभेकर, महाजन, लोकहितवादी व्यक्त करतात.

या कालखंडात समाजसुधारणेचे तत्त्वज्ञान मांडणारे अनेक थोर पंडित होते. पण प्रत्यक्षात कृती करणारे काही अपवादात्मकच होते. त्यात म. फुले हे अग्रणी हाते. त्याचबरोबर त्यांच्या पत्नीही होत्या. त्याच कालखंडात नव्या विचारांची नवी पीढी उदयाला आली व त्यांनी म. फुलेंसमवेत महाराष्ट्रात समाज परिवर्तन घडवून आणले व समाजासमोर एक आदर्श घालुन दिला. अशा आदर्श विचारवादी सुधारणांच्या यादीत प्रामुख्याने नाव येते ते म्हणजे विधवा विवाहाचे पुरस्कर्ते विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे कारण एकोणिसाव्या शतकाची परिस्थिती पाहता सर्व समाजसुधारक हे धर्माच्या भीतीने ग्रासलेले होते. अशा परिस्थितीत देखील पंडितांनी आपला दिनक्रम चालूच ठेवला. अशा खडतर परिस्थितीत त्यांना साथ मिळाली ती म्हणजे गोपाळ गणेश आगरकर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, रानडे, केशव शिवराम भवाळकर, कृष्णशास्त्री चिपळुणकर, विष्णु मोरेश्वर भिडे यांची यासारख्या सुधारकांनी समाजात सुधारणांचा अट्टाहास धरुन परिवर्तनाचा इतिहास घडविला. प्रत्येकाचे विचार परिस्थितीनुरुप वेगळे असले तरी ध्येय मात्र एकच होते. प्रत्येकाने आपआपल्या पातळीवर सुधारणेचा चंग बांधलेला दिसतो.

असे असले तरी विष्णु परशुराम शास्त्री पंडितांचे कार्य हे इतरांपेक्षा नेहमीच वेगळे जाणवते. समाज सुधारणेच्या कोणत्यही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक काथ्याकूट करत करत लोकांचे मत परिवर्तन होणे शक्य नाही, याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच स्त्री जातीच्या उन्नतीसाठी शक्ती व सर्वस्व वेचण्याचा निश्चय त्यांनी केला. लोकांच्या निंदेला, आघातांना न जुमानता त्यांनी तो निश्चय आमरण पाळला. ज्या ज्या वेळेला त्यांच्या कसोटीची वेळ आली त्या त्या वेळी ते आपल्या शब्दाला जागले व आपली तत्त्वनिष्ठा किती अटळ आहे याची समाजाला खात्री पटवून दिली.

यांचा प्रत्यय आपणाला त्यांच्या विधवा पुनर्विवाहावरुन येतोच. तो एक वेगळा आदर्श समाजासमोर त्यांनी ठेवला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधात एकूण सात प्रकरणे असून दोन परिशिष्टे घेतलेली आहेत.

प्रकरण पहिले हे प्रस्तावना असून त्यामध्ये संशोधनाची ओळख करुन दिलेली आहे. सुरुवातीला संशोधनासंदर्भात प्रस्तावना दिलेली आहे. त्यामध्ये संशोधनाचे नाव, संशोधन विषयाची निवड, आवश्यकता संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संदर्भ साधने, संशोधन पध्दती, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन विषयाच्या मर्यादा, प्रकरण नियोजन, संशोधन विषयाचे महत्त्व, त्याचबरोबर सदर संशोधन विषयाचे योगदान दिलेले आहेत व शेवटी संशोधन विषयासंदर्भातील काही प्रमुख निष्कर्ष काढलेले आहेत.

प्रकरण दोन मध्ये एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आरंभकाळातील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला आहे. सदर प्रकरणात १९ व्या शतकातील आरंभकाळ व सामाजिक परिस्थिती, मध्यमवर्गाचा उदय, वर्ण संकल्पना, समाजाची विभागणी, तसेच १९ व्या शतकातील समाज जीवन व त्या काळी अस्तित्वात असलेली जातिव्यवस्था यांचा बारकाईने अभ्यास केलेला आहे. समाजातील जाती पोटजातींचा व वर्णजाती व्यवस्थेचा समाजावर काय व कसा परिणाम झाला याचे सविस्तर वर्णन या प्रकरणात केलेले आहे.

तत्कालीन महाराष्ट्रात समाजात जातिव्यवस्थेबरोबरच अस्तित्वात असणारे स्त्रियांचे प्रश्न म्हणजे बालविवाह, विषम विवाह (जरठ कुमारी विवाह) बहुपत्नीत्व, सतीची पध्दत, विधवांचे जीवन, केशवन, स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न, पडदा पध्दती, यांचाही सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

समाजावर असणारा धर्माचा पगडा व त्यामुळे बंदिस्त झालेले स्त्रियांचे जीवन व त्यांचा दर्जा यांचा परिणाम तत्कालीन स्त्रियांवर झालेला आपणास चांगलाच जाणवतो. तत्कालीन समाज जाती उपजातीत विभागलेला होता व

त्यावर तत्कालीन हिंदु व इतर धर्माचा चांगलाच प्रभाव होता. समाजात वर्णव्यवस्था खोलवर रुजली होती व त्यातूनच जातिसंस्थेचा विषारी वृक्ष फोफावलेला होता. थोडक्यात, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचा सामाजिक परिस्थितीचे वर्णन करताना म्हणावे लागले की, वर्ण जातीची विषमताप्रधान चौकट व बंदिस्त ग्रामजीवन अस्पृश्यता व स्त्रीदास्य ही उदाहरणे तत्कालीन महाराष्ट्राची जणू महत्त्वाची अंगेच होती. म्हणूनच राजा दीक्षित आपल्या पुस्तकात वर्णन करताना म्हणतात की, शिवाजी महाराजांसारख्या समर्थ राज्यकर्त्याला देखील जातीसत्ता, गोसत्ता, वर्णसंस्था व व्यापारी सत्ता यांच्याशी जुळवून घ्यावे लागले. प्रसंगी नमते घ्यावे लागले. म्हणूनच इंग्रजांनी देखील सुरुवातीला याच जातिसंस्थेला कोणताही धक्का न लावता आपली सत्ता हळूहळू प्रस्थापित केली व नंतरच समाजाच्या कलाकलाने सुधारणा घडवून आणण्यास सुरुवात केली. तरी देखील समाजातील स्त्रियांचे प्रश्न इतक्या सहजासहजी सुटलेले दिसत नाहीत, ही अत्यंत दुःखद बाब होती.

इंग्रजी शिक्षणाने मात्र समाजात प्रबोधनास सुरुवात झाली व नवशिक्षित तरुणांच्या कल्पनेतून समाज परिवर्तनाची दीक्षा ठरु लागली. त्याला ख्रिस्ती मिशनऱ्यांचे चांगलेच सहकार्य लाभले व महाराष्ट्रात परिवर्तनाला सुरुवात झाली या परिवर्तनात प्रामुख्याने महात्मा फुले, बाळशास्त्री जांभेकर, नाना शंकरशेठ, विष्णु परशुराम शास्त्री पंडित, लोकहितवादी, भाऊ महाजन, विष्णुबुवा ब्रह्मचारी  यांच्यासारखे कर्तव्यदक्ष समाजसुधारक पुढे आले या व इतर सुधारकांच्या प्रयत्नामुळेच सामाजिक सुधारणांच्या चळवळीला चालना मिळाली व समाज परिवर्तनास सुरुवात झाली.

तीसऱ्या प्रकरणात विष्णु शास्त्री पंडित व त्यांच्या जीवनकार्याची चर्चा केली आहे. त्यामध्ये त्यांच्या जन्मापासून तर त्यांच्या मृत्युपर्यंतचा कालखंड घेतलेला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली. त्यांचे विचार काळाशी कसे सुसंगत होते. बदलत्या काळाबरोबर त्यांच्या विचार आणि कार्यात आलेला, जोपासलेला, सतत कार्यमग्न राहाण्याचा त्यांच्या

व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू समोर येतो. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी अपणाला जे मिळवायचे आहे त्याचा सतत ध्यास घेऊन त्यांनी सामाजिक विकासाचे एक पर्व तयार केले. लेखन, व्याख्यान, चर्चा आणि कीर्तन या चातुर्विध साधनांनी त्यांनी लोकसुधारणेचा मार्ग अवलंबिला. धर्मशास्त्रास धरून असलेले प्रगल्भ व प्रागतिक विचार ते इंदुप्रकाश साप्ताहिकामधून जनतेसमोर मांडत असत. पंडितांनी पुरस्कारलेल्या स्त्री पुनर्विवाहाचा विषय महाराष्ट्राच्या तळागाळापर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी मोठ्या  धिराने पार पाडले. हिंदू विधवांचे पुनर्विवाह करण्याचे तत्त्व जनतेस पटले तरी तपशिलात शिरून विधवेचे दान कोणी करावे, तिचे गोत्र काय आहे इ. अनेक प्रश्न लोकांकडून विचारले जात असताना त्याला उत्तरे देताना पंडित शास्त्र वचनांचा आधार देत व शुद्ध विचार समाजासमोर मांडत. समाजाच्या विकासासाठी समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण व्हावी म्हणून विष्णु शास्त्री पंडितांनी केलेले काम महत्त्वाचे ठरते. त्यांनी समाज बदलण्याचा मार्ग दाखविला यातच त्यांच्या विचारांचे मोठेपणे जाणवते. समाजातील दुःख दैन्य त्यांना स्वस्त बसू देत नव्हते व तीच त्यांची प्रेरणा होती. ते ज्या ज्या भागात गेले त्या त्या भागातील लोकांना राष्ट्रप्रेमाची, कृतिशीलतेची व उच्च विचारांची ओंझळ कायमची देवू केली.

प्रस्तुत प्रबंधामध्ये विष्णु शास्त्री पंडितांच्या स्वभावाचा, विचारांचा, जीवणप्रणालीचा, कौटुंबिक नात्याचा, सामाजिक सुधारणेविषयी असणारी बांधिलकी व योगदान यांचा विचार करण्यात आला आहे. व्यक्तीला जीवन जगण्यापेक्षा सामाजिक तत्त्वाचे प्रत्यक्ष आचरण करणे किती आवश्यक आहे हे त्यांचे जीवन कार्य अभ्यासतांना आपल्या लक्षात येते. विष्णु शास्त्री पंडितांनी आपल्या जीवनाच्या अखेरपर्यंत या मौलिक सामाजिक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन केल्याचे दिसते. जीवनमूल्य हेच कुटुंब, समाज, गाव, राष्ट्र व विश्व यांचा पाया आहे. विष्णु शास्त्रींनी देखील ही जीवनमूल्य आपल्या जीवनाच्या अखेरपर्यंत पाळली म्हणूनच ते समाजासमोर एक आदर्श ठरतात.

तरीही समकालीन विचारवंताच्या तुलनेत विष्णुशास्त्रींचे जे वेगळेपण जाणवते ते त्यांच्या स्वयंपूर्त विचारांमुळे, त्याकाळात समाजात अनेक गोष्टीचे अवडंबर माजले होते. आपल्या संस्कृतीचे शुध्द स्वरूप लोकांसमोर मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. उदात्त मानवधर्माचा, जागतिक बंधुभावाचा आणि विश्वप्रेमाचा पुरस्कार त्यांनी केला. लोककल्याणातच आत्मकल्याण आहे ही त्यांची मूळ प्रेरणा होती. समाज हितचिंतनाचे त्यांनी व्यक्त केलेले सामाजिक विचार हे एकोणिसाव्या शतकातील अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे विचार होते.

विष्णु शास्त्री पंडित भारतीय समाजातील अबला स्त्रियांचे प्रश्न पोटतिडकीने मांडणारे अघाडीचे समाजसुधारक होते. त्यांनी तत्कालीन समाजातील स्त्रियांची दैन्य अवस्था पाहिली होती. त्यांच्यावर चोहोबाजूनी होत असलेला अन्याय व यासाठी काहीतरी करण्याची तळमळ सतत त्यांच्या मनी येत होती. म्हणूनच विष्णुशास्त्रींनी स्त्रियांची स्थिती सुधारण्याला प्रथम प्राधान्य दिले आणि त्यासाठीच आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले. स्त्रियांच्या न्याय्य हक्कांसाठी समाजातील सनातनी लोकांशी संघर्ष करण्याचीही तयारी त्यांनी ठेवली होती. त्यावेळीच्या समाजव्यवस्थेवर सनातन्यांचा जबरदस्त पगडा होता. त्यामुळे सनातन्यांच्या विरोधाला तोंड देणे हे समाजसुधारकांच्या दृष्टीने एक दिव्यच होते. बऱ्याच समाजसुधारकांना सनातन्यांनी आरंभिलेल्या छळापुढे हात टेकावे लागले होते. विष्णुशास्त्रींनी तर विधवा विवाहासारख्या स्फोटक प्रश्नांना हात घातल्यामुळे त्यांनाही सनातन्याविरूध्दच्या संघर्षात बराच त्रास सहन करावा लागला होता. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालण्यापर्यंत सनातनी मंडळींची मजल गेली होती. तरीही त्यांनी हाती घेतलेले आपले कार्य अर्धवट न सोडता अखेरपर्यंत समाजाशी लढा दिला. विष्णु शास्त्रीसर्वांगिण सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते होते. तसेच समाज सुधारण्याच्या कार्याची त्यांची व्याप्तीही खूप प्रचंड होती.

महाराष्ट्रातील विविध समाजसुधारकांनी स्त्रीप्रश्नांच्या संदर्भात कार्य केलेले आहे. आधुनिक महाराष्ट्राचे आद्य शिल्पकार आचार्य `बाळशास्त्री

जांभेकर` यांनी विधवा विवाह, स्त्रीशिक्षण, शिक्षण प्रसार, पुनर्विवाह पुरस्कार करणे अशी तत्कालीन समाजाला बंडखोरी वाटावी असे प्रयत्न केले. 'लोकहितवादी' अथवा `गोपाळ हरी देशमुख` यांनी पुनर्विवाहोत्तेजक मंडळी या नावाची संस्था स्थापन करून विधवा विवाहाचा पुरस्कार केला. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देणाऱ्या `दादोबा पांडूरंग तर्खडकर` यांनी सामाजिक जागृती आणि ज्ञान प्रसारणासाठी `ज्ञान प्रसारक सभा` स्थापन केली. अशातच विष्णु शास्त्री पंडितांनी एका विधवेशी पुनर्विवाह करून समाजाला मोठा आदर्श घालून दिला. म्हणजे स्त्री जातीच्या उन्नतीपुरतेच जरी विष्णु शास्त्री पंडितांनी आपले कार्यक्षेत्र मर्यादित केले असले तरी त्यांची दृष्टी अत्यंत व्यापक होती हे विसरता येत नाही. समाजजीवनाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक यासारख्या सुधारणांच्या विषयी त्यांना सारखीच तळमळ होती असे दिसते.`[२]

तसेच म. फुले व सावित्रीबाई फुले हे त्याकाळातील कर्ते सुधारक होते. तेदेखील त्यावेळी फक्त विचार मांडून थांबले नाहीत तर त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू करून प्रत्यक्ष कार्याला सुरूवात केली. विधवा पुनर्विवाह पुरस्कार, अनाथ बालक आश्रम सुरू करणे या गोष्टी त्यांच्यातील मोठेपणाच्या निर्देशकच होत्या. एकंदरच एकोणिसावे शतक मोठ्या  घडामोडीचे व बदलाचे गेले. त्यात काही चांगले व वाईट परिणाम झाले. मात्र, यात सर्वात महत्त्वाची म्हणजे समाजसुधारकांनी केलेल्या स्त्री जातीच्या सुधारणेसाठीच्या प्रयत्नांना थोडेफार का होईना पण यश आले. व स्त्रियांची परिस्थिती सुधारू लागली.

प्रकरण चारमध्ये विष्णु शास्त्री पंडित व त्यांचे समकालीन सुधारक यांच्या कार्याची माहिती व थोडक्यात विवेचन केले आहे. या विवेचनावरून महाराष्ट्रातील या थोर व निष्ठावंत समाजसुधारकांच्या कार्याचे श्रेष्ठत्व आपल्या लक्षात येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही यशापयशाची फिकीर न करता यांनी समाजहितासाठी केवळ आपल्या हाडाची काडे केली व समाजात परिवर्तन घडून आणले.

महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात राज्यकारभाराची सूत्रे एलफिन्स्टन, माल्कम यासारख्या कर्तबगार व मुत्सद्दी अधिकाऱ्याच्या हाती होती. त्यांनी मोठ्या दक्षतेने आणि दूरदर्शीपणाने इंग्रजी सत्तेचा जम बसवला. अशातच इंग्रजी सत्तेचा परिणाम सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर होऊ लागला. इंग्रजी राज्यकर्त्यांनी शिक्षण प्रसारावर भर देऊन शिक्षण संस्था व शाळा सुरू केल्या, सुरूवातीच्या काळात या कामात त्यांना ख्रिस्ती मिशनऱ्यांचेही सहकार्य लाभले. शिक्षण प्रसारामुळे महाराष्ट्रातील तरूणांची नवी पिढी पाश्चात्त्य शिक्षण व संस्कृती आणि आधुनिक विचारांच्या संपर्कात आले. ब्रिटिशांच्या भौतिक सुधारणांमुळे ज्ञानांची क्षितिजे उंचावण्यास मदत झाली, त्यामुळे येथील समाजात आधुनिक विचारांचे वारे जोराने वाहू लागले.

या परिवर्तनामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनात प्रचंड खळबळ माजली. व सुशिक्षित तरूण आपल्या धार्मिक व सामाजिक स्थितीकडे चिकित्सकदृष्टीने पाहू लागला. आपल्या समाजातील रूढी परंपरा, अनिष्ट चालिरीती, प्रथा, अंधश्रध्दा, भोळयासमजुती या सर्वांमुळे घडून आलेला नैतिक अध:पात याची जाणीव त्यांना झाली. या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याची गरज त्यांना वाटू लागली. अशा जाणिवा निर्माण झालेली आणि समाजसुधारणेची तळमळ लागून राहिलेली सुशिक्षित युवकांची नवी पिढी या काळात उदयास आली. यात दादोबा पांडुरंग, गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी), भाऊ महाजन, विष्णु शास्त्री पंडित, विष्णुबुवा ब्रह्मचारी, भाऊ दाजी लाड इत्यादीचा समावेश होतो. या सुधारकांच्या प्रारंभिक प्रयत्नामुळेच महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळीला चालना मिळाली. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रातील आद्यसुधारक असे म्हटले जाते.

विष्णु शास्त्री पंडितांचा चिकित्सक अभ्यास करीत असताना त्यावेळची परिस्थिती व त्या परिस्थितीत अनेकांनी केलेले वेगवेगळे प्रयत्न यांचा त्यांच्याशी संबंध आलेला दिसतो. समाजसुधारणेच्या अनेक कार्यात त्यांनी

एकत्रितपणे प्रयत्न केले तर काही ठिकाणी त्यांनी आपले विचार त्यासंदर्भात मांडलेले दिसतात. त्याशिवाय विष्णु शास्त्री पंडितांचा उल्लेख बऱ्याच समकालीन सुधारकांच्या चरित्रात आलेला दिसतो. म्हणूनच विष्णुशास्त्रींचा अभ्यास करत असताना त्यांचे विचार व कार्य एकाच पध्दतीचे असल्याचे जाणवते. समाज सुधारण्याच्या कार्यात सर्वांचे ध्येय जरी एक असले तरी विचार व कार्यपध्दती वेगवेगळ्या स्वरूपात पहावयास मिळते.

तसेच पाचव्या प्रकरणामध्ये विष्णु शास्त्री पंडितांच्या वांड्;मयीन कार्याचा उल्लेख केलेला आहे. त्यांनी एकोणिसाव्या शतकात विधवा विवाहाइतकेच समाजसुधारणेच्या अन्य अंगाकडे लक्ष देणे ते आपले पवित्र कर्तव्य मानत. त्यांनी लेखन, व्याख्यान, चर्चा आणि कीर्तन या चातुर्विध साधनांनी लोकसुधारणेचा मार्ग अवलंबविला होता. धर्मशास्त्रास धरून असलेले आपले प्रगल्भ व प्रागतिक विचार ते जनता जनार्धनापुढे `इंदुप्रकाश` साप्ताहिकातून जाहीर करत होते. त्यांनी चालविलेल्या स्वदेश हित संवर्धनार्थ कीर्तन प्रसंगी `पुष्पमाला` हा पद्यगुच्छ स्वयंस्फूर्तीने रचला.`[३] यातच त्यांचे कवी कीर्तनकार व लेखक हे गुण पहावयास मिळतात.

पंडितांची प्रागतिक मतांची शिकवण श्रृती, स्मृती, पुराणे यावर आधारलेली होती. तो कालखंड पहाता त्यांचे विचार समाजाला रूजण्यास व पचनी पडण्यास अनुकूल नव्हता. स्त्रीशिक्षण, स्त्री पुनर्विवाह, परदेशगमन, ब्राह्मण वर्गाशी ब्राह्मणोत्तरसमाजाचा समानतेचा व्यवहार, स्वदेशी वस्तूंचा प्रचार इ. त्यांचे उपदेश आज पसंत पडतील. परंतु त्याकाळात समाजाने त्याविचारांविरूध्द विरोधी भूमिका घेतली होती. अर्थात त्याकाळात त्यांच्या विचारांची समाजाला मदत झाली असती परंतु त्यांचे विचार समाजाच्या पचनी पडण्यास फार कालावधी गेला. त्याकाळात इंग्रजी शिक्षणाने अर्धवट शहाणे झालेले लोक फार होते. इंग्रजी भाषा, विद्या व विचार यांच्या परिचयानी या मंडळींची श्रध्दा स्वधर्मावरून उडून चालली होती. लोकांमध्ये इंग्रजी विद्येच्या मांडयाने डामडौल आणि व्यसने वाढली होती. हे अनिष्ट परिणाम

विष्णुशास्त्रींना मान्य नव्हते. त्यांचा ओढा सुरूवातीपासूनच लेखनाकडे होता. त्यांचे ग्रंथलेखा १८५४ पासून चमकू लागले.

त्याकाळात इतिहासाचे ज्ञान देण्याकरिता `हंटर व मरेकृत` पुस्तके प्रसिध्द होती. त्यापैकी मरेंच्या इंग्रजी ग्रंथाचे विष्णुशास्त्रींनी १८६१ मध्ये भाषांतर करून पुस्तक प्रसिध्द केले. त्या अगोदर त्यांनी नाना फडणीस यांची संक्षिप्त बखर १८५९ मध्ये प्रसिध्द केली. इंग्रजी भाषांतर करत असताना मुळातील मर्म न दवडता भाषा अगदी साधी सोपी व सफाईदार ठेवण्यात पंडित कुशल होते. म्हणूनच कै. न्या. रानडे हे १८६४ मध्ये लिहितात `एलफिन्स्टन`आणि `मरे` यांचा इतिहास व ग्रँड डफ यांच्या मराठी इतिहासाचे भाषांतर जे विष्णुशास्त्रींनी केले आहे त्याला वांड्;मयीन व गुणात्मक दर्जा आहे.`[४] रानड्यांच्या या वाक्यावरून पंडितांच्या लेखनाचा दर्जा आपल्या लक्षात येतो.

विष्णु शास्त्री पंडितांचा ओढा स्वदेश कल्याण व समाजहिताकडे होता. `आमच्या मित्रांनी अन्य प्रादेशिक विषयावर लिहीत बसण्यापेक्षा स्वदेशाच्या मनोरंजक गोष्टी आणि राजकर्त्यांच्या इतिहासाकडे लक्ष पुरवावे ते अधिक लाभदायक होईल.`[५] हे वाक्य त्यांच्याच एका अभिप्राय लेखनात आलेले आहे. म्हणजे भारतीयांनी आपल्याच देशाचा इतिहास लिहावा व संस्कृती जतन करून ठेवावी, असे त्यांना वाटत होते.

त्यांच्या वाड्:मयीन कार्यातून समाजहिताची व देशहिताची तळमळ जाणवते त्यांचे हे कार्य १८५४ पासून सुरू झाले ते १८७४ पर्यंत चालले. सुशिक्षित तरूणांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्यासाठी त्यांनी हे कार्य २० वर्षे अहोरात्र चालवले. पाश्चात्त्य संस्कृतीने व विचाराने ग्रासलेल्या लोकांना स्वधर्माची जाणीव करून देतांना त्यांचे हे साहित्य क्षेत्रातील योगदान खूपच मोलाचे ठरले.

त्यांनी आपल्या वाड्:मयीन गुणाचा उपयोग समाजाच्या सेवेसाठी केला. इंदुप्रकाशचे संपादक या नात्याने त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयावर लेखन केले होते. तसेच स्त्रियांच्या प्रश्नांसबंधित अनेक ग्रंथही त्यांनी लिहिले आहेत. त्यांच्या

सामाजिक, धार्मिक व साहित्यिक क्षेत्रातील लेखनामुळे समाजाला नक्कीच फायदा झाला असे म्हणता येईल. यातील काही ब्राह्मण  कन्या विवाह विचार, पुरूषसुक्त व्याख्या, विधवाविवाह, विधवोद्वाह विवेक, आर्य लोकांच्या प्राचीन व अर्वाचीन रीती हे प्रसिध्द ग्रंथ आहेत. त्याशिवाय हिंदुस्थानचा इतिहास, नाना फडणीस यांची संक्षिप्त बखर, तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा इ. पद्यात्मक पुस्तकेही त्यांनी लिहिली होती.`[६]

प्रकरण सहामध्ये विष्णु शास्त्री पंडितांचे सामाजिक विचार व कार्य याचे थोडक्यात विवेचन केले आहे. विष्णु शास्त्री पंडितांचा काळ हा पारतंत्र्याचा काळ होता. त्याकाळी समाजात ज्या वाईट चालिरीती परंपरा होत्या त्यांचा समाजावर परिणाम होत होता. त्याकाळात समाजातील दुर्बल अशा घटकांवर म्हणजे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा प्रश्न अतिशय गंभीर होता व या प्रश्नाकडे पंडितांनी आपले लक्ष केंद्रित करून समाजाच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. कारण समाज सुधारण्याच्या कोणत्याही कार्यात आपले सर्व सामर्थ्य एकवटल्याशिवाय केवळ शाब्दिक उपदेश लोकांना देऊन मतपरिवर्तन होणे शक्य नाही याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्त्री जातीच्या उन्नतीसाठी आपले शक्तीसर्वस्व वेचण्याचा निश्चय केला व लोकनिंदेची पर्वा न करता तो शेवटपर्यंत पाळला.

एकोणिसाव्या शतकात सनातन्यांचा प्रभाव जास्त होता. त्यांच्या विरोधाला तोंड देणे म्हणजे एक दिव्यच होते, अशा सनातन्यांसमोर सुधारक हात टेकत असत. विष्णुशास्त्रींनी तर विधवा विवाहासारख्या स्फोटक विषयाला हात घालून त्यांना आव्हानच दिले होते. असे असताना सनातन्यांनी त्यांच्यावर बहिष्कार घालण्याइतपत तयारीही केली होती. पण आपल्या कर्तव्यात त्यांनी तसूभरही  माघार न घेता आपले कार्य नेटाने पुढे चालवले व शेवटपर्यंत त्या परिस्थितीचा सामना करत राहिले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत यशापयशाची फिकीर न करता ज्यांनी समाजहितासाठी केवळ कर्तव्य बुध्दीने आपल्या हाडाची काडे केली. त्यांच्या

कार्याचा उगम जरी लहान असला तरी निष्ठा, धैर्य, त्याग चिकाटी इ. गुणांत त्यांची बरोबरी करतील असे मोजकेच लोक आहेत. इंग्रजी राजवटीत महाराष्ट्र देश अगदी थंड गोळा होऊन पडला असताना सुधारणेच्या चळवळीला याच सुधारकांनी चालना दिली.

आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचा बारकाईने विचार करून लोकजागृतीचे कार्य त्यांनी प्रथम हाती घेतले. आपल्या समाजाची कुवत त्यांना माहिती होती. इंग्लंडसारख्या प्रगत व बलाढ्य राष्ट्राशी आपली गाठ आहे व त्यात आपला समाज, अनिष्ट रूढी परंपरेत गुंतला आहे याची जाणीव त्यांना होती. समाजाच्या सुसंघटित कार्याशिवाय नुसत्या सुधारणेच्या कल्पना करून त्यात सुधारणा होणार नाही ही गोष्ट कळून चुकली होती. म्हणूनच त्यांनी जुन्या व नव्या विचारांचा समन्वय घालण्यासाठी आपल्या श्रृती, स्मृती व पौराणिक विचारांच्या आधारे स्त्री जातीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपली शक्ती खर्च केली व त्याची जाणीव समाजालाही करून दिली.

एकोणिसाव्या शतकातील सुशिक्षित विचारवंताचे अत्यंत सर्वच बाबतीत पुरोगामी असे विचार एका बाजूला तर दुसरीकडे परंपरा अभिमान धरणारे शास्त्री पंडितांचा वर्ग यांच्यामध्ये रूढी व परंपरेच्या सनातनी शास्त्राच्या चौकटीत राहूनच विष्णु शास्त्री पंडितानी समाज सुधारणेचे प्रयत्न केले. पण एकोणिसाव्या शतकातील सुशिक्षित सुधारक विचारवंताच्या वेगवेगळ्या मतांच्या गलबल्यांमुळे पंडितांचे काहीशे वेगळे वाटणारे विचार समाजाच्या पचनी पडण्यास बराच कालावधी गेला. तरीही समकालीन विचारवंताच्या तुलनेत विष्णु शास्त्री पंडितांचे वेगळेपण नेहमीच जाणवते. हे त्यांचे वेगळेपण स्वयंस्फूर्त विचारामुळे व ज्या सद्सद्विवेक बुध्दीच्या जोरावर त्यांनी ते सडेतोडपणे मांडले. त्या काळात खरा धर्म व धर्मातील चालिरीती समजेनाशा झाल्या होत्या. अनेक बाह्यतकारी गोष्टींचे अवडंबर धर्मात माजले होते. त्या काळात आपल्या धर्मातील योग्य विचार व संस्कृतीचे शुध्द स्वरूप लोकांपुढे मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला व सदैव स्वजन, स्वभाषा व स्वदेश यांच्याच

विचारांनी प्रेरित होऊन शेवटपर्यंत कार्य केले. म्हणूनच एकोणिसाव्या शतकात त्यांनी मांडलेले विचार हे श्रेष्ठ दर्जाचे विचार होते हेच त्यांचे वेगळेपण आहे.

**प्रमुख निष्कर्ष -**

१) विष्णू शास्त्री पंडीतांनी केलेला स्वतःचा पुर्नविवाह समाजसुधारकांसाठी एक आदर्श आहे.

२) विष्णु शास्त्री पंडितांच्या अंगी असणाऱ्या शुध्द आचार, शुध्द विचार, जीवन, त्याग व स्वाभिमान या गुणांच्या मिश्रणाने त्यांचे व्यक्तिमत्त्व हे इतरांपेक्षा वेगळे जाणवते.

३) विष्णु शास्त्री पंडितांची साहित्यिक क्षेत्रातील कामगीरी अविस्मरणीय व आजही समाजोपयोगी आहे.

४) त्यांची लेखणी अतिशय मार्मिक, साधी व सोपी अशा प्रकारची होती.

५) विष्णु शास्त्री पंडितांनी सुधारणेसाठी लेखन, व्याख्यान चर्चा आणि कीर्तन या साधनांचा वापर केला तो आजही विचारात घेण्याजोगा आहे.

६) पंडितांचे साहित्य इतरांपेक्षा वेगळे असून त्यात स्वजन, स्वभाषा व स्वदेश यासाठीचे वेगळेपण पहावयास मिळते.

७) विष्णु शास्त्रींनी केलेले वाद - विवाद हे त्या त्या काळात स्त्री - उन्नतीसाठी प्रेरणादायी ठरले.

८) विष्णु शास्त्री पंडितांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान समाज उपयोगी आहे.

९) पंडितांचे धैर्य, निष्ठा, त्याग व चिकाटी हे गुण समाजाने कृतीत आणण्यासारखे आहे.

१०) पंडितांनी केलेले स्त्री - उध्दाराचे कार्य हे आजच्या काळातही समाजाला प्रेरणा देणारे आहे.

११) स्त्री पुनर्विवाहाचा त्यांनी केलेला पुरस्कार हा अत्यंत नाजुक विषय असून तो स्त्रियांसाठी वरदानच ठरला आहे.

१२) विष्णू शास्त्री पंडितांचे कवी, कीर्तनकार हे गुण समाजासाठी मार्गदर्शक ठरतील.

१३) विष्णु शास्त्री पंडितांनी केलेले 'इंदुप्रकाश' साप्ताहिकासाठीचे कार्य किंवा वर्तमानपत्रासाठीचे कार्य हे आजच्या संपादकीय वर्गाला निश्‍चितच मार्गदर्शक ठरेल.

**संदर्भसूची**


१) किर धनंजय, `यांनी इतिहास घडविला,` पृष्ठ - २७.

२) श्री. पंडित स., `विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे चरित्र`, पृष्ठ - ९२

३) कित्ता; पृष्ठ - ३

४) कित्ता; पृष्ठ - ९

५) कित्ता; पृष्ठ - १०

६) पाटील व्ही. बी., `१९व्या शतकातील महाराष्ट्रामधील समाज सुधारणेचा इतिहास`, पृष्ठ - १३८

## संदर्भग्रंथ सूची

**१) प्राथमिक साधने -**

**अ) अप्रकाशित साधने**

**ब) प्रकाशित साधने -**


१) खोले विलास (संपादक), स्त्री पुरुष तुलना (यथामुल संशोधित आवृत्ती), प्रतिमा प्रकाशन, पुणे - १९९७.

२) गोखले पु. `विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि त्यांचे विचारधन`, नवकमल प्रकाशन, प्रथमावृत्ती-१९९६.

३) गोडबोले परशुराम बल्लाळ यांचे, `पार्वती परिणय नाटक`, प्राकृत भाषांतर विष्णु शास्त्री पंडितांनी पुणे येथे इ. स. १८६९ मध्ये तपासून दक्षिणा प्रैस कमीटीच्या अध्यक्ष यांच्या परवानगीने मुंबईत इंदुप्रकाश छापखान्यात छापले.

४) गोंधळेकर श्रीधर, `विधवा विवाहाच्या अशास्त्रतेविषयी निर्णयपत्र`, श्री जगहरू शंकाराचार्य स्वामी मठकरविर व संकेश्वर यांनी वे. शा. स. रा. रा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर व विष्णु शास्त्री पंडित यांच्या वादाअंती पुणे येथे केले ते `रावजी श्रीधर गोंधळेकर` यांनी जगध्दितेच्छू छापखान्यात छापून प्रसिध्द केले. ता. १७ एप्रिल १८७०.

५) गोळे महादेव शिवराम, हिंदुधर्म आणि सुधारणा, प्रकाशक - महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, पुणे - १९२७.

६) नरके हरि, फडके य.दि. (संपादक), महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, प्रकाशक - महात्मा जोतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - १९८२.

७) पद्मनजी बाबा, यमुनापर्यटन अथवा हिंदुस्थानातील विधवांच्या स्थितीचे निरुपण, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर - २००३.

८) पाटील पंढरीनाथ सीताराम, महात्मा जोतिराव फुले यांचे चरित्र, पुर्नमुद्रन, नाग-नालंदा प्रकाशन - १९२७.

९) पंडित श्रीधर सखाराम, `विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे चारित्र`, पुणे पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६/३ येथे आर्यभूषण छापखाण्यात रा. रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिले व विधवा विवाह मंडळ पुणे यांनी पुणे येथे प्रसिध्द केले. - १९३६.

१०) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, `तुकाराम बाबांची अभंगाची गाथा`, मुंबई सरकारच्या आश्रयाने इ.स. १८६९-७३ साली इंदुप्रकाश छापखान्यात दोन भागात प्रसिध्द केली.

११) पंडित विष्णु शास्त्री, `स्त्री गायन संग्रह अथवा बायकांची गाणी`, रा. रा. सखाराम परशुराम शास्त्री पंडित, मॅनेजर इंदुप्रकाश यांनी इंदुप्रकाश छापखान्यात त्यांच्या मृत्यू पश्चात छापून पसिध्द केला. मुंबई १८८२.

१२) पंडित विष्णु शास्त्री, `स्त्री पुनर्विवाह`, सशास्त्र असल्याविषयी पुणे व नाशिक येथे दिलेली व्याख्याने, पुनर्विवाहोत्तेजक मंडळींनी मुंबईत इंदुप्रकाश छापखान्यात छापून प्रसिध्द केले.

१३) पंडित विष्णु शास्त्री, `हिंदुस्थानचा इतिहास`, मरेकृत इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर मेहरबान डायरेक्टर ऑफ इन्स्त्रक्शन यांच्या हुकुमावरून, मुंबईत छापन्यात आले. सन १८६१.

१४) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, `लघुनिबंधमाला`, दक्षिणा प्रैस कमिटीचे अध्यक्ष यांच्या आज्ञेवरून इंदुप्रकाश छापखान्यात छापले. सन १८७६.

१५) पंडित विष्णु शास्त्री, `संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश`, मुंबई २१ सप्टेबर १८६५.

१६) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, `विधवोद्वाहविवेक`, मुंबई, इंदुप्रकाश छापखाण्यात छापून प्रसिध्द केले. सन-१८६८.

१७) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, `विधवाविवाह`, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या बंगाली ग्रंथाचे मराठीत भाषांतर. मुंबई, इंदुप्रकाश छापखाण्यात छापले. दु. आ. १८७०.

१८) पंडित विष्णु परशुरामशास्त्री, संस्कृत क्रम बोधित्या श्लोकेतिहासात्मको बालपाठस्तृतीयो भाग, इंदुप्रकाश छापखाना - १७८९.

१९) महात्मा जोतिराव फुले, शेतकऱ्यांचा आसुड, ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे, मुंबई.

२०) माडगावकर गो.ना., मुंबई वर्णन, प्रकाशक - इंदुप्रकाश छापखाना, मुंबई - १८६३ दुसरी आवृत्ती - १९६१.

२१) मालशे स.गं., विधवा विवाह चळवळ (१८००-१९००), प्रकाशक - सौ. कमलिनी भनसाळी, कुलसचिव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई, प्रथमावृत्ती - १९७८.

२२) मा. राधाकृष्णन, हिंदु धर्माची समीक्षा, (प्रकाशक - माहिती उपलब्ध नाही).

२३) मुरंजन सुमंत, पुरोहित वर्गसर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास, प्रकाशक, श्रीपाद नानजकर, चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई - १९७३.

२४) लोकहितवादी, `शतपत्रे` , संपादक - टिकेकर ग. रा. पुणे-१९६३.

२५) वाळिंबे रा. रा. `१९व्या शतकातील महाराष्ट्राचे पुनर्घटन`, प्र. भा. काळे, प्रतिभा मुद्रणालय सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती-१९६२.

२६) शिंदे ताराबाई, स्त्री पुरुष तुलना, सुधीर प्रकाशन २००१.

२७) सहस्त्रबुध्दे पु.ग. (संपा), लोकहितवादींची शतपत्रे, कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती - १९६०.

२८) ज्ञानोदयलेखनसारसूची, प्रकाशक, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती खंड - १, मुंबई १९८८.

२९) ज्ञानोदयलेखनसारसूची, प्रकाशक, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती खंड - २, मुंबई १९८८.

**ब) वर्तमानपत्रे/साप्ताहिके -**

१) इंदुप्रकाश, २ जानेवारी १८३२, १३ जुलै १८६३, २२ एप्रिल १८६७.

२) वर्तमानपत्रदीपिका, ९ एप्रिल १८५३, २१ जानेवारी १८६०.

३) सुबोधपत्रिका, ४ मे १८७३.

४) ज्ञानसिंधु, मार्च ११, १८४४.

५) ज्ञानप्रकाश, ३१ मार्च, १८५०, २६ मे १८५०, १४ जुन १८५०, २४ सप्टेबर १८५०.

६) ज्ञानचक्षु, ३ जानेवारी १८६६.

**२) दुय्यम साधने -**

**अ) मराठी -**


१) आठवले सदाशिव, `इतिहासाचे तत्त्वज्ञान`, प्राज्ञपाठशाला मंडळ, वाई, द्वितीय आवृत्ती -१९८६.

२) ओक प्रमोद, `एलफिन्स्टन`, दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०, प्रथमावृत्ती २७ मार्च १९९०.

३) बगाडे उमेश, महात्मा जोतिराव फुले, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व वेद प्रकाशन, २०१०.

४) बकाणे लाया, 'निबंधमाला'कार विष्णु शास्त्रीचिपळुणकर, (महाराष्ट्र चरित्र-ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व-वेद प्रकाशन - २०१०.

५) कीर धनंजय, `लोकमान्य टिळक आणि राजर्षी शाहू महाराज`, एक मूल्यमापन रघुवंशी प्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट १९९४.

६) केळकर नरसिंह चिंतामण, `लो. टिळकांचे चरित्र`, (खंड-१) केशवरावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु छापखाना ५०७ शनिवार पेठ, पुणे. १९२३.

७) खापर्डे डी.के., राष्ट्रपिता जोतिराव फुले, (समग्र वाङ्:मय भाग - ४), प्रकाशक डी.के. खापर्डे मेमोरियल ट्रस्ट, मुंबई - १९९०.

८) खोचीकर वि.शि. प्रा. सौ. केळकर उज्ज्वला (संपा), जिल्हा स्त्री शिक्षणाची वाटचाल आणि सार्वत्रिक शिक्षण (इ.स. १९७६ ते १९५०) बाबासाहेब आपटे जन्म शताब्दी प्रकाशन, भारतीय इतिहास संकलन समिती, महाराष्ट्र, पुणे - २००४.

९) गोखले द. न. `चरित्रचिंतन`, मौज प्रकाशन, गृह मुंबई, प्रथम आवृत्ती २०००.

१०) जाधव रा. ग., `सांस्कृतिक मुल्लेवेध`, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र. आ. नोव्हेंबर १९९२.

११) जोशी अ. म. `चरित्र आत्मचरित्र`, स्नेहवर्धन पब्लिसींग हाउस पुणे, तृतीय आवृत्ती १९९९.

१२) जोशी अरूण व इतर, `ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत`, य. च. मु. वि. नाशिक, प्र. आ. २००१.

१३) देशमुख शारदा, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री-जीवन, नेहरु सामाजिकशास्त्र विद्यास्थान पदव्युत्तर विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, प्रथमावृत्ती - १९७३.

१४) पवार जयसिंगराव, डॉ. जाधव रमेश, (संपा), निवडक विजयी मराठा, प्रकाशक - विजय मराठा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९९३.

१५) पाध्ये प्रभाकर, श्री. रा. टिकेकर, `आजकालचा महाराष्ट्र`, प्रकाशन एम. एन. कुलकर्णी, भारत गौरव ग्रंथमाला, कर्नाटक हाऊस चिराबाजार, मुंबई नं.-२.

१६) पाटील व्ही. बी., `महाराष्ट्रातील समाजसुधारक व थोर भारतीय विचारवंत`, के. सागर पब्लिकेशन .

१७) पाटील व्ही. बी., `एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास`, के. सागर पब्लिकेशन, प्रथमावृत्ती - २००४.

१८) पाटील व्ही.ए., आचार्य बाळशास्त्री जांभेकर, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व वेद प्रकाशन - २०१०.

१९) पाटकर विवेक, संशोधन मार्गावरील प्रवास, मुद्रक - दि पॅकेज गिरगाव, मुंबई - २००७. E-Book आवृत्ती - २००८.

२०) फडके य. दि., `विसाव्या शतकातील महाराष्ट्र`, श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार पेठ, पुणे-३०, प्रथमावृत्ती ३० जानेवारी १९८१ - (खंड-१)

२१) फडके य. दि. `विसाव्या शतकातील महाराष्ट्र`, श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार पेठ, पुणे-३०, प्रथमावृत्ती १५ मार्च १९८१ - (खंड-२)

२२) फडके य.दि.`व्यक्ती आणि विचार`,श्री विद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टो. १९८५

२३) भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, प्रकाशक, भारतीय इतिहास अनुसन्धान परिषद, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती - १९७६.

२४) भावे वा.कृ., महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती - १९३५.

२५) भिडे, पाटील एन. डी., थोरात डी. एस., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास`, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ऑक्टोबर, २००५.

२६) भिडे जी.एल., प्रा. परित एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास (१८१८ ते १९५०), फडके प्रकाशन, कोल्हापूर - २०१२.

२७) भोले भास्कर लक्ष्मण (संपा), एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड- २), प्रकाशक - साहित्य अकादमी, प्रथमावृत्ती - २००६.

२८) मालशे स. ग. `शोध निबंधाची लेखन पदधती`, लोक वाङ्;मय गृह प्रकाशन, द्वितीय आवृत्ती २००६.

२९) महाजन, टी.टी., मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन प्रकाशक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, - २००४.

३०) महाजन टी.टी., प्राचीन भारतातील स्त्री जीवन, प्रकाशन - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - २००४.

३१) महाजन, टी.टी., प्राचीन भारतातील स्त्री-जीवन प्रकाशक - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - २००४.

३२) मालसे स. ग., `शोध निबंधाची लेखनपध्दती`, सुधारित आवृत्ती, स. ग. मालसे, लोकवाङ्;मयगृह, द्वि. आ. सप्टेबर २००६.

३३) मोरजे गंगाधर `इतिहास आणि लोकसाहित्य`, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, प्रथमावृत्ती १९९९.

३४) मंजुळ वा.ल., प्राध्याविद्या-विशारद, डॉ. रा.गो. भांडारकर, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व वेद प्रकाशन - २०१०.

३५) यादव आनंद, `आत्मचरित्र मीमांसा`, मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे, प्रथमावृत्ती फेब्रुवारी १९९८.

३६) राऊत गणेश व प्रा. राऊत ज्योती, `महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास`, डायमंड प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती-सप्टेबर, २००५.

३७) रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा-एकोणिसावे शतक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, मार्च - २००५.

३८) सरदार गं भा. `महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी`, सुनंदा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती -१९४१ द्वितीय आवृत्ती -१९५१.

३९) सरदार गं.बा., रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा, प्रकाशक - पां.स. सावंत, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे, प्रथमावृत्ती - १९७३.

४०) सहस्त्रबुद्धे पु. ग., 'महाराष्ट्र संस्कृती ', कॉन्टिनेण्टल प्रकाशन विजय नगर पुणे. प्र. आ. -१९७९

४१) सुर्वे गजानन, `धनंजय किरांचे अप्रकाशित लेख`, गजेंद्र रघुवंशी प्रकाशन.

४२) साळुंखे आ.ह., हिंदु संस्कृती आणि स्त्री, प्रकाशक - लोकवाङ्:यम गृह मुंबई, प्रथमावृत्ती - १९८९.

४३) सोनी नी.वि., एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील तथाकथित प्रबोधनाचे स्वरुप, लोकमान्य टिळक व्याख्यानमाला, पुष्प दुसरे, टी.म.वि.पुणे प्रथमावृत्ती, जुलै - १९८१.

४४) स्वामी व्ही.एन, महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्याभारतीय प्रकाशन, लातूर - २०११.

४५) सिरसीकर व. मं., `आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण`, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००१.

४६) गाठाळ एस.एस., भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २०१३.

४७) गाठाळ एस.एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, (इ.स. १८१८-१९६०), कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती - २०१३.

४८) दीक्षित राजा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती - २००९.

४९) दिघे पी.डी., महाराष्ट्रातील सामाजिक सांस्कृतिक चळवळ, मुद्रक - वरद ऑफसेट कोल्हापूर - २०१२.

५०) शिरगावकर, शरावती, डॉ. परचुरे चिं.ना., डॉ. कामेरकर आणि, श्रीमती आपटे उर्मिला, (संपादित) स्त्रीजीवनविषयक स्थित्यंतर मुंबई परिसर (इ.स. १८७६ ते १९५०), भारतीय इतिहास संकलन समिती, मुंबई, - १९९२.

५१) ठाकुर अरुण, शिकवण्यायोग्य काय आहे, आनंद निकेतन, नाशिक - २००८.

५२) नेवाळकर अमला, समाजपुरुष जगन्नाथ शंकर शेट (महाराष्ट्र चरित्र-ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व-वेद प्रकाशन - २०१०.

५३) जामखेडकर अ.प्र., समाजधुरीण, डॉ. भाऊ दाजी लाड, (महाराष्ट्र चरित्र-ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व-वेद प्रकाशन - २०१०.

५४) जोशी अरुण, लोकहितवादी, गोपाळ हरि देशमुख, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व वेद प्रकाशन, २०१०.

५५) जैन न.म., समाजचिंतक, विष्णुबुवा ब्रह्मचारी , (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व वेद प्रकाशन - २०१०.

५६) जाधव माणिक ल., महिला सबलीकरण, प्रकाशक प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे - २००९.

५७) दुभाणी अरुणा, समाजसुधारक, दादोबा पांडुरंग तर्खडकर,(महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच),श्री. गंधर्व वेद प्रकाशन - २०१०.

५८) टिळेकर अरुण, न्यायमूर्ती, महादेव गोविंद रानडे, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री. गंधर्व वेद प्रकाशन - २०१०.

५९) लिमये पुष्पा, 'सार्वजनिक काका', गणेश वासुदेव जोशी, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच) श्री. गंधर्व वेद प्रकाशन - २०१०.

**ब ) नियतकालिके व इतर -**

१) करांडे शोभा (संपादक), सगुणा, सगुणा चॅरिटेबल स्ट्रस्ट, पुणे - २०१४.

२) पानसे रमेश (संपा), ग्राममंगल शिक्षणवेध, प्रकाशक - ग्राममंगल संस्था, मुंबई, वर्ष पहिले, अंक नववा, मार्च २००९.

**क) अप्रकाशित प्रबंध -**

१) 'विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचे जीवन व कार्य एक अभ्यास', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, एम.फील. लघुशोधप्रबंध, संशोधक प्रवीण पिसे, सन - २००९.

२) 'विष्णुबुवा ब्रह्मचारी व त्यांचे विचारधन', सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, संशोधक अरुणा मोरे, पीएच.डी. करिता सादर, सन - २०१४-१५.

# परिशिष्टे

## परिशिष्ट-१

## जीवनपट

| | | | |
|---|---|---|---|
| १) | इ.स. १८२७ | - | विष्णु शास्त्री पंडितांचा जन्म. |
| २) | इ.स. १८३७ | - | पुणे येथे शिक्षणासाठी दाखल |
| ३) | इ.स. १८४५ | - | इंग्रजी शिक्षणास सुरूवात |
| ४) | इ.स. १८४८ | - | ट्रान्सलेशन एक्झीबीशनची सरकारी नोकरी |
| ५) | इ.स. १८५४ | - | विष्णुशास्त्रींची ग्रंथ लेखणास सुरूवात |
| ६) | इ.स. १८५९ | - | नाना फडणीस यांची बखर प्रसिध्द केली |
| ७) | इ.स. १८६१ | - | मरेकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचे भाषांतर करून प्रसिध्द केले. |
| ८) | इ.स. १८६३ | - | `इंदुप्रकाश` साप्ताहिकाचे उपसंपादक |
| ९) | इ.स. १८६४ | - | शिक्षण सेवेतून निवृत्ती घेऊन मुंबईत पदार्पन |
| १०) | इ.स. १८६५ | - | कोकणस्त ब्राह्मण जातीतील विवाहात कन्यादान |
| ११) | इ.स. १८६५ | - | पुनर्विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना |
| १२) | इ.स. १८६८ | - | बाँम्बे संस्कृत शिरीजपैकी तीसरे पुस्तक प्रकाशित |
| १३) | इ.स. १८६९ | - | `तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा` प्रसिध्द केली. |
| १४) | इ.स. १८७० | - | पुणे येथील कसबा पेठेत भाऊसाहेब दीक्षितांच्या वाड्यातील वाद (विष्णु शास्त्री पंडित व नारायणाचार्य गजेंद्रगडकर) |
| १५) | इ.स. ६ नोव्हे.१८७२ | - | पुणे येथे भाऊसाहेब नातू यांच्या दिवाणखान्यात स्वदेश कल्याणावर कीर्तन |

| | | | |
|---|---|---|---|
| १६) | इ.स. १८७४ | - | च्या सुमारास विष्णुशास्त्रींच्या पहिल्या पत्नीचा मृत्यू व २१/०४/१८७४ रोजी मुंबई येथे पोलीस कोर्टात मॅजिस्ट्रेट यांच्या समोर लग्नापूर्वीचा करार |
| १७) | १४ डिसें. १८७४ | - | विष्णु शास्त्री पंडितांचा कुसुबाईशी यथाशास्त्र पुनर्विवाह. |
| १८) | ०५/०३/१८७५ | - | उपयुक्त ज्ञान प्रसारक सभेपुढे स्त्रियांचे अधिकार यावर व्याख्यान |
| १९) | इ.स. २९/४/१८७६ | - | विष्णु शास्त्री पंडितांचा मृत्यू |

**सौजन्य**

**पंडित श्रीधर सखाराम यांनी लिहिलेले विष्णू परशुराम शास्त्री पंडीत यांचे चरित्र.**

## परिशिष्ट-२

## विष्णू परशुरामपंडीत यांचे छायाचित्र



**सौजन्य**

**पंडित श्रीधर सखाराम यांनी लिहिलेले विष्णू परशुराम शास्त्री पंडीत यांचे चरित्र, पृष्ठ क्र. - ४**

## परिशिष्ट-३

## विधवा विवाहाच्या अशास्त्रतेविषयी निर्णयपत्र

हे निर्णय पत्र श्री जगद्‌गुरु शंकराचार्य स्वामी मठ करवीर व शंकेश्वर यांनी वे. शा. संपन्न रा.रा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर व विष्णू परशुराम शास्त्री पंडित या दोघांच्या वादाअंती केले ते धर्माभिमानी सहकार्यांस कळविण्याकरिता पुणे येथे रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी आपल्या जगद्धितेच्छु छापखान्यात छापून प्रसिद्ध केले.

(मिती चैत्र वै २ रविवार शके १७९२, ता. १७ एप्रिल १८७०.)

**वादाचा सारांश -**

पंडितांनी दि. १५ जून १८६९ रोजी मुंबईस मोरोबा कान्होबा यांच्या वाड्यात `प्रभाकरभट परांजपे` यांची कन्या वेणुबाई हिचा पुनर्विवाह मोठ्या थटामाटात घडवून आणला. या विवाहात नियोजित वर पांडुरंग विनायक करमकर हे होते. समारंभाच्या कुंकुमपत्रिकेवर गोपाळ हरि देशमुख, विष्णु परशुराम पंडित, विष्णु मोरेश्वर भिडे, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, विष्णु परशुराम रानडे, महादेव गोविंद रानडे, जनार्दन सखाराम गाडगीळ अशा सात वजनदार पुढाऱ्यांच्या सह्या होत्या.

त्यावेळी ह्या समारंभास मुंबईतील बरेच प्रमुख लोक उपस्थित होते. वधुवरांच्या आहेराची रक्कम ही जवळजवळ तीन हजारापर्यंत होती. शिवाय पंडितांनी पुनर्विवाहोत्तेजक मंडळाच्या फंडातुन दोन हजार रूपये पुनर्विवाहीत स्त्रीच्या नांवे बँकेत ठेवले होते. हा समारंभ त्यावेळी यशस्वी झाला. परंतु त्यामुळे विरोधकांचे चांगलेच पित्त खवळले व त्यांनी बहिष्काराचे रामबाण अस्त्र बाहेर काढले.

त्यावेळी पुराणमताभिमानी लोकांनी मुंबई, पुणे या ठिकाणी सनातनी पंडितांच्या सभा भरविल्या होत्या. त्यात पुनर्विवाहाला पाठिंबा देणाऱ्या

पुढाऱ्यांना बहिष्कृत करण्याचा निर्णय झाला होता. प्रभाकर शिवराम भावे व कृष्णशास्त्री साठे यांनी मुंबईत 'हिंदू धर्म व्यवस्थापक सभा ', स्थापन केली होती. व तिच्या मार्फत दर रविवारी जाहीर बैठका बोलावून पुनर्विवाहाचे खंडण करण्याचे काम केले जात असे. त्यावर 'आमचे मत ज्यांना मान्य नाही त्यांच्याशी वाद करण्यास आम्ही तयार आहोत', असे विष्णु शास्त्री पंडितांनी सनातनी पंडितांना सांगितले. त्यावेळी विष्णु शास्त्री पंडित व नारायणाचार्य गजेंद्रगडकर यांच्यात पुणे येथे या विषयावर १७ एप्रिल १८७० रोजी वाद झाला. त्या वादाच्या अंती एक निर्णयपत्र श्री. जगद्‌गुरु शंकराचार्य स्वामी मठकरवीर व संकेश्वर यांनी प्रसिध्द केले होते. ते विधवा विवाहाच्या अशास्त्रतेविषयीचे निर्णय पत्र होय.

(सोबत हे निर्णय पत्र जोडलेले आहे.)

## विधवा विवाहाच्या अशास्त्रतेविषयी निर्णयपत्र

श्री·

# विधवा विवाहाच्या अशास्त्रते विषयीं निर्णयपत्र·

हें पुस्तक

श्रीजगद्गुरु शंकराचार्यस्वामी·

मठ करवीर व संकेश्वर

58088 यांणीं

वे· शा· संपन्न रा· रा· नारायणाचार्य गजेंद्रगडकर

व

विष्णु परशुराम पंडित

या उभयतांच्या वादा अंतीं

केलें तें

धर्माभिमानी सच्छिष्यांस कळण्या करितां

आज्ञेवरून

पुणें येथें

रावजी श्रीधर गोंधळेकर याणीं आपले जगद्धितेच्छु छाप०

छापून प्रसिद्ध केलें

मिति चैत्र वद्य २ रविवार शके १७९२

ता· १७ एप्रेल सन १८७०

किंमत २ आणे·

सौजन्य -

डेक्कन कॉलेज, ग्रंथालय येरवडा, पुणे.

# श्री शंकर



## विधवा विवाहाच्या अशास्त्रते विषयीं निरणयपत्र.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यश्रीऋष्यशृंगपुर षट्दर्शनसंस्थापकश्रीकमलानिकेत करवीर सिंहासनेश्वरश्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्या शंकर भारती करकंजोद्भव श्री विद्यानरसिंह भारती स्वामी याणीं शके १७९२ प्रमोदनाम संवत्सरे चैत्र शुक्ल ९ रविवारीं शहर पुणे मुक्कामीं सारांश केला ऐसा जे ब्राह्मण ज्ञातींत विधवा विवाह मुंबई शहरांत व त्या नजिक जाहले त्याजविषयीं वैदिक व शास्त्री व सरदार गृहस्थ मंडळीची सभा शहर पुणें येथें होऊन निर्णय जाहला तो:—

विष्णु परशुराम पंडित शास्त्री याणीं विधवा विवाह करण्यास शास्त्राधार आहे ह्मणून वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्धि केली त्याजवरून मुंबई येथें हिंदुधर्मव्यवस्थापक मंडळीची सभा स्थापन होऊन त्याणीं विष्णु परशुराम यांस शास्त्र प्रतिपादन करण्यास येण्या विषयीं वारंवार कळविलें असतां प्रथम न येऊन विधवा विवाह होण्याचे पूर्वीं दोन दिवस सभेंत येऊ